
तूफान

बूमरँग

(भाग -२)

बाबा कदम

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.®
२५१ क, शनिवार पेठ, पुणे -४११०३०

बुमरँग (भाग २)
Boomrang (Part - I)

प्रकाशक
राजीव बर्वे
मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

website: www.diliprajprakashan.in
email: info@diliprajprakashan.in

© सौ. कुमुदिनी वीरसेन कदम
‘आनंद’, बालक मंदिराजवळ,
ताराबाई पार्क,
कोल्हापूर

नवीन आवृत्ती : १५ डिसेंबर २०११
Ebook: July 2020
प्रकाशन क्रमांक : ११६१

मुद्रक :
गिरिश जोशी
पद्मरेखा आर्टस्
१४६८, सदाशिव पेठ, पुणे - ४११००३

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

२२

भवानीनगरमधील सरदार-जहागीरदारांचा हा वर्ग स्वत:ला उच्चवर्णीय अन् खानदानी समजतो; अन्य लोकांना कनिष्ठ मानतो. रोटीबेटीचे व्यवहार त्यांच्या-त्यांच्यातच घडायचे. पूर्वजांच्या शौर्याच्या भांडवलावर मिशांना पीळ देत हे सरदार लोक दारू, जुगार आणि रखेल्या यांच्यात रममाण व्हायचे. आदरानं नतमस्तक व्हावं असा एकहीजण त्यांच्यात शोधून मिळत नव्हता. एखाददुसरा निर्व्यसनी असला तरी घराण्याचा बडेजाव टिकवण्यासाठी प्रचंड खर्च करून तोही कर्जाच्या भारानं वाकलेला असे.

भवानीनगरच्या महाराजांनी मला फुटबॉल टीमचा कप्तान केलं. त्यानंतर मला रत्नापूरला पाठवलं, यामुळं महाराजांच्या भोवती घुटमळणाऱ्या या सरदार-जहागीरदारांच्या पोटात दुखायला लागलं. रत्नापूरच्या महाराजांचं कारस्थान उलटवून मी तिथून पळून आलो, तेव्हाही भवानीनगरच्या या सरदार मंडळींनी माझ्यावर काही आरोप करायला कमी केले नव्हते. पुढे मी सैन्यात गेलो आणि प्रथम भेटीच्या वेळी महाराजांना भेटायला वाड्यावर गेलो, त्या वेळी सैनिक अधिकाऱ्याच्या वेशात मला पाहून कित्येकांनी नाकं मुरडली होती. आपल्या जातिबांधवांव्यतिरिक्त कोणाचाही उत्कर्ष त्यांना पहावत नसे. या लोकांच्याविषयी माझ्याही मनांत एक चीड होती आणि या चीडेपोटी आज मी त्यांच्याशी फ्लश खेळायला बसलो होतो.

प्रथम आठ-दहा डाव हरलो. पण हरत असताना पत्त्यांना नखानं खुणा करायचं काम सुरूच होतं. डोळ्याला लावलेला चष्म्याच्या त्या 'मॅग्निफाइंग' पॉइंटसमधून मला सर्व महत्त्वाच्या पत्त्यांवर खुणा केलेल्या स्पष्ट दिसू लागल्या. आणि मग मी एकेकाला गंडवायला सुरुवात केली. दुसऱ्याच्या हातातील 'ट्रायो' किंवा 'सीक्वेन्स' भारी की हलका मला चटकन् ओळखता येऊ लागले आणि मी चाल वाढवत राह्यलो. दुसऱ्याच्या हातातील पत्त्यांचा अंदाज लागल्यामुळे कोण उगाच फालतू पानांवर खेळतो आहे, कोणाजवळ खरोखरच भारी पत्ते आहेत, याचा अंदाज येऊ लागल्याने मी त्या सर्वांना पुरून उरणार हे नक्की होतं, आणि शेवटी झालंही तसंच!

एकएक 'सरकार' 'बँकरप्ट' होऊन बाजूला होऊ लागले. कोण हजार, तर कोणी सहा हजार गमावून बाजूला झाला. शेवटी माझी अन् सावर्डेकरसरकारांची जुंपली. हे सावर्डेकर प्रख्यात शिकारी होते. यांची गोळी कधीच वाया जात नव्हती. धावते हरण अन् उडते पक्षी हे अचूक टिपत. या सर्व 'सरकार' लोकांत ते एकटेच धूर्त आणि तयारीचे होते. त्यांना माझ्या चालबाजीची शंका येऊ लागली. ते मला खेळताखेळता म्हणाले, "समर, जादूटोणा करतोस की काय?"

"यात कसला आला आहे जादूटोणा?"

"मग? एकामागून एक डाव जिंकतो आहेस, हे कसं काय शक्य आहे?"

"लव्â!"

"जुगारांत लक् जरूर लागतं; पण हे असं लक् मी आयुष्यात कधी पाह्यलेलं नाही. या

सर्वांना तू कफल्लक करून सोडलंस!" बाजूला एवढी एवढी तोंडं करून बसलेल्या सरकार लोकांच्याकडे बोट दाखवून सावर्डेकर म्हणाले.

"ते अन्लकी आहेत!" मी म्हणालो.

"आज इतकी वर्षं आम्ही फ्लश खेळतो आहोत, पण एकट्यानं सर्वांना जिंकल्याचं उदाहरण मी पाह्यलेलं नाही."

"असं होतं कधी कधी!" हसतहसत मी सावर्डेकरांना 'शो' मागितला, त्यांनी आपल्या हातातली इस्पिक सत्त्या-अठ्ठया आणि नव्वा याची 'रन' दाखवली. मी तीन गुलामांची 'ट्रायो' त्यांच्या पुढ्यात टाकली आणि टेबलावरच्या नोटांचा ढीग उचलून खिशांत कोंबला. खिसे तट्ट फुगले होते. जसा दौलतखानाला मी कफल्लक केला होता, तशीच या सरकार मंडळीवरही आज मी दिवाळखोरी आणली होती.

सावर्डेकर सरकारांचे अठरा हजार मी जिंकले तेव्हा ते काहीसे अस्वस्थ झाले. त्यांच्याजवळ पुढे खेळायलादेखील पैसे उरले नाहीत; तेव्हा ते मला म्हणाले-

"समर, ही नवग्रहाची अंगठी घे. पाच हजारांचा हिराच आहे यातला. मला पैसे दे खेळायला!"

सावर्डेकरांनी आपल्या बोटातली नवग्रहाची अंगठी काढून माझ्यासमोर धरली होती. तीमधला अस्सल हिरा लखलखत होता. अंगठी खरोखरच आकर्षक आणि मौल्यवान होती; पण मी उगाच सज्जनपणाचा बुरखा पांघरून म्हणालो-

"सरकार, आता पुरे! दागिने विकून जुगार खेळणं ही अधोगती होईल. शिवाय रात्रही बरीच झाली आहे."

"उजाडलं तरी हरकत नाही, तू खेळायला पाहिजेस!"

"जबरदस्तीनं खेळायला लावता मला?"

"हो, तू काहीतरी लबाडी करतो आहेस अशी माझी खात्री झालीय. हा नवा 'कॅट' घेऊन चार डाव खेळू. तू पहिले किती डाव जिंकतोस हेच पहायचं आहे मला!"

"नवा 'कॅट'?"

"हो, आणि तू डोळ्यांवरचा तो चष्माही काढून ठेव!"

"ते का?"

"लबाडी करण्याला त्या चष्म्याची मदत होत असली पाहिजे तुला!"

"काहीतरीच सरकार! हा बघा चष्मा. काय मदत होते यानं?" डोळ्यावरचा चष्मा काढून मी त्यांच्यासमोर धरला. त्यांनी तो आपल्या डोळ्यांवर चढवला आणि इकडे तिकडे न्याहाळून पाह्यलं. पण त्यांना त्यातली गोम कळणं शक्यच नव्हतं. त्यांनी तो चष्मा काढून परत माझ्या हाती देत म्हटलं,-

"हा चष्मा न लावता खेळ!"

"पण मला तुमची अंगठी घेऊन पैसे द्यायचे नसले तर?"

"का देणार नाहीस?"

"माझ्या इच्छेचा प्रश्न आहे हा!"

जुगारी लोक पैसे हरले की चिडखोर बनतात. हमरीतुमरी करतात आणि कधी कधी प्रकरण हातघाईवरही येतं हे मला ठाऊक होतं, म्हणून मी थोडंसं सबुरीनं घ्यायचं ठरवलं आणि म्हणालो,

"सरकार, आपल्याला पैसे द्यायला माझी काही हरकत नाही; पण दागिने विकून जुगार खेळणं आपल्यासारख्या खानदान व्यक्तीला शोभत नाही!"

"मला काय बरं दिसतं अन् काय नाही, याची तुला चिंता करायचं कारण नाही! चल, घे ही अंगठी आणि दे पैसे मला!"

एकानं जुगारांत सर्व पैसे हरल्यावर मला बाई देऊ केली होती, आज ही नवग्रहाची, मध्ये अस्सल हिरा असलेली अंगठी माझ्यासमोर आली होती. क्षणभर विचार करून मी म्हणालो, --

"मध्यरात्र टळून गेली आहे. हवं तर मी उद्या इथंच रहातो. तुम्हीही पैशाची व्यवस्था करा. उद्या खेळू! मग तर झालं?"

बाकीचे कफल्लक झालेले सरकार लोक बसल्या जागीच खुर्च्यांवर पेंगत होते. त्यांना सावर्डेकर हरले काय किंवा जिंकले काय, यात सोयरसुतक नव्हतं. ते स्वत: हरल्यामुळं निराश होऊन बाजूला झाले होते. सावर्डेकरांची बाजू घेऊन मला पुढं खेळायला भाग पाडावं असं त्यांना वाटत नव्हतं.

सावर्डेकरांनी सिगारेट शिलगावली आणि ते पवित्रा बदलून मला म्हणाले, "समर, मी हरलो. यापुढ खेळायचं नाही हे मला कबूल; पण तू मात्र मला सांगायला हवंस. काय 'मख्खी' आहे तुझ्या खेळण्यात?"

हसत हसत मी म्हणालो, "आपल्या बाजूला लव्â असणं हीच मख्खी!"

"काहीतरी थाप देऊ नकोस! खरं सांग!"

"तसं काही नाही हो, सरकार! इट इज जस्ट ए गेम ऑफ चान्स!"

"ठीक आहे. सांगू नकोस, पण उद्या खेळायचं कबूल केलेलं आहेस हं!"

"डेफिनेटली!" उठता उठता मी म्हणालो. सावर्डेकरांनी पुन्हा बोटात ती अंगठी चढवली अन् ते उठून झोपायला आत गेले. शिष्टाचार म्हणून 'गुड नाईट' देखील म्हणाले नाहीत. जुगारात कफल्लक झालेल्याकडून शिष्टाचाराची अपेक्षा तरी का करावी?

मीही उठून पलीकडच्या सूटमध्ये आलो. कुमारी गाढ झोपली असेल असं वाटलं होतं; पण मंद निळा दिवा लावून माझीच वाट पहात होती. मी तिच्यासमोर नोटांचा ढीग ओतला.

"काय रे हे?"

"एकेकाची वाट लावली! सारे एकजात माझा मत्सर करायचे!"

"कमाल करतोस! पण मघा मोठ्यानं तोंड चाललेलं ऐकलं अन् वाटलं, मारामारी करतात की काय तुझ्याशी!"

"ती ताकद नाही त्यांच्यात! मिशीवर पीळ देऊन धमकी देतील फार तर! बरं, कुमारी आपण आता इथून सटकायला हवं!"

"का?"

"हे लोक उद्या सकाळी मला पुन्हा खेळायला बोलवणार! कदाचित् माझं भांडं फुटेलही! सावर्डेकर फारच तयारीचा आहे, तेव्हा आता इथं थांबण्यात अर्थ नाही."

"अरे, पण अशा वेळी आपण जाणार कसे?"

"त्याची चिंता नको, तू तयार हो!"

कुमारी चटकन् उठून बसली.

"हे पैसे बॅगेत भर, मी आलोच!"

बाहेर बागेत तीन मोटारी होत्या, दोन मोटारीत ड्रायव्हर झोपले होते, तिसऱ्या मोटारीत ड्रायव्हर नव्हता. देसाई जहागीरदारांची ती गाडी होती. ते स्वत:च ड्रायिंव्हग करायचे. माझं सुदैव! गाडीच्या दारांना लॉक नव्हतं. गाडी सुरू करायची किल्ली गाडीत नव्हती. त्यामुळं माझं काही अडून राहणार नव्हतं. बॉनेट उघडून वायिंरग जोडून मी गाडी सुरू करायचं शास्त्र जाणत

होतो. पण गाडी रेस्ट-हाऊससमोर सुरू करून चालणार नव्हतं.

पलीकडच्या सूटमधे सारी सामसूम झाल्याची खात्री करून घेऊन मी अन् कुमारी हळूच बाहेर आलो. निरभ्र आकाशात चंद्राची कोर किंचित मावळतीकडे झुकली होती. मंद मंद वारा वाहत होता. दुर्गावरच्या मोहरलेल्या जांभळाच्या अन् आंब्याच्या झाडावरचा गंध तो पसरवीत होता.

"कुमारी, मी गाडी मागून ढकलतो. तू न्युट्रल टाकून या गेटमधून खाली घे. ती घसरत खाली गेल्यानंतर चालू करू!" मी कुमारीला सूचना केली. आवाज न करता कुमारी आत बसली. मी ताकद लावून गाडी मागून ढकलली. ती 'वॉक्झॉल' ढकलतढकलत गेटमधून बाहेर काढली अन् गती येताच मी लगेच दार उघडून आत शिरलो. कुमारी बाजूला सरकली आणि म्हणाली, "समर, बोंब उडणार उद्या!"

"उडू दे! आपल्याला कुठं ही गाडी चोरून न्यायची आहे? फक्त लिफ्ट हवी भवानीनगरपर्यंत!"

ती हसली आणि म्हणाली, "धाडसाची कमाल आहे तुझ्या!"

"काय करणार? परिस्थितीच मला असं बनवते आहे!"

गाडी दोन फर्लांग आल्यावर मी बॉनेट उघडून 'इग्निशन' किल्लीविना मशीन सुरू केलं आणि गाडी भवानीनगरच्या दिशेनं दामटली. घाट माथ्यावरची नागमोडी वळणं ओलांडताना मला कुमारी म्हणाली,-

"समर, मोटार चोरून नेल्याची फिर्याद तुझ्यावर नोंदवतील ते लोक!"

मी हसलो आणि म्हणालो, "ती चिंता करू नको. मी त्या गोष्टींचा पूर्ण विचार केला आहे!"

"काय विचार केलेला आहेस?"

"ही गाडी भवानीनगरला देसायांच्या वाड्यासमोरच सोडून जायचं!"

"म्हणजे?"

"ज्याचा माल त्याच्या ताब्यात!"

"कमाल आहे तुझी!" कपाळाला हात लावून कुमारी पुढं म्हणाली.

"समज त्यांच्या घरातल्या कुणी पाह्यलं तर?"

"त्याला सांगायचं, सरकारनी गाडी पुढं पाठवली आहे. उद्या सावर्डेकरांच्याबरोबर येईन असा निरोप दिला आहे!"

कुमारी माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, "इतका तयारीचा असशील याची कल्पना नव्हती मला!"

"सद्गुणांवरची माझी श्रद्धा उडत चालली आहे, कुमारी! सरळपणानं जगणाऱ्याला जग सुखानं जगू देत नाही. लफडेबाज माणसं मात्र सुखानं जगतात!"

"पण हे किती दिवस चालणार?"

"चालेल तितके दिवस! उद्याचं कोणी पाह्यलंय?"

"तुला असं का वाटावं?"

"अनेक कारणं आहेत असं वाटायला! मी फसलो गेलो आहे म्हणून मला जगाला एकसारखं फसवत रहावंसं वाटतं!"

"कोणी फसवलं तुला?"

"बायकोनं! अलकानं! बदफैलीपणा केला! बेईमान झाली माझ्याशी!"

"पण उल्का तरी तुझ्याशी प्रामाणिक आहे ना?"

"तिचं चारित्र्य संशयातीत आहे यात शंका नाही; पण वैफल्यानं तिलाही ग्रासलं आहे. तीही व्यसनाधीन झालीय. तिच्याकडूनही माझा अपेक्षाभंग झालेला आहे. बोथ ऑफ देम हॅव डिसीव्हड मी!"

कुमारी माझ्या मांडीला मांडी लावून बसली होती. घाट उतरल्यानंतर सरळ रस्त्यावर मी ॲक्सिलेटर दाबला. रात्रीची वेळ असल्यानं रस्त्यावर वाहनं अशी नव्हतीच. नकळतच वेग वाढवला जात होता. अर्ध्या तासातच गाडी भवानीनगरला पोहोचली. देसाई सरदारांचा वाडा गावच्या दक्षिणेला होता, त्यांच्या वाड्याकडे जाण्यापूर्वी मी टॅक्सी-स्टँडला जाऊन रोहिल्या अहमदला उठवलं. त्याला मला 'फॉलो' करायला सांगितलं. आम्हाला तत्काळ भवानीनगर सोडायचं होतं. सावर्डेकर सरकार इरेला पेटले होते. जुगारात मी नक्कीच काहीतरी लबाडी करतो, याबद्दल त्यांची खात्री पटली होती. भवानीनगरचे वरिष्ठ पोलिस अधिकारी त्यांच्या परिचयाचे होते. तेव्हा प्रकरण लांबण्याअगोदरच तिथून सटकायचं असं मी ठरवून टाकलं होतं.

सुदैवानं देसाई सरकारांच्या वाड्यासमोर कोणीही नव्हतं. त्यांची गाडी तिथेच सोडली आणि अहमदच्या टॅक्सीनं सरळ पुण्याचा रस्ता धरला.

कराड ओलांडून थोडे पुढे गेलो, अन् सूर्योदय झाला. कुमारी मागच्या सीटवर माझ्या खांद्यावर मान टाकून गाढ झोपी गेली होती. अलीकडे मला तिच्यात झालेला आमूलाग्र बदल जाणवत होता. ती शांत अन् विचारी दिसत होती. फॅशन करायचं तिनं बंद केलं होतं. साधी पावडर अन् लिपस्टिकदेखील ती लावत नव्हती. एक काळ मुंबईच्या सधन तरुणांना आर्किषत करणारी; अन् अमाप पैसा कमावणारी ती वेश्या होती हे आज कोणाला सांगूनही पटणारं नव्हतं.

साडेनऊच्या सुमाराला अहमदनं टॅक्सी पुण्यात आणली अन् मला विचारलं,-

"गाडी कुठं घेऊ समरबाबू?"

"हॉटेल हेवर्डस्!"

"कुठंय ते?"

"कॅंपमध्ये. मी दाखवतो. चल!"

सलिमाप्रकरणापासून मी त्या हॉटेलातल्या प्रत्येकाला परिचित होतो. अहमदचे पैसे दिले, आणि जादा शंभर रुपये त्याच्या हातावर ठेवीत मी म्हणालो, "तू मला पुण्यात आणून सोडलंस हे कुणालाही समजता कामा नये!"

"मी हो कशाला सांगू?" नोटेची घडी करून खिशात ठेवीत तो म्हणाला.

"तसा मी काही कोणाची चोरी करून पळून आलो नाही, पण एक कारण घडलं म्हणून असं तातडीनं यावं लागलं."

अहमदनं कुमारीकडं एक ओझरता दृष्टिक्षेप टाकून म्हटलं, "चालायचंच! अशी कारणं घडतात म्हणून माझ्यासारख्याचं पोट चालतं! कोण अचानक आजारी पडतं, कोणाचीतरी तातडीनं भेट घ्यावी लागते, म्हणूनच लोक टॅक्सीनं जातात. एरव्ही कोण टॅक्सी करणार?"

"बरोबर बोललास!" असं म्हणून मी कुमारीबरोबर हॉटेलमधे प्रवेश केला. बोर्डाकडे पाह्यलं तर माडीवरची तेरा नंबरची खोली रिकामी होती. याच तेरा नंबरमध्ये सलिमाचा खून झाला होता. कुमारीला तो प्रकार ठाऊक होता की नव्हता, मला माहीत नव्हतं; पण तरीही मला ती खोली घ्यावीशी वाटेना.

"कॅन यू नॉट गिव्ह मी एनी अदर रूम?" मॅनेजरला मी विचारलं.

"सर्टनली!" हसतहसत तो म्हणाला, "पण थोडं थांबलं तर बरं होईल! अठरा नंबर आता एक पाच मिनिटात रिकामी होत आहे! तोपर्यंत विंटग हॉलमध्ये बसा. चहा पाठवून

देऊ?''

''ओऽके!''

या हॉटेलचा गुणधर्म काय होता, कोण जाणे! ज्या वेळी जुगारात अफाट पैसा मी मिळवीत असे त्या वेळी नेमका मी इथं यायचा! माथेरानला फौजदार कंपनीला गंडवलं होतं तेव्हाही मला इथं यावं लागलं होतं.

कुमारी िंभतीवरचं जहाजाचं लँडस्केप न्याहाळत होती. कोपऱ्यात मोठा पंखा फिरत होता. आज्ञाधारक नोकरासारखा मान फिरवत होता. मी सिगारेट शिलगावली.

''समर, तू येताना आईलादेखील भेटला नाहीस?''

''कसा भेटणार? एक मिनिट तरी थांबायला सवड होती का? पण मी तिला जाण्यापूर्वी नक्की भेटीन असं वचनं दिलं होतं. ती माझी वाट पहात राहील!''

''पत्र लिहून टाक ना?''

''आता मुंबईला गेल्यावर लिहू.'' वेटरनं चहा आणला. कुमारीनं तो तयार केला. कप माझ्या हाती देत ती म्हणाली,-

''ते लोक सकाळी लक्षात आल्यावर काय करतील रे?''

''काय करतील, आहे ठाऊक? मोटार चोरीला गेली म्हणून दुर्गावरच्या पोलीस ठाण्यावर खबर देतील. मीच चोरून नेली असंही म्हणतील; पण मोटार त्यांच्याच वाड्यासमोर सोडलेली आहे, असं दिसून आल्यानंतर त्यांच्या फिर्यादीतला जोरच निघून जाईल! मी जरी स्वत: वकील नसलो तरी वकील बापाचा मुलगा आहे!''

''माझ्या केसच्या वेळेला ते दिसून आलंच की! पण काय रे, चोरीचा गुन्हा का नाही होणार?''

''चोरी करणारा मालमत्ता मूळ मालकाच्या घरापाशी सोडून जातो तेव्हा त्याचा हेतू ती मालमत्ता अपहार करण्याचा नव्हता असं नाही का दिसून येत? 'डिसऑनेस्ट इंटेन्शन' नसल्यामुळे त्यातली हवाच निघून जाते! शिवाय ते साले सगळे जुगारात हरल्याचं जगजाहीर होईल ना फिर्याद दिल्यानंतर!''

''पण पुन्हा तू त्यांच्या तावडीत सापडलास तर तुला ते सोडणार नाहीत!''

''उद्याचं उद्या! उद्या काय होणार आहे, त्याची चिंता आज कशाला?''

आमचा चहा संपतो, तोच मॅनेजर स्वत: किल्ली घेऊन आला, ''खोली रिकामी झाली आहे!''

''साफ केलीय?''

''बेडशीडस्, पिलोकव्हर्स देखील बदलले!''

''हो, नाहीतर इकडे खोली सोडून लोक जेव्हा जातात तेव्हा त्यांनी मागे ठेवलेले अवशेष अगदी पहाण्यासारखे असतात!'' कुमारीकडे पहात मी म्हणालो.

''पण आमच्या हॉटेलमध्ये असले लोक येतच नाहीत. रोज पन्नास रुपये देऊन हलके लोक येतीलच कसे?'' मॅनेजर म्हणाला.

''हो हो, भारीच येणार!'' मुद्दाम त्याचे संभाषण थांबवण्याच्या इराद्यानं म्हणालो.

स्वत:च्या कष्टावर जगणारा माणूस असल्या महागड्या जागी येईलच कशाला? माझ्यासारखे 'ईझी मनी' किंवा 'ब्लॅक मनी' वालेच अशा हॉटेलच्या पायऱ्या चढणार! मी स्वत: खूप पैसे कमवले; पण पैसे सद्मार्गानं कमावणाऱ्यांच्या विषयी, साधेपणानं जीवन जगणाऱ्यांविषयी माझ्या मनात सदैव आदराचे स्थान आहे! त्यांना कोणी कमी लेखल्याचं किंवा कोणी त्यांचा उपहास केल्याचं मला कधीच आवडलं नाही. सज्जन आणि सरळमार्गी

माणसांच्या डोळ्यांत एक प्रकारचं तेज असतं, लांडीलबाडी करणारा लफडेबाज माणूस त्यांच्या डोळ्याला डोळा देऊ शकत नाही. अगदी स्वत:च्या अनुभवानं सांगतोय मी हे!

कुमारी कपडे घेऊन बाथरूमला गेली. मी रात्री केलेली कमाई मोजायला सुरुवात केली. अठ्ठावीस हजार चारशे सत्तर! मला ते पैसे पाहून हसू यायला लागलं. एकजात सगळ्यांना लुबाडलं होतं मी! बऱ्याच दिवसांपासून त्या लोकांविषयी माझ्या मनात तेढ होतीच.

पैसे परत बॅगेत ठेवले. मला अचानक सलिमाची आठवण आली. त्या रात्री मी तिच्याशी जे काही केलं ते सर्व आठवलं. सलिमानं मला दिवस उजाडण्यापूर्वी निघून जायला सांगितलं होतं, आणि आजही मी दुर्गावरून दिवस उजाडण्यापूर्वीच बाहेर पडलो होतो. हा आजचा प्रसंग अगदी जसाच्या तसा पूर्वी एकदा घडलेला होता असं वाटण्याइतकं सामर्थ्य या दोन प्रसंगात होतं. त्यात सलिमासारखी रूपयौवना समोर होती, आज कुमारी आहे. सलिमाइतकी सुंदर नसली तरी तिच्या थोडीफार बरोबरी करण्यासारखं सौंदर्य हिच्याजवळही आहे! माझ्या सहवासानंतर तिचा शेवट हृदयद्रावक असा झाला. कुमारीचं तसं काही न घडो!...

हे विचार माझ्या मनात यायला आणि बाथरूममधे कुमारी मोठ्यानं किंचाळायला एकच गाठ पडली. मी कॉटवरून ताडकन् उठलो आणि बाथरूमच्या दाराकडे धावलो. दारावर एकसारख्या थापा मारल्या.

"कुमारीऽऽ! काय झालं? दार उघड!" कुमारीनं दार उघडलं तेव्हा तिनं कमरेभोवती फक्त टॉवेल गुंडाळला होता. भीतीनं तिची छाती वरखाली होत होती. तोंडातून धड शब्दही उमटत नव्हता.

"काय झालं, सांगशील की नाही?"

"डाव्या खांद्यावर पाल पडली!"

"हात्तिच्या! त्याला एवढं भ्यायला काय झालंय?"

"अशुभ असतं रे ते!"

"छट्! माणूस रस्त्यावर पाय घसरून पडत नाही का? आपण त्यावर शकुन-अपशकून असं काही ठरवतो का?"

"माणसाची गोष्ट निराळी रे!" तशा अवस्थेत ती मला बिलगली. तिच्या छातीची धडधड मला स्पर्शातून जाणवत होती. एखाद्या लहान मुलीसारखी ती मला घट्ट बिलगली होती. धंदा करताना अनेक गिऱ्हाईकांशी ती अशीच वागली असेल, पण आजचं तिचं वागणं हे इतकं नैसर्गिक होतं की, ती असहाय्य आहे अन् तिला माझ्या आधाराची अत्यंत गरज आहे, हे मला तिच्या स्पर्शातूनच जाणवत होतं.

"सोड मला! अंघोळ झाली ना तुझी?"

"अंघोळ झाली म्हणून टॉवेल घेतला, त्याच क्षणी अंगावर पडली मेली! मला शकुनापेक्षा पालीची किळसच अधिक वाटते!"

"सोडून दे तो विषय! कपडे कर, तोवर मीही अंघोळ करून घेतो. ब्रेकफास्ट करू आणि दुपारच्या ट्रेननं मुंबईला निघू!"

-o-o-

२३

मुंबईला परतलो तेव्हा रात्रीचे आठ वाजून गेले होते. खरं म्हणजे मला उल्काकडे जायला हवं होतं; पण सकाळी पुण्यात अंगावर पाल पडल्यापासून कुमारी अतिशय उद्विग्न आणि निराश दिसत होती. म्हणून आजची रात्र वरळीला रहावं असा विचार केला. दाराची बेल दाबली. मार्थानं दार उघडलं. पण ती नेहमीप्रमाणं स्मित न करता गंभीर होऊन कुमारीकडे पहात राह्यली. मला तिच्या वागण्यातला तो बदल तत्काळ जाणवला. कुमारी आपल्या खोलीकडे निघून गेल्यानंतर मी कोपऱ्यातल्या स्टुलावर बसून बुटाची लेस सोडतासोडता मार्थाला म्हणालो,-

"काय गडबड आहे, तू अशी भयभीत का दिसतेस?"

"कुमारीला पकड - वॉरंट निघालं आहे!"

"पकड वॉरंट?"

"कशाबद्दल?"

"सुटलेल्या केसवर हायकोर्टाकडे अपील दाखल झालं आहे. हायकोर्टातूनच पकड वॉरंट सुटलं आहे!"

"माय गॉड! मार्था, तू इतक्यात कुमारीला काही सांगू नकोस. सकाळपासून ती काहीशी अस्वस्थ आहे. तशात हे तिच्या कानावर गेलं तर ती अधिक अस्वस्थ होईल. मी जरा बाहेर जाऊन येतो." सोडलेल्या बुटाच्या लेसेस पुन्हा बांधताबांधता मी म्हणालो.

मला ते असं काहीतरी होईल याची मुळीसुद्धा कल्पना नव्हती. कुमारी गडकऱ्यांच्या खुनाच्या केसमधून निर्दोष सुटल्यानंतर त्या प्रकरणावर कायमचा पडदा पडला आहे, असं मी समजून चाललो होतो. पण एवढा मोठा जबरदस्त पोलीस अधिकारी मारला गेल्यानं पोलीस खातं स्वस्थ बसलं नाही. सेशन कोर्टाच्या निकालावर सरकारतर्फे हायकोर्टात अपील दाखल करण्यात आलं होतं. अपील ॲडमिट झाल्यानं कुमारीला पकडण्याचं वॉरंट काढण्यात आलं होतं. पण अपील ॲडमिट झालं म्हणजे तिच्यावरचा आरोप शाबित झाला असं समजण्याचं कारण नव्हतं. दोन्ही बाजूंचं सविस्तर म्हणणं ऐकून घेतल्याशिवाय हायकोर्ट निकाल देणार नव्हतं. परंतु त्यापूर्वी पुन्हा कुमारीतर्फे हायकोर्टात जामिनाचा अर्ज देऊन तो मंजूर करून घेणं भाग होतं. पुढे जेव्हा अपील चालेल तेव्हा कुमारीची बाजू मांडण्यासाठी कोणीतरी ॲडव्होकेट देणं भाग होतं. बाहेर पडल्या पडल्या मी विचार केला, इथले कोणीतरी ॲडव्होकेट देण्यापेक्षा डॅडींनाच परत बोलावलं तर? सेशन कोर्टात त्यांनीच केस चालवलेली आहे, खटल्यातल्या सर्व खाचाखोचा त्यांच्याइतक्या दुसऱ्या कोणाही ॲडव्होकेटला समजणं शक्य नाही. डॅडींनाच बोलावलं पाहिजे...

पोस्ट ऑफिसमधे जाऊन मी डॅडींना 'स्टार्ट इमिजिएटली, अपील अगेन्स्ट कुमारीज ॲक्विटल ॲडमिटेड इन हायकोर्ट.' अशी तार केली. पण डॅडी येईपर्यंत जर पोलिस ते वॉरंट बजावण्यासाठी आले तर त्यांना थोपवून धरण्यासाठी तात्पुरता कोणीतरी वकील द्यावा म्हणून

मी चांदोरकर नावाच्या एका नवीन वकिलाकडे गेलो. त्यांच्याकडून जामिनाचा अर्ज तयार केला.

माझी अडचण अशी झाली की, त्या अर्जावर कुमारीची सही घेणं भाग होतं. अन् सही घेण्यापूर्वी तिला सही कशासाठी करायची हेही सांगणं भाग होतं. पण आता इलाज नव्हता.

रात्री अकरा वाजता मी परत कुमारीच्या ब्लॉकवर आलो, तेव्हा कुमारी आपल्या खोलीत चक्क 'शिवास रिगल' पीत बसली होती. तिच्या हातात डनहिल सिगारेट होती. अशा स्थितीत मी तिला अनेक वेळा पाहिलं होतं; पण आजचं तिचं ते पिणं, सिगारेट ओढणं, सारंच काही मला विचित्र दिसलं.

तिच्याजवळ कॉटवर मी जाऊन बसलो.

तिनं माझ्याकडे एक कटाक्ष टाकला आणि विचारलं, "आल्या आल्या कुठं गेला होतास?"

"जरा बाहेर जाऊन आलो. काम होतं!"

"डॅडींना तार केलीस?"

कुमारी विकट हास्य करीत म्हणाली, "अरे, तुला काय वाटतं, मी अगदीच निर्बुद्ध आहे? सगळं समजलंय मला. मार्थानं दार उघडल्या वेळी तुझ्याकडे, माझ्याकडे विचित्र नजरेनं पाह्यलं. नंतर तू बाहेरच्या बाहेर निघून गेलास. यावरून इथं मुंबईत काहीतरी विशेष घडलं आहे हा अंदाज करू शकले मी! शेवटी मार्थाला सर्व काही सांगणं भाग पडलं. ग्लास घे कपाटातला!"

एका अर्थी तिला समजलं ते ठीकच झालं होतं. नाहीतरी जामिनाच्या अर्जावर तिची सही घेण्यासाठी मला ती सर्व कल्पना तिला देणं भागच होतं.

उठून मी कपाटातला ग्लास घेतला. टेबलावरच्या बाटलीतला एक पेग ओतून ग्लासात घेतला. जगमधलं पाणी घातलं, आणि ग्लास कुमारीसमोर उंचावून तसाच थांबलो. 'चीअर्स' म्हणणं अनाठायी ठरणार होतं. माझी ती भांबावलेली मनोवस्था ओळखून कुमारी सिगारेटचा धूर नाकातून सोडत म्हणाली, "चीअर्स बोल ना? चीअर्स टु कुमारीज अपील!"

"उगाच काहीतरी बोलू नकोस! अशी खूप अपील्स होतात. पण एकदा खालच्या कोर्टानं स्ट्राँग जजमेंट दिल्यानंतर ते सहसा वरच्या कोर्टात बदलत नसतं!"

"ॲडमिट तरी झालं ना? पुन्हा तो चर्चेचा विषय निर्माण झाला! ॲडमिट झालं म्हटल्यावर शाबित होणारच नाही असं कशावरून समजायचं?"

"माझी खात्री आहे! ते जजमेंट मी चांगलं अभ्यासलेलं आहे! सेशन कोर्टानं सर्व पुराव्यांचा सखोल असा परामर्श घेऊन निकाल दिलेला असल्यानं हायकोर्ट त्यात सहसा ढवळाढवळ करणार नाही, अशी माझी खात्री आहे!"

कुमारी एक सिप घेऊन म्हणाली, "समर, मला मात्र आता हे टेन्शन सहन करणं अशक्य आहे!"

"वेडी आहेस! अगं, अपीलात भिण्यासारखं काहीच नसतं. तिथं पुन्हा साक्षीपुरावे होत नसतात, जाबजबाबासाठी तुला पिंजऱ्यात उभं रहावं लागत नाही. खालच्या कोर्टाच्या कागदपत्रांवर सारं काम चालतं. सरकारी वकील आणि आरोपीचे वकील यांनी आपआपली बाजू मांडायची असते!"

"पण अपील ॲडमिट करून घेतलं याचा अर्थ खालच्या कोर्टाचा निकाल चुकीचा आहे असा नाही का होत?"

"मुळीच नाही! सरकारपक्षाला आपलं म्हणणं मांडण्याची अधिक संधी दिलेली आहे,

एवढाच त्यातून अर्थ निघतो!''

''पण खरं सांगू, मी यातून निसटणार नाही, असंच मला वाटू लागलं आहे! गडकऱ्याचं भूत माझ्या मानगुटीवर बसल्याशिवाय रहाणार नाही!''

''छट्! उगाच मूर्खासारख्या काही कल्पना करू नको! गडकरी हा काही सज्जन, सालस माणूस नव्हता. मुंबईतल्या धंदा करणाऱ्या अनेक बायापोरींना तो सतावत होता. मारझोड करून वर त्यांचाच उपभोग घ्यायचा. आता मनुष्यहत्या घडली म्हणून केस-खटला हे होणारच! तेव्हा खटला झाला किंवा त्यावर अपील झालं म्हणून तू सर्वार्थानं दोषी आहेस, असं कसं समजायचं? प्रत्येक गुन्ह्याचं विश्लेषण दोन बाजूंनी होत असतं. एक नैतिक आणि दुसरं केवळ कायद्याच्या दृष्टीने! नैतिक दृष्टीनं तुझं कृत्य संपूर्णत: समर्थनीय ठरतं! कायद्याच्या दृष्टीनही खालच्या कोर्टानं संशयाचा फायदा देऊन तुला दोषमुक्त केलेलं आहे, तेव्हा अपील कोर्ट त्यात फारसा बदल करील असं समजण्याचं काही कारण नाही.''

कुमारी शांत चित्तानं मी बोलत होतो ते सारं ऐकून घेत होती. मधूनच व्हिस्कीचा एक एक सिप घेत होती. ती कॉटच्या एका बाजूला उशी ठेवून पाय लांब करून कॉटवर आडवी झाली. मी तिच्या डोक्यावर हात ठेवून म्हणालो,-

''आयुष्य हे असं आहे, कुमारी. याचा फारसा गंभीर अर्थ लावायचा प्रयत्न आपण करू नये. जे जे समोर येईल त्यातून मार्ग काढत राहणं भाग आहे.''

''सकाळी पुण्यात अंघोळ करतानाच माझ्यासमोर काय वाढून ठेवलेलं आहे याची पूर्वसूचना मिळाली होती मला! पाल पडली तेव्हाच अशुभाची जाणीव झाली होती.''

''हत् वेडे! त्याचा याच्याशी काहीएक संबंध नाही! तुझी केस खालच्या कोर्टात सुटल्यानंतर लगेच सरकारतर्फे अपील करण्यात आलं होतं, ते ॲडमिट होऊन फक्त आज वॉरंट निघालेलं आहे! जे व्हायचं होतं, ते अगोदर घडलं आहे. तुझ्या अंगावर पाल पडण्याचा आणि या वॉरंटचा अर्थाअर्थी काहीएक संबंध नाही.''

कुमारी निर्विकार चेहऱ्यानं माझ्याकडे पहात होती. पण तिच्या मनात मात्र विचारांचा कोलाहल माजला होता. तो शमवण्यासाठीच तिनं बाटली खोलली होती.

मार्था जेवणासाठी दुसऱ्यांदा बोलावायला आली तेव्हा मी कुमारीला म्हणालो, ''चल, थोडं खाऊन घेऊ!''

कुमारीनं ग्लासातलं मद्य संपवलं आणि ती उठली. उठताच तिचा किंचित तोल ढळल्यासारखा झाला तेव्हा मी तिला आधारासाठी हात दिला तशी तिला जास्त झालेली नव्हती; पण अस्वस्थ अशा अवस्थेत माणसावर मद्याचा परिणाम लौकर होत असावा.

डायिंनग टेबलावर मार्थानं सूपच्या बशा आणून ठेवल्या, तेव्हा कुमारीनं विचारलं, ''आम्ही गेलेल्या मुदतीत कोण आलं होतं?''

''इकडं कोणी आलं नव्हतं; पण समर इथं आहे का फोनवरून जॉकी विलासनी विचारलं होतं.''

''विलासचा फोन होता?''

''हो, आणि तुला आल्यानंतर भेटायला सांगितलंय!'' माझ्याकडे पहात मार्था म्हणाली.

''अच्छा!''

जेवता जेवता मी विचार करत होतो, विलासनं मला का भेटायला सांगावं? काय काम असेल त्याचं माझ्याकडे?..... मला काही तर्क करता येईना. मुंबईचा सीझन चालू झाल्यानंतर तो तीन महिने मुंबईत राहणार होता, हे मला ठाऊक होतं. मागल्या वेळी कुमारीच्या घरीही तो

माझ्यासोबत आला होता,

कुमारी पोटभर जेवेल की नाही याची मला शंका वाटत होती; पण ती पोटभर जेवली. मार्थानं तिला आवडणारा पूना मसाला पान अगोदरच आणून ठेवलं होतं, ते प्लेटमधून आणलं. तिनं विडा तोंडात घालण्यापूर्वी माझ्याकडे पहात म्हटलं, "सावकाश होऊ दे! मी जरा गच्चीत बसते हवेला! "

कुमारी गेल्यानंतर मी पिंडग खाताखाता मार्थाला म्हणालो,-

"मार्था, तू जरा समजावून सांग हिला, अपील झालं याचा अर्थ शिक्षा होणार असा नव्हे! महत्त्वाच्या केसमध्ये सरकारतर्फे अपील जरूर केलं जातं. त्यामुळं निराश व्हायचं काहीच कारण नाही!"

"त्याचं काय झालंय, त्या केसचा निकाल लागल्यापासून ही अशी एकलकोंडी बनलीय! आता तू जवळ असलास की ती तुझ्याशी बोलते- हसते, पण एकटी असली ना, की कुठेतरीच पहात बसते! मला तिच्या डोळ्यांत आताशी थोडीशी वेडाची छटा दिसते आहे! तसं पाह्यलं तर त्या गडकऱ्याला मारायला कारणीभूत ठरले मी! पण हिला वाटतं, त्याचा आत्मा केव्हा ना केव्हा आपला सूड घेईल! घ्यायचाच झाला तर तो माझा घेईल की नाही, तूच सांग!"

"नक्कीच! खरं म्हणजे तुला पोलिसांनी आरोपी करायला हवं होतं!"

"पण काय रे, आता हायकोर्टात मला आरोपी नाही ना करणार?"

"मुळीच नाही! खालच्या कोर्टाचा निकाल बरोबर आहे की नाही, एवढंच हायकोर्ट पहाणार!"

"समज, निकाल बरोबर नाही असं हायकोर्टाला वाटलं तर?"

"तरी काय होणार आहे? त्या खटल्यात संशय निर्माण होण्यासारख्या इतक्या घटना आहेत, की हायकोर्टालादेखील खालच्या कोर्टाचा निकालच बरोबर आहे असंच शिक्कामोर्तब करावं लागेल."

"तुझे डॅडी येतील ना उद्या?"

"तार पोहोचल्यानंतर ते थांबणार नाहीत!"

ती रात्र मी कुमारीकडे घालवली. सकाळी उठल्याउठल्या मात्र मी बांद्र्याला उल्काकडे आलो.

मी कल्पना करीत आलो होतो, उल्का अद्याप अंथरुणात असेल, आपले तारवटलेले डोळे चोळत उठेल आणि दार उघडेल. पण मी गेलो तेव्हा खोलीचं दार उघडं होतं. पांढरी शुभ्र साडी, पांढरा ब्लाऊज घालून पाठीवर दोन वेण्या सोडलेली उल्का बाहेर पडायच्या तयारीत होती.

मला पहाताच ती म्हणाली, "कुठंय पत्ता?"

"भवानीनगरला जाणार आहे म्हणून तुला नव्हतं सांगितलं?"

"अस्सं! कशी काय झाली ट्रिप? एकटाच होतास की आणखी कोणी सोबत होतं?" केसांवर कंगवा फिरवीत ती मला विचारत होती.

"ते सांगतो सारं सविस्तर, पण तू इतक्या लौकर कुठं चाललीस सांग अगोदर!"

"कुठं म्हणजे? शाळेत! शेठ रतनभाई धीरजी गुजराती शाळेत मॉंटेसरी क्लासवर नोकरी लागली, परवापासून जायला लागले."

"कॉंग्रॅच्युलेशन्स्! व्हॉट ए गुड न्युज!" मी उल्काच्या हाताला धरून तिला जवळ घेतलं, तेव्हा तिनं मला कपडे खराब होतात म्हणून दूर ढकललं आणि किंचित रागानं ती म्हणाली,

''कुठल्या वेळी काय करावं हे तुला अजिबात कळत नाही!''

''अगं, पण मला झालेला आनंद मी कसा व्यक्त करणार?''

''फार शहाणा आहेस! चल, तुला शाळा दाखवून ठेवते.''

''फार दूर आहे?''

''तशी फार दूर नाही, माहिमलाच!''

''फार बरं झालं! पण काही म्हण उल्का, एखाद्या गोष्टीची वेळच यावी लागते, नाही? नोकरीसाठी इतका आटापिटा केला तेव्हा काहीएक उपयोग झाला नाही. नोकरीची आशा सोडून दिल्यानंतर मात्र नोकरी लागली!''

मी उल्कासोबत 'शेठ रतनभाई धीरजी' या शाळेत गेलो. या शाळेचं वैशिष्ट्य असं की, माँटेसरीपासून एस. एस. सी. पर्यंत इथे वर्ग होते. संस्था मुख्यत: गुजराती समाजाची असली तरी इतर जातीजमातीच्या लायक अशा शिक्षकांना तिथं नोकरी देताना तो कोणत्या जातीचा आहे याचा विचार केला जात नव्हता. त्या एकाच कारणामुळं उल्काला मुंबईत नोकरी मिळू शकली नव्हती. मुंबापुरीसारख्या 'कॉस्मॉपॉलिटन' शहरात अद्यापही काही जातीजमाती आपआपल्या जातीपुरताच विचार करताहेत, हे पाहून खेद वाटायचा. पण शेवटी शेठ रतनभाई धीरजी या शाळेत उल्काला नोकरी लागल्याचं पाहून मला खूपच समाधान वाटलं. निदान या मुंबईत एकतरी अशी संस्था होती की, जिथं फक्त शिक्षकांच्या 'कॅलिबर'चाच विचार केला जात होता.

''उल्का,'' बसस्टॉपकडे जाता जाता मी विचारलं, ''पगार विचारणं हे अशिष्टपणाचं मानलं जातं, म्हणून विचारत नाही, पण तो आकडा मला समजला असता तर माझी जिज्ञासा थोडी थंड झाली असती.''

उल्का हसतहसत म्हणाली, ''अरे, परक्या माणसाला पगार विचारणं हे अशिष्टपणाचं समजलं जातं. स्वत:च्या बायकोला विचारण्यात कसला औपचारिकपणा?''

मी फक्त हसलो.

''साडेसहाशे!''

''छान! एनी फॅसिलिटीज?''

''असतीलही, पण मी काही विचारलं नाही! माणसं मात्र अत्यंत सात्विक वृत्तीची अन् सालस आहेत. त्यांनी माझी निवड केल्याचं सांगताच मी शपथ घेतलीय!''

''कसली?''

''मद्याला स्पर्श न करण्याची?''

''मी ऐकतोय काय?''

''खरंच रे! ती छोटीछोटी मुलं बघितली अन् वाटलं, या निष्पाप मुलांना मी शिकवणार! तेव्हा मात्र माझं चारित्र्य कसं निष्कलंक पाह्यजे!''

''आयला! उल्का, मी आज इतका डॅम प्लीज झालो आहे, की काय करावं हे समजेनासं झालंय! गेले वर्षभर तू स्वत:ची काय अवस्था करून घेतली होतीस?''

''साडेसातीची वेळ होती रे ती! त्या व्यसनात मी मरून गेले नाही हेच भाग्य समज!''

उल्काला शाळेजवळ सोडून मी परत वरळीला जायला निघालो, तोच मला मार्थानं विलासचा फोन आल्याचं सांगितल्याचं आठवलं. सरळ पेडर रोडला जाणारी बस पकडली. वाटेत थोडी फळं आणि चॉकलेटस् मुलांच्यासाठी घेतली आणि लिफ्टमध्ये जाऊन उभा राह्यलो.

विलास घरीच होता. मला पाहून हातात हात देत म्हणाला, ''अरे, भल्या गृहस्था! तुला

किती शोधायचा? आहेस कुठे?''

''भवानीनगरला गेलो होतो!''

''का?''

''सहज!''

''आई, वडील ठीक आहेत?''

''हो. त्यांना भेटण्यासाठीच गेलो होतो. तुझा अगदी तातडीचा निरोप होता म्हणून मार्थानं सांगितलं!'' ऐसपैस बसून विलासची इंपोर्टेड सिगारेट शिलगावून मी म्हणालो, ''हं बोल, काय एवढं अर्जंट काम काढलं होतंस माझ्याकडे?''

''एक व्यक्ती तुझ्या शोधात आहे गेले दोन आठवडे. गेल्या रविवारी संध्याकाळी माझा पत्ता काढून इथं आली आणि तुझ्याबद्दल विचारू लागली. त्या व्यक्तीला वाटलं की, तू अद्याप माझ्याजवळ रहातो आहेस!''

''कोण, आहे तरी कोण ती व्यक्ती?''

''राजकन्या रत्नप्रभा राजे!''

''माय गॉड! विलास, खरं सांगतोस तू हे?''

''खोटं सांगायचं कारणच काय मला, बोल?''

''काय म्हणाल्या तरी काय?''

''त्या इथं एका दूरच्या नातेवाईकाकडे उतरल्या आहेत. नवऱ्याला रामराम ठोकून आलेल्या आहेत!''

''ते कळलं आहे. पुढं सांग?''

''जवळपास जे पैसे होते ते संपत आले असावेत, माझ्याकडे पाचशे रुपये मागत होत्या, बाईमाणूस म्हण किंवा राजघराण्याविषयी अद्याप मनात आदर आहे म्हणून म्हण, मी एक दोनशे रुपये दिले; पण खरं सांगू, समर, त्या बाईला वेळीच कोणीतरी सावरायला हवंय; नाहीतर बरबाद होऊन जाईल या मुंबईत!''

''विलास, मी आता कोणाकोणाचं म्हणून पाहू?''

''ते तुझं तू ठरव! ती तुझा पत्ता काढत आली म्हणून तुला फोन केला. तिला कुमारीच्या घरचा पत्ता मुद्दामच मी सांगितला नाही! पण आज ना उद्या ती तुला शोधून काढल्याशिवाय रहाणार नाही!''

''विलास, काय करावं समजत नाही! राजकन्येनं माझे प्राण वाचवले ही गोष्ट सत्य आहे. पण अशा अवस्थेत मी जर तिच्या सहवासात गेलो तर आणखी एका जाळ्यांत सापडला जाईन. अलका, उल्का, कुमारी या तिघींच्या सहवासानं मी खूप काही शिकलो आहे!''

विलास हसतहसत म्हणाला, ''त्या तिघीत ही चौथी!''

''खरं सांगतो विलास, माझं मन द्विधा झालेलं आहे. एक मन म्हणतं रत्नप्रभा राजेंची भेटच घेऊ नये तर लगेच दुसरं मन म्हणतं की, मी राजेंची भेट घेणं अत्यावश्यक आहे. आज मी तुझ्यासमोर दिसतो आहे तो त्यांच्याच कृपेमुळे! त्यांच्या हाकेला मी जर धावून गेलो नाही तर कृतघ्न ठरेन!''

''तुला जसं योग्य वाटेल तसं कर. मी तरी काय सांगणार? पण तू दिवसेंदिवस बायकांच्या जाळ्यांत अधिकाधिक अडकत चालला आहेस, हे मात्र स्पष्ट दिसतं आहे मला!''

''ते मलाही समजत आहे, पण काय करू? मी स्वत: होऊन त्यांच्या जाळ्यांत जात नाही. तशी परिस्थितीच निर्माण होतेय! घर सोडून पुण्यात आलो तेव्हा हॉटेलात सलिमा भेटली, तुझ्याकडे रहायला आलो तेव्हा मुलांना शाळेत सोडायला जाताना उल्काची ओळख

झाली. मुंबईला आलो तर रॉबर्टनं कुमारीची ओळख करून दिली. गंमत अशी, ज्या ज्या बायकांची ओळख होते त्या कसल्यातरी विचित्र परिस्थितीत सापडलेल्या असतात, त्याची झळ मलाही लागते! काय करावं समजत नाही!''

''हळूहळू तुला याही जीवनाचा सराव होईल!'' विलास मला चिडवण्याच्या उद्देशानं म्हणाला.

''हे मात्र खरं! पण तुला समजलं का? उल्काला नोकरी लागली!''

''कुठं?''

''शेठ रतनजी धीरजी शाळेत. साडेसहाशे स्टार्ट!''

''अरे व्वा! आता ती सुधारेल!''

''पिणं बंद करून टाकलं आहे म्हणते; पण आता एक आठ-पंधरा दिवस उलटल्याशिवाय काही खरं धरायचं नाही!''

''कुमारी काय म्हणते?''

''त्या बिचारीची अवस्था मोठी विचित्र झालीय रे! सरकारनं त्या गडकऱ्यांच्या केसमध्ये हायकोर्टात अपील केलं आहे. त्यामुळं ती कमालीची अस्वस्थ झालीय!''

''अस्सं? मला नव्हतं ठाऊक हे!''

''डॅडींना येण्याबद्दल तार केलीय, आज-उद्या इथला कोणीतरी तात्पुरता एक वकील देऊन तिला जामिनावर सोडवून घ्यायला हवंय!''

''तुझ्या सहवासात येणाऱ्या या स्त्रिया मात्र अगदी 'एक्सट्रॉ ऑर्डिनरी' असतात हं!''

''तुला सगळीच गंमत वाटते, विलास! मुलं कुठं आहेत?''

''इंदूबरोबर बाहेर गेलीत! काय आणलंस हे?''

''थोडी फळं, चॉकलेटस आणलीत त्यांच्यासाठी!''

''ठेवून दे! रेसला येतोस का परवा! माझे चार माऊंटस आहेत!''

''कुमारीचा जामीन मंजूर करून घेतल्याशिवाय कुठं जाणार नाही, आलो तर माझं लक्षही लागणार नाही!''

''यू आर ए डिव्होटेड कंपॅनीयन्!'' विलास हसतहसत म्हणाला.

''काय म्हणायचं ते म्हण! बरं, मी निघतो!''

''ओ ऽ के!''

विलासकडून मी निघालो तेव्हा रस्त्यावर पोरं 'इव्हिनिंग न्यूज' विकत ओरडत चालली होती. ''रिअॅरेस्ट ऑफ कुमारी! गडकरी मर्डर केस अॅडमिटेड इन् अपील!'' एक अंक विकत घेतला अगदी हेदिंगवर मोठ्या टाईपमध्ये ती बातमी छापली होती. कुमारी म्हणाली त्याप्रमाणं लोकांना पुन्हा चर्चेला तो विषय मिळाला होता. माझी पावलं नकळत वरळीकडे वळली. कुमारीच्या फ्लॅटवर आलो तेव्हा कुमारी मधल्या हॉलमधे इव्हिनिंग न्यूजचाच अंक हातात घेऊन वाचत बसली होती. मला अंक दाखवीत म्हणाली, ''हे बघ! केवढी मोठी जाहिरात केलीय माझी!''

''करू देत! मीही वाचली ती बातमी! अगदी सीरियसली विचार करण्यासारखं त्यात काही नाही!''

''तसं तुला वाटतं! कुठं जाऊन आलास?''

''विलासकडे!''

''अरे, तुला फोन आला होता. शेठ रतनजी धीरजी शाळेतून. नंबर दिला आहे. आल्यानंतर तुला फोन करायला सांगितलं आहे!''

मी उठलो. तो नंबर घेतला आणि कुमारीच्या खोलीत जाऊन त्या नंबरची डायल फिरवली. उल्काचाच फोन आला असला पाहिजे! मनात म्हटलं.

"हॅल्लो, मी समर ठाकूर बोलतो आहे. उल्का ठाकूर आहेत का तिथं?"

"हां, जस्ट ए मिनिट! प्लीज होल्ड ऑन!" दोन मिनिटातच उल्का लाइनवर आली,-

"हॅल्लो, समर का?"

"हो, हो, मीच बोलतो आहे!"

"बातमी वाचलीस ना?"

"हो, वाचली!"

"मग आता तू तिचं घर सोडून सरळ बांद्र्याला रहायला ये! मला नोकरी नव्हती, म्हणून नाईलाजानं तुला मी तिची नोकरी धरायला परवानगी दिली होती. यापुढे आपल्याला तिची गरज नाही! ती आहे आणि तिचं अपील आहे! संध्याकाळी मी तुझी वाट पहाते घरी!"

इतकं बोलून उल्कानं रिसीव्हर खाली ठेवला. माझ्या ओठांवरचे शब्द ओठांवरच विरून गेले. अशा अवस्थेत कुमारीला एकटीला सोडून जाणं मला योग्य वाटत नव्हतं.

मी पुन्हा त्या नंबरवर डायल फिरवली तेव्हा मला सांगण्यात आलं की, उल्का वर्गावर गेली आहे.

मी निराश होऊन रिसीव्हर स्टँडवर ठेवून दिला आणि काहीसा अस्वस्थ होऊन कुमारीच्या खोलीत कॉटवर बसून राह्यलो.

विलास म्हणाला ते खरं होतं. मी या बायकांच्या जाळ्यात पुरता सापडलो गेलो होतो. उल्काला भेटून तिला सर्व परिस्थिती समजावून देऊन मी आणखी काही दिवस कुमारीच्या घरी रहाणं आवश्यक होतं. पण उल्कानं एकतर्फीच फर्मान माझ्यावर लादलं होतं. कुमारी खोलीत आली आणि म्हणाली, "ही घे! तुझ्या डॅडींची तार आहे. प्रकृती बरी नसल्यानं ते येऊ शकत नाहीत. इथेच कोणातरी ॲडव्होकेटकडून अपील चालवून घ्यावं असं सुचवलंय त्यांनी!"

"माय गॉड! सगळीकडूनच दैव माझी परीक्षा पहायला लागलंय! कुमारी, माझं डोकं भयंकर चढलंय!" मी हताश होऊन म्हणालो.

"अमृतांजन देऊ?"

"नको, व्हिस्कीचा एक बडा पेग दे!"

कुमारी माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पहात राहिली.

-o-o-

२४

दुसऱ्या दिवशी मी चांदोरकर वकिलांसह हायकोर्टात जामिनाचा अर्ज घेऊन गेलो. अर्ज दाखल केल्यानंतर चांदोरकरांनी तो अर्ज लवकरात लवकर सुनावणीस ठेवण्याबद्दल प्रयत्न केला. दुसऱ्याच दिवशी त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख पडली. चांदोरकर वकील मला आश्वासन देत होते, "बेल नक्कीच मंजूर होईल! सॉल्व्हंट शुअर्टी मिळाला नाही तर कॅश भरून बेल मंजूर करता येईल!"

"अंदाजे किती रक्कम भरावी लागेल?"

"पाचएक हजार तयार ठेवा!"

"ठीक आहे!"

"बरं, तुम्ही उद्या ठीक साडेदहा वाजता कुमारीला घेऊन कोर्टात हजर रहा. काही वेळा आरोपी हजर राहणं फायद्याचं असतं!"

"ते कसं?"

"आरोपीचं वय, व्यक्तिमत्त्व याचा नाही म्हटला तरी काही अंशी परिणाम होतो. आरोपी स्त्री म्हणून बऱ्याच वेळा दयेची भावना निर्माण होत असते!"

"अच्छा अच्छा! मी घेऊन येईन तिला!"

"मी जातो आहे, माझं दुसरं काम आहे. या तुम्ही उद्या!"

असं म्हणून चांदोरकर माझा निरोप घेऊन हायकोर्टाच्या दक्षिण महाराष्ट्र बार असोसिएशनच्या दालनाकडे निघून गेले. दुसऱ्या मजल्यावरच्या जिन्यानं खाली उतरून जावं म्हणून मी वळलो, तो समोर राजकन्या रत्नप्रभा!

मी अदबीनं त्यांना नमस्कार करून विचारलं, "आपण इकडे?"

"हो, तुला किती शोधायचं या मुंबईत? बरं झालं भेटलास एकदाचा!"

"पण आपण हायकोर्टात काय काम काढलंत?"

"मी? आमच्या पतिराजांवर मेंटेनन्ससाठी काम चालवलंय. माझे वकील इथं आहेत. त्यांच्यासोबत कोर्टात जायचं आहे!"

"बांद्र्याच्या?"

"हो, मी तिथंच रहाते!"

"बांद्र्याला कुठं असता?"

"कुठं असते ते समक्ष तुला नेऊनच दाखवते. पण तू कोर्टात का? तुझ्यामागे कोर्टखटलं लावलं की काय कोणी?"

"माझ्यामागे काही लावलं नाही; पण माझ्या एका मित्राचं काम होतं म्हणून आलो होतो. आपण किती वेळ थांबणार आहात?"

"वकिलांना भेटायचं की लगेच निघायचं. तुला सवड असली तर चल! बरं, तू असतोस कुठं हल्ली? विलासनं मला तुझा पत्ता देण्याचं टाळलं! काय, भानगड काय आहे?"

रत्नापूरला मी पाह्यलेल्या रत्नप्रभाराजे आमूलाग्र बदलल्या होत्या. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर एक निष्पाप अन् बालिश असं सौंदर्य दिसत होतं, पण आज माझ्यासमोर ज्या रत्नप्रभाराजे उभ्या होत्या त्या या मुंबईच्या धकाधकीच्या जीवनांत रुळलेल्या, किंचित त्रासलेल्या अन् उद्विग्न अशा दिसल्या.

काही झालं तरी त्या माझ्या प्राणदात्या होत्या. स्वत:च्या बापाचं माझ्या जीविताला धोका करण्याचं कारस्थान याच रत्नप्रभाराजेंनी उधळून लावलं होतं. आज त्यांना माझ्याकडूनही कसलीही मदत लागली तर मला तर ती करणं भाग होतं. मी क्षणभर विचार करून म्हणालो,

"मी मोकळाच आहे. येईन तुमच्यासोबत!"

"ठीक आहे! पण तुझा पत्ता नाही सांगितलास?" माझ्याशी बोलत बोलत त्या बार असोसिएशनच्या दालनापर्यंत आल्या. त्यांचे वकील तिथं नव्हते. ते बांद्र्याच्या कोर्टाकडे गेले होते. जाण्यापूर्वी त्यांनी रत्नप्रभाराजेंना तसा निरोप ठेवला होता.

खाली आल्यानंतर राजकन्येनं टॅक्सी केली. मी पुढं बसावं म्हणून पुढचं दार उघडलं, तेव्हा त्या म्हणाल्या, "अरे, मागे बस ना!"

मला मागे बसण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. पण तरीही अंग चोरून डाव्या बाजूला बसलो. राजघराण्याविषयीचा आदर तीन पिढ्या रक्तात भिनलेला होता, तो असा सहसासहजी निघून जाणं शक्य नव्हतं!

रत्नप्रभाराजेंनी माझी आदब ओळखली अन् त्या हसून म्हणाल्या, "समर, गेले ते दिवस! विसरून जा आता! तू असं वागायला लागलास तर खरोखरच मी राजकन्या आहे असं मला वाटायला लागेल! आय वॉण्ट टु फर्गेट माय पास्ट! सारं विसरून जायचं आहे मला! सरळ इकडे सरकून बस!"

तरीही मी तसाच बसून राह्यलो, तेव्हा राजकन्या स्वत:च माझ्याकडे सरकल्या आणि त्यांनी चक्क माझा हात हातात घेत म्हटलं, "जरा माणसासारखं वाग ना माझ्याशी!"

मी हात सोडवून घेण्यासाठी थोडी चुळबुळ केली. पण नियमितपणे रायिंडग केल्यानं, लगाम खेचून कणखर झालेली त्यांची हाताची पकड जबरदस्त होती. मला माझी बोटं त्यांच्या हातून सोडवून घेता आली नाहीत.

टॅक्सीवाला त्या प्रचंड वाहनसमुदायातून टॅक्सी कौशल्यानं चालवत होता. त्याला ना मुंबापुरीच्या त्या अफाट जनसमुदायाला कुठल्या टॅक्सीत कोणी कोणाचा हात धरून बसले आहे हे पहायला सवड होती! तसं पाह्यलं तर मुंबईच्या टॅक्सी ड्रायव्हर्सना मागे बसणारी तरुण जोडपी याहीपेक्षा किती भयंकर प्रकार करतात याची कल्पना असावी. आमचा टॅक्सी ड्रायव्हरदेखील असाच स्थितप्रज्ञ जातीतला होता.

"समर, तुला मी एक पत्र पाठवलं होतं, आठवतं?"

"हो, तुमच्या लग्नापूर्वी!"

"बरोबर, अन् त्या पत्रात मी एक भीतीही व्यक्त केली होती की, रावेरचं राजघराणं अत्यंत जुनाट वळणाचं आहे. मला तिथं शिकार, नृत्य, गायन, वाचन, रायिंडग यापैकी एकही छंद जोपासता येणार नाही, आणि लग्नानंतर नेमकं तसंच घडलं! मला वाड्यातून बाहेर पडायची बंदी केली! का, तर म्हणे राणीचं नखदेखील प्रजेला दिसता कामा नये! मी कॉन्व्हेंटमधे शिकलेली, गोषा पद्धतीचा मनस्वी तिटकारा असलेली!"

"पण महाराजांनी लग्नापूर्वी तुमची इच्छा विचारात नाही घेतली?"

"ते इतके शहाणे असते तर मग हे कशाला घडलं असतं! त्यांचं शहाणपण सारं

कारस्थानं करण्यात खर्ची पडलं होतं! लग्नाच्या अगोदर मी डॅडींना सर्व कल्पना दिली, तेव्हा 'रावेरच्या महाराजांचा जामदारखाना अख्ख्या हिंदुस्थानात तिसऱ्या नंबरचा आहे! पहिला हैद्राबादच्या नबाबाचा, दुसरा बडोद्याचा अन् तिसरा रावेरचा! संस्थान छोटंसंच आहे, पण पूर्वापार चालत आलेली संपत्ती, जडजवाहिर-हिरं, माणकं, मोती, सोनं अगणित आहे! एवढ्या सधन संस्थानची राणी होते आहेस, तेव्हा बाकीच्या काही गोष्टींकडे तुला दुर्लक्ष करावं लागेल, असं म्हणाले ते.''

''बरं मग?''

''मग काय, लग्न झालं! पतिराज म्हणजे शुद्ध बैलोबा! आईवडिलांच्या अर्ध्या वचनात! सकाळी बाथरूमला जाऊ का एवढंच आई-वडिलांना न विचारता करीत! बाकी प्रत्येक गोष्टीत 'माँसाहेब, मी खाली खासगीत जाऊ' 'माँसाहेब, मी बागेत फिरायला जाऊ,' अशा फालतू गोष्टी विचारत असत. बुद्धी नसलेल्या त्या राजकुमाराची मला पहिल्याच दिवशी घृणा आली! पुढं पुढं हे अंतर वाढत गेलं! मी डॅडींना पत्रानं कळवलं तर त्यांचं उत्तर आलं, ''तुला ॲडजस्ट करून घ्यावं लागेल! रावेरचे रीतिरिवाज तुला कटाक्षानं पालन करावे लागतील!'' हे रीतिरिवाज म्हणजे वाड्यातून बाहेर न पडणं. तुरुंगातले कैदीदेखील आपआपसात मनमोकळेपणानं बोलू शकतात, पण मला धड बोलायला एखादी दासीही नव्हती. माझं मन 'रिव्होल्ट' करून उठलं. डॅडी मला परत रत्नापूरला घेणार नव्हते, तिथं रावेरला रहाणं मला असह्य झालं होतं. तू जसा रत्नापुरवरून रात्रीतून निघून गेलास तशी मी रावेर सोडून इकडे आले, सोबत थोडे पैसे, दागिने आणले होते. त्यावर आजपर्यंतचा खर्च भागला. यापुढं किमान दरमहा एक हजार तरी हवेत मला खर्चाला, म्हणून मेन्टेनन्स मागते आहे!''

''हो, तुमच्या स्टँडर्डला तितके तरी जरूर आहेतच!''

''म्हणूनच क्रिमिनल प्रोसिजरखाली पोटगीचा अर्ज दाखल केला आहे रावेरकरांवर! त्यानंतर वाटणीचा दिवाणी दावाही करायचा विचार आहे.''

''पण ते नांदवायला तयार असतील तर पोटगी मिळणं कठीण आहे!''

''अरे, त्यांना ही नोटीस लागली तरी पुरे आहे! कोर्टात येऊन उभं रहायची हिम्मत कुठं आहे त्यांच्यात? इतकी अमाप संपत्ती आहे त्यांच्याजवळ, महिन्याला एक हजार म्हणजे 'किस झाडकी पत्ती' त्यांना! पोटगी मिळेल पण मला वकिलांनी एकदोन साक्षीदार हवेत असं सांगितलंय! जर त्यांनी मेन्टेनन्स पीटिशन कॉन्टेस्ट करायचंच, तर माझ्या बाजूनं साक्ष देणारे एक-दोन उत्तम साक्षीदार हवेत. तुला इथं मुंबईत शोधत होते ते त्याचसाठी!''

आता मात्र मला संपूर्ण उलगडा झाला. राजकन्येनं माझा हात सोडून वाऱ्यानं भुरभुरणारे आपले केस सावरले अन् त्या माझ्याकडे स्नेहार्द्र नजरेनं पहात म्हणाल्या, ''तू मुंबईत आहेस असं समजल्यावर मला खूप बरं वाटलं! तुझं काय-काय झालं? पहिल्या बायकोपासून तू डायव्होर्स घेऊन दुसरं लग्न केलंस असं कोणीतरी म्हणत होतं?''

''चुकीची माहिती आहे ही! पहिल्या बायकोशी पटलं नाही एवढं खरं; पण डायव्होर्स मात्र दिला नाही तिला! आमच्या घराण्यात तशी प्रथा नाही!''

''मग पहिलीला डायव्होर्स न देताच दुसरं लग्न केलंस?''

लग्न अन् डायव्होर्स याविषयी बोलताना भातुकलीच्या खेळाइतकं सहजतेनं राजकन्या बोलत होत्या. मी त्यांना हसतहसत म्हणालो, ''माझ्याही आयुष्याचा 'फियास्को' झालेला आहे. सुरुवातीला मन थोडं हळवं होतं. वाईट वाटलं, पण आता मन निर्ढावलंय!''

''एक्झॅक्टली! माझंही अगदी तस्संच झालंय!'' राजकन्येनं माझ्या हातावर टाळी देत म्हटलं. दादर-माहीम ओलांडून गाडी बांद्र्याच्या परिसरात आली तेव्हा राजकन्या पर्समधल्या

छोट्या आरशात ओठांवरची लिपस्टिक बरोबर करीत म्हणाल्या, "तुझी अन् माझी अवस्था जवळजवळ सारखीच आहे तर! वुइ आर सेलिंग इन् द सेम बोट!"

मी फक्त हसून होकार दर्शविला अन् विचारलं, "माझ्याबद्दल आपल्याला कोणी माहिती दिली?"

"अरे, तू स्वत:ला कोणी साधा समजू नकोस! आजकाल मुंबईतले गुंडदेखील तुला घाबरतात. ए, खरं काय घडलं रे त्या गडकऱ्यांच्या प्रकरणात?"

"म्हणजे तेही तुम्हांला समजलंय तर?"

"वा ऽ! उभ्या महाराष्ट्राला ते समजलंय! तू अजून कुमारीकडेच असतोस ना? विलासनं पत्ता द्यायला टाळटाळ केली, तेव्हाच शंका आली होती! कशी आहे रे दिसायला ती?"

शेवटी स्त्रीजातीतली असूया नकळत डोकावलीच! कुमारीच्या सौंदर्याबद्दल कोणाचंही दुमत होण्यासारखं नव्हतं. पण तरीही एका स्त्रीसमोर दुसऱ्या स्त्रीच्या सौंदर्याचं गुणगान करायचा मूर्खपणा माझ्या हातून घडणं शक्य नव्हतं. हसत हसत मी म्हणालो,- "ती सुंदर आहे, पण तुमच्याइतकी नाही!"

राजकन्येनं माझ्या दंडाला चिमटा काढला अन् त्या म्हणाल्या, "पक्का आहेस तू! अरे, मी तर ऐकलंय की मस्तानीनंतर महाराष्ट्रात अशी सुकुमार बांध्याची स्त्री झालीच नाही!"

"असंच काही नाही हं! या मुंबईत एकीपेक्षा एक अशा सुस्वरूप स्त्रिया आहेत, पण तुमच्या सौंदर्याशी तुलना करायची झाल्यास त्या फार मागे पडतील!"

राजकन्या डोळे तिरपे करून हसल्या. बांद्र्याचं कोर्ट आलं होतं. राजकन्येनं पर्समधून पैसे काढून बिल भागवलं, तेव्हा मी म्हणालो,-

"टॅक्सीत जितका पैसा या मुंबईत जातो तितक्यात गाडीदेखील ठेवता येईल!"

टॅक्सीवाल्याकडून बाकीचे पैसे परत न घेताच त्या मला म्हणाल्या, "कम ऑन, लेट अस फाइंड आउट द ॲडव्होकेट!"

ॲडव्होकेट भडोचवाला जाडजूड होते. खुर्चीत ते मावत नव्हते. एवढ्या मोठ्या पोटाचा माणूस मी अद्याप बघितलेला नव्हता.

"ओ ऽ ह प्रिन्सेस! कम ऑन, कम ऑन! तुम्हाला हायकोर्टात निरोप मिळाला ना?"

"हो. म्हणून सरळ इकडेच आले!"

"हे बघा, तुमच्या नवऱ्याला शमन्स लागू झ्याला! आता शटरा टारीकला ते कोर्टात हजर होणार! पुराव्याचा काय केला?"

"हा काय साक्षीदार आणला आहे! तुम्हाला जशी हवी तशी साक्ष देईल!"

माझा होकार न घेताच राजकन्येनं भडोचवालांना सांगून टाकलं.

"दॅटस् व्हेरी नाइस! व्हॉट इज युवर नेम, यंग मॅन?" माझ्याकडे क्षणभर रोखून पहात भडोचवाला पेन कपाळावर घासत म्हणाले, "मी तुमाला कुठेतरी पाह्यलाय?"

"गडकरी मर्डर केसच्या वेळी सेशन कोर्टात आपण मला पाह्यलं असण्याची शक्यता आहे!" मी म्हणालो.

"करेक्ट! परफेक्टली करेक्ट! काय वंडरफुल ॲर्ग्युमेंट केला ते भवानीनगरच्या ठाकूर वकिलानं!"

"ते माझेच वडील!" मी म्हणालो.

"अरे! काय शांगटा काय? प्रिन्सेस, मग हे असला एक शाक्शीदार बस झ्याला!"

रत्नप्रभाराजेंनी माझ्याकडे हसत पाह्यले. भडोचवाला ॲडव्होकेटनी पुढची तारीख

सांगितल्यानंतर आम्ही कोर्टातून बाहेर पडलो.

"हं, आता बोल, कुठं जायचं?" राजकन्येनं मला विचारलं.

"तुम्ही सांगाल तिथं!"

"जेवायलाच जाऊ कुठंतरी बाहेर!"

"जेवायला?" हातातल्या घड्याळाकडे पहात मी म्हणालो, "संध्याकाळी घरी जायला हवं होतं!"

"अरे! घर तर नेहमीचंच आहे. फोन करून सांग!"

"घरी फोन नाही!"

"जवळपास?"

"शेजारी एक फोन आहे! ठीक आहे, पण जायचं कुठं?"

"तूच सांग! माझ्याजवळ फारच थोडे पैसे आहेत, तूच होस्ट व्हायला हवंस!" स्पष्टपणे राजकन्या म्हणाली.

माझ्याही खिशांत दुर्गावर जिंकलेले पैसे होते. खिशांत पैसे असताना पैसे नसल्याचा बहाणा करणारे असंख्य महाभाग मी पाह्यलेले आहेत. पण मला असं खोटं नाटक करता येत नव्हतं! शिवाय राजकन्येनं जेवण मागावं आणि मी नाही म्हणावं याला काहीच अर्थ नव्हता, राजकन्येच्या उपकाराचा इतका प्रचंड डोंगर माझ्या शिरावर होता की, कित्येक दिवस मी तिच्यासाठी खर्च करीत राह्यलो असतो तरी ते उपकार फिटणारे नव्हते. माझी अडचण एकच होती - उल्कानं मला आज संध्याकाळी घरी बोलावलं होतं. मी गेलो नाही तर तिचा गैरसमज होण्याची दाट शक्यता होती. कुमारीही एका विचित्र मानसिक अवस्थेत सापडली होती. खऱ्या अर्थानं आज मी त्रांगड्यात अडकलो होतो. पण आता मला अधिक विचार करत बसायला वेळ नव्हता. मी टॅक्सीला हात केला. आम्ही दोघे तीत बसलो.

"हॉटेल ड्रीमलँड."

"ये कहाँ आया जी?" सरदारजी टॅक्सीवाल्याने विचारले.

"कोलाबा!"

"हां जी! उसके सामने वो अपना डाान्सिंग स्कूल है!"

"बिल्कुल ठीक!"

राजकन्या माझ्याकडे पहात म्हणाल्या, "तू मुंबईत चांगलाच रुळला आहेस! बरं झालं, तू भेटलास! डान्सिंग स्कूलमधे फी काय घेतात रे!"

"इथली डान्सिंग स्कूल्स, फक्त नावाचीच आहेत राजे. डान्सिंग स्कूलच्या नावाखाली राजरोस वेश्याव्यवसाय चालतो. अशा ठिकाणी चुकूनही जाऊ नका?"

"खरं सांगतोस हे?"

"पाहायचं आहे का? पण नको! ज्या गावाला जायचं नाही, त्या गावची वाटसुद्धा विचारू नये! मी एक प्रश्न विचारू?"

"जरूर विचार!"

"रावेर सोडल्यानंतर वास्तव्य करायला तुम्ही मुंबईच का पसंत केलीस?"

"त्याला काही खास कारण आहे!"

"कोणतं?"

"रावेर सोडल्यानंतर मला अशा ठिकाणी राहावंसं वाटलं, की जिथं कोण कोणाची चांभारचौकशी करणार नाही! या मुंबईत तू पहातोस ना, कुणाला दुसऱ्याची चौकशी करायला सवडच नाही. जो तो यंत्राच्या पट्ट्यात सापडल्यासारखा धावतोय! सकाळपासून रात्रीपर्यंत ही

धावाधाव सुरू आहे. मी इथं येऊन जवळजवळ सहा महिने झाले. या सहा महिन्यांत तुम्ही कोण, कुठल्या, याची साधी चौकशीदेखील कोणी केली नाही!''

''त्या दृष्टीनं जरी हे शहर चांगलं असलं तरी खर्चाच्या दृष्टीनं अत्यंत महागडंही आहे!''

''हे बघ, माझी कोणतेही कष्ट करायची तयारी आहे! शिवाय पोटगी एक हजार रुपये मिळाली तर माझं एकटीचं त्यात कसंही भागेल!''

''पण असे किती दिवस काढणार? आपण अजून तरुण आहात!''

हसतहसत त्या म्हणाल्या, ''तारुण्य काय कायम टिकतं थोडंच?''

''जोपर्यंत आहे तोपर्यंतचं विचारतोय मी!''

''तो प्रश्न गौण आहे, समर! मला एक सांग, सिनेमा कंपनीत तुझ्या काही ओळखी आहेत?''

''सिनेमा कंपनी?'' मी दचकून विचारलं.

''हो, मला सिनेमात काम करायची खूप इच्छा आहे!''

''हा प्रांतही त्या डान्सिंग स्कूलपेक्षा फारसा भिन्न नाही, राजे!''

''तूदेखील 'ऑर्थोडॉक्स' कसा रे? प्रत्येक क्षेत्रात अगदी टगे आणि मवाली असल्यासारखं बोलतोयस?''

''राजे, मी ही दुनिया अगदी जवळून पाहतो आहे. स्त्रीच्या चारित्र्याचे वाभाडे निघाले की तिला जगणंदेखील मुष्किल होतं, हे मी कुमारीच्या अनुभवावरून सांगतो आहे! त्या फ्लॅटमधे एकही जण तिच्याशी बोलत नाही! तिच्या सुखदु:खाची कुणी पर्वा करीत नाहीत. एक काळ ती या मुंबईची सौंदर्यसम्राज्ञी मानली जात होती. पण आज तिनं सारं सोडलंय, धंदा बंद केला आहे, पण तरीदेखील कोणी तिच्याशी जवळीक करीत नाहीत. एक मार्था आणि दुसरा मी बस्स!''

''तिचं उदाहरण मला कशाला सांगतोस?''

''सांगणं भाग आहे! तुम्हीदेखील तरुण आहात, सुंदर आहात, शिवाय तुम्हाला आज पैशाची गरज आहे. पैसे येतील; पण शील घेऊन जातील!''

मला वाटलं, माझ्या त्या उद्गाराने राजकन्या गंभीर होतील; पण त्या माझ्या मांडीवर चापट मारून खो खो हसत सुटल्या. इतक्या मनापासून हसल्या की हसता हसता त्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. हसायच्या थांबताच त्या मला म्हणाल्या,-

''समर, शील सांभाळायचं ते कुणासाठी?'' त्या असा चमत्कारिक प्रश्न मला विचारतील याची मुळीसुद्धा कल्पना नव्हती.

''म्हणजे?''

''माझ्या नवऱ्यानं मला अपमानास्पद वागणूक दिली. जन्मठेपेचा कैदी शिक्षेची मुदत संपल्यानंतर तुरुंगातून सुटतो तरी; पण मला त्या रावेरच्या तुरुंगांत मरेपर्यंत खितपत पडावं लागलं असतं. माझ्याजवळ सुंदर गाण्यांच्या रेकॉर्डस होत्या, मला लग्नात डॅडींनी दोन बंदुका दिल्या होत्या शिकारीसाठी; पण या नवरोजींनी माझ्या रेकॉर्डस कुठं दडवून ठेवल्या! वाड्यातून बाहेर पडायला बंदी होती, मग शिकारीला कसची जातेय? बरं, वाचनात वेळ घालवावा म्हटलं तर मला पुस्तकं दुर्मिळ! रत्नापूरला तू माझी स्वत:ची लायब्ररी पाहिली होतीस ना? अरे, साध्या जेम्स हॅंडले चेसच्या किंवा अॅगाथा खिस्तीच्या डिटेक्टिव्ह नॉव्हेल्स जरी मला वाचायला मिळाल्या असत्या तरी चाललं असतं! समर, माझ्या ठिकाणी एखादी अडाणी, निरक्षर राजकन्या असती तर ती मात्र सासरच्या जामदारखान्यातलं वैभव पाहून तिथं रमली असती. पण माझ्यासारख्या विदेशी जीवनाबद्दल आकर्षण असलेल्या, स्वतंत्र बुद्धीच्या मुलीला तो

राजवाडा कारागृहासारखा भासला. आताशी शील, चारित्र्य या कल्पनादेखील मला भोंगळ वाटू लागल्या आहेत. माणसानं कसं स्वच्छंदी जीवन जगावं! हसावं, खेळावं, बागडावं! मन मानेल ते खावं-प्यावं! शेवटी एक दिवस मरूनच जायचं आहे ना?''

''राजे, हे सर्व वाटतं तितकं सोपं नाही! तुम्ही पुरुष असता आणि असं वागला असता तर फारसं कोणी लक्ष दिलं नसतं. पण तुम्ही स्त्री आहांत आणि स्त्रीत्वाच्या मर्यादा झुगारून देणं इतकं सोपं नाही.''

''अरे व्वा! म्हणे स्त्रीत्वाच्या मर्यादा! समर, याचा अर्थ इतकाच की, अजून तुझे विचार बुरसटलेले आहेत!''

''तसं समजू नका राजे! स्वच्छंदी जीवन जगण्याला माझा आक्षेप नाही; पण पुरुष जो स्वैराचार करतो तो स्त्रीला करता येणं शक्य नाही. निसर्गानेच तिच्यावर काही मर्यादा लादलेल्या आहेत.''

''मला कल्पना आहे तुला काय म्हणायचंय त्याची! पण तरीही स्त्रीनं थोडं डोकं वापरलं तर, तिलाही स्वच्छंदीपणे जगता येईल!''

राजकन्येचे विचार इतके पुढे गेले होते की, आता त्यांना काही शहाणपणा शिकवण्यात अर्थ नव्हता, हे मी ओळखलं.

कुलाब्याच्या त्या विस्तीर्ण रस्त्यातून टॅक्सी डान्सिंग स्कूलसमोरच्या हॉटेल ड्रीमलँडसमोर येऊन स्थिरावली. मी टॅक्सीचे पैसे भागवले. राजकन्या माझ्यामागोमाग हॉटेलच्या पायऱ्या चढू लागल्या. हॉटेल दुसऱ्या मजल्यावर होतं. अन् लिफ्टसमोर पाटी होती 'प्लीज डोंट लिफ्ट फॉर सेकंड फ्लोअर.'

जिना चढताचढता त्या म्हणाल्या; ''अरे, थोडा आधार दे ना हाताचा! इथं तुला अन् मला कोणीही ओळखणार नाही!''

मी राजकन्येच्या हाताला धरले. साडेसात वाजून गेले होते. हॉटेलात तरुण जोडपी यायला सुरुवात झाली होती. समोर 'बार' ची पाटी दिसली. तेव्हा राजकन्येनं त्या पाटीकडे माझं लक्ष वेधलं!

''घ्यायचं काही ड्रिंक?'' मी सहज विचारलं.

''मग? इतक्यांत जेवायचं? नुकतेच साडेसात वाजलेत!''

आम्ही दोघे आत गेलो. मेणबत्तीच्या आकाराचे आणि मेणबत्तीसारखेच मंद जळणारे विजेचे दिवे कोपऱ्यात आणि वर सीलिंगमधे झुरत होते. निळ्या भिंतीवर खजुराहोमधील लेण्यातल्या काही पोजेस चितारल्या होत्या. आमच्यासमोर एक अँग्लो इंडियन जोडपे एकमेकाला असे चिकटून बसले होते की, काय अशी शंका माझ्या मनात डोकावली.

राजकन्येच्या वक्तव्यानं माझीही भीड चेपली होती. जाड कुशनच्या सोफ्यावर माझ्याशेजारी बसलेल्या राजकन्येनं माझा हात हातात घेतला. मी यिंत्कचितही प्रतिकार केला नाही, तेव्हा त्या मला अधिकच बिलगल्या!

लाल बंद गळ्याचा कोट आणि काळी पट्टी असलेली लाल पँट घातलेला 'बेअरर' आदबीनं माझ्याजवळ येऊन आज्ञेची वाट पाहू लागला.

''काय घेणार तुम्ही, राजे?''

''व्हिस्की! कोणती आहे?'' राजकन्येनं विचारलं.

''डिंपल, जॉनी वॉकर, वॅट सिक्स्टी नाइन, व्हाइट हॉर्स, सिवास रिगल, ट्रिपल क्राउन, गोल्ड कॉइन, स्कॉटिश चीफ...''

त्यानं इतकी नावं भराभर घेतली की एकही लक्षांत राहू नये राजकन्या म्हणाल्या,-

"व्हाइट हॉर्स!"

"हीच कशी काय पसंत केलीत?" मी विचारलं,

"मला तिचा फ्लेवर बरा वाटतो! आणि घोड्याबद्दल मला जिव्हाळा असल्यानं पसंत करते!"

"याअगोदर मुंबईत घेतली होती?"

राजकन्या त्या प्रश्नावर फक्त हसल्या. त्यांना उत्तर देण्याची इच्छा नव्हती हे मी ओळखलं.

"समर, हॉर्सवरून आठवलं, तू रेसला जातोस?"

"पुण्यात जात होतो, इथं आल्यापासून गेलो नाही. विलास मला नेहमी म्हणतो, येत जा!"

"दॅटस इट! रेसचं काय आहे सांगते तुला. आपल्या चांगल्या ओळखीचा एखादा जॉकी असल्याशिवाय रेस खेळण्यात अर्थ नाही. ट्रेनरओनर यांना काहीसे अंदाज असतात, पण जॉकीइतक्या 'परफेक्ट टिप्स' कोणीच देऊ शकत नाही! विलासची तुझी इतकी मैत्री आहे तर का नाही फायदा करून घेत?"

मी हसतहसत म्हणालो, "पैसा मिळवायचे इतर हुकमी मार्ग माझ्याजवळ असताना बेभरवंशाच्या मार्गाला कशाला जाऊ?"

"म्हणजे?"

इतक्यात वेटरनं व्हिस्कीचे ग्लास आणि सोड्याच्या बाटल्या ट्रेमधून आणून ठेवल्या, अन् पुन्हा अदबीनं विचारलं, "एनी स्नॅक्स सर?"

"नो! थँक्स!"

राजकन्या या आयुष्यांत परत भेटतील असं रत्नापूर सोडल्यावेळी वाटलं नव्हतं. त्यांची भेट तर झालीच, पण माझ्या अगोदरच गुंतागुंत वाढलेल्या आयुष्यांत ह्या आणखी थोडी भर टाकणार असं दिसू लागलं. मी त्यांना समजुतीच्या चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला खरा; पण माझं ते 'सर्मन' हवेतच विरून गेलं. राजकन्येनं जीवनाचा जो मार्ग स्वीकारला होता, त्यापासून त्या परावृत्त होण्याची थोडीसुद्धा शक्यता दिसत नव्हती.

माझीही अवस्था त्याहून काही भिन्न नव्हतीच! अलकानं फसवलं म्हणून मी गाव सोडलं, किंवा आई नि डॅडींनी थोड्या दिवसांसाठी मी बाहेर जावं असं सुचवलं. पण घर सोडल्यानंतर माझ्यात किती आमूलाग्र बदल घडला होता! मलाही सुंदर अन् तरुण स्त्रियांचा सहवास हवाहवासा वाटू लागला होता. उल्का माझ्याशी प्रामाणिक होती, पण तरीही मी कुमारीकडे आर्किषला गेलो होतो. कुमारी त्या खूनखटल्यांत सापडल्यामुळं माझं तिच्याबद्दलचं आकर्षणही वाढलं होतं. अशातच ही राजकन्या भेटली. ती इतक्या स्वैरपणे वागत होती की, हिच्याविषयीचा आदर थोडासा बाजूला ठेवणं मला भाग पडलं. नाहीतरी मी पुरुषच होतो! एका ठराविक मर्यादिपर्यंत मी तिची आदब ठेवली, पण त्या मर्यादिनंतर मात्र मी तिच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला असता तर तेदेखील अनैर्सिगक दिसलं असतं. मघा कानात काहीतरी सांगण्याचं निमित्त करून मी तिच्या गालाला ओझरते ओठ लावले, तेव्हा मला थोडं बरं वाटलं. प्रतिकाराचा प्रश्न उरलेला नव्हता.

"समर! खरंच सिनेमा-कंपनीत कोणी तुझ्या ओळखीचं नाही?" अगदी काकुळतीला येऊन राजकन्येनं मला विचारलं.

"खरोखरच इच्छा आहे का?"

"तुझी शप्पथ रे!"

"पण तुमच्या डॅडींना आणि रावेरला तुमच्या सासरी काय वाटेल, याचा विचार केलात का?"

"डॅडींनी मला त्या जुनाट घराण्यात देण्यापूर्वी माझ्या मनाचा विचार केला होता का? आणि रावेरकरांनी मला आपल्या वाड्याच्या गोठ्यात जनावराप्रमाणं बंदिस्त करून टाकलं होतं, तेव्हा त्यांना आपण काय करतो आहे याची जाणीव होती का? वाचायला पुस्तकदेखील मिळत नव्हतं! कोणाशी चार शब्द बोलावं म्हटलं तरी बंदी! मी कशाला पर्वा करू आता त्या लोकांची?"

"राजे, एक विचारू? रागावणार नाही?"

"मुळीच नाही! खुश्शाल विचार!"

"तुमचं आणि तुमच्या पतीचं असं मनोमनी न पटण्याचं कारण तरी काय? मी त्यांचा फोटो पाह्यला होता. फोटोत रुबाबदार दिसले!"

"हां! तसे दिसायला हँडसम! पण अंगात धमक शून्य! अरे, सांगू नये त्या गोष्टी सांगते. पहिल्या रात्रीचा प्रसंग! हे माझ्या दालनात आले. मी आपली एक इंग्रजी पुस्तक वाचत पडले होते. पण वाचनात लक्ष कुठलं रे? म्हटलं, आता अंगाला हात लावतील, मग लावतील! अर्धा तास गेला! मी पुस्तक वाचते म्हणून ते डिस्टर्ब करत नसतील; म्हणून पुस्तक मिटून ठेवून दिलं. जांभई दिली आणि कॉटवर पडले. तरीही तिकडून काही हालचाल नाही. मला निराळीच शंका येऊ लागली. अशा वेळी 'इनिशिएटिव्ह' कोणी घ्यायचं असतं?"

"पुरुषानं!" मी चटकन् बोलून गेलो.

"पण हे सुंभासारखे बसून! मला वाट पाहूनपाहून पेंग यायला लागली, अन् मी झोपलेदेखील. पण जेव्हा मध्यरात्री जाग आली तेव्हा पाह्यलं, मी झोपेत असतानाच त्यांनी काहीतरी प्रकार केला होता. इतकी किळस आली मला त्या प्रकारची, काही विचारू नकोस! पतीपत्नी म्हणून जे एक नाजुक नातं निर्माण व्हावं लागतं, एकमेकांविषयी ओढ, जिव्हाळा निर्माण व्हावा लागतो, तो कधीच झाला नाही."

"म्हणजे त्यानंतरही ते प्रसंग तुम्ही झोपेत असतानाच झाले की काय?"

"छे: रे! चांगली जागी असताना देखील एकशय्या घडली, पण का कुणास ठाऊक! मला त्यांच्याविषयी एकदाही आकर्षण वाटलं नाही! कधी स्वत:ची लहर लागली की बळेबळेच मला ओढून घ्यायचे; कधी माझ्या इच्छेअनिच्छेचा त्यांनी विचार केला नाही, स्त्रियांना एक ठराविक असा मूड यावा लागतो अन् त्यानंतरच उच्चतम अशा रतिसुखाचा अनुभव त्यांना मिळतो, हे साधं गणित कधी त्यांना समजलं नव्हतं! मला तर वाटायचं की तो समागम नसून बलात्कारच होता! समर, लैंगिक समाधान हे पतीपत्नीच्या सुखी जीवनाचा मूळ पाया असं मी समजते. तो पायाच त्यांना कधी नीट बसवता आला नाही. रावेरकरांच्या जामदारखान्यांत अगणित संपत्ती होती, पण माझ्या दृष्टीनं ते कफल्लक आणि दरिद्रीच! एक तर आईवडिलांचं भलतं 'डॉमिनेशन' आणि दुसरं म्हणजे 'त्या' शास्त्रात अगदी 'ढ'! अरे, थोडातरी मला समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला असता तरी मी त्यांचे इतर अपराध पोटात घातले असते. रावेरपासून सहा मैलांवर यांचं एक फॉरेस्ट होतं. छोटंसंच जंगल; पण त्यात रानकोंबड्या, कस्तर, वाइल्ड पीजन्स, असे पक्षी होते. जंगलात मध्यभागी रावेरकरांचा टुमदार बंगला होता. मला वाटायचं, दोघांनी त्या बंगल्यात जाऊन रहावं. खूप मनमोकळी चर्चा करावी. एकमेकांच्या कमरेला विळखा घालून कडेकपारीतून हिंडावं, मन मानेल तेव्हा शिकार करावी, पण रावेरच्या माँसाहेबांनी फर्मान काढलं, कुठंही बाहेर जायचं नाही! अरे, अशी एक नाही अनेक घटना घडल्या, की त्यामुळं माझं मन त्या लोकांबद्दल विटलं! मी मनाला खूप समजावण्याचा प्रयत्न

केला. 'सेक्स इज नॉट ऑल' नावाचं एक छोटंसं पुस्तक वाचलं होतं. त्यात लेखकानं फारच सुरेख चर्चा केली होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणं, ज्यांचं 'सेक्सलाइफ' ॲडजस्ट झालेलं नाही त्यानं आपल्या सहकाऱ्याशी कसं वागावं हे अत्यंत मनोरंजक रीतीनं सांगितलं होतं. या आयुष्यात ज्यांना 'सेक्स' उपभोगता येत नाही त्यांनी कला, क्रीडा, वाचन, निसर्ग यात मन रमवायला शिकलं पाहिजे, असंही लेखकानं सूचित केलं होतं; पण माझ्या बाबतीत म्हणशील तर सेक्स डिस्टर्ब झालेलंच होतं, पण माझं मन अन्य ठिकाणी रमवण्याच्या सर्व वाटा त्या जुनाट घराण्यातल्या लोकांनी रोखून ठेवल्या होत्या! शेवटी मला माझी सुटका करून घेतल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं!"

राजकन्या अगदी प्रामाणिकपणानं मला सांगत होत्या, अन् एकेकाळी अत्यंत विनम्र आणि मार्दवशील भासलेली ही सुस्वरूप राजकन्या अशी स्वैराचारी का बनली, याचं रहस्य मला उलगडलं. थोडं वाईटही वाटलं!

बोलता बोलता समोरचे ग्लास कसे रिते झाले हे मला अन् राजकन्येलाही समजलं नाही. आमच्या समोरचे ग्लास रिकामे झाल्याचे पाहून बेअरर हळूच टपकला. त्याला केव्हा पुढं यायचं हे ठाऊक असावं. आणखी एक-एक पेग आणायची ऑर्डर दिली गेली.

-०-०-

२५

कुमारीचा जामीन-अर्ज मंजूर झाला. माझ्या डोक्यावरचं मोठं ओझं उतरल्यासारखं झालं. पण त्या दिवशी रात्री घरी न गेल्यामुळं उल्काचा मात्र रोष मी ओढवून घेतला. त्या रात्री मी घरी जाणं शक्यच नव्हतं. राजकन्येला तिच्या निवासस्थानी सोडून येणं भाग होतं. पण त्या घरी जाण्याच्या अवस्थेत नव्हत्या. ती रात्र आम्ही फोर्टमधल्या एका हॉटेलात घालवली.

राजकन्या एका नातेवाईकाकडे रहात होत्या. त्यांना तिथं फार दिवस रहाता येणं शक्य नव्हतं. एक तर त्यांच्याजवळ पैसा नव्हता, अन् दुसरं म्हणजे नवऱ्याला टाकून आलेल्या स्त्रीला आसरा देणं हे अनेक व्यवहारी माणसांच्या दृष्टीनं गैर होतं. राजकन्येची ही जबाबदारी आपण स्वीकारावी की नाही याबाबत माझ्या मनाचा अद्याप निर्णय होत नव्हता. एक वेळ तिनं माझ्यावर उपकार केला म्हणून जन्मभर मी तिचा भार घ्यावा का? काय करावं?... पण मी जर आधार नाकारला तर तिचा या मुंबईत टिकाव लागणं शक्य नव्हतं!

आम्ही रेसकोर्सवर भेटायचं ठरवलं होतं. विलासकडून मी चार टिप्स घेतल्या होत्या. राजकन्या गुलाबी जॉर्जेट आणि तसलंच ब्लाऊज घालून रेसकोर्सवर आल्या. रेसकोर्स म्हणजे अनेक युवतींचं सामूहिक दर्शन घडणारी एक जत्राच! सर्व जातीच्या, धर्माच्या स्त्रीपुरुषांचा मेळावा! रेसकोर्सवर येण्यापूर्वी या स्त्रिया किमान तासभर तरी अगोदर मेकअपला बसल्या असल्या पाहिजेत, असं वाटे! पण राजकन्येसारख्या जातीच्या सुंदर स्त्रिया त्या मेळाव्यांत सहज ओळखू येत!

राजकन्या हातातली पर्स फिरवीत सांगितलेल्या ठिकाणी आल्या. हसत हसत मला म्हणाल्या, "तुला एक चांगली बातमी सांगायची आहे!"

"कसली?"

"रावेरकरांनी मला महिना दीड हजार पोटगी देण्याचं कबूल केलं आहे. त्यांनी ते मेन्टेनन्सचं पीटिशन मी काढून घ्यावं असं सुचवलं आहे!"

"फार छान झालं!"

"पण भडोचवाला म्हणत होते की, त्यांनी कोर्टात हजर राहून तसं लेखी लिहून द्यायला हवं! समज, आज त्यांनी दरमहा दीड हजार द्यायचे कबूल केले, आणि नंतर दिले नाही तर? पण कोर्टामार्फत ऑर्डर झाली की त्यांच्यावर ती कायदेशीर जबाबदारी राहील!"

"बरोबर आहे वकिलांचं म्हणणं!"

"म्हणून वकिलांनी त्यांना कळवलंय की, एकदा समक्ष येऊन तसं अंडरटेकिंग कोर्टात देऊन जा!"

"बरं केलं!"

"विलासकडे गेला होतास?"

"होय! चार घोडे दिलेत त्यानं, पण खास अशी 'सर्टन्टी' नाही! जिंकले तर भाव चांगला पडेल!"

"माझ्याकडे आज जास्त खेळायला पैसे नाहीत! तूच खेळ!"

"मी देतो ना थोडे!"

"किती दिवस माझ्यासाठी खर्च करतील?"

"तुमची पोटगी नियमित सुरू होईपर्यंत!"

बोलतबोलत आम्ही 'बूथ' पर्यन्त आलो. तोच राजकन्येनं मला एका मध्यम वयाच्या सूटधारी माणसाला दाखवून म्हटलं, "हे नरोन्हा! प्रख्यात दिग्दर्शक आहेत. माझी यांची ओळख करून देता आली तर बघ!"

योगायोग असा विचित्र होता, सकाळीच नरोन्हा विलासकडे आले होते, अन् विलासनं त्यांची अन् माझी ओळख करून दिली होती. सिनेक्षेत्रातले प्रोड्यूसर, डायरेक्टर, नटनट्या विलासकडे यायचे. मला सिनेमातल्या लोकांविषयी कधीही आकर्षण वाटलं नव्हतं. उलट ती माणसं आपमतलबी, स्वार्थी आणि कमालीची लबाड असतात असा माझा ग्रह होता. प्रोड्यूसर्स नटनट्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला असंख्य पटींनी द्यायला तयार असत; पण तेच तंत्रज्ञांना किंवा इतर कामगारांना पैसे देताना त्यांचे चेहरे सुतकी होत. आता रेसकोर्सवर नरोन्हा भेटताच मी सिनेधंद्यातल्या लोकांविषयींचा आकस क्षणभर विसरून गेलो.

"हॅल्लो! मिस्टर नरोन्हा! वुइश यू बेस्ट ऑफ लक!" मी म्हणालो.

"द सेम टू ये!" गळ्यातली दुर्बिण सावरून नरोन्हा माझ्या डाव्या बाजूला उभ्या असलेल्या राजकन्येकडे पाहून स्मित करीत म्हणाले, "बेस्ट लक मिसेस ठाकूर!"

मला एकदम लाजल्यासारखं झालं.

"ओ ऽ ऽ नो नो! शी इज माय फ्रेंड! प्रिन्सेस ऑफ रत्नापूर!" राजकन्येनं हात जोडले. नरोन्हा आपण एकदम काहीतरी बोलून गेलो म्हणून ओशाळला आणि म्हणाला, "आय ॲम सॉरी, प्रिन्सेस!"

"मिस्टर नरोन्हा, यांना एखाद्या चित्रपटात काम करायची फार इच्छा आहे!" मी म्हणालो.

"अच्छा? मोस्ट सर्टनली!"

"आपण विलासकडे भेटू!"

"ओ ऽ के!"

नरोन्हा आमचा निरोप घेऊन गर्दीत मिसळले, तेव्हा राजकन्या म्हणाल्या,-

"समर, काय छान योगायोग जमून आला रे!"

"या लोकांच्या मागेही फार लागून चालत नाही; फार भाव खातात मग!"

"विलासनं जर मनावर घेतलं ना तर सहज शक्य होईल!"

"आपण बोलू नंतर त्याच्याशी त्या विषयावर!"

खरं म्हणजे मला राजकन्येनं सिनेमाक्षेत्राकडे अजिबात फिरकू नये असं वाटत होतं. जोपर्यंत जवानी आहे तोपर्यंतच सिनेमात 'मार्वेâट' रहातं, नंतर कोणी कोणी विचारत नाही. भवानीनगरमधे कित्येक जुन्या नट्या मी पाहिलेल्या होत्या. शेवटी त्यांना स्टुडिओत काम करणाऱ्या लाइटमन् किंवा ट्रॉली ढकलणाऱ्याची रखेली म्हणून दिवस कंठावे लागत होते. आम्ही फुटबॉल खेळायला सारसबागेत जायचो, तेव्हा अशीच एके काळची मराठी चित्रपटसृष्टी गाजवलेली 'हीरॉइन' तारा ग्राऊंडच्या एका कोपऱ्यात बसून चुरमुरे-फुटाणे विकायची. प्रत्येकीच्याच वाट्याला असे जीवन येत असेल असे नाही; पण बहुतांश नट्यांचा उत्तरकाल हा परावलंबी असतो याची मला खात्री होती. माझा सिनेमात चांगल्या बायकांनी जायला विरोध होता तो आणखी एका कारणामुळे. स्त्रीच्या चारित्र्याचे या क्षेत्रात इतके िंधडवडे निघतात

तितके दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात निघत नसतील! डायरेक्टर आणि प्रोड्यूसरची तृप्ती केल्याशिवाय कोणतीच नटी नावारूपाला येत नाही. अशी अनेक उदाहरणं मी पाहिलेली होती. एक अत्यंत किळसवाणा दिसणारा निर्माता सतरा वर्षांच्या एका नवोदित तारकेला मांडीवर घेऊन बसलेला प्रकार मी एका लॉजवर पाह्यला होता. समोर शेवचिवड्याची प्लेट, बाजूला रमची बाटली आणि कोवळी पोरगी त्याच्या मांडीवर. तिचा बाप शोभेल असं त्याचं वय होतं. मी त्या लॉजवर एका जुन्या फुटबॉल प्लेअर मित्राला भेटायला म्हणून गेलो आणि चुकून दुसऱ्याच खोलीचं दार ढकललं, तर समोर हे दृश्य! त्यांची क्षमा मागून मी मागे वळलो. तेव्हा ते निर्माते मला आत बोलावून म्हणाले, "या या! रम घेणार का थोडी!" मी ओशाळलो होतो. तरीही वरून तसं न दाखवता म्हणालो, "एकोणीस नंबरमधे मला जायचं होतं!"

"जाल हो नंतर! थोडी रम घेऊन जा. हिला आग्रह केला तर ही नाही म्हणते. दारू कंपनीशिवाय प्यायला मजा येत नाही हो!"

त्याच्या मांडीवरून बाजूला सरकून बसलेली ती तरुणी खाली मान घालून उगाचच खुदूखुदू हसत होती. तरी बरं, तो मराठी चित्रपटनिर्माता होता. हिंदी चित्रपटनिर्माता असता तर मला काय पाहायला मिळालं असतं, याची कल्पनाच करवत नाही! हिंदीवाल्यांपेक्षा मराठीवाले त्यातल्या त्यात 'सोबर!'

"समर! अरे, रेस सुटायची वेळ झाली. स्टॉलकडे चल!" राजकन्येच्या त्या शब्दांनी माझी विचारमालिका भग्न पावली. आम्ही दोघे स्टॉलवर गेलो. दूर स्टारटिंग पॉइंटपाशी घोडी पिंजऱ्यात घातली जात होती, माईकवरून कॉमेंट्री सुरू होती,

"सालाझार इज बिइंग इन्स्टॉल्ड, नयनतारा इज इन्, ब्ल्यू नाइट इज बिइंग टेकन टु द स्टॉल्स..." सगळी घोडी बंद केल्यानंतर बेल झाली आणि रेस सुटली. मी 'नयनतारा' वर विनसाठी शंभर लावले होते, तर राजकन्या सालाझार आणि ब्ल्यू नाईटवर फोरकास्ट पूल खेळली होती! घोडी फर्लांगाचे अंतर तोडीत विनिंग पोस्टकडे धावत आली आणि राजकन्या जोरजोरांत ओरडू लागली, "सालाझार! ब्ल्यू नाईट! सालाझार! ब्ल्यू नाईट!"

शेवटी सालाझार विन आणि ब्ल्यू नाईट प्लेस झाली. राजकन्येनं मी दिलेले शंभर रुपये फोरकास्टवर लावले होते, भाव पडला होता एकशे ऐंशी! राजकन्येच्या शंभर रुपयांचे तीन हजार सहाशे क्षणांत झाले. त्यानंतरच्या रेसमधे राजकन्या पन्नास रुपये हरली.

रेस्टॉरंटमधे कोल्ड्रिंक घेण्यासाठी आम्ही गेलो तर तिथं चिक्कार गर्दी. बाहेर थोडा वेळ थांबावं लागलं. आतली गर्दी ओसरल्यानंतर आत जायचं म्हणून आम्ही दाराशी थांबलो असताना आतून अचानक अवी, उल्काचा भाऊ एका ब्रह्मी पोरीच्या हातात हात घालून आला. मला पहाताच तो म्हणाला,-

"हॅल्लो समर! भल्या गृहस्था! अरे, तू आहेस तरी कुठं? उल्का कुठं आहे? लग्न केलंस ना तू तिच्याशी?" राजकन्येकडे आपद्मस्तक पहात त्यानं विचारलं, "यांची ओळख?"

"प्रिन्सेस ऑफ रत्नापूर!"

"ओ ऽ! ग्लॅड टू मीट यू प्रिन्सेस! समर, तू भेटलास फार बरं झालं. चल, आत फार गर्दी आहे, आपण हिरवळीवर बसू. तिकडेच काहीतरी मागवू!"

राजकन्या सोबत असल्यामुळं बाहेर मोठ्या रंगीबेरंगी छत्र्यांखाली बसायला नको म्हणून मी आत चाललो होतो; पण अवीनं बाहेर बसायचं सुचवल्यामुळं माझा नाईलाज झाला.

आम्ही समोरासमोर बसलो, तेव्हा अवी म्हणाला, "तरी मला वाटत होतंच की, तुझी कधीकाळी भेट झाली तर ती रेसकोर्सवरच होणार! समर, मीट माय फ्रेंड, वीन ली फ्रॉम रंगून!"

'वीन ली' हसली.

"समर, उल्का कुठं आहे सध्या? मला तिला भेटायला हवंय. एक वर्ष होऊन गेलं असेल तिला पाहून! काय, करते काय ती सध्या?"

"नुकतीच र्सिव्हस लागलीय तिला."

"त्यापूर्वी?"

"त्यापूर्वी तिनं मला कामाला लावलं होतं!"

"म्हणजे?"

"तू आणि मी एकदा निवांत भेटू, म्हणजे सर्व सांगता येईल. तूर्तास ती सुखरूप आहे एवढं समज!"

"मी तुला बोललो होतो आठवंत? आमच्यात ही उल्का अत्यंत तऱ्हेवाईक आहे. एक मनात आलं तर तेच धरून बसेल! आयुष्यात तडजोड म्हणून तिला ठाऊक नाही! आता तुझ्याशी लग्नच करायचं होतं तर तू पहिल्या बायकोपासून डायव्होर्स घेतला आहेस की नाही याची शहानिशा करून घ्यायला नको होती? आई-पप्पा तेच म्हणत होते. घाईनं लग्न केलंस तर मिस्ट्रेसपेक्षा भिन्न असं तुझं स्थान रहाणार नाही! मला सांग, वाईट होता सल्ला तो? पण नाही! ऐकलंच नाही तिनं! असू दे! आज सुखात आहे ना ती?" राजकन्येकडे पहात त्यानं मला विचारलं.

"तसं समजायला हरकत नाही!" संकोचून मी म्हणालो.

"ठीक आहे! आज विलासनं काही खास टीप्स दिल्या का?"

"हो, मघाच्या रेसला प्रिन्सेसना फोरकास्ट लागली."

"काँग्रॅटस्!"

राजकन्या सोबत असताना अवी भेटल्यामुळं मला फारच 'ऑकवर्ड' वाटू लागलं होतं. पण अवी तरी बेटा कुठं इतका साळसूद लागून गेला होता? त्याचंही लग्न झालेलंच होतं, तरी तो या 'वीन ली' ला सोबत घेऊन फिरत होताच की? मला जास्त शिकवायच्या भरीस तो पडला नाही याचं कारणच ते असावं!

अवीनंच आम्हाला कोल्ड कोको पाजला. जाताना अवी म्हणाला, "आमची बोट मुंबई बंदराला लागलेली आहे. चार दिवस मुक्काम आहे आमचा. त्यानंतर आम्ही एडनला जाणार आहोत इथून. उद्या जमलं तर जेवायला या दोघंही!"

"दोघं म्हणजे?"

"उल्का आणि तू! नक्की येत असाल तर या नंबरला फोन करून कळव! मी फोनची वाट पाहीन!" हरलेल्या तिकिटावर त्यानं नंबर लिहिला. राजकन्या मुद्दाम लक्ष नसल्यासारखं करून तिसरीकडेच पहात होत्या. ती बर्मी पोरगी मला खूपच आवडली होती. अवीची भेट झाल्यानंतर मला वाटलं होतं की, याची भेट राजकन्या सोबत असताना व्हायला नको होती; पण अवी तसा वागण्यात 'रिफाइन्ड' होता. तो उल्काच्या बाबतीत फार विचारत बसला नाही! उल्काशी लग्न केल्यानंतर राजकन्येसारख्या तरुण मुलीला मी सोबत घेऊन फिरत होतो ही घटनाच त्यात बरंचसं काही सांगून गेली असावी.

अवी त्या बर्मी मुलीला घेऊन त्या जत्रेत निघून गेला. मी मात्र काहीसा सिंचत झालो. उल्काला मी राजकन्येला घेऊन रेसकोर्सवर फिरतो, हे कळलं तर काय वाटेल? उल्काला दु:ख होईल असं मला वागून चालणार नाही... कुमारी किंवा राजकन्या या दोघींचा सहवास मला हवाहवासा वाटतो हे खरं; पण त्या माझ्यावर अधिकार गाजवू शकत नाहीत. उल्काची गोष्ट निराळी आहे. उल्काच्या मनाला लागेल असं वर्तन करून मला भागणार नाही!....

राजकन्येनं त्या दिवशी पैसे जिंकले होते, ती हॉटेलात जेवायला जायचा आग्रह करीत होती. मी मात्र उल्काकडे जाऊन तिची माफी मागायचं ठरवलं होतं. राजकन्या थोडीशी निराश झाली. पण असं प्रत्येक वेळी प्रत्येकीला संतुष्ट ठेवणं मला अशक्यप्राय होतं!

बांद्र्याला घरी आलो तेव्हा उल्का भाजी नीट करीत बसली होती. कोपऱ्यात बूट काढून मी तिच्यासमोर स्टुलावर बसलो. तिनं माझी दखल न घेता भाजी नीट करण्याचं काम पुढं सुरू केलं. ती असा अबोला धरणार हे मला ठाऊकच होतं! थोडा वेळ मी तसाच बसून राह्यलो. ती काहीच बोलत नव्हती, तेव्हा तिला खूष करण्यासाठी म्हणून मी म्हणालो, "आज तुला एक आनंदाची बातमी सांगायचीय!" तरीही ती अबोलच.

"आज अवी भेटला मला!"

उल्कानं चटकन् मान वर करून माझ्याकड पाह्यलं आणि विचारलं, "कुठं?"

"रेसकोर्सवर!"

"काय म्हणाला?"

"आपल्याला त्यानं बोटीवर जेवायला बोलावलंय?"

"केव्हा?"

"उद्या रात्री!"

"आणखी काय म्हणत होता?"

"काही नाही!"

"एकटाच होता?"

"अं?" त्याच्यासोबत ती बर्मी पोरगी होती हे सांगावं की नाही हे न समजल्यानं मी थोडासा गोंधळून गेलो. माझी ती अवस्था उल्कानं तत्काळ जाणली आणि ती म्हणाली, "तो एकटा असणं शक्यच नाही!"

मी फक्त हसलो. "मग उद्या जायचं ना अवीकडे?"

"पाहू या! उद्या संध्याकाळी शाळेत एक मीटिंग आहे, ती लौकर संपली तर जाऊ!"

"तसं नको, त्याला अगोदर कळवायला हवं! हा बघ त्यानं दिलेला फोन नंबर!"

"जाऊ या. मी इथं सातपर्यंत येते, तू इथंच थांब."

"ओ ऽ के!"

"त्या दिवशी का नाही आलास?"

"जरा कामात होतो!"

"अजून कुमारीकडेच असतोस?"

"खरं सांगू उल्का, कुमारीला आजवर कधी नव्हती इतकी माझ्या आधाराची गरज आज आहे! तिच्या केसमधे अपील दाखल झालेलं आहे. तिची मन:स्थिती अत्यंत बिघडली आहे. न्यूरॉसिसचा झटका येईल की काय असं वाटतं आहे!"

"पण तुला तिची इतकी चिंता वाटायचं कारण?"

"हे बघ उल्का, तू ज्या वेळी मद्याच्या नशेत बेहोष होऊन पडत होतीस, तेव्हा माझी स्थिती काय होती, याची तुला कल्पना येणार नाही. त्या वेळी मला कुमारीनं जवळ केलं. माझ्यावर लोभ केला. मला सर्वार्थानं तिनं मदत केली. आज तिच्यावर वेळ येऊन ठेपली आहे, तेव्हा तिच्यासाठी थोडेफार कष्ट घ्यावेच लागतील मला!"

"कष्ट घे, माझी ना नाही. पण यातून काही तिसरंच निर्माण होऊ नये, एवढीच इच्छा आहे. मी बुद्धिभ्रष्ट झाले त्या वेळी तू विचारानं वागत होतास, पण आता मी विचारानं वागायचं ठरवल्यानंतर तू बुद्धिभ्रष्ट होऊ नयेस, एवढीच इच्छा!"

"तसं काही होणार नाही." मी बसलेलं स्टूल थोडं पुढं ओढलं आणि उल्काच्या खांद्यावर हात ठेवले. तिनं प्रतिकार केला नाही. पण फक्त समोरच्या खिडकीकडे पाह्यलं. खिडकीवरचा पडदा उजेडासाठी दूर केलेला होता. त्यातून कोणीतरी पाहण्याची शक्यता होती. मी उठून चटकन तो पडदा खिडकीवर ओढला आणि उल्काला बाहुपाशांत धरून तिचं एक दीर्घ चुंबन घेतलं. रुष्ट किंवा रुसलेल्या स्त्रियांचा राग घालवायचा असेल तर उगाच वितंडवाद घालत न बसता सरळ त्यांचं चुंबन घेऊन टाकावं! एका क्षणाच्या आत त्यांचं स्वरूप पालटतं!

बांद्र्याची आमची खोली तसं पाह्यलं तर अडचणीचीच होती. बारा बाय-चौदाच्या त्या खोलीतच जेवण करायचं, झोपायचं सामानसुमानही तिथंच आणि कोपऱ्यात मोरी होती तेच बाथरूम!

आम्हाला सुरुवातीला आश्रय देणारे रॉबर्ट आणि त्याची पत्नी लिलियन या दोघांनीही आमचे संबंध तोडून टाकले होते. पण मी मात्र रॉबर्ट दिसला की त्याला हसून स्मित करीत असे. गडकरी मर्डर केसपासून मी कोणीतरी भयंकर माणूस आहे, अशीच सर्वांची समजूत झाली होती. तशात उल्काला मद्याचं व्यसन लागलेलं! त्यामुळं लिलियननंही उल्काशी बोलणंच बंद करून टाकलं! येणं-जाणंही थांबलं. पण मला त्या दोघांनाही दोष द्यावासा वाटत नव्हता. ती पुढं पाहून वाट चालणारी माणसं होती. त्यांना धकाधकीचं जीवन पेलण्यासारखं नव्हतं. त्या दोघांनी आमच्याशी संबंध तोडल्यानं मला काही दिवस वाईटही वाटलं. वरळी नाक्याच्या दुकानात रॉबर्ट डोळ्याला भिंग लावून घड्याळ दुरुस्त करीत असताना मी अनेकदा पाह्यला. काही वेळा वाटे, दुकानी जावं आणि रॉबर्टला विचारावं, "का रे बाबा, माझ्याशी बोलणं बंद करायला मी काय तुझं घोडं मारलं आहे?" पण अधिक विचार केला, एखाद्याला माझ्याशी संबंध वाढवायचे नसतील तर मी जबरदस्ती का करावी? कोणाशी किती काळ मैत्रीचे संबंध ठेवायचे हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न आहे.

त्या दिवशी उल्का भाजी नीट करताना मी तिला जवळ ओढून चुंबन घेतलं अन् म्हणालो, "आज भाजी खायला नको, कुठंतरी चांगल्या हॉटेलात जाऊन मस्तपैकी जेवू!"

प्रथम उल्का तयार होईना, पण जरा जास्त गळ घातल्यावर ती तयार झाली. ती कपडे करायला लागली, तोच दारावर थाप पडली, म्हणून मी उठून पुढं झालो. खिडकीचा पडदा दूर सारून पाह्यलं तर दाराशी लिलियन उभी!

मी दार उघडलं. लिलियन आत आली आणि ओक्साबोक्शी रडू लागली. उल्काशी तिनं बोलणं जरी बंद केलं असलं तरी दारातून ती रडत आत आली म्हटल्यावर उल्कानं तिला विचारलं,

"का? काय झालं ग?"

"रॉबर्ट!" रडता रडता थांबून ती म्हणाली. मला वाटलं रॉबर्ट संपला, पण उल्कानं तिला पुन्हा विचारलं, "काय झालं रॉबर्टचं?"

"त्याला अटक करून पोलीस घेऊन गेले!"

"कशाबद्दल?"

"चोरीचं घड्याळ त्याच्याकडे मिळालं असा आरोप ठेवलाय त्याच्यावर!"

"छट्!" मी म्हणालो, "त्याच्या बापजन्मी असलं कृत्य व्हायचं नाही! केव्हा पकडलं त्याला?"

"दुपारी तीन वाजता!"

"ठीक आहे. त्याला मी एक तासाच्या आत सोडवून आणतो! चल माझ्यासोबत, उल्का, तूही चल!"

त्यावर उल्का माझ्यावर डोळे मोठे करून म्हणाली, ''कोणत्या आधारावर तू त्याला सोडवून आणण्याचं वचन देतोस?''

''आधारबिधार मला काही माहीत नाही, पण रॉबर्टसारख्या पापभीरू माणसाच्या हातून चोरीचा माल जवळ बाळगण्याचा हा गुन्हा घडणंच शक्य नाही!''

त्या दोघींना टॅक्सीनं घेऊन मी पोलीस स्टेशनवर गेलो. आताशी पोलीस, कोर्ट यांचा मला सराव झाला होता. गडकरी मर्डर केसपासून पोलीस खात्यातल्याही बऱ्याच लोकांशी माझी चांगली जानपेहेचान झाली होती. त्या दोघींसह मी आता गेलो. तिथले सबइन्स्पेक्टर घाटपांडे माझ्या परिचयाचेच निघाले.

''हॅल्लो मिस्टर ठाकूर, व्हॉट ब्रिंग्ज यू हिअर?'' त्यांनी विचारलं.

''तुम्ही माझा एक दोस्त पकडून आणला आहे!''

''कोण? प्लीज सिटडाऊन!''

मी पुढे बसलो. माझ्या मागच्या खुर्च्यांवर उल्का आणि लिलियन् बसल्या.

''कोण म्हणालात आपण, मिस्टर ठाकूर?'' फौजदारांनी पुन्हा विचारलं.

''रॉबर्ट मार्टिन!''

''हां, तो घड्याळवाला! वरळी नाक्यावरचा?''

''हां, हां, तोच! ही त्याची बायको लिलियन!'' लिलियननं त्याला नमस्कार केला.

''मिस्टर ठाकूर, आम्ही आजच त्याला अटक केलेलं आहे. त्याच्याकडे चोरीचं एक इंपोर्टेड घड्याळ मिळालं आहे. घड्याळांचं स्मगिंलग करणाऱ्या टोळीशी याचे संबंध असावेत अशी शंका आहे आम्हाला!''

''इंपॉसिबल! हा माणूस तुम्ही मोठ्यानं ओरडलात तर बेशुद्ध पडेल इतका भित्रा आहे. गडकरी मर्डर केस झाली कुमारीवर, पण मी तिथं असतो म्हणून यानं घाबरून माझ्याशी बोलणंदेखील बंद करून टाकलं होतं!''

''ते खरं आहे, मिस्टर ठाकूर! पण पेडर रोडच्या सटोडियाचं जे घड्याळ चोरीला गेलं होतं, ते रॉबर्ट मिंटनच्या दुकानी सापडलं... बरं, याला विचारलं ते तुझ्याकडे कसं आलं, तर त्याला सांगता येईना. तो कोणाचं तरी वर्णन सांगू लागला. त्याच्या रजिस्टरमध्ये जे नाव लिहिलेलं आहे, त्या नावाचा माणूस अस्तित्वात नाही! त्यानं ही खोटी एंट्री केली असावी अशी शंका निर्माण होते!''

''पण साहेब, ज्या माणसानं हे घड्याळ त्याच्याकडे आणून दिलं, त्यानं आपलं बनावट नाव सांगितलं असण्याची शक्यता आहे की नाही?''

इन्स्पेक्टर हसून म्हणाले, ''तीही शक्यता नाकारता येत नाही, मिस्टर ठाकूर. पण तरीही खरं काय-खोटं काय हे ठरवण्यासाठी आम्ही याची एक आठ दिवसांची पोलीस कस्टडीची रिमांड घेणार आहोत!''

''तुम्हाला ज्या वेळी चौकशीसाठी त्याची गरज भासेल तेव्हा तो तुमच्याकडे हजर होईल ना!''

''ते खरं आहे मिस्टर ठाकूर, पण तरीही याला सोडवून घेण्याची एवढी घाई का?''

''ही त्याची बायको रात्रभर रडत बसेल!''

''ते त्याला जामिनावर सोडायला पुरेसं कारण होऊ शकत नाही, मिस्टर ठाकूर!'' शांतपणे इन्स्पेक्टज घाटपांडे म्हणाले.

''साहेब, खुनासारख्या केसमधे एकदा नव्हे दोनदा कुमारीला कोर्टानं जामिनावर सोडलं! एकदा सेशन कोर्टानं आणि परवा अपिल ॲडमिट झाल्यानंतर हायकोर्टानंदेखील बेल

मंजूर करताना आढेवेढे घेतले नाहीत! आणि तुम्ही या साध्या घड्याळ सापडलेल्या खटल्यांत त्याला रिमांड घेऊन डांबून ठेवणार?''

''त्याला काही ईलाज नाही, मिस्टर ठाकूर!''

''ठीक आहे! कोणाचं घड्याळ चोरीला गेलं होतं म्हणालात?''

''वीरेंद्रकुमार सटोडिया, ३४१।७, नवरोजी गमाडिया लेन, पेडर रोड!''

''ओ. ऽ के! मी येतो एक पंधरा मिनिटात.''

टॅक्सी करून गेलो. त्या वीरेंद्रकुमारला गाठला. त्याला माझी ओळख सांगितली. गडकरी मर्डर केसमधल्या कुमारीचा मी पर्सनल सेक्रेटरी अशी ओळख करून देताच तो निम्मा हबकला. त्याला म्हणालो,-

''गेली दहाबारा वर्षं रॉबर्ट मार्टिन तिथं दुकान मांडून आहे. एकदाही त्याच्याबद्दल कोणी तक्रार नोंदवलेली नाही. तुमचं घड्याळ कुणीतरी दुसऱ्यानं चोरून दुरुस्तीसाठी खोटं नाव सांगून त्याच्याकडे दिलं असल्याचीच शक्यता आहे. तुमचं घड्याळ तुम्हांला मिळालं म्हणजे झालं ना!''

''मग आमाला दुसरं काय पायजे?''

''ते इंपोर्टेड घड्याळ आहे, तुम्ही कोणाकडून घेतलंय याची पावती आहे का तुमच्याजवळ?''

''पावती कसा असेल?''

''मग ते घड्याळ तुमचंच कशावरून? मिस्टर सटोडिया, तुम्ही या रॉबर्टला जामिनावर सोडवण्यासाठी जर सहकार्य न द्याल तर मला निराळ्याच मार्गाचा अवलंब करावा लागेल?''

''काय म्हणाला?''

''काही नाही, नंतर समजेल!''

किंचित धमकीवजा बोलण्यानं वीरेंद्रची वीरश्री मावळली. तो घाबरून म्हणाला, --

''ए बाबू, आमी काय करायला पायजे ते सांग!''

''पोलिसांना सांगा की, आपलं ते घड्याळ परत मिळालेलं आहे. ते माझ्या घरगड्यानं चोरलेलं होतं, आणि ते दुरुस्तीसाठी रॉबर्टकडे टाकलं असेल! रॉबर्टचा या गुन्ह्याशी काही एक संबंध नाही!''

''आमी कुटं म्हणते?''

''तुम्ही म्हणत नाही, पण तुमच्या शब्दावर विसंबून त्या बिचाऱ्याला आठ दिवस पोलीस कस्टडीत खितपत पडावं लागेल ना! तोंडावर खिसमस आलाय! ऐन खिसमसमधे हा रॉबर्ट पोलीस कस्टडीत खितपत पडेल! आपल्या वस्तू सुरक्षित ठेवता येत नाहीत, आणि त्या चोरीला गेल्यानंतर कोणावरही तोहमत आली तरी चालेल असं वाटतं तुम्हा लोकांना?''

''ये, तुमी असं काय बोलू नका. ते जामिनावर सुटले तर आमच्या बापाचा काय तोटा न्हाय होनार!''

''मग चला तर पोलीस स्टेशनवर, सांगा त्या फौजदारांना की, घड्याळ चोरीला गेल्याबद्दल माझी या रॉबर्टविरुद्ध तक्रार नाही. कोणीतरी दुसऱ्यानं ते चोरून त्याच्याकडे दुरुस्तीला टाकलं असलं पाहिजे असं!''

वीरेंद्र सटोडिया स्वत:ची गाडी घेऊन पोलीस स्टेशनला आला. फौजदारांना भेटला आणि म्हणाला 'सायेब, हे केस मिटवून टाकता आला तर बगा, घड्याळ आमाला परत मिळाला तर आमचा काय बी तक्रार नाय!'

''हां, शिवाय यांच्याकडे घड्याळाची पावतीही नाही. उद्या कोर्टात रॉबर्ट मार्टिन हे

घड्याळ स्वत:चंच म्हणाला तरी यांचं काही चालणार नाही! घड्याळ गेलं, आणि खोटी केस दाखल झाल्याचा कोर्टाचा ठपका यांच्या माथी येईल! खरं की नाही मिस्टर सटोडिया?''

फौजदारांनी ओळखलं की, रॉबर्ट मार्टिनला आपण जर जामिनावर सोडला नाही, तर मी तो 'प्रेस्टीज पॉ◌ंइंट' करून त्या कामात निष्कारण घोळ तयार करून ठेवणार!

फोजदार हसतहसत म्हणाले, ''मिस्टर ठाकूर, केवळ तुमच्या मध्यस्थीमुळे आम्हांला याला सोडावं लागत आहे!''

''व्हेरी काइंड ऑफ यू! पण एखाद्याला अटक करण्यापूर्वी त्याचे 'अँटेसिडेटस्' काय आहेत हे थोडं पहावं. एक घड्याळ मिळालं म्हणून तो अगदी स्मगलर्सच्या टोळीतला एक आहे इथपर्यंत कल्पनेची भरारी मारणं बरं नव्हे!''

''आता तुमच्यासमोर काय बोलायचं? हवालदार, त्या रॉबर्ट मार्टिनचा बेलबॉण्ड पुरा करून त्याला सोडून द्या. चौकशीच्या कामी त्याची गरज लागली तर परत बोलावून घेता येईल?''

इन्स्पेक्टर घाटपांडे हसतहसत मला पुढं म्हणाले, ''बाकी तुम्ही निष्णात वकील नक्कीच बनला असता. आपली बाजू दुसऱ्यांना पटवून देण्यात तुमचा अगदी हातखंडा दिसतो!''

''थँक्स फॉर द् कॉम्प्लिमेंटस्''

रॉबर्ट मार्टिनला जेव्हा पोलिसांनी जामिनावर सोडलं तेव्हा तो बाहेर आम्ही उभं होतो तिथं आला. माझ्याशी निष्कारण अबोला धरल्याबद्दल त्याला पश्चात्ताप होत असावा असं त्याच्या चर्येवरून दिसत होतं. लिलियन मार्टिनचे डोळे कृतज्ञतेनं पाणावले होते. हातांतल्या घड्याळात पाहात लिलियनला म्हणालो, ''अद्याप एक तासदेखील झालेला नाही. मघाशी तुला काय म्हणालो होतो?''

''काय?'' ओलावलेल्या डोळ्यांच्या कडा पुसत लिलियन मला विचारलं.

''एक तासाच्या आत रॉबर्टला सोडवून आणतो असं म्हणालो होतो की नाही?''

लिलियननं होकारार्थी मान डोलावली. अन् ती म्हणाली, ''फार उपकार झाले तुझे! खिसमसच्या दिवशी हा अटकेत राह्यला असता!''

''आता खिसमस आनंदानं साजरा कर! उल्का, चल!''

''जेवायला येत नाहीस घरी?'' लिलियननं उल्काला विचारलं.

''आज नाही, खिसमसच्या दिवशी येऊ. खास गोवानीज पद्धतीची चिकन् बनव!'' मी म्हणालो.

टॅक्सी हात करून थांबवली आणि आम्ही दोघे मार्टिन पतीपत्नींचा निरोप घेऊन हॉटेलकडे निघालो.

उल्का माझा हात हातात घेत म्हणाली, ''तुला इतका आत्मविश्वास कसा रे?''

''कशाबद्दल म्हणतेस?''

''रॉबर्टला तासाच्या आत सोडवून आणतो म्हणालास आणि खरं करून दाखवलंस ते!''

''त्याचं काय आहे उल्का, कोर्टकचेऱ्यांची मला बरीच माहिती झालीय वर्षभरात! कोणती कळ दाबली की कोणतं दार उघडतं, कोणतं बंद होतं, हे सर्व मला समजायला लागलंय! त्या वीरेन्द्र सटोडियाला प्रथम हात जोडून समजावण्याचा प्रयत्न केला; ऐकेना म्हणताना चांगला दम भरला. मग बरोबर वठणीवर आला.''

''पण पोलिसांनी तुझं का ऐकावं? त्यांना तू दम भरू शकत नाहीस!''

''तुला समजलं नाही उल्का! नकळत तेही काम केलं मी! कोर्टात जर रॉबर्टवर खटला भरून पाठवला तर तो खटला टिकणार नाही हे मी सूचित केलं, ही एक प्रकारची तंबीच नव्हती का? शिवाय खरं सांगू, गडकऱ्याला मारला मार्थानं आणि कुमारीनं, पण अजूनही या खात्यातल्या काही लोकांना वाटतं, की मीच त्यामागं असलो पाहिजे! मी दिसलो की थोडेसे चपापतात याचं कारण तेच!''

उल्कात आणि माझ्यात गेले कित्येक दिवस अंतर पडलं होतं. तिच्या गळ्यातल्या मंगळसूत्राशिवाय तिचं-माझं काही नातं उरलं नव्हतं. पण सुदैवानं तिला नोकरी लागली अन् सारंच चित्र पालटलं. कुमारी आणि राजकन्या या दोघींच्या सहवासात मला सुख व्हायचं, पण त्या सुखाला काही मर्यादा होत्या.

उल्कासोबत फिरताना मात्र मनाला कसली खंत वा रुखरुख वाटत नसे. मी तिच्याशी लग्न केलं होतं. ते लग्न कायदाबाह्य जरी असलं तरी मी तिच्याशी लग्न केलेलं आहे, या जाणिवेमुळं मला तिच्याकडे पाहताना आदर वाटत असे. ती मद्याच्या आहारी गेली तेव्हा मला खूप दु:ख झालं. मी तिला त्यापासून परावृत्त करायचा आटोकाट प्रयत्न केला, पण हाती यश आलं नाही. शेवटी मॉफिया देऊन, भूल देऊन तिची अल्कोहोलिक स्थिती बदलावी लागली. यात माझ्याजवळ होते नव्हते ते सारे पैसे संपून गेले होते.

पण मला पैशाची कदर नव्हती. पैसा मिळवणं हा माझ्या हातचा मळ होता! परवा दुर्गावर बघता बघता मी हजारो रुपये कमविले. तरीही मला पैशाचा हव्यास नव्हता. जवळ पैसा असला की मी तो पाण्यासारखा उधळत असे, मुळातच तो पैसा विनाकष्ट मिळवलेला असे. अन् विनाकष्ट मिळवलेल्या पैशाला पळवाटा फार! तो आल्याचं सुखही नाही आणि गेल्याचं दु:खही नाही! प्राचीन पुराणग्रंथ मी फारसे वाचलेले नाहीत, तथापि निर्लोभी वृत्ती की काय म्हणतात ती बहुधा हीच असावी!

'रेनबो' हॉटेल मुख्य प्रवेशद्वारांतून टॅक्सी आत येताच समोर हिरवंगार लॉन मर्क्युरी दिव्याच्या प्रकाशात किरमिजी रंगाचं दिसत होतं. या हॉटेलचं वैशिष्ट्य असं की, समुद्रकिनारा या हिरवळीवरून स्पष्ट दिसत असे. या हॉटेलात येणारे बहुतांशी लॉनवरच्या खुर्च्या-टेबलांवर डोळा ठेवून असत. आत बसणारे फारच थोडे. तसे चोरून खाणारे-पिणारे किंवा सोबत आणलेली पोरगी कोणाला दिसू नये म्हणून सरळ हॉटेलाच्या इमारतीत जाणारेही थोडेथोडके नव्हते!

आज उल्का माझ्यासोबत होती. मला हॉटेलात जाण्यापेक्षा बाहेर बसणेच पसंत होते. उल्का समुद्राकडे तोंड करून बसली. आजूबाजूला काही जोडपी ड्रिंक्स घेत, हसतखिदळत होती. उल्काला आता मद्याचं आकर्षण उरलेलं नव्हतं. ती ज्या वेळी सोबत असेल तेव्हा तिचा मान राखायचा म्हणून मीही मद्याला स्पर्श करायचा नाही असं ठरवलं होतं.

''समर, या हॉटेलचं वातावरण कसं प्रसन्न वाटतं, नाही?'' आकाशाकडे पाहात ती म्हणाली.

''त्याचं कारण काय, आहे ठाऊक?''

''काय?''

''पायाखाली ही हिरवळ, समोर समुद्र आणि वर आकाश! समुद्र आणि आकाश ही निसर्गाची अतिप्रचंड दोन रूपं. यांच्याकडे पाह्यलं की माणसाच्या मनातले जळकटकळकट विचार लुप्त होतात. समुद्राकडे पाह्यलं की मन कसं प्रसन्न होतं. समुद्र पाह्यल्यानंतरही ज्याच्या मनात स्वत:विषयी विचार येतील तो माणूस शुद्ध जनावर! तसंच आकाशाचंही आहे! खरं म्हणजे अशा हिरवळीवर उताणे पडून आकाशातले चंद्र, ग्रहतारे पाह्यलेस का तू?

तेव्हादेखील मानवी जीवनाचं क्षणभंगुरत्व आणि निसर्गाचं विराटत्व प्रत्ययाला येतं!''

उल्का एकाएकी हसू लागली.

''हसायला काय झालं?'' मी सिगारेट पेटवून विचारलं.

''तुझ्यात संचारलाय कवी!''

''खरंच उल्का! चेष्टा नको समजू! कधी कधी मला अगदी अस्संवाटतं!''

''वाटू दे, वाटू दे. तो बेअरा येतोय, त्याला ऑर्डर दे! समुद्र आणि आकाश पाहून तुझी तहानभूक विसरत असेल, मला मात्र भूक आवरत नाही! बरं, अवी आणखी काय म्हणत होता?''

''काही नाही, इकडचं तिकडचं विचारलं त्यानं!''

''लग्नाबाबत काय बोलला?''

''हो. आपणाला लग्न करायला कोणाचा विरोध नव्हता; फक्त हे लग्न कायदेशीर ठरावं एवढीच त्यांची इच्छा होती!''

''आता असं म्हणायचं असतं! अरे, जेव्हा मी तुझ्याबद्दल पप्पांना सांगितलं, तेव्हा ते म्हणाले, दिसायला स्मार्ट असणारी माणसं कधी कधी कारस्थानी निघतात! तुझ्या संदर्भात बोलताना मला ते त्या सलिमा मर्डर केसच्या बाबतीत सारखं काहीतरी सांगायचे. हेतू हा की, मी तुझ्यापासून चार हात दूर राहावं!''

''मुलींच्या आईवडलांना हे असं वाटणं स्वाभाविकच आहे, उल्का! तुझ्यासारखी देखणी, सुविद्य मुलगी चांगल्या ठिकाणी पडावी असं आई-बापांना का वाटू नये? तसे अनेक दुर्गुण माझ्याजवळ आहेत! मी जुगार खेळतो, बाहेरख्यालीपणा करतो, मद्य मला निषिद्ध नाही. मग अशा माणसाला आपण जावई करून घ्यावा असं कोणा सुज्ञ आईबापाला वाटेल?''

''पण मला पश्चात्ताप वाटत नाही त्याचं काय?''

''तुझी माझ्याकडे पहाण्याची दृष्टीच भिन्न आहे!''

वेटर जवळ येताच मी त्याला ऑर्डर दिली.

''उल्का, बाकी आता येणारे दिवस चांगले आहेत, असं मला वाटायला लागलंय!''

''कशावरून?''

''तू त्या 'ऑक्टोपस'च्या विळख्यातून सुटलीस, नोकरी लागली. लिलियनसारखी तुझी जुनी मैत्रीण तुटली होती, ती पुन्हा जोडली गेलीय. या साऱ्या घटना येणारे दिवस चांगले येतील हेच दर्शवतात!''

''ते काय असेल ते असो; पण तू यापुढं कुमारीकडे तुझं जाणंयेणं आहे ते थांबवावंसं असं मला वाटतं!'' उल्का मनापासून म्हणाली.

''खरं सांगू उल्का, कुमारी आपल्या दोघांमधे कधीच येऊ शकणार नाही. ती खरोखरच असहाय्य आहे. इतके पैसे मिळवले तिने, पण पैसा हा एखाद्या व्यक्तीला पुरेसं संरक्षण द्यायला किती असमर्थ ठरतो हे तिच्या उदाहरणावरून अगदी स्पष्ट दिसून येतं. संरक्षण याचा अर्थ शारीरिक संरक्षण नव्हे बरं!''

''मला असल्या चर्चा करायला आवडत नाहीत, आणि अशा नितांत रमणीय ठिकाणी तरी अजिबात नाही! मला एवढंच माहीत आहे, यापुढं तिचे संबंध हळूहळू तू तोडून टाकावेस!''

वेटरनं जेवण आणलं. टॉमेटो सूपवर क्रीम तरंगत होतं. उल्का सूप खात खात म्हणाली, --

''उद्या अवीकडे जायचं आहे, लक्षात असू द्या! मला त्याला बघावंसं वाटू लागलंय!''

''उद्या सकाळीच त्याला फोन करून कळवतो ना!''

"पण जेवणाचं त्यानं कुठं सांगितलंय!"

"त्याच्या बोटीवरच! या दर्यावर्दी लोकांचे कूक फार एक्सपर्ट असतात, उल्का! देशीदेशीचे पदार्थ बनवू शकतात! अवीला बर्मीज चिकन फार आवडते, आताशी तो रोज तेच खात असतो!"

सूपनंतर कटलेटस आले. या हॉटेलचं वैशिष्ट्य असं की, इथं उत्तमपैकी फिश कटलेटस बनवले जातात. दोन फिश कटलेटस खाल्ले की वर दुसरी 'डिश' नको वाटायचं! उल्काला मासा आवडायचा, पण आजपर्यन्त तिला फिश कटलेटस हा प्रकार ठाऊक नव्हता. तिला तो विशेष आवडला.

रात्री उल्का माझ्या बाहुपाशांत स्थिरावली तेव्हा मी तिला बिलगून म्हणालो, "पुणं सोडल्यापासून इतक्या दिवसांनी आज प्रथम..."

खरंच, पुणं सोडल्यापासून उल्काशी एकशय्या झालेलीच नव्हती. तिचं ते व्यसन! कधी मी घरी आलो तर ती तारवटलेले डोळे विस्फारून दार उघडायची! पत्नी म्हणून जवळ घ्यावं असं मलाही वाटलं नव्हतं! आज तो दिवस अन् क्षण आला होता.

-o-o-

२६

ते तीन महिने! माझ्या आयुष्यांतले अत्यंत आनंदाचे आणि सुखासमाधानाचे असे गेले!

कुमारीचं अपील चालायला अवधी होता. पण तिची होईल त्या परिणामाला तोंड देण्याची आता मानसिक तयारी झाली होती. चार चार दिवस मी तिच्याकडे जात नव्हतो, त्यामुळं उल्काला समाधान वाटत होतं. मी कुमारीशी हळूहळू संबंध तोडून टाकतो आहे अशी तिची खात्री होऊ लागली होती.

राजकन्येच्या जीवनांतही थोडं स्थैर्य निर्माण झालं होतं. त्यांना महिना दीड हजार रुपये पोटगी देण्याचं रावेरकरांनी मान्य केलं होतं. त्या नातेवाईक बाईकडे अधिक काळ रहाणं शक्य नसल्यानं त्यांना दादरच्या हिंदू कॉलनीत दोन खोल्यांचा एक ब्लॉक मिळवून दिला. रेसला अधूनमधून जात होतो. विलासनं दिलेल्या टिप्सपैकी 'फिफ्टी पर्सेंट' बरोबर यायच्या; त्यामुळं कितीही पैसे खेळलो तरी नुकसान नाही अन् फायदा नाही अशी अवस्था व्हायची. नाही म्हणायला माझे अन् विलासचे जवळचे संबंध आहेत म्हणून अनेक पंटर मला चिकटले होते. जेवण, पार्ट्या बाहेर व्हायच्या! हळूहळू मुंबईतल्या जुगारी जगांतही माझी जानपहेचान झाली. 'तो' चष्मा डोळ्यांसमोर चढवून मी ज्या ज्या वेळी खेळायला बसत असे तेव्हा तीनचार हजारांचा गल्ला जमवून घरी येत असे. पण मुंबईतल्या जुगारी लोकांशी खेळताना मला फार जपून खेळावं लागे. मुंबई म्हणजे बनेल लोकांचं आगर! इथं प्रत्येकजण दुसऱ्याला फसवायला टपलेला असतो, असं आपलं मला वाटायचं! तेव्हा मी त्या चष्म्याचा 'इस्तेमाल' करून लोकांना गंडवू असे मनात आणलं तर फार काळ त्यांना ठकवू शकणार नाही, अशी आपली माझ्या मनांत एक भीती होती! ज्यावेळी फ्लश खेळायला व्यापारी किंवा बेअक्कल सरकारी अधिकारी जमत तेव्हा मात्र मी साफ धुऊन काढत असे. फक्त सराईत मंडळीतच मी हात आखडता घेत असे! हेतू इतकाच की, माझं गुपित चव्हाट्यावर येऊ नये!

मुंबईतलं मिल्टन हॉटेल हे कितीजणांना ठाऊक आहे, कुणास ठाऊक! पण मी मात्र गेले चार महिने अधूनअधून या हॉटेलवर फ्लश खेळायला जायचो.

मुंबईतल्या पॉश लोकवस्तीतल्या एका प्रचंड इमारतीत तळघरात हे हॉटेल आहे. एखाद्या डिपार्टमेंटल स्टोअरमधे जसं ब्रेसियरपासून ते फेल्ट हॅटपर्यंत सर्व वस्तू मिळतात त्याप्रमाणं या हॉटेल मिल्टनमध्ये बाई-बाटली पासून ते चरस-गांजा-हशीश, एल. एस. डी. पर्यंत सर्व मादक पदार्थ मिळत. जुगाराचेही सर्व प्रकार बिनधास्तपणे तिथं चालत. इथं हॉटेलात प्रवेश करायला फी होती पन्नास रुपये! पन्नास रुपये दिल्याशिवाय तळघराच्या द्वाराशी असलेला सहा फूट उंच पठाण आत कोणालाही सोडत नसे. तळघरात बार अद्ययावत होता. केटिंरगची व्यवस्थापक होती आण्टी जिनोजिया! फक्त अर्धा तास अगोदर ऑर्डर दिली की तुम्ही सांगाल तसल्या डिशेस तयार होत. फ्रेंच, इटालियन, इंग्लिश फूडपासून ते चायनीज नूडल्स इन् चिकन सूपपर्यंत सर्व काही तिथं मिळत असे. हॉटेल मिल्टन एका मालकाच्या

मालकीचं नव्हतं, यात पार्टनर्स होते. तेच या हॉटेलचा कारभार पाहात आणि हॉटेलात चालणाऱ्या बेकायदेशीर हालचाली चव्हाट्यावर येऊ नयेत म्हणून सर्वजण दक्ष असत. त्या इमारतीत खाली जाणारी लिफ्ट या हॉटेल मिल्टनमधे आणून सोडत असे. दुसरी वाट होती. पण ती फक्त मालक लोकांना आणि त्यांच्या खास विश्वासातल्या लोकांनाच ठाऊक होती. यदाकदाचित पोलिसांची धाड पडलीच तर बाहेर पडायचा तो इमर्जन्सीचा मार्ग होता, पण असा इमर्जन्सीच्या दारातून बाहेर पडायचा प्रसंग गेल्या कित्येक वर्षांत कोणावर आला नव्हता. सारं काही राजरोसपणे चाललं होतं.

प्रथम मला या ठिकाणी विलास घेऊन आला होता. त्याला कधीतरीच चैन करायची लहर यायची. पण आपण केलेली चैन मुंबईत कोणाच्या निदर्शनाला येऊ नये अशी खबरदारी तो घेई! हॉटेल मिल्टनमध्ये नंगानाच घातला तरी बाहेर कुणाला समजत नसे. विलास इथं यायचा तो खास एका पोरीसाठी. ही चिनी पोरगी अठराएकोणीस वर्षांचीच होती, पण जो कोण एकदा तिच्या सहवासात आला तर तो फिरून दुसऱ्या कोणाकडे जायचाच नाही! ती फर्स्ट क्लास हिंदी बोलायची! गिऱ्हाईकाला वाटावं की, आपली अन् हिची फार पुराणी ओळख आहे! 'चिंग यांग' तिचं नाव, पण तिला सर्वजण 'चिंगी' म्हणत. वेश्या व्यवसाय करणाऱ्या तयारीच्या अशा फार पोरी मी माझ्या नंतरच्या आयुष्यात पाह्यल्या आहेत; पण 'चिंगी'ची सर कोणालाही येऊ शकणार नाही. मला तर वाटे, हा व्यवसाय करण्यासाठीच तिचा जन्म झाला आहे. त्या शास्त्रात 'चिंगी' प्रवीण होती.

हॉटेल मिल्टनच्या तळघरात क्वचित प्रसंगी जुगाऱ्यांत झगडे होत; पण झगडे करणाऱ्याला दारावरच्या पठाणासारखा एक दुसरा पठाण अलगद उलचून नेत असे. मांजराच्या पिल्लाला मुंडक्याला धरून उचलतात तसा. जास्त दारू पिऊन बडबडणाऱ्याला कोपऱ्यातल्या बाथरूममधे नेऊन त्याला उभा भिजवून बाहेर घालवत. पाण्याचा प्रचंड लोट डोक्यावर सपासप आपटला की दारूड्याची नशा पाच मिनिटातच उतरत असे. सुदैवानं माझ्यावर अशी पाळी कधीही आली नव्हती आणि येणार नव्हती. मला दारूचं असं वेड नव्हतं. शिवाय माझ्याजवळ चष्मा होता तोपर्यंत मला जुगार खेळताना कोणाशी भांडणतंटा करण्याचं कारण नव्हतं! हार मला ठाऊकच नव्हती! नेहमी व्हायची जीतच!

त्या दिवशी मध्यरात्री मी खेळ संपवून बाहेर निघालो, तेव्हा हॉटेलाचा मॅनेजर सालेभॉन मला म्हणाला, "उद्या संध्याकाळी खेळायला ये!"

"का?"

"एक अरब फ्लश खेळायला येणार आहे!"

"असं? विशेष काय?"

"तो प्रत्येक वेळेला इथं येऊन सर्वांना 'बँकरप्ट' करून जातो. तू हुषारीनं खेळतोस म्हणून म्हटलं, त्याच्याशी खेळायला तुझ्याशिवाय दुसरा कोणी योग्य नाही!"

"अस्सं? पण आपले नेहमीचे मेंबर काय कमी आहेत?"

"उनको मारो गोली! ते तुझी बरोबरी नाही करणार! त्या अरबाला एकदा इथून 'नेकेड' करून सोडायचा आहे. त्याचा पांढरा पायघोळ झगादेखील काढून घ्यायचा!"

मी हसलो आणि सालेभॉयला म्हणालो, "मी येईन. पण माझ्यासोबत आणखी दोघेतिघे हवेत!"

"ते साले आले तरी, तुझ्यासमोर टिकणार नाहीत. शेवटी जेव्हा एकच प्रतिस्पर्धी उरतो तेव्हा ब्लाईंड शंभरची चाल खेळतो तो अरब!"

"माय गॉड! ब्लाईंड शंभरची चाल?"

"हो ऽ! सोन्याचा चोरटा धंदा करतो तो गेली आठ-दहा वर्षं. शंभराच्या नोटा म्हणजे त्याला टॉयलेट पेपरसारख्या वाटतात!"

"मग खेळतो कशासाठी?"

"फ्लशमधल्या थ्रीलसाठी खेळतो. कमावण्यासाठी मुळीच नाही!"

"अजबच प्राणी दिसतो हा!"

"बघशीलच उद्या! एक अख्खी स्कॉच संपवली तरी पाऊल इकडे का तिकडे पडणार नाही!"

"एवढ्या ताकदीचा माणूस आहे?"

"एका वेळेला एक अख्खा कोंबडा रिचवतो! पहाटे उठून व्यायाम करतो. त्याची ताकददेखील अशी अफाट आहे. आमचा दारावरचा पठाण आणि तो युनूस या दोघांना तो भारी आहे!"

"पैशाकडून भारी आणि शक्तीनंही भारी?"

"जबरदस्त!"

"मग मला त्याला पाहावंच लागेल!"

"अरे, पहातोस काय त्याला! फ्लशमधे जर त्याला हरवशील तर पुन्हा आयुष्यात कामधंदा करायची पाळी येणार नाही!"

"आजपर्यंत कुठं कामधंदा केलाय म्हणा! पण उद्या मात्र नक्की येईन!"

"थोडे पैसे जास्त घेऊन ये! त्याची चाल मोठी असते!"

"ओ ऽ के!"

मॅनेजर सालेभॉयनं त्या अरबाचं वर्णन केल्यामुळं मी त्याला पहायला आतुर होतो. मद्य घेताघेता फ्लश खेळणारी माणसं जसजसा डाव रंगत जाईल तसतसा मूर्खपणा करतात. त्यांचं तर्कज्ञान, सारासारबुद्धी काम करेनाशी होते. अंती सर्व पैसे गमावतात, असा माझा अनुभव होता. त्यामुळं स्कॉच पितापिता फ्लश खेळणारा हा अरब आहे तरी कोण हे पहायला मी अधीर झालो होतो. माझ्या त्या चष्म्याच्या सहाय्यानं त्या अरबाला वाळवंट दाखवण्याची स्वप्नं रंगवीत मी घरी परतलो.

मध्यरात्र टळून गेली होती, उल्कानं अर्धवट झोपेत दार उघडलं आणि ती किंचित रोषानं म्हणाली, "तुला लाख वेळा सांगितलं की थोडा लवकर येत जा घरी!"

मी हसतहसत म्हणालो, "घरी येतो हेच मोठं समज!"

"नाही आलास तरी माझं फारसं बिघडत नाही! रात्री-अपरात्री येणाऱ्या माणसाला सज्जन म्हणत नाहीत!"

"माझी तरी कुठं तशी अपेक्षा आहे!"

"बरं बरं, झोप आता. उगाच डिस्टर्ब करतोस माझी झोप!"

मी कपडे बदलून कॉटवर तिच्याजवळ झोपलो. तिच्या अंगावर हात टाकताच ती फणकाऱ्यानं म्हणाली, "प्लीज, डोंट डिस्टर्ब मी, समर!"

"ओ ऽ के! गुड नाईट!" मीही पाठ फिरवून झोपेची आराधना करू लागलो. पण काही केल्या झोप लागेना. डोक्यात नाना तऱ्हेचे विचार येऊ लागले, 'कुमारीच्या अपीलाचा निकाल कसा होईल? राजकन्येच्या डोक्यात अजूनही सिनेमात काम करायचं वेड आहे ते कसं जाईल? उल्कामधे केवढा बदल घडला आहे?....'

मला उल्काचं खरोखरच कौतुक वाटायचं! तिचं हे जे ट्रान्स्फॉर्मेशन झालं होतं ते आश्चर्यकारक होतं. अल्कोहोलिक झालेली माणसं सहसा व्यसनमुक्त होत नाहीत अन् शेवटी

त्यांचा अंत त्यातच होतो, अशी कितीतरी उदाहरणं मी बघितलेली होती. उल्काचा निर्धार मला जाणवला तो त्या दिवशी आम्ही बोटीवर जेवायला गेलो तेव्हा. तो प्रसंग अजूनही मला आठवतो.

'सतलज' या प्रचंड मालवाहू बोटीवर अवी कॅप्टन होता. त्यानं मला अन् उल्काला जेवायला बोलावलं म्हणून आम्ही गेलो. डॉकपासून सुमारे फर्लांगावर 'सतलज'नं लंगर टाकला होता. तिथं जाण्यासाठी आम्ही होडीत बसलो. बोटीजवळ होडी आली तेव्हा आम्हाला ओळखपत्र विचारलं. पण अवीनं तसं काही ओळखपत्र लागतं असं मला सांगितलं नव्हतं. तेव्हा वाटलं, आता इथूनच परतावं लागतं. इतक्यात अवी स्वत: डेकवर तोंडात पाईप धरून फिरत असताना दिसला. त्याचं आमच्याकडे लक्ष जाताच तो स्वत: उतरून खाली आला. त्याला पहाताच आम्हाला ओळखपत्र विचारणारा खलाशी आपोआप बाजूला झाला,

"तू दिसला नसतास तर पंचाईत होती." उल्का म्हणाली.

"तसं कसं होईल? मी तुम्हा लोकांची वाटच पहात होतो! डॉकवरदेखील सांगून ठेवलं होतं!"

"पण आम्हाला तिथं कोणी अडवलं नाही!"

"अडवणार बोटीवरच!"

अवी गोरा, गिड्डा नाही, फार उंच नाही, असा. हनुवटीवर लेनिनसारखी दाढी. उजव्या मनगटावर कोणा गोऱ्या खलाशाच्या नादानं गोंदून घेतलेलं! पांढरी निळी फित असलेला नेव्हीचा ड्रेस.

"जहाज लागलं तरी हा गणवेश घालावाच लागतो का?" मी विचारलं.

"अर्थात! आता बाहेर फिरायचं म्हटलं तर सिव्हिलियन ड्रेसमधे फिरता येतं."

"कंटाळा येत नाही का, दिवस अन् रात्र पाण्यात राहून?"

अवी हसला आणि म्हणाला, "या जीवनाची एकदा सवय झाली की काही वाटत नाही! शिवाय जमिनीला पाय लागले की ते जीवन मनसोक्त उपभोगून घेतो."

अवीबरोबर चालतचालत आम्ही त्याच्या केबिनपर्यंत आलो. मला वाटलं त्याच्या केबिनमधे परवा बघितली ती ब्रह्मा युवती असेल. पण तिथं तर कोणीच नव्हतं. मी हवेत हात घेऊन, ती कुठं आहे? अशा अर्थाची खूण केली. त्यावर अवी म्हणाला,-

"ती आहे खाली. थोड्या वेळानं येईल वर!"

"कोण रे?" उल्कानं विचारलं.

"बोटीवरची डॉक्टरीण!"

"तुला काय ठाऊक?" उल्कानं मला विचारलं.

"अगं, मी परवा तिला रेस पाहायला घेऊन गेलो होतो, तेव्हा हा भेटला होता."

"ती डॉक्टरीण आहे? तशी दिसत नव्हती!" मी खवचटपणे म्हणालो.

"तू त्या बाबतीत काही बोलू नकोस, समर!" अवीनं मला दरडावलं. कारण त्या दिवशी रेसकोर्सवर माझ्या सोबत राजकन्या होती.

ती प्रचंड मालवाहू बोट लाटांवर डुलत होती. मुंबईचा गजबजाट इथं ऐकू येत नव्हता. अवीबरोबर आम्ही सारी बोट फिरून पाहिली. बोटीच्या खालच्या मजल्यावर प्रचंड बॉयलर होता. बोट बंदराला लागल्यामुळं त्याखाली इंधन घातलेलं नव्हतं, तरीही त्या जागी उष्णता जाणवत होती!

"इथं या बॉयलरमधे वाफ तयार होते; ती या मोठ्या पाईपमधून पिस्टनमधे येते. वाफेच्या दाबामुळे...."अवीनं बोट कशी चालते याची थोडक्यात माहिती दिली. बॉयलरजवळ

काही निळे डगलेवाले कर्मचारी इंजिनला तेलपाणी करीत होते. अवीला तेथे आल्याचं पहाताच ते अदबीनं बाजूला होत.

"त्यानंतर हा डेक! इथं माल ठेवला जातो!"

"एकूण किती लोक असतात बोटीवर?" उल्कानं विचारलं.

"ठराविक अशी संख्या नसते; पण आमच्या या बोटीवर शंभर कर्मचारी आहेत!"

"त्यांची बायकामुलं भेटायला येतात का?"

"हो. बोट बंदराला लागली की हे लोक सुट्टीवर जातात, नातेवाईकही भेटू शकतात!"

उल्का म्हणाली, "तू प्रत्येक वेळी घरी का येत नाहीस?"

"कसा येणार? बोट बंदराला लागल्यानंतर एखादा दिवस रजा घेता येते आणि बोट बंदराला लागल्यानंतर माल चढवणं, उतरवणं अशी कामं असतातच की! भरलेला माल सुरक्षितपणे उतरला जातो आहे की नाही हे मलाच पाहावं लागतं!"

"आम्हांला वाटलं, बोट चालवणं किंवा त्यावर देखरेख करणं इतकंच तुझं काम!" मी.

"पण काय रे, तुला अंजलीची आठवण येत नाही?" उल्कानं विचारलं.

"आठवण येऊन काय करतेस? नोकरी आहे ना ही जोखमीची!" अवी म्हणाला.

"त्याचं कारण काय आहे सांगू, उल्का?" मी.

"काय?"

"A sailor has a wife on every harbour. प्रत्येक बंदरावर खलाशाची एक बायको असते!" मी अवीची मस्करी करण्याच्या हेतूनं म्हणालो. अवीनं माझ्या पाठीवर थाप देत म्हटलं, "खलाशाला ते क्षम्य आहे रे, पण तुझ्यासारख्या भूचल माणसानं एकाच वेळी चारचार पोरी झुलवत ठेवणं शोभतं का?"

"चार-चार?" मी.

"हो हो! नावं सांगायला हवीत का?"

"नको रे बाबा!" डाव माझ्यावरच उलटल्याचं पाहून मी म्हणालो, "अडचणीत असलेल्यांना मी मदत करत असतो. पण लोक त्यातून वेगळाच अर्थ काढतात झालं!"

बोलतबोलत आम्ही परत अवीच्या केबिनजवळ आलो, तेव्हा पांढरी सिल्कची साडी नेसलेली ती ब्रह्मी डॉक्टरीण विन ली केबिनसमोरच्या ग्रिलला धरून उभी होती.

"गुड इव्हिनिंग सर!" किंचित कमरेत वाकून तिनं अवीला अभिवादन केलं.

"ली ऽ, मीट माय सिस्टर उल्का ॲण्ड हर हजबंड समर!"

"अरे! माझी पुन्हा कशाला ओळख करून देतोस? परवा झालीय ना?"

"पण परवा रेसकोर्सवर आपण होता?" लीनं उल्काला विचारलं.

"मी? मी कधीच रेसकोर्सवर जात नसते!"

त्यावर अवी हसत हसत म्हणाला, "ली, तू त्याच्याबरोबर प्रत्येक वेळी नवीन पोरगी पहाशील! ती गोष्ट विचारायची नसते. बायकोसमोर असा विषयच काढायचा नसतो. केव्हा कळायचं तुला?"

मी बाहेर काय धंदे करतो ते उल्काला ठाऊक नव्हतं असं नाही; पण तरीही माझ्या त्या वागण्याची जाहीररित्या चर्चा व्हावी असं तिला वाटत नव्हतं. मी लीचं बोलणं न ऐकल्यासारखं करीत समुद्राकडे पाहू लागलो.

अवीच्या केबिनबाहेर पांढऱ्या छोट्या खुर्च्या मांडल्या. मधे पांढरं ओव्हल शेपचं टेबल ठेवण्यात आलं. अवीचा अटेंडंट डोळ्यांच्या इशाऱ्यावर पटापट कामं करत होता. अवीनं डाव्या हाताच्या मुठीवर उजव्या हाताचा तळवा आपटताच त्यानं आतून स्कॉच व्हिस्कीची बाटली

बाहेर आणली. स्नॅक्सदेखील आणायला अवीनं खुणेनंच सांगितलं.

"हा जन्मत:च मुका आहे, समर! पण याला इतकी जाण आहे की, सांगता सोय नाही!"

"हे कसं काय?"

"तेच तर आश्चर्य आहे! माझ्या अगोदर या बोटीवर जे कॅप्टन होते, त्यांनी याला आपला ऑर्डर्ली म्हणून आणला. पण ते बिचारे अगदी तरुण असतानाच वारले! हा जाणार होता, पण मीच याला इथं ठेवून घेतलं. माझं इतकंसुद्धा अडू देत नाही!"

"नाव काय याचं?"

"तोलाराम!"

"पण जन्मत: जे मुके असतात ते बहिरेही असतात म्हणे!"

"याला थोडंथोडं ऐकू येतं! मागे इथं डॉकयार्डवर स्फोट झाला, तेव्हा यानंच मला येऊन उठवलं आणि इशारा करू लागला की, बोट आणखी थोड्या दूरवर नेऊन थांबवा म्हणून!"

"का?"

"आमच्या बोटीवर त्या वेळी 'एक्स्प्लोजिव्ह' मटेरियल बरंच होतं. इमर्जन्सी डिझेल इंजिन ऑपरेट करून आम्ही बोट आत नेऊन लावली, म्हणून बरं झालं!"

"का?"

"डॉकवर झालेल्या स्फोटाचे जळके तुकडे इतस्तत: फेकले जात होते, लहान चार पडाव नाही का जळाले त्या वेळी?"

"कमाल आहे या तोलारामची! बाकी काही म्हण अवी, आम्ही तुला गुरू मानलं!" मी म्हणालो.

"का?"

"तू ज्या ज्या बंदराला जातोस तिथं कायकाय उद्योग करतोस त्याची वाच्यताच कोणासमोर होऊ नये, म्हणून न बोलता येणाऱ्या ह्या तोलारामला निवडलास!"

"हात्तीच्या!" बाटली उघडून अवी ग्लासात व्हिस्की ओतू लागला. उल्का म्हणाली,-

"मला घालू नको!"

"अगं, थोडं घे! एक दिवस घेतल्यानं काही बिघडत नाही!"

त्यावर उल्का म्हणाली, "मी जेवायला थांबावं अशी इच्छा आहे ना?"

अवीनं हसत हसत तोलारामला खूण केली, आणि तोलाराम पळत पळत बोटीच्या कॅन्टीनमधे गेला आणि कोकाकोलाच्या दोन बाटल्या घेऊन आला.

लीची साडी मंद वाऱ्यावर फडफडत होती. चीअर्स करून आम्ही तिघांनी ग्लास ओठांना भिडवले, पण उल्का मात्र स्ट्रॉँग कोकाकोलाच पित राह्यली. केवढा संयम! मला आज रात्री तो प्रसंग जसाच्या तसा आठवला.

सकाळी साडेसहाच्या सुमारास उल्का पांढरी साडी, पांढरा ब्लाऊज, केसात शेवंतीचा गजरा घालून शाळेला जायची तयारी करीत होती. अंथरुणावर पडल्या पडल्या मी डोळे किलकिले करून तिच्याकडे पहात होतो. तिच्या हालचाली न्याहाळण्यातदेखील एक सुख होतं. माझ्याकडे पाठ करून ती आरशात पाहून पावडर लावू लागली, तेव्हा आरशातूनच तिनं माझ्याकडं पाह्यलं. मी जागा आहे असं पाहून ती म्हणाली, "ऊठ, रात्री बारा-बारा, दोन-दोन वाजता यायचं, मग असं आळशासारखं लोळत पडायचं! जीवनाला काहीतरी शिस्त लावून घे! कुठंही जायचं, केव्हाही यायचं, याला काही अर्थ आहे?"

पावडर लावून झाल्यानंतर तिनं भुवयांवर हलकेच आयब्रो पेन्सिल फिरवली, फिक्कट गुलाबी अशी लिपस्टिक ओठांवरून फिरवली, आणि पर्स घेण्यासाठी ती खाली वाकली. माझी नजर तिच्या उरोजावर स्थिरावली. अलीकडे खरोखरच तिची तब्येत सुधारली होती!

"मी जाते रे! आणि रात्री घरी यायचं झालं तर दहाच्या आत ये! वेळानं येण्यापेक्षा न आलास तरी चालेल!"

"बहुधा आज येणारच नाही!"

"का कुठं निमंत्रण आहे काय?"

"होय. आज एका लक्ष्मीपुत्रासोबत फ्लश खेळत बसणार आहे."

"फ्लश, जेवणं, पार्ट्या आणि पोरांना घेऊन रेसकोर्सवर फिरणं याशिवाय दुसरं तुला काही सुचतं?"

"बाकी शिक्षकी पेशा पत्करला की माणसांना सगळ्या जगाला शिकवत सुटावं असं वाटतं खरं! तो दोष तुझा नाही, तू पत्करलेल्या पेशाचा आहे!"

"बरं बरं! पुरे झालं! ऊठ! त्या भांड्यात पोहे करून ठेवले आहेत, ते खा अन् भांडं धुऊन ठेव!"

"बरं बाईसाहेब!" मी आळस दिला आणि अंथरुणावर उठून बसलो.

उल्का "येते रे" असं अगदी स्नेहभरानं म्हणून बाहेर पडली. क्षणात रागवण्याची, क्षणात प्रेमभरानं बोलण्याची कला केवळ बायकाच जाणोत, अन् त्या फक्त लग्नाच्याच! कुमारी किंवा राजकन्या या दोघींच्या सहवासात मी खूप राह्यलो, पण त्यांनी मला असे कधी माझे दोष दाखवण्याची किंवा मला डाफरण्याचा प्रकार केला नव्हता. तो हक्क केवळ एक पत्नीच बजावू शकते!

कुमारीला मी उल्काचं घडलेलं स्थित्यंतर सांगितलं होतं, तेव्हा ती म्हणाली होती, "असं सहसा घडत नाही, पण तुझ्या बायकोच्या बाबतीत घडल्याचं पाहून आश्चर्य वाटतं!"

"पण आता त्यामुळं मला तुझ्यापासून थोडं दूर होणं जरूरीचं आहे!"

"का?"

"आपण व्यसनाधीन झाल्यामुळं मी बाहेर आर्किषला गेलो आहे अशी तिची समजूत होती, तेव्हा ती व्यसनमुक्त झाल्यानं मी बाहेर राहू नये अशी स्वाभाविकच तिची अपेक्षा आहे!"

"तसं काही समजू नको हं, कुमारी! काही झालं तरी तुला सुखानं जगता यावं यासाठी कोणतीही मदत करायला मी मागेपुढे पहाणार नाही. तुझी चलती होती, नाव होतं, तेव्हा तू मला आश्रय दिलास, खायलाप्यायला घातलंस. या मुंबापुरीच्या वातावरणाची तूच मला ओळख करून दिलीस. आता तुझी वेळ फिरली आहे तेव्हा मी तुझ्याकडे पाठ फिरवणं हे कृतघ्नपणाचं ठरेल!"

"ते तुझं तूच ठरव! पण ज्या वेळी मला कोणीतरी आधार देणारा पुरुष हवा होता, तेव्हा तू धावून आलास, लोक काय बोलतील याची पर्वा केली नाहीस. खुनाची केस माझ्यावर झाली तेव्हा या मुंबापुरीत मला भोगलेले असंख्य लक्ष्मीपुत्र असून एकजणही मदतीसाठी पुढे आला नाही. त्या वेळी छातीचा कोट करून तू मला संरक्षण दिलंस! तुझ्याविषयी परकेपणाची जाणीवच कधी झाली नाही. तुझं पहिलं लग्न होऊनही तुझं आयुष्य उद्ध्वस्त झालं म्हणून तू दुसरं लग्न केलंस. पण दुर्दैवानं उल्का व्यसनाधीन झाली. तुझीही मन:स्थिती बरी नव्हती. तरीही माझ्या विपत्काली तू मला आधाराचा हात दिलास! तो तू सोडू नयेस, असं वाटतं; पण त्याचबरोबर माझ्यामुळं उल्कात आणि तुझ्यात जर बेबनाव होणार असेल तर तू माझ्यापासून

दूर होण्यातदेखील मला समाधान लाभेल!''

कुमारीनं बोलताबोलता डोळ्यांच्या कडा टिपल्या. ती मनापासून बोलली, पण बोलताना भावनाविवश झाल्यानं तिचे डोळे पाणावले होते.

ज्यावेळी अलकाचा बदफैलीपणा निदर्शनास आला तेव्हा आईनं अन् डॅडींनी मला काही दिवसांसाठी भवानीनगर सोडून जायला सांगितलं. त्यानंतर माझ्या आयुष्यात सलिमा, उल्का, कुमारी अन् राजकन्या अशा भिन्न प्रकृतीच्या अन् धर्मांच्या स्त्रिया येतील आणि झंझावात निर्माण करतील अशी ओझरतीही कल्पना आली नव्हती.

आता मात्र मी या स्त्रीजंजाळात पुरता सापडलो होतो. यातून सुटका होणं सहजासहजी शक्य दिसत नव्हतं!

दाढीअंघोळ करून, उल्कानं करून ठेवलेले पोहे खाल्ले आणि दाराला कुलूप लावून निघण्यासाठी वळतो न वळतो, तोच समोर रॉबर्ट मार्टिन उभा!

''हॅलो! गुड मोर्निंग मार्टिन!''

''गुड मोर्निंग'' चालताचालता मार्टिन म्हणाला.

''लवकर दौड मारलीस?''

''आज संध्याकाळी जेवायला येशील?''

''काय खास?''

''काही नाही. काल पोलिसांनी माझ्यावर जो चोरीचा माल जवळ बाळगल्याचा खटला दाखल केला होता, तो एकशे एकोणसत्तर केला म्हणून सांगितलं! सुटलो एकदाचा पोलिसांच्या कचाट्यातून!''

''अरे व्वा ऽ! काँग्रॅच्युलेशन्स! तरी मला त्या खटल्याच्या फॅक्टस ऐकल्यावर वाटलंच होतं!''

''शिवाय वीरेंद्र सटोडिया या फिर्यादीच्या नोकरानं ते घड्याळ खोटं नाव सांगून माझ्याकडे दुरुस्तीला टाकल्याचं पोलिसांसमोर आणि मॅजिस्ट्रेटसमोर कबूल केलं. त्याला आठ दिवस सक्त मजुरी आणि शंभर रुपये दंडाची शिक्षा झाली.''

''छान झालं! पण आता यापुढं जेव्हा एखादं अपरिचित गिऱ्हाईक मौल्यवान घड्याळ दुरुस्तीसाठी म्हणून घेऊन येईल, तेव्हा तो कोण आहे याची ओळख पटल्याशिवाय घड्याळं स्वीकारत जाऊ नकोस!''

चालता चालता रॉबर्टनं दोन्ही खांदे अन् गळ्यातला क्रॉस स्पर्श करून शपथ घेतली आणि 'तोबा तोबा' केलं.

''मग जेवायला येत नाहीस आज?''

''आज आलो असतो; पण एक एंगेजमेंट आहे!''

''फार महत्त्वाची आहे? लिलियन म्हणाली की काही करून तुम्हा दोघांना आग्रहानं यायला सांग!''

''हे बघ रॉबर्ट, लिलियनला सांग, आज नको, नंतर केव्हाही येऊ! तू काय परका आहेस का? लिलियनला सांग आज मी थोडा कामात आहे! आणि कसलाही गैरसमज करून घेऊ नका!''

रॉबर्ट मार्टिन गेले कित्येक महिने माझ्याशी अबोला धरून होता. त्याला तसं काही सबळ कारण जरी नसलं तरी त्याच्यासारख्या एकमार्गी माणसाला माझ्यासारख्या अत्यंत धाडसी आणि धकाधकीचं जीवन जगणाऱ्याशी फारसे सलोख्याचे संबंध ठेवू नयेत असं वाटणं स्वाभाविक होतं. लिलियननंही उल्काशी संबंध तोडले होते, त्याला मात्र अगदी संयुक्तिक

कारण होतं. केवळ 'क्रॉनिक कफ'साठी ब्रँडी पंच घ्यायला सुरुवात केलेल्या उल्कानं रात्रंदिवस 'अल्कोहोल' घेत रहावं हे लिलियनसारख्या सालस स्त्रीला मानवण्यासारखं नव्हतं. एखाद्याचा मार्ग आपल्याला रुचला नाही किंवा पटला नाही, तर त्याला ज्ञान शिकवण्यापेक्षा सरळ त्याच्यापासून चार हात दूर रहाणे हाच सुज्ञपणाचा मार्ग होता. मार्टिन पतीपत्नींनी याच मार्गाचा अवलंब केला तर त्यांत त्यांचं गैर काय होतं?

हिंदू कॉलनीत जिथं राजकन्या रहात होती तिथं आलो. दारावर टक् टक् केलं. फटींतून आत पहाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आत सेंटचा गंध दरवळत होता. राजकन्येनं पुढं होऊन दार उघडलं.

"हे काय? बाहेर पडण्याची तयारी दिसते?" मी अत्यंत आकर्षक असं प्रसाधन करून समोर उभ्या असलेल्या राजकन्येकडे पहात म्हणालो.

"येस, ऑफ कोर्स! समर, माझं स्वप्नं शेवटी साकार होणार!"

"कसलं स्वप्नं?"

"नरोन्हांनी आज मला स्क्रीन टेस्टसाठी बोलावलंय! निरनिराळ्या अँगल्सनी माझे काही शॉटस् त्यांना घ्यायचे आहेत. साऊंड टेस्टही करायची आहे. सध्या त्यांच्याकडे एक अतिशय पॉवरफुल स्टोरी आहे. मी जर आज त्यांच्या या टेस्टस्ना उतरले तर हिरॉइनचाच रोल मला मिळेल! पहिला रोल अन् तोही हिरॉइनचा! इट्स नॉट ए जोक, समर!"

ते ऐकून मनातून मी काहीसा अस्वस्थ झालो. राजकन्येनं सिनेमाच्या फंदात पडू नये असं अगदी मनापासून मला वाटत होतं; पण ही तर गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेली! नाही म्हटलं तरी राजघराण्याविषयी माझ्या मनात आदर होता, तशात या राजकन्येनं माझे प्राण वाचवलेले; तिची सिनेमाच्या छंदापायी वाताहत व्हावी, असं मला वाटत नव्हतं!

मी कोचावर बसून शांत चित्तानं म्हणालो, "राजे, तुम्हाला सांगितलं तर आवडणार नाही; पण मला अजूनही वाटतं, या सिनेमाच्या मोहमयी दुनियेपासून तुम्ही अलिप्त रहावं. पैसे देऊन तीन तास सिनेमा पाहणं वेगळं आणि प्रत्यक्षात सिनेमात काम करायची इच्छा धरणं निराळं! विशेषत: स्त्रियांनी या क्षेत्रात पाऊल ठेवण्यापूर्वी थोडा खोल विचार करणं जरुरीचं आहे, असं मला वाटतं!"

"वेश्येच्या घरात रहाणं, तिच्या पैशावर जगणं, यापेक्षा सिनेमाचं काम करणं केव्हाही उजवं ठरेल!"

राजकन्या असं काहीतरी मूर्खासारखं विधान करून माझं तोंड बंद करील याची मला थोडीसुद्धा कल्पना नव्हती. मी अवाक् होऊन तिच्यापासून दूर पहात म्हणालो,--

"ठीक आहे! मी तुम्हाला शिकवणार कोण? एक वेळ तुम्ही जीवदान दिलेलं आहे, ही जाणीव उराशी बाळगून आहे; म्हणून वारंवार तुम्हाला या क्षेत्रात पडू नका असं सांगण्याचा मोह वाटतो. यापुढं असा मूर्खपणा करणार नाही! माझी गरजच वाटली तर केव्हाही हाक द्या, आपण बोललात याचं दु:ख नाही!"

"मी उठलो आणि दाराकडं निघालो, तेव्हा राजकन्या पुढं आल्या. त्यांनी माझा हात घट्ट धरला आणि म्हणाल्या, "समर, एक्सक्यूज मी! अनवधानानं मी काहीतरी बोलले, पण तू विसरून जा!"

त्यांच्या हातातून माझा हात सोडवून घेत मी म्हणालो, "तुम्ही एकदा जीवदान दिलेलं आहे! तेव्हा असं काहीतरी बोललात एवढ्यावरून सर्व संबंध तोडून टाकावेत. असं मला मुळीच वाटत नाही. येतो मी!" राजकन्येचा निरोप घेऊन मी बाहेर पडलो.

-o-o-

२७

हॉटेल मिल्टन! रात्रीचे साडेनऊ झालेले आहेत. मी, सालेभॉय, युसुफ आणि जोसेफ टेबलाजवळ बसून अरब दाऊद मोहंमद कारबू याची वाट पहातो आहोत. बरोबर पावणेदहाला अरब आला. तो आला तेव्हा सालेभॉन, युसुफ आणि जोसेफ उठून सामोरे गेले.

युसुफनं त्याला 'सलाम अलेकुम' कसं काही म्हटलं.

अरबानं सर्वांशी शेकहँड केला.

अरब आल्यानंतर हॉटेलातल्या प्रत्येकाचं लक्ष त्याच्यावर खिळलं. बाजूला गिऱ्हाईकासोबत व्हिस्की पीत बसलेल्या धंदेवाईक पोरीसुद्धा अरबावर नजर केंद्रित करून होत्या. ज्या एंगेज्ड नव्हत्या, त्या अरब फ्लश कसा खेळतो हे पहायला आल्या, 'चिंगी' ती चिनी छकडी पोरगीदेखील अरबाकडे पाहून उगाचच गालातल्या गालात हसत होती.

दाऊद मोहंमद कारबू सहा फूट उंच होता. गोरापान. त्याचं नाक पिरॅमिडसारखं भुवयांमधून उमटलेलं होतं. दाढीमिश्या नव्हत्या. डोळे अतिशय भेदक आणि तेजस्वी होते.

त्याचं चिंगीकडे लक्ष जातांच त्यानं तिला खूण करून जवळ बोलावलं. ती गेली. इवलीशी चिंगी दाऊद महंमदसमोर एखाद्या बाहुलीसारखी दिसू लागली. तिच्या चेहऱ्यावरचे ते मादक भाव पाहून दाऊद मोहंमदला मोह आवरता आला नाही, त्यानं तिला जवळ घेतलं आणि तो म्हणाला, "आज तुझ्या हातून व्हिस्की पीतपीत फ्लश खेळायचा!" चिंगीचे सुळसुळीत केस कुस्करत त्यानं तिला जवळ ओढून तिचं मस्तक चुंबिलं. हॉटेल मिल्टनमधल्या इतर पोरींना चिंगीचा हेवा वाटला; कारण दाऊद मोहंमदनं अशी मेहेरनजर करण्याचं ठरवलं की, तिला पुढे सहा महिने- वर्षभर बसून खाता येईल इतके पैसे मिळायचे! त्याच्या दृष्टीनं पैशाला कवडीचं मोल नव्हतं!

सालेभॉयनं जॉनी वॉकरची अख्खी बाटली, सोडा, बटाटा वेफर्स असं साहित्य मागवलं. वेटर ट्रे घेऊन येताच दाऊद मोहंमद चिंगीला म्हणाला, "हनी ऽ! यू ओपन इट!" चिंगीचा गालगुच्चा घेऊन तो हसतहसत म्हणाला, "तुझा हातगुण कसा आहे पाहू!"

दाऊद मोहंमदनं युसुफ, जोसेफ आणि मला ड्रिंक्सबद्दल विचारलं; पण याच्याशी मद्याचा थेंबदेखील न घेता खेळायचं आम्ही ठरवलं होतं. आपण जसं एखाद्या 'सर्वगुणसंपन्न' माणसाला हा गावोगावचं पाणी प्यायला आहे, असं म्हणतो, तसं प्रत्यक्षांत हा दाऊद मोहंमद देशोदेशीचं पाणी प्यायलेला होता. स्मगिंलगच्या धंद्यापायी त्याला एडन ते एिंडबरो आणि बॉम्बे टु बर्निओ असा प्रवास करावा लागत असे. त्यामुळं जगातल्या प्रचंड शहरात, जिथं रात्रीचा दिवस असतो, तिथं दाऊद मोहंमद वावरलेला होता. इथं हॉटेल मिल्टनमधल्या धंदेवाल्या पोरी त्याच्याकडे अभिलाषेनं बघतीलच बघतील; पण पॅरिसमधल्या 'एफेल कॅफे' या प्रख्यात नाईटक्लबमधेही त्याच्याशी डान्स करायला फ्रेंच युवती आसुसलेल्या असत!

दाऊद मोहंमद दिसायला उमदा होता. त्याचं खाणंपिणं माझ्या दुप्पट होतं; पण तरीही मला तो शरीराच्या हालचालीत काहीसा मंद वाटला. स्मगिंलगवर अक्षरश: त्यानं कोट्यवधी

रुपये कमावल्याच्या अफवा मी ऐकल्या होत्या. त्याचं स्वत:चं एक विमान होतं. या 'मोनोप्लेन'मधून तो युरोपांत फिरायचा. नाहीतरी असं गतिमान जीवन जगणाऱ्यांना बोट किंवा आगगाडी यांचा प्रवास कसा मानवणार?

चिंगीच्या कमरेला विळखा घालून अधूनमधून तिच्या शरीरावरून हात फिरवीत, तोंडानं सिगारेट ओढत दाऊद मोहंमद आमच्याशी फ्लश खेळत होता. त्याच्या अटॅचीत लाखभर रुपये सहज असतील. चिंगी व्हिस्कीचा ग्लास हातात धरून खेळ बघण्यात गर्क होती. मधेच दाऊद मोहंमद आपले पत्ते चिंगीला दाखवून तिला काय करावं म्हणून तिच्या कानाजवळ ओठ नेऊन विचारायचा. पण ती काही सल्ला द्यायची नाही. काही वरच्या स्तरातल्या घरात दुसऱ्याशी गप्पा मारताना लोक आपल्या पॅमेरियन कुत्र्याची लव कुरवाळत बोलत असतात, तसाच दाऊद मोहंमद चिंगीला कुरवाळीत मधेच व्हिस्कीचा एक घोट घेत ब्लाइंड खेळताना शंभराच्या नोटा पुढं सरकावत होता. युसुफ आणि जोसेफ या दोघांचा त्याच्यासमोर टिकाव लागणं शक्य नव्हतं. दोघेही चार-सहा हजार गमावून 'ढीग' झाले. शेवटी माझी आणि दाऊदची जुंपली. जोपर्यंत माझ्या डोळ्यांवर तो चष्मा होता तोपर्यंत मी दाऊद मोहंमदचा 'वालीद' जरी खेळायला आला असता तरी मी घाबरणार होतो थोडाच?

खेळता-खेळता नखानं टोचून मी पत्त्याच्या डिझाईनवर खुणा केल्या. माझ्या चष्म्याच्या त्या छोट्या बिंदूतून मला दाऊद मोहंमदच्या हातात कोणते पत्ते आहेत हे अचूक समजू लागलं. बेकार पत्ते हातांत असताना आपल्याजवळ एखादी 'ट्रायो' किंवा 'रन' आहे असा निर्माण करून दाऊद मोहंमद पुढं-पुढं चाल करीत रहायचा. 'स्टेक मनी' चा ढीग वाढायचा आणि अचानक तो पत्ते खाली टाकून मला 'ओपन' मागायचा!

मी हरत नाही, असं पाहून तो म्हणाला, ''बच्चमजी! माझ्याशी खेळतो आहेस, लक्षात ठेव!''

मी हसतहसत म्हणालो, ''हो! एका प्रख्यात फ्लश प्लेअरशी खेळतो आहे याची जाणीव आहे मला.''

जवळजवळ पन्नास हजार रुपये दाऊद मोहंमदनं गमावले, तेव्हा त्यानं व्हिस्कीचा एक घोट घेतला आणि सिगारेट शिलगावली अन् मला म्हणाला-

''थोडा वेळ थांबू!''

''का?'' हसतहसत मी विचारलं.

''थोडी रेस्ट घेऊ!''

''ओ ऽ के?''

''जरा पिणार?''

''बाय ऑय मीन्स!'' मीही खुशीत आल्यानं 'हो' म्हणालो. चिंगीनं माझ्यासाठी ग्लास मागवून त्यात एक पेग जॉनी वॉकर ओतली.

मी दाऊद मोहंमदला चीअर्स करून ग्लास उंचावला, दाऊद मोहंमदला खेळाच्या दुसऱ्या टप्प्यांतही मी हरवणार अशी खात्री असलेले युसुफ, जोसेफ आणि सालेभॉय नजरेनंच मला चीअर्स करीत होतो.

माझा ग्लास संपला तेव्हा दाऊद मोहंमदनं आपल्या खिशातील सोन्याची लखलखणारी सिगारेट - केस काढून मला सिगारेट 'ऑफर' केली. मी सिगारेट घेण्यासाठी पुढं झालो, आणि माझ्या डोळ्याचं पातं न लवतं तोवर दाऊद मोहंमदनं माझ्या डोळ्यांवरचा चष्मा काढून घेतला.

''हे ठीक नाही, तो चष्मा दे!''

मी चिडलो, आणि उठून हाताच्या अस्तन्या सावरल्या. दाऊद मोहंमद विचित्र हास्य करीत चिंगीला बाजूला करून माझ्या रोखानं पुढं येत म्हणाला-

"साला, अशी बनवेगिरी करतो!...." त्याचं वाक्य पुरं व्हायच्या आतच मी त्याच्या तोंडावर एक ठोसा लगावला. दाऊदनं मान झटकावली आणि पुन्हा विकट हास्य करीत, "समर! हा ठोसा तुला फार महाग पडेल!" असं म्हणत त्यानं माझं मानगूट धरायचा प्रयत्न केला. व्हिस्कीप्राशनानं त्याची हालचाल काहीशी मंदगतीनं होत होती. मी मात्र माझी लबाडी उघडकीला आणलेल्या दाऊद मोहंमदवर तुटून पडलो. ठोशामागून ठोसे लगावून मी त्याला अर्धमेला केला. सहा फूट उंचीचं ते प्रचंड धूड भुईसपाट झालं. ओठातून, कपाळातून ठिबकणारं रक्त पुसत त्यानं उठून बसण्याचा प्रयत्न केला. तेव्हा माझ्या डाव्या पायानं 'पेनल्टी कॉर्नर' मारावा तशी बुटाची लाथ मी त्याच्या छातीवर हाणली. तो आडवाच झाला. निश्चेष्ट पडून राह्यला.

टेबलावर बाजूला ठेवलेले पैसे मी पँटच्या खिशात कोंबले. सारे पैसे खिशात मावेनात, म्हणून रुमालात बांधले. तरीही थोडे शिल्लक राह्यले ते उचलले आणि चिंगीच्या अंगावर फेकले. एवढ्या मोठ्या जबरदस्त माणसाला जुगारात आणि द्वंद्वात पराजित केल्यामुळे नकटी चिंगी गालावर खळी उमटवून माझ्याकडे सस्नेह पहात होती. पण मला आता तिच्याकडे पहात बसायला वेळ नव्हता. खाली पडलेल्या दाऊद मोहंमदकडे मी एकदा तिरस्कारानं पाह्यलं आणि हॉटेल मिल्टनच्या बाहेर पडण्यासाठी लिफ्टमधे येऊन उभा राह्यलो.

युसुफ, जोसेफ आणि सालेभॉय यांना दाऊदनं माझ्या डोळ्यांवरचा चष्मा का काढून घेऊन फोडला, हे न कळल्याने ते एकमेकांकडे प्रश्नार्थक नजरेनं पहात राह्यले.

त्या झटापटीत दाऊद मोहंमदनंही मला तीन थपडा लगावल्या होत्या, आणि त्याच्या राक्षसी बोटांचे ठसे माझ्या गालावर उमटलेले आहेत, हे लिफ्टच्या आरशात माझ्या निदर्शनास आले.

अखेर तो इतिहासप्रसिद्ध चष्मा गेला. या चष्म्यामुळेच मी सलिमा उपभोगली, या चष्म्यामुळेच मी भवानीनगरच्या जहागीरदारांच्या डोळ्यांत दुर्गावर धूळ फेकली होती, या चष्म्याच्या आधारावर मी कित्येकजणांना बनवलं, हजारो रुपये कमावले, तो चष्मा असा अचानकपणे माझ्या डोळ्यांदेखत नष्ट झाला होता.

वास्तविक पहाता माझा नंबरचा चष्मा दाऊदनं निष्कारण फोडून टाकला म्हणून मला कांगावा करता येण्यासारखा होता; पण दाऊदनं त्या चष्म्याचं रहस्य माझ्यासमोरच सर्वांना सांगितलं असतं तर हॉटेल मिल्टनमधे आजपर्यंत माझ्याकडून लुबाडले गेलेले सर्वजण माझ्यावर तुटून पडले असते. जे पन्नास हजार मी घेऊन चाललो होतो तेदेखील त्यांनी मला नेऊ दिले नसते. कांगावखोरपणा केला आणि दाऊदच्या अंगावर धावून गेलो ते तेवढ्यासाठी! यापुढे फ्लशमधे मला चालबाजी करता येणं अशक्य होतं. बेहराम इराणीचा पुण्यात चोरलेला तो चष्मा माझ्या आयुष्यात ज्या घटना घडवून गेला, तो चष्मा गेला. त्याच्यामुळे मला अनेक चिरस्मरणीय व्यक्ती भेटल्या. त्या भयंकर माणसाने त्याचे तुकडेतुकडे केले. माझे पंखच छाटून टाकले त्यानं. यापुढं मी फ्लश खेळेनही, पण समोरच्या माणसाच्या हातात कोणते पत्ते आहेत हे एखाद्या चिंतामणीप्रमाणे मला माहिती करून देणारा माझा चष्मा गेला! दाऊद मोहंमद खरोखरच देशोदेशीचं पाणी प्यायलेला होता. त्यानं माझ्या यशाचं गूढ बरोबर शोधलं आणि कसलीही शंका प्रकट न करता त्यानं माझा चष्मा हिसकावून घेऊन त्याचे तुकडेतुकडे केले, यामुळं भविष्यात माझ्याकडून फसल्या जाणाऱ्या जुगाऱ्यांना अभयदानच नाही का दिलं त्यानं?

‘दाऊद, तू माझी लबाडी अचूक हेरलीस, माझा आवाज बंद केलास, खरं म्हणजे मी तुझ्यावर हात टाकायला नको होतं, पण मला चिडल्याचं ते नाटक करणं भागच होतं. निदान आजपर्यंत केलेल्या लबाडीवर पांघरूण घालण्यासाठी तरी तसं करणं भागच होतं... माफ कर मला, दाऊद! तू भविष्यात कधीकाळी भेटलास तर मी तुझी माफी मागेन!....’

ज्या वेळी रात्री साडेतीनला बांद्र्याला पोहोचलो तेव्हा दूधवाल्या भय्यांची ये-जा सुरू झाली होती. दारावर टकटक् करून मी थांबलो.

उल्का गाढ झोपी गेली होती. तिला असं अवेळी उठवलेलं आवडत नसे, हे मला ठाऊक होतं. पण खिशात आणि रुमालात शंभराशंभराच्या नोटा घेऊन मी असा दारात किती वेळ बसून रहाणार? पुन्हा दार ठोठावलं, तेव्हा उल्का जागी झाली. नेहमीप्रमाणं शिव्या मोजत तिनं दार उघडलं. दिव्याच्या प्रकाशात तिनं माझ्या चेहऱ्याकडे भयभीत होऊन पहात म्हटलं,-

“हे रे काय? कपाळातून रक्त? गालावर वळ कसले हे?”

मी कोपऱ्यात बूट काढून ठेवता ठेवता नोटांची बंडलं दाखवीत म्हणालो, “या पैशांची किंमत मोजावी लागली. संपलं, आता यापुढं पत्ते हातात नाही धरणार!”

“पण असं झालं तरी काय?”

“जाऊ दे, सोड तो विषय! मला थोडा वेळ पडू दे!” न्हाणीत जाऊन मी थंड पाण्यानं तोंड धुतलं आणि कॉटवर आडवा झालो. दाऊदनं जी थप्पड दिली यामुळं डावा कान सुन्न झाला होता. गालावरच्या अन् कानांतल्या वेदना थांबल्या; पण डाव्या कानात ‘सूं ऽऽ’ असा आवाज जाणवू लागला. झोप लागणं शक्य नव्हतं. डोळ्यांसमोर हॉटेल मिल्टनमधे घडलेला तो प्रकार स्पष्ट दिसत होता. दाऊद मोहंमदवर मी तुटून पडलो, त्याला भुईसपाट केला; पण पराजय झाला होता तो माझाच!

उजाडायच्या सुमारास माझा डोळा लागला, तेव्हा उल्का शाळेकडे गेलेली होती. साडेनऊ-दहापर्यंत मी झोपून होतो.

दहाच्या सुमारास दारावरचं कुलूप खडखड वाजू लागलं. मी घरी असलो तरी उल्का बाहेर जाताना कुलूप लावून जात असे. त्या कुलुपाची दुसरी किल्ली मजजवळ होती. जाग आल्यानंतर खिडकीतून कोणातरी पोराला बोलावून मी कुलूप काढायला सांगत असे, आणि ही व्यवस्था माझ्या परिचितांना ठाऊक होती. भांडी घासायला येणारी मोलकरीण, रॉबर्ट, लिलियन् या सर्वांना हे ठाऊक होतं.

दारावरचं कुलूप खडखड वाजल्याचा आवाज एकसारखा येऊ लागला, तेव्हा मी उठून खिडकीजवळ गेलो. पडदा बाजूला सारून पाह्यलं, -- दारात रॉबर्ट उभा.

“हॅल्लो! गुड मोर्निंग, रॉबर्ट!”

“गुड मोर्निंग समर! तुला सकाळी अकरा वाजेपर्यंत बोलावलंय!”

“कोणी?”

“कुमारीनं! आज तिचं अपील चालायचं आहे!”

“काय म्हणतोस काय?”

“हो, काल रात्री वकिलांचा फोन आला होता. आज तिला कोर्टात हजर रहायला सांगितलंय तिच्या वकिलांनी!”

“मला कशी काय कल्पना दिली नाही वकिलानं?”

“ते काही मला ठाऊक नाही, पण तू मात्र लौकर जा, तुझी वाट पहात असेल ती!”

“पहात असेल काय? डोळे लावून बसली असेल माझ्या वाटेकडे! आय मस्ट गो!”

रॉबर्ट तो निरोप देऊन दारातल्या दारातूनच गेला.

दाढीचं सामान घेऊन मी गालाला फेस फासला. कितीही महत्त्वाचं काम असलं, वेळ थोडा असला तरीही मी दाढी केल्याशिवाय कधी घराबाहेर पडत नसे! ही सवय मला मिलिट्रीत असल्यापासूनची. एक वेळचं जेवण चुकलं तरी पर्वा नसे; पण सकाळची दाढी चुकत नसे. क्वचित प्रसंगी ती केली नाही तर दिवसभर चुकल्याचुकल्यासारखं वाटे! दाढी अन् अंघोळ केल्याशिवाय बरंच वाटायचं नाही!

काल चष्मा फुटला. फुटला कसला? फोडला त्या दाऊदनं! खेळ खलास! आता आयुष्यात पत्ते म्हणून हातात धरायचे नाहीत. त्या खेळातला चार्मच निघून गेला. कुमारीला हे समजलं तर बरं वाटेल! तीसुद्धा माझ्या फ्लश खेळण्यावर नापसंती व्यक्त करायची! मला म्हणायची, आठवड्यातून एक दिवस रेस खेळत जा हवं तर, पण रात्रंदिवस हे पत्ते कुटत बसणं आपल्याला आवडत नाही! मी तिचं हे बोलणं हसण्यावारी न्यायचो. आता अनायासेच मला पत्ते सोडावे लागणार होते.

वरळीला जेव्हा येऊन पोहोचलो तेव्हा कुमारी माझीच वाट पहात होती. दारातून आत येताच ती मला म्हणाली,--

"अरे, पत्ता कुठंय तुझा? काल वकिलांचा निरोप आला होता. आज अपील चालणार आहे हायकोर्टात!"

"चालू दे! त्यात एवढं घाबरायचं काही कारण नाही, खालचं जज्जमेंटच वर कन्फर्म होणार! तुझ्या केसालासुद्धा धक्का लागणार नाही!"

"या केसच्या चिंतेनं मला गेले चार दिवस झोप नाही. चारचार मँड्रेक्स खाल्ल्या तरी डोळा लागत नाही!"

"झोपेच्या गोळ्या खाल्ल्यास? शहाणीच आहेस! कुमारी, तुला या अपिलांत काहीही होणार नाही. विश्वास ठेव माझ्या शब्दावर!"

"अरे, पण तुझे डॅडी अपील चालवायला आले असते तर प्रश्न नव्हता. दुसरा वकील दिला आहेस तू, तो आपली बाजू कसा मांडतो कुणास ठाऊक!"

"डोंट वरी! वकिलाचं काम पडणारच नाही, कुमारी! हायकोर्टाचे जज्ज अगोदरच खालच्या कोर्टाचं जज्जमेंट वाचून येतात. मनात काही शंकाकुशंका असल्या तर तेवढ्यापुरतंच सरकारी वकिलांना किंवा आरोपींच्या वकिलांना विचारतात! पण सांगतो ना, शंभर टक्के खालच्या कोर्टाचा निकालच वर कायम होणार आहे!"

कोचावर ऐसपैस बसत सिगारेट शिलगावून मी म्हणालो, "इतकी भित्री असशील असं वाटलं नव्हतं!"

"भिण्याचा प्रश्न नाही रे!"

"मग झोप का उडाली?"

"कुणास ठाऊक!"

"केस शाबित झालीच तर सुप्रीम कोर्टात अपील करू! भितेस कशाला?"

"आणखी एक आठ वर्षं मला जगायला हवंय!"

"आठ वर्षं? ते कशासाठी?"

"ते कशासाठी? ते कशासाठी?" कुमारी वेड्यासारखी स्वत:शीच पुटपुटत राहिली. थोड्या वेळानं म्हणाली. "चल, निघू, जाताना सांगते वाटेत!"

गाडीत माझ्या शेजारी कुमारी बसली. फिक्कट निळी रेशमी साडी. केस साधे, भुवयांमधून आयब्रो पेन्सिल फिरवलेली, अन् ओठांच्या रंगाचीच लिपस्टिक.

माझा हात हातात घेत कुमारी म्हणाली, "समर, आजपर्यंत मी तुझ्यापासून एक गुपित

लपवून ठेवलं आहे. पण माझं काही भलंबुरं होण्याआधी ते तुला सांगणं भाग आहे!''

''तुझं काय भलंबुरं आहे?''

''अपिलांत शिक्षा झाली तर जगण्यासारखं काहीच शिल्लक राहणार नाही रे!''

''पण ते गुपित कसलं म्हणालीस?''

''मला एक मुलगी आहे. सध्या आठ वर्षांची आहे. आणखी आठ वर्षांनी ती सोळा वर्षांची होईल; मग मी तिचं लग्न करून देईन अन् मग मी मरायला मोकळी आहे!''

''कुठंय ती?''

''बेंगलोरला! माझ्या एका बालमैत्रिणीकडे तिला ठेवलेलं आहे.''

''अगं, पण ती जन्मली केव्हा? कोण तिचा बाप?''

''दाऊद मोहंमद अरब.''

ते नाव घेताच मी दचकलो, आणि मोठ्याने म्हणालो, ''काय, सांगतेस काय कुमारी?''

''गोल्डाशपथ!''

''गोल्डा कोण?''

''माझी मुलगी!''

''अगं, मग ती जन्मली कुठं?''

''मला दिवस गेल्यानंतर दाऊद मला फ्रान्सला घेऊन गेला होता. तिथंच जन्मली ती! तीन महिन्यांची असताना मैत्रिणीकडे बेंगलोरला ठेवली. तिला पैसे पाठवते दर महिन्याला!''

''आजपर्यंत तू मला या गोष्टीचा थांगपत्ता लागू दिला नव्हतास!''

''ही गोष्ट तशी कुणाला सांगण्यासारखी नव्हतीच!''

''तू बेंगलोरला गेलीच नाहीस त्यानंतर?''

''दोन वर्षांपूर्वी एकदा जाऊन आले. पण ती मला ओळखतच नाही. मीनाक्षीलाच ती आपली आई म्हणते!''

''खरंच, तुला ती दाऊदपासून झालीय?''

''तू दाऊदला कधी पाह्यला आहेस का?''

''काल रात्रीच त्याची अन् माझी झटापट झाली. पाहिलाय का म्हणून काय विचारतेस;''

''गोल्डा अगदी त्याच्या तोंडातून पडल्यासारखी दिसते!''

''त्यानंतर दाऊद तुझ्याकडे आला नाही?''

''एक-दोन वेळा आला होता. पण मुंबईच्या पोलिसांचा आणि एक्साईजच्या लोकांचा त्याच्यामागे ससेमिरा होता. गडकऱ्यांनी दाऊदला पकडण्यासाठी माझ्या घराभोवती गुप्तचर पोलिसांचं जाळं विणलं होतं. शिवाय त्याला माझ्याबद्दल प्रेम असं कधीच नव्हतं! रोज एका नवीन पोरीला कुशीत घेऊन झोपणारा तो!''

''कुमारी, सत्य काय विचित्र असतं, नाही?''

''अतर्क्य! पण मला गोल्डासाठी तरी आणखी आठ वर्षं जगायला हवं रे!''

''आठ नाही, ऐंशी वर्षे जगशील!'' मी तिला दिलासा देत म्हणालो. पण तिचे डोळे मात्र डबडबले होते.

-o-o-

२८

चांदोरकर वकिलांनी केसची तयारी उत्तम केली होती; पण का कुणास ठाऊक, त्या दिवशीच्या बेंचवर असलेल्या जज्जांनी चांदोरकरांना प्रश्न विचारायला सुरुवात केली,

"का हो, या गडकरी इन्स्पेक्टरांचं जेव्हा पोस्टमॉर्टेम झालं तेव्हा त्यांचा 'व्हिसेरा' घेण्यात आला, त्यात अत्यल्प असं मद्यांश आढळलं, मग त्यांचा तोल जाऊन ते खाली पडले म्हणणं कसं योग्य वाटेल? शिवाय गडकऱ्यांच्या मानेभोवती ओरखडे निघाले होते, याचा खुलासा खालच्या कोर्टात तुम्ही काही दिलेला दिसत नाही!"

या प्रश्नावर चांदोरकरांनी उत्तर दिलं, "माय लॉर्ड, गडकऱ्यांच्या अन्नांशामधे अल्कोहोल मिळालं या वस्तुस्थितीनं ते प्यायले होते हे निर्विवादपणे प्रस्थापित होते, ज्या वेळी प्रेताची तपासणी झाली तेव्हा पोटात थोडे अल्कोहोल मिळाले; पण मरण्यापूर्वी अगोदर प्राशन केलेलं अल्कोहोल रक्तात भिनलं नसेल कशावरून, आणि त्यामुळंच त्यांचा मेंदू अकार्यक्षम झाला नसेल कशावरून? या ओरखड्यांबद्दल डॉक्टरांचा पुरावा अपुरा असा आहे. ते ओरखडे किती वेळ अगोदर काढले गेले होते, याचा उल्लेख र्सिटफिकेटमधे नाही. शिवाय आरोपीतर्फे तपासल्या गेलेल्या डिफेन्स विटनेसने- म्हणजे मिलीने, गडकरी त्या दिवशी संध्याकाळी आपल्याकडे आल्याचं आणि आपल्याशी त्यांची झटापट झाल्याचं शपथप्रतिज्ञेवर सांगितलं आहे. ओरबाडल्याच्या जखमा कशा तऱ्हेनं झाल्या, याचा खुलासा आरोपीनं केलेलाच आहे."

न्यायाधीशांनी आरोपीतर्फे झालेला पुरावा पाहिलेलाच नव्हता. कारण सर्वसामान्य केसमधे - विशेषत: खुनाच्या केसमधे आरोपीतर्फे पुरावा सादर करण्याची जबाबदारी कोणी स्वीकारीत नसते. आरोपीतर्फे केला जाणारा पुरावा कधी कधी अंगाशी येतो. या केसमधे नखाचे ओरखडे कसे निघाले हे दर्शवण्यासाठी डॅडींनी मिलीची साक्ष घेतली होती, ती खालच्या कोर्टाने ग्राह्य मानली होती. न्यायाधीशांचं समाधान झाल्यासारखं दिसलं, तरीही त्यांनी चांदोरकरांना प्रश्न केला, "गडकरी, वेश्यांना छळत असत, त्रास देत, मारपीट करीत; म्हणून तुमच्या क्लायंटनं त्यांना गच्चीतून खाली ढकलून देण्याची शक्यता सर्वस्वी नाकारता येत नाही!"

त्या दिवशी अपीलाचे कामकाज संपले. बाहेर आल्यानंतर कुमारी भलतीच नर्व्हस दिसू लागली. ती चांदोरकरांना म्हणाली,--

"न्यायाधीशांच्या मनात मला शिक्षा देण्याचं दिसतंय!"

"छट्! तसं मुळीच समजू नका! काही काही न्यायाधीशांना आपण केसचा फार सखोल अभ्यास केलेला आहे, असा आभास निर्माण करायची सवय असते. पण खरं सांग, त्यांच्या त्या शंकात काही तथ्य नव्हतं. मी आत्मविश्वासानं सांगतो की, या कामी खालच्या कोर्टाचा निकाल अपील कोर्टाला फिरवता येणं शक्य नाही."

"का?" कुमारीनं विचारलं.

"खालच्या कोर्टानं झालेल्या पुराव्याचा परामर्श इतका सुंदर घेतलेला आहे की,

खालचं जज्जमेंट फिरवणं सहजासहजी या अपेलेट कोर्टाला शक्य होणार नाही.''

''मग त्यांच्या डोक्यात अशा शंका का याव्यात?''

''सांगितलं ना? असते अशी सवय काहीजणांना!''

''निकाल केव्हा देणार आहेत?'' मी विचारलं.

''परवा अकरा वाजता! तुम्ही या. निकालाला हजर रहावं लागतं!''

''शिक्षा झाली तर?'' कुमारीनं विचारलं.

''लगेच जामीन पटवू आणि सुप्रीम कोर्टाला अपील करण्याची परवानगी घेऊ! पण माझा आत्मविश्वास आहे, तुम्हाला निर्दोष सोडावं लागेल हायकोर्टाला!''

चांदोरकरांचा निरोप घेऊन आम्ही परत वरळीला यायला निघालो, तेव्हा कुमारी माझा हात हातात घेत म्हणाली, ''समर, मला भीती वाटते रे! माझं काही भलंबुरं झालं तर माझी गोल्डा पोरकी होईल रे! आपली आई एक खुनी बाई होती हे तिला समजलं तर?''

''वेश्या होती हे समजलं तर काही वाटणार नाही? उगाच काहीतरी डोक्यात घेऊ नकोस!''

''पण काही म्हण, तुझ्या डॅडींनीच हे अपील चालवणं योग्य होतं. त्यांनी या प्रकरणाचा जितका सखोल अभ्यास केलेला होता, तितका या चांदोरकरांना जमला नाही!''

''हे बघ, तुला त्यातलं काही कळत नाही. तू गप्प रहा.'' किंचित् वैतागून मी म्हणालो.

फ्लॅटवर परत आल्यानंतर मी म्हणालो, ''कुमारी, आता शांत रहा!''

''तू इथून जाऊ नकोस, निकाल लागेपर्यंत इथं माझ्याजवळ रहा!''

''राह्यलो असतोही; पण काय होईल आहे ठाऊक, तुला बरं वाटेल, पण उल्का मला फाडून खाईल. आता कुठं ती माझ्याशी बरी वागू लागली आहे!''

''निकाल लागेपर्यंत मला तुझ्या आधाराची गरज आहे रे!'' काकुळतीला येऊन कुमारी म्हणाली.

''मलादेखील ते कळतं आहे कुमारी, पण काय करू सांग? तिला न सांगता मी इथं राहणं बरं नाही!''

''तुला वाटेल ते कर!''

''अशी रागावू नकोस. उल्का व्यसनमुक्त होऊन नोकरीला लागली आहे, अजूनही तिची मन:स्थिती तशी नाजुक आहे, अशा वेळी मी तिच्या इच्छेविरूद्ध एखादी गोष्ट केली तर होणाऱ्या परिणामाला मलाच तोंड द्यावं लागणार आहे!''

''ठीक आहे!''

''मी असं करतो, उद्या सकाळी उठल्याउठल्या इकडे येतो, मग तर झालं?''

''ये!''

कुमारीचा निरोप घेऊन मी बांद्र्याला आलो. उल्का नुकतीच शाळेतून परत आली होती. येता येता मार्वेâटमधून पापलेट घेऊन आली. ते पाहून मी म्हणालो, ''गुजराती शाळेत शिकवणाऱ्यांना मासा-मटण खायला बंदी असते, ठाऊक नाही तुला?''

''गप्प बैस! खाण्यावर अशी कोणती संस्था बंधनं घालत नसते! कुठं गेला होतास?''

''हां, सांगायचं राह्यलंच! आज कुमारीचं ते अपील चाललं. परवा निकाल आहे!''

''काय होईल?''

''सुटेल अन् काय? केसमधे काय दम आहे?''

''म्हणजे एक माणूस मेला तो फुकटच!''

''असं नाही! गडकरी मेले म्हणून कुमारी दोषी आहे असं नाही मानता येत! त्यांच्या

मरणाला ती कारणीभूत आहे असं नको का सिद्ध व्हायला?''

''तुझ्यासारखे कायदेपंडित तिच्या पाठीशी असताना ते कसं काय सिद्ध होईल?''

''मस्करी नको हं उल्का, खरं सांगू, ती केसमधून सुटेल असं केस चालवणाऱ्या वकिलांना आणि मलाही वाटतं; पण कुमारीनं इतकं टेन्शन घेतलंय मनावर की, तिला आज आणि उद्या कोणाचीतरी एकसारखी सोबत हवी!''

''गिऱ्हाईकं देत असतीलच की सोबत!''

''काहीतरी बोलू नकोस, उल्का! तिनं धंदा बंद करून जवळ जवळ वर्षं होत आलं! ती केस झाल्यापासून ती कोणा परक्या माणसासमोर देखील जात नाही!''

''मग तू कोण, घरचा की काय?''

''डोंट बी सिली, उल्का! सुधारणाऱ्या माणसाला असं तुच्छतेनं लेखू नये!''

''पण तुला तिच्याशी काय कर्तव्य आहे रे?''

''तू जेव्हा दिवस अन् रात्र दारूच्या नशेत पडून होतीस तेव्हा तिनं मला सांभाळलंय, कृतघ्न होण्याची इच्छा नाही माझी!''

''कशाच्या मोबदल्यांत तिनं तुझा सांभाळ केला?''

''आज तुझं काहीतरी बिघडलंय उल्का, त्याशिवाय तू असं बोलायची नाही!''

''काही बिघडलेलं नाही! यापुढं तू तिच्या घराची पायरी चढता कामा नये!''

''उल्का, फक्त आज अन् उद्या मला तिच्या घरी राहण्याची परवानगी दे, तिची मन:स्थिती फारच खराब आहे! परवापासून म्हणशील तर मी तिच्याकडे फिरकणारदेखील नाही!''

''मी आज आणि उद्या तुला तिकडे मुळीच जाऊ देणार नाही. परवा गेलास तरी चालेल!''

''अशी का हट्टाला पेटली आहेस आज?''

''तुझी परीक्षा घ्यायची आहे मला!''

''अगं, पण ही सत्त्वपरीक्षा आजच कशाला पहातेस?''

''उद्या मी रजा काढलेली आहे. उद्या सकाळी पुण्याला जायचंय! आईची प्रकृती बरी नाही म्हणून शाळेच्या पत्त्यावर पत्रं आलंय! आपणा दोघांनाही बोलावलंय, अवीही आहे तिकडे. त्यानंच तुला घेऊन येण्याबद्दल लिहिलंय!''

''मग असं करतो, आज रात्री जातो कुमारीकडे. उद्या सकाळी दिवस उजाडायला इथं येतो!''

''आज जर तू इथून जाणार असशील तर तुझा नि माझा संबंध संपला! मला घटस्फोट दिला असं लिहून दे आणि कुठं जायचं असेल तिकडे बेशक जा! माझं काहीएक म्हणणं नाही!''

''उल्का, खरंच आज तू माझा अंत पहायचा ठरवलं आहेस!''

''काही म्हण, पण मी आज तुला तिकडे जाऊ देणार नाही. उद्या सकाळी दोघं मिळून पुण्याला जायचंय!''

मी हताश होऊन कॉटवर बसलो. उल्का माझ्याशी काहीच बोलणं न झाल्यासारखी गाणं गुणगुणत पापलेटच्या फोडी तळायला लागली. मी मात्र मनातून माशासारखा तडफडत होतो. जावं तर ही उल्का माझं तोंडदेखील पहाणार नाही ही भीती वाटत होती, न जावं तर तिकडे कुमारी काय करेल याची चिंता! शेवटी मी म्हणालो, ''जेवण करून जरा बाहेर जाणार आहे मी!''

"हे बघ, तू मला कुक्कुलं बाळ समजू नकोस, समर! तू काय करणार आहेस, कुठं जाणार आहेस, हे मला सर्व ठाऊक आहे; पण लक्षात ठेव, आज जर तू माझं ऐकलं नाहीस तर तुझा-माझा संबंध संपला! मी किती हट्टी आहे हे तू जाणतोस ना? मग आता पुन्हा जायचं नाव नको काढू!"

पुन्हा एकदा उल्कानं मला 'अल्टिमेटम' दिला.

उल्का काही झालं तरी माझी पत्नी होती! जेव्हा अलकानं मला माणसातनं उठवलं होतं तेव्हा उल्कानं मला आधाराचा हात दिला होता. ती तऱ्हेवाईक होती, तुसडी होती, विलासच्या बायकोशी, इंदुवहिनींशी निष्कारण भांडण काढून तिनं मला पुणं सोडायला लावलं, ही गोष्ट सत्य होती, पण तरीही ती मला आवडत होती. माझ्यासाठी तिनं घरादाराचा, आई-बापाचा, नात्यागोत्याचा त्याग करायला मागेपुढे पाह्यलं नव्हतं! माझ्यावर ती हुकूमत गाजवत होती, हे मला ठाऊक असूनही मला ती आवडत होती. याचं कारण एकच-- ती माझ्याशी कमालीची एकनिष्ठ होती! परपुरुषासंबंधी तिच्या स्वप्नातदेखील विचार येणं शक्य नव्हतं. मग अशा पत्नीनं आपला पती एका वेश्येच्या घरी तिचा संरक्षक म्हणून पडून रहावा हे खपवून घेण्याचं मुळीच कारण नव्हतं!...

मध्यंतरी ती व्यसनाधीन झाली तेव्हा मी बिनधोकपणे कुमारीकडे जायचो, पण ती अर्धवट शुद्धीत असतानादेखील मी कुमारीकडे जाऊ नये म्हणून मला बजावत असे. आता तर ती व्यसनमुक्त झाली होती! तिच्या इच्छेनुसारच मी कुमारीकडे जाणं टाळत होतो; पण आज मला जाणंच भाग होतं, अन् आज उल्का मला तिकडे जाऊ द्यायलाच तयार नव्हती! काय करावं समजेना!...

कसाबसा जेवलो. काय खात होतो याकडे लक्षच नव्हतं. डोळ्यांसमोर दिसत होत ती जिवाची घालमेल होणारी कुमारी!

"काय हवंय? किती वेळ अशी कोरडी चपाती खात राहणार आहेस?"

मी ताटाकडे पाह्यलं, ताटात माशाचं कालवण असूनही मी कोरडीच चपाती खात होतो.

"समर, तू जेव आणि जाऊन तिला फोन करून ये. आज येता येत नाही म्हणून!"

"फोन तरी कशाला करू?" असं म्हणून मी पानावरून उठलो. हात धुऊन कॉटवर जाऊन पडलो.

"तुला तिची फारच चिंता वाटते आहे म्हणून म्हणते! अरे, गडकऱ्यांसारख्या मातब्बर पोलीस अधिकाऱ्याचा खून करणारी ती बाई, ती काय भावनाप्रधान होणार आहे थोडीच?" माझ्या पाठोपाठ कॉटजवळ येऊन उल्का म्हणाली.

"हे पहा उल्का, मी फोनदेखील करायला जाणार नाही, मग तर झालं?" चिडून मी म्हणालो.

"हां! असा जरा ताळ्यावर ये! आणि ते तांदळाच्या डब्यात पैसे कसले? कुठं डाकाबिका घातलाय की काय?"

"ते जुगारातले आहेत!"

"छान! जुगार चालूच आहे म्हण!"

"होता; पण आता संपला; यापुढं हातात पत्ते न धरण्याची शपथ घेतलीय!"

"अरे व्वा! अशी एकाएकी उपरती कशामुळं झाली?"

"कंटाळा आला खेळायचा!"

बोलताबोलता उल्का माझ्या अंगावरून हात फिरवू लागली, तिला आपण फार मोठा

दिग्विजय गाजवल्यासारखं वाटू लागलं. मला बाहेरे जायचं रोखून धरल्यामुळे ती मोठ्या खुशीत आली होती.

"तुला किनई एक खूष खबर सांगायचीय!"

"कसली?" तिचा हात हातात घट्ट धरून मी विचारलं.

"आपल्याकडे बाळ येणार आहे?"

"काय म्हणालीस?" ताडकन् अंथरुणावर उठून बसत मी विचारलं.

"शप्पथ! दोन महिने झालेत!"

"मग हे आज सांगतेस?"

"हो! मघा येताना चोक्सीबाईंकडे गेले होते. तिनं तपासून पाह्यलं अन् सांगितलं, नक्की प्रेग्नन्सी आहे म्हणून!"

"माय गॉड!"

"का? नको होतं?"

"तसं नाही, पण हे असं इतक्या लवकर घडेल असं वाटलं नव्हतं!"

"हे समजल्यामुळं मला खूप आनंद वाटला. म्हणून येताना पापलेट घेऊन आले. तशात घरचं पत्र आलंय! जावं की न जावं याबद्दल निर्णय होत नव्हता; पण मघा डॉक्टरणीनं सांगितल्यामुळं जायचा निर्णय घेतला. शाळेत उद्याची रजा समजावी म्हणून फोन केला. इतक्यात तू आलास! मग अशा पार्श्वभूमीवर तू कुमारीच्या घरी गेल्याचं आवडेल का मला सांग!"

अलकाच्या खुशीमागचं हे रहस्य समजल्यानं मलाही बरं वाटलं. पण कुमारीची केविलवाणी अवस्था मला अधूनमधून अस्वस्थ करीत होती.

उल्का आई होणार! मी बाप होणार!... बाप? अरे बाप रे! बाप हा शब्द आजपर्यंत कित्येकदा मी उच्चारला असेन, पण मी 'बाप' होणार ही जाणीव अशी अचानक मला काहीतरी गंभीर अशा जबाबदारीची जाणीव निर्माण करून गेली. या आनंदाच्या क्षणी कुमारीची दयनीय अवस्थाही मी विसरून गेलो.

उल्का माझ्या कुशीत होती. तिच्या केसांचा गंध मस्तकात भिनत होता. मद्यपी होऊन स्वत:चा अंत करून घेण्यापर्यंत जिची मजल गेली होती, ती उल्का अशी अचानक बदलली. ती म्हणत असे की, जोपर्यंत साडेसाती आहे तोपर्यंत माझ्यात काही बदल घडणार नाही. ज्योतिषशास्त्रावर माझा फारसा विश्वास नाही; पण ठराविक वेळी माणसाच्या आयुष्यात घडणारं हे स्थित्यंतर पाह्यलं की वाटतं, ग्रहांचे माणसाच्या आयुष्यातल्या भल्याबुऱ्या घटनांवर निश्चितच परिणाम होत असावेत!....

पहाटे पाचचा सुमार असेल, माझ्या दारावर कोणीतरी 'धाड धाड' आवाज करून मला उठवत होते. तात्काळ बाहेर आलो. माझ्या मागोमाग उल्काही आली. मार्था रॉबर्टला घेऊन माझं घर शोधत आली होती. तिची चर्या भेदरल्यासारखी दिसली म्हणून मी विचारलं,--

"काय प्रकार आहे मार्था?"

"कुमारीला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलंय?"

"का?"

"रात्री दीडपर्यंत तिनं तुझी वाट पाहिली, दीड वाजता दोन-अडीच पेग व्हिस्की प्याली आणि झोपण्यासाठी झोपेच्या गोळ्या खाल्ल्या, त्या जास्त झाल्या."

"माय गॉड! कुठल्या हॉस्पिटलात?" मी कपडे चढवता चढवता विचारलं.

"वाडियात!"

"डॉक्टर काय म्हणतात?"

"दुपारी बारापर्यंत काही सांगता येणार नाही म्हणतात!"

"अरेरे! काय घोटाळा होऊन बसला हा!"

तो प्रकार ऐकल्यानंतर उल्का काहीही बोलली नाही. मी बाहेर पडताना तिनं मला अडवलंदेखील नाही, हॉस्पिटलकडे जाताना टॅक्सीत मार्था मला म्हणाली, "तुझा पत्ता ठाऊक नाही, या रॉबर्टनं एकदा आपलं घर कुठं आहे ते सांगितलं होतं म्हणून बरं!"

"पण मार्था, तू घरी होतीस ना?"

"हो."

"मग त्या झोपेच्या गोळ्या का घेऊ दिल्यास?"

"अरे, मला पत्तादेखील लागू दिला नाही!"

"जेवली नाही?"

"मुळीच नाही!"

"तुला समजलं कसं?"

"व्हिस्की घेतली तेव्हा मी म्हणाले, दोन घास खाऊन घ्या, तर म्हणाली भूक नाही! मग मी जेवायला उठले, तोवर हा कारभार करून घेतला. जेवून परत येते तर कॉटजवळ बेशुद्ध पडलेली!"

"मग काय केलंस?"

"शेजारच्या बिल्डिंगमधल्या डॉक्टर काणेकरांना बोलावून आणलं. ते म्हणाले, ताबडतोब हॉस्पिटलमधे घेऊन जा. तेही सोबत आले!"

"हॉस्पिटलमधे काय केलं?" मी विचारलं.

"स्टमक वॉश दिलाय, इंजेक्शन्स दिली. मी म्हटलं, तुला बोलावून आणावं, म्हणून हॉस्पिटलमधून सरळ इकडे आले!"

मनात विचार आला, "आज उल्कानं माथेफिरूपणा केला नसता तर कदाचित् हा भयंकर प्रसंग टळला असता... कुणास ठाऊक? पण आज मी तिला दिलेलं वचन पाळणं अत्यावश्यक होतं... तिची मानसिक अवस्था अत्यंत नाजुक झालेली होती. काय होणार आहे कुणास ठाऊक?....

दवाखान्यात आलो, तेव्हा डॉक्टर-नर्सेस तिच्याभोवती गोलाकार उभे होते. मी कुमारीचा तो निश्चेष्ट चेहरा पाहून कासावीस झालो.... तिच्या कपाळावर हात ठेवून मी तिची नाडी हातात धरून बसलेल्या डॉक्टरांना विचारलं "धोका नाही ना?"

डॉक्टर माझ्याकडे पाहून सहानुभूतिपूर्वक स्मित करून म्हणाले, "इट इज टू ऽ लेट! शी इज प्रॅक्टिकली डेड!"

मला मोठ्यानं टाहो फोडावासं वाटलं. कुमारीची नाडी हातात घेतलेले डॉक्टर, इतर डॉक्टर आणि नर्सेस यांच्याकडे पहात म्हणाले,-

"संपलं! थोडी आशा वाटली मघा! पण आता पल्स मुळीच लागत नाही!"

कुमारीच्या नाकात ऑक्सिजनची नळी खुपसलेली होती. मनगटात सलाईन चढवलं जात होतं, ते थांबलं! पायथ्याची पांढरी चादर नर्सनं ओढून कुमारीच्या तोंडावर ओढली. माझ्यासोबत आलेली मार्था धाय मोकलून रडू लागली. मी तिला समजावता समजावता माझेही पाझरणारे डोळे टिपू लागलो.

थोड्याच वेळात तिथं पोलीस आले. त्यांनी मला विचारलं, "तुम्ही हिचे कोण?"

मी काय उत्तर देणार? माझं-तिचं काहीच नातं नव्हतं; पण तरीही ती मला माझी

जवळची होती.

"हिच्याकडे मी नोकरीला होतो!" डोळे टिपत मी म्हणालो.

"नोकरीला? कसली नोकरी?"

"दिवाणजी होतो. बाजारहाट करणं, बिलं भागवणं इत्यादी!"

"म्हणजे, हिचा पैशाअडक्याचा व्यवहार तुम्ही पहात होता?"

"हो, काही किरकोळ आर्थिक व्यवहार!"

"ही आत्महत्या आहे की खून याची आम्हाला सखोल अशी चौकशी करावी लागते! यात काही घातपात आहे असं जर आढळलं तर गुन्हा नोंदवला जाईल! हा खूनदेखील असण्याची शक्यता आहे!"

"खून कोण करील हिचा!"

"कोणीही करेल! सधन, सुस्वरूप वेश्येचा खून घडल्याची असंख्य उदाहरणं घडलेली आहेत साहेब, या मुंबईत!"

"पण हा खून नव्हे, आत्महत्याही नव्हे, हा केवळ अपघात आहे. चुकून जास्त झोपेच्या गोळ्या घेतल्या गेल्यानं घडलेला मृत्यू!"

"हे पहा, हा मृत्यू कोणत्या सदरात मोडतो हे आमचे वरिष्ठ ठरवतील! तोपर्यंत आम्हाला सारी चौकशी करावी लागेल!"

इतक्यात एक इन्स्पेक्टर आले. ते होते भावे! गडकरी प्रकरणात मी कुमारीला मदत केल्याचं भाव्यांना ठाऊक होतं. मला पहाताच ते म्हणाले, "कालच यांचं अपील चाललं ना?"

"हो, उद्या निकाल आहे!"

"मग निकाल समजण्याअगोदरच हे कसं काय घडलं?"

"मी तेव्हा घरी बांद्र्याला होतो. मार्था मला बोलवायला आली तेव्हाच समजलं!"

"अच्छा! ही मार्था काय?"

"हो."

"जरा बाहेर ये!"

इन्स्पेक्टर भावे मार्थाला प्रश्न विचारण्यासाठी बाहेर घेऊन गेले. मी एकटाच कुमारीच्या प्रेताजवळ! डोळ्यावरची पांढरी चादर उचलून पहात मी म्हणालो, "काय करून घेतलंस हे, कुमारी?" पण पांढरे फटफटीत पडलेले ओठ विलग होऊन उत्तर देणार होते थोडेच? मी पुन्हा चादर चेहऱ्यावर झाकली, अन् भरलेले डोळे पुसू लागलो.

प्रेताची तपासणी, पोलिसांचे जाबजबाब हे संध्याकाळपर्यंत चाललं. तपासणीनंतर ते प्रेत ताब्यात घेतलं. रॉबर्ट, लिलियन, मार्था अन् मी विद्युतदाहिनीकडे जात असता एका टॅक्सीतून पाच वेश्या आल्या. त्यात कुमारीच्या बाजूनं साक्ष दिलेली मिलीही होती. ती धाय धाय रडत होती. "हे असं करून घ्यायचं होतं तर मला साक्ष द्यायला कशाला सांगितलंस?" असं म्हणून ती कुमारीच्या प्रेतावर ओणवी होऊन अश्रू ढाळू लागली.

माझ्या आयुष्यात अचानक आलेली कुमारी तशीच अचानक निघून गेली. निदान गोल्डासाठी तरी जगायची होती.

पोलीस तपासात तो खून किंवा आत्मघात नसून केवळ अपघात होता असा निष्कर्ष काढण्यात आला होता. मी मार्थासोबत परवीन व्हिलावर परतलो, तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते.

कुमारीच्या निधनानं आठव्या मजल्यापासून ते तळमजल्यापर्यंतच्या बिऱ्हाडांनी सुटकेचा नि:श्वास सोडला होता. त्यांच्या दृष्टीनं त्यांच्या इमारतीला लागलेला काळिमा धुतला

गेला होता. माझ्याकडे आणि मार्थाकडे पहात काहीजण कुजबुजले, --

"मालकीण गेली, आता मालकिणीच्या मोलकरणीला हा मालकीण बनवणार वाटतं!"

मूर्खांच्या तोंडाला न लागणे हा शहाणपणाचा मार्ग मी स्वीकारलेला होता.

फ्लॅटवर भयाण शांतता पसरली होती. मधल्या हॉलमध्ये मार्था माझ्यासमोर बसली. रस्त्याने फ्लॅटवर येईपर्यंत तिनं कसंतरी दु:ख आवरलं होतं, पण फ्लॅटवर आल्याआल्या ती ओक्साबोक्शी रडू लागली. दु:खाचा आलेला जोरदार उमाळा ओसरल्यानंतर मी तिला विचारलं, "आता पुढं?"

"मी गोव्याला जाणार!"

"हे इथलं सामानसुमान, फिंनचर?"

"मला काही नको यातलं. तू घे हवं तर!"

"मी हे घेऊन ठेवू कुठं? पंचाईतच आहे! कुमारीनं आपलं मृत्युपत्र केल्याचं आठवतं का तुला?"

"अं ऽ हं! मला काही त्यातलं माहिती नाही! शिवाय आपण इतक्या आकस्मित रीतीनं मरून जाऊ याची तिला तरी कुठं कल्पना होती!"

"जरा शोधून पहायला पाहिजे!" असं म्हणत मी उठलो. कुमारीच्या खोलीत आलो. विद्युतदाहिनीत तिच्या देहाची राख झालेली मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी बघितली होती; पण या खोलीत आल्यानंतर मात्र ती आजूबाजूला कुठंतरी वावरते आहे, असा मला भास होऊ लागला.

मी तिच्या कपाटाचे दार उघडले. आत हँगरला अडकवलेल्या उंची साड्यांची ओळ दिसली. तसेच निरनिराळ्या प्रकारचे पंजाबी ड्रेसेस, सेंटस्च्या बाटल्या दिसल्या. कपाटाचा ड्रॉवर खोलला, त्यात एक सातआठ वर्षांच्या मुलीचे फोटो दिसले. हीच गोल्डा! नाक कसं अगदी दाऊदसारखं, कपाळातून फुटलेलं, पिरॅमिडसारखं! टोकदार. ओठ, हनुवटीची ठेवण सगळं कसं अगदी सहीसही दाऊदसारखं!

त्या ड्रॉवरमधे कागदपत्र चाळून पहाताना मला कुमारीनं गोल्डाच्या नावे फिक्स डिपॉझिटमध्ये दहा वर्षांच्या मुदतीनं ठेवलेल्या दोन लाख रुपयांची सिंटफिकेटस् मिळाली. त्या दोन लाखाचं दरमहा येणारं व्याज, मीनाक्षी सुंदरम, हिला मिळावं अशी तरतूद होती. ही व्यवस्था गोल्डा सज्ञान होईपर्यंत चालायची होती.

कुमारीच्या धोरणाचं मला कौतुक वाटलं. अन् लगेच डोक्यात विचार आला, 'या फ्लॅटमधलं हे फिंनचर, उंची गालिचे, कपाटं ही बेवारशी मालमत्ता नाही. याला वारस आहे, आणि ती म्हणजे गोल्डा. मला या प्रॉपर्टीचा मोह नाहीच, मार्थालाही नाही, याची खरी वारसदार आहे ती गोल्डाच!'

"मार्था!" मी मार्थाला हाक मारली.

अलीकडे धंदा बंद केल्यापासून आवक नव्हतीच. कुमारीला जमीन खरेदी करायची इच्छा होती हे मला ठाऊक होतं. याचा अर्थ तिच्याजवळ आणखी पैसे असायला हवे होते, मी सारं घर धुंडाळलं; पण मला दोनअडीच हजारांच्या वर काहीच मिळालं नाही.

त्या दिवशी मी तिथंच राह्यलो. रात्री रॉबर्ट आणि लिलियन आली. कुमारीच्या नात्यागोत्यातलं जवळचं असं कोणीचं नव्हतं.

मी रॉबर्टला म्हणालो, "कुमारीला मुलगी असल्याचं तुला ठाऊक आहे का!"

"मुलगी? कुठली मुलगी?"

मी त्याला सर्व सत्य प्रकार सांगितला तेव्हा भुवया उंचावून तो म्हणाला, "अजब आहे सारं!"

आमचं बोलणं चालू असताना तिथं बिल्डिंगगचे मालक चोरडिया आले.

"देखो भाई, आठ दिनके अंदर यह जगह खाली करो!"

"क्यूँ?"

"अब वो मर गई ना!"

"वो मर गई, लेकीन उसकी रिश्तेदार है ना!"

"रिश्तेदार-फिश्तेदार मैं नही जानता! जगह खाली करनीही पडेगी!"

कुमारी मरून गेल्याबरोबर मालक तिथं कसा टपकला, याचं मला आश्चर्य वाटलं. पण लगेच तो उलगडाही झाला. डोक्यावर एक वेश्या रहाते हे बऱ्याच भाडेकरूंना खुपत होतं, तेव्हा कुमारीचं नातं सांगून आणखी तसलीच कोणी तिथं घुसू नये, यासाठी तत्काळ मालकाला बोलावून त्यांनी खबर दिली होती.

माझ्या मनात आलं होतं, जरा तंगवावं त्याला; पण मार्था गोव्याला जाणार होती, माझं बांद्र्याला घर होतं. मग मी उगाच त्या चोरडियाचं रक्त आटवायचं ते कशासाठी? प्रश्न होता सामानसुमानाचा आणि र्फिनचरचा, मार्टिन म्हणाला, "इथं वापरलेलं र्फिनचर विकत घेणारे खूप एजंट आहेत. विकून टाका, आणि पैसे त्या गोल्डाच्या नावावर ठेवून द्या."

मी त्याला म्हणालो, "गोल्डाची व्यवस्था कुमारीनं लावलेली आहे. प्रश्न आहे तो मार्थाचा! या मार्थानं इमानेइतबारे कुमारीची सेवाचाकरी केली. या र्फिनचरच्या विक्रीतून येणारी निम्मी रक्कम मार्थाला द्यावी."

तिसऱ्या दिवशी कुमारीच्या अपिलाचा निकाल बाहेर पडला. हायकोर्टानं तिला निर्दोष मुक्त केले. ती केसमधून सुटल्याची आणि मरण पावल्याची वार्ता एकाच दिवशी प्रसृत झाली.

कुमारीला अपिलांत शिक्षा झाली असती तर कदाचित् तिच्या अकाली मरणाचं दु:ख फारसं जाणवलं नसतं; पण ती अपिलात निर्दोष सुटल्याचं वाचून मात्र माझ्या अन् मार्थाच्या दु:खाला पारावार उरला नाही.

-o-o-

२९

कुमारीच्या निधनानं माझ्या आयुष्याला एक वेगळेच वळण लागू पहात होते. ती एक वेश्या होती हे जगजाहीर होतं, पण ती एक 'माणूस' होती, या दृष्टीनं कोणीच तिच्याकडे पाह्यलं नव्हतं. ते मी पाह्यलं होतं. माझा-तिचा संबंधही आला होता. तरीही मी तिला कमी लेखायला तयार नव्हतो. गडकरी मर्डर केसमुळं तिच्याबरोबर मीही प्रकाशात आलो. लोकांना अजूनही वाटत होतं की, त्या खुनात माझा हात होता. पण मला खरं सांगायला कुणाची भीती आहे? आता मी आसन्नमरण अवस्थेत आहे. अर्धांगानं अधू झालेलं शरीर इतकं दुबळं झालेलं आहे. मला दुसऱ्याच्या आधाराशिवाय एक इंचभरही हलता येत नाही. औषधपाणी बंद केलं आहे. कारण मला ठाऊक आहे की, मी आता काही आठवड्यांचाच सोबती आहे. ढळढळीत मरण समोर दिसत असताना मी कुणाला अन् कशासाठी घाबरू?

Truth sits upon the lips of a dying man. मरणोन्मुख माणसाच्या जिव्हेवर सत्य वसलेलं असतं, असं एक वचन आहे. तेव्हा मला सारं खरंखुरं सांगून टाकायचं आहे. हे न सांगता माझे प्राण निघून गेले तर आत्मा निष्कारण मागे रेंगाळत राहील! मला आता कशा-कश्शाची भीती वाटत नाही! मरण समोर दिसल्यावर माणसं घाबरतात, पण असं घाबरून काही फायदा नाही. हरणाच्या मागे लागलेला चित्ता कधीच त्या हरणाचा जीव घेतल्याशिवाय रहात नाही. मृत्यूचंही तसंच आहे. तो एकदा मागे लागला की मग सुटका नाही. मोठा सम्राट असो नाहीतर रस्त्यावरचा भिकारी असो!

आत्मनिवेदन करायचं सोडून मी उगाच खोलात शिरलो. तर काय सांगत होतो? हं, आठवलं!

कुमारीच्या फिनचरचे चाळीस हजार आले. त्यातले वीस हजार मार्थाला दिले आणि वीस हजार घेऊन मी स्वत: बंगलोरला जायची तयारी केली. एकदोन दिवसांत निघणार होतो. कुमारीला जाऊन तेरा दिवस झाले होते.

मार्टिन डोळ्याला भिंग चढवून खाली पाहून घड्याळ दुरुस्त करताकरता म्हणाला, "कुमारीच्या सगळ्या मालमत्तेची विल्हेवाट लागली, पण एक वस्तू मात्र राहिली!"

"कोणती रे?"

"फ्रान्सवरून तिनं आणलेलं घड्याळ! परवा तीन आठवड्यांखाली बंद पडलं म्हणून परत माझ्याकडे पाठवून दिलं होतं ते तिनं!"

"काय सांगतोस?"

"ते बघ! परवाच चालू करून ठेवलंय! काय करायचं त्या घड्याळाचं?"

"ठेवून दे तुझ्याकडे!" मी म्हणालो.

"माझ्यापेक्षा ते तुझ्याकडेच रहाणं बरं, कुमारीची एक आठवण म्हणून!"

"ठीक आहे. बंगलोरहून आल्यानंतर घेऊन जाईन; पण उल्काला मात्र हे घड्याळ कुमारीचं आहे हे समजता कामा नये!"

"का?"

"इतके दिवस जवळ राहूनही तुला तिचा स्वभाव समजलेला नाही? बरं ते जाऊ दे. माझ्याकडे आणखी कोण आलं होतं?"

"अरे हो!" हातातल्या घड्याळात पहात मार्टिन म्हणाला, "तू इथंच थांब. ती राजकन्या येते म्हणाली आहे साडेअकराला!"

"केव्हा निरोप ठेवला?"

"सकाळी दुकान उघडलं तेव्हा आली होती!" राजकन्येच्या चित्रपटाच्या वेडापायी मी तिची संगत टाळत होतो. कारण मला पक्कं ठाऊक होतं की, ती त्या व्यवसायांत पडली की बरबाद झालीच!

साडेदहा वाजून गेले. आणखी एक तास थांबावं लागणार होतं. एक मन म्हणत होतं, "कशाला तिची पर्वा करतोस? गेली तर जाऊ दे खड्ड्यात! तू इतकं समजावून सांगतो आहेस, तरी ती ऐकायला तयार नाही." पण लगेच दुसरं मन म्हणायचं, "ती आज वागायला चुकते आहे हे जरी खरं असलं, तरी तिनं एकदा तुझे प्राण वाचवलेले आहेत. ती खड्ड्यात पडते आहे हे दिसूनही जर तू तिला सावरण्याचा प्रयत्न न करशील तर कृतघ्न ठरशील!"

सिगारेटचे झुरके घेत मी रॉबर्टच्या फळीवर बसून होतो. रॉबर्ट आपलं काम करताकरता म्हणाला,-

"काल चोरडिया बोंबलत आला होता!"

"का?"

"कोणी उठवलंय म्हणे, कुमारी मेली ती फ्लॅटवर आणि तिथं मध्यरात्री ती येते. गडकऱ्यासारखा एक जाडाजुडा माणूस विव्हळल्याचाही लोकांना भास होतोय! त्या फ्लॅटवर कोणीच रहायला धजत नाहीत! भुताटकीची हूल उठवली आहे!"

"नॉनसेन्स! काहीतरी बोगस कल्पना आहेत या!"

"चोरडिया म्हणत होता, लोकांच्या मनातील ही भीती दूर होण्यासाठी तू थोडे दिवस तिथं रहावंस!"

"मी?" छातीवर हात ठेवून मी म्हणालो.

"हो, आणि त्याबद्दल महिना शंभर रुपये तुला द्यायला तयार आहे तो!"

"भाडं नाही ते नाही, वर शंभर रुपये? विचार करायला हवा! पण तो किती दिवस तिथं रहायला परवानगी देणार!"

"त्याबद्दल काही बोलला नाही, तू भेट हवं तर!"

"बघू, बंगलोरला जाऊन येतो, मग विचार करू! पण उल्का तिथं रहायला येईलसं वाटत नाही!"

मी खुर्चीवर बसून विचार करत होतो तेव्हा रॉबर्ट म्हणाला, "अशा ठिकाणी राहू नये हे बरं! एक खून घडलेला, त्यानंतर एक आत्महत्या!"

"नव्हे, अपघात!" मी म्हणालो.

"काही असो, ती जागा रहाणाऱ्याला त्रासदायक आहे, एवढं खरं!"

"मार्टिन, तू कसा काय विश्वास ठेवतोस रे यावर?"

"घडलेल्या घटना समोर असताना विश्वास का ठेवू नये?"

"फर्गेट इट!"

इतक्यात राजकन्या रत्नप्रभा टॅक्सीतून आल्या. दार उघडून पुढं झाल्या अन् म्हणाल्या-

''आय ॲम व्हेरी सॉरी, समर! वाईट झालं! कुमारी गेल्याचं समजलं मला!''

मी काही न बोलता उभा राह्यलो.

''असं कसं झालं?''

भेटलेल्या प्रत्येकाला कुमारीच्या मृत्यूचा इत्थंभूत इतिहास सांगावा असं मला वाटत नव्हतं. मोघम उत्तर द्यायचं म्हणून मी म्हणालो, ''गैरसमजुतीनं चुकीच्या गोळ्या खाल्ल्या तिनं!''

''अरेरे! बॅड लक! बरं, मी भेटेन तुला नंतर; आज तू काही कामात आहेस?''

''नाही, का?''

''माझ्यासोबत येशील?''

''कुठं?''

''फेमसमधे, एक छोटा रोल आहे. शुटींग आहे एकदोन तासाचं!''

मलाही काही काम नव्हतं; शिवाय बसूनबसून कंटाळा आला होता; म्हणून उठलो आणि टॅक्सीत बसलो. राजकन्येनं सिनेमात काम करायला विरोध होता, तरीही ती ऐकायला तयार नव्हती. काय व्हायचंय तिचं ते होऊ दे, म्हणून मी तिला यापुढं काही शिकवायच्या भरीला पडायचं नाही असं ठरवलं होतं. हे सर्व ठाऊक असूनही ती मला शूटिंग पहायला बोलावते म्हटल्यावर मला तिच्या चिकाटीचं थोडं कौतुक वाटलं!

''चला, कसलं, शूटिंग आहे ते बघू तरी!''

''त्याचं काय झालं समर, नरोन्हा जे पिक्चर करणार आहेत, त्यात थोडी अडचण आलीय, त्यांचा फायनान्सर स्टेटसला गेलाय. तो येईपर्यंत थांबावं लागणार आहे. दरम्यान मलाही साइड रोलची ऑफर आली.''

''बरं झालं!''

''मनापासून म्हणतोस ना हे?''

''कसंही समजा!''

''तसं नाही रे, मला या क्षेत्रात नाव कमवायचं आहे.''

''कमवाल! पण तुम्ही कमवायला सुरुवात केली की पोटगी बंद होईल किंवा कमी तरी होईल.''

''ते का?''

''ज्या स्त्रियांना पैसे मिळवता येतात त्यांना पोटगीची काय आवश्यकता?''

''पण त्यांनी कबूल केलेले आहे ना कोर्टासमोर!''

''असेल केलं, पण पोटगीची रक्कम मंजूर झाल्यानंतर ज्या स्त्रीला पैसा मिळतो तिला द्यावयाच्या पोटगीच्या रकमेतही कपात करावी, असं कायदा सांगतो!''

''पण जर मला नाव मिळालं या क्षेत्रात तर त्यांच्या पैशावर कशाला विसंबून राहीन मी?''

''नाव? पैसा? मिळेलही! कोणी सांगावं! पण त्यासाठी फार मोठं मोल द्यावं लागेल!''

''तुझं आपलं काहीतरीच असतं बघ!'' राहूनराहून मला राजकन्येच्या स्थित्यंतराचं आश्चर्य वाटलं होतं. रत्नापुरात पाहिलेली ती अबोल, विचारी, संयमी राजकन्या हीच का असा संभ्रम पडावा इतकं मोठं स्थित्यंतर हिच्यात घडलेलं होतं.

स्टुडिओच्या आवारात टॅक्सी येऊन थांबली. मी राजकन्येच्या मागोमाग उतरलो.

''हॅल्लो प्रिन्सेस!'' असं म्हणत नरोन्हाचा असिस्टंट पुढं झाला.

''मी वेळेत आले ना?''

"बिल्कुल! चला मेकअप करून घ्या!"

"समर, तू सेटवर थांब, मी आलेच. मिस्टर रोबो, हा समर ठाकूर माय फ्रेंड! याला सेटवर घेऊन चला."

रोबोनं माझ्याशी हस्तांदोलन केले आणि तो मला स्टुडिओत जिथं सेट उभा केलेला होता तिथं घेऊन गेला. माझ्यासारखी दहापाच बघ्ये मंडळी तिथं अगोदरच येऊन बसलेली होती. स्टुडिओत मोठ्या दिवाणखान्याचा सेट उभा केलेला होता. वरून लाईट टाकण्याची व्यवस्था पूर्ण झाली होती. मेकअप केलेला एक तरुण तोंडात सिगरेट धरून बोलत होता.

थोड्याच वेळात राजकन्या मेकअप करून तिथं अवतीर्ण झाल्या. राजकन्येने इतके तोकडे कपडे घातलेले होते की, तिला त्या वेषात पहाताक्षणीच माझा मस्तकशूळ उठला. मी कोणी फार मोठा पवित्र आचरण करणारा साधुसंत नव्हतो, तरीही राजकन्येनं आपलं अर्धअधिक शरीर उघडं टाकून कॅमेऱ्यासमोर येऊन उभं रहावं आणि ती फिल्म तयार झाली की हजारो- शेकडो लोक ते दृश्य पहाणार, या विचारानं मी अस्वस्थ झालो. पण आता मला गप्प बसण्याव्यतिरिक्त काहीच करता येणं शक्य नव्हतं.

शूटिंगला सुरुवात झाली. एका नर्तकीला एक गुंड पळवून नेतो व आपल्या बंगल्यात तिला जबरदस्तीनं नाच करायला लावतो, असे ते दृश्य होते. नर्तकी नाच करायला नाकारते; मग तो जांबिया दाखवून तिला जबरदस्तीनं नाचायला लावतो!

ते शूटिंग चालू असताना एकदा लाईट चुकीचा पडला, दुसऱ्यांदा साऊंड केबिनमधे आवाज बरोबर उमटला नाही, तर तिसऱ्यांदा लाईट अन् साऊंड व्यवस्थित असताना व्हिलनला जोराची शिंक आली! असिस्टंट डायरेक्टर प्रत्येकी वेळी 'कट्-कट्' म्हणून बोंब मारत होता.

प्रत्येक वेळी नव्या उत्साहानं त्या व्हिलनशी झोंबाझोंबी करणाऱ्या राजकन्येची मला कीव येत होती. चित्रपटात काम करणाऱ्या छंदापायी ती आपल्या देहाचं प्रदर्शन बिनधास्तपणे करीत होती. मला ते पहावेना, मी उठून बाहेर येऊन उभा राहिलो. खरं तर तिथून निघूनच जावं असं वाटलं होतं.

ते जवळजवळ तीन तासाचं शूटिंग संपवून राजकन्या हसतहसत बाहेर आली. मला म्हणाली, "कसं काय वाटलं ॲक्टिंग?" मी काहीच बोललो नाही.

"नरोन्हा एकदम खूष! तू नव्हतास नरोन्हा सेटवर आले तेव्हा!"

"राजे, माझं डोकं गरगरायला लागलंय! मला घरी जायला हवंय!"

"याचा अर्थ तुला माझा अभिनय आवडला नाही! अरे, यानंतरच्या शॉटमधे माझा असा डान्स आहे, की प्रेक्षक मॅड होतील मॅड!"

"होतील होतील!" मी उपहासानं म्हणालो.

"समर, डान्सिंगची मला बालपणापासून हौस आहे, तुला ठाऊक आहे ना?"

"हो, पण असं अंग उघडं टाकून डान्स करण्याची सवय नसेल यापूर्वी!"

"तुझं कोडंच सुटत नाही, समर! स्वत:चं जीवन जगण्याचं एक स्टँडर्ड! अन् दुसऱ्यांसाठी वेगळं असं डबल 'स्टँडर्ड' ठेवणं बरं नव्हे!"

"मी पुरुष आहे हे विसरता!"

"म्हणून तू जे वागतोस ते आदर्श?"

"मुळीच नाही! पुरुषानं काही धिंगाणा घातला तरी त्याचं फारसं वाईट होत नसतं; पण स्त्री जर बेताल वागली तर जन्मभर पस्तावत रहाते!"

"याचा अर्थ तू अजून शंभर वर्षांपूर्वीच्या जमान्यात वावरतो आहेस! पाश्चात्य देशात काय चाललं आहे ते जरा वाचत जा!"

"काही गरज नाही. तिथं काय चालतं आहे त्याचा इथं जे वागतात त्यांच्या वर्तनावरून मला अंदाज करता येतो."

"चूक आहे! स्त्री-पुरुष समान मानले जातात तिथं!"

"लाख मानू देत, म्हणून पुरुष काही माता बनू शकत नाही! निसर्गानं ज्या मर्यादा घातलेल्या आहेत त्या पालन कराव्याच लागतील! कल्पना करा राजे, एक तरुण सुस्वरूप स्त्री या जीवनाला कंटाळली अन् तिला वैरागीण होऊन सारी तीर्थक्षेत्रं पायी फिरायची इच्छा झाली, तर ती प्रत्यक्षात तसं करू शकेल का?"

"का नाही?"

"तिला एक दहा मैल तरी रस्त्यानं एकटीला सुखरूप जाता येईल का? पुरुष मात्र ते करू शकेल! हे असं का? तर निसर्गानंच स्त्रीवर काही मर्यादा घातल्याहेत म्हणून! आमच्या भवानीनगरला एक वेडी होती, अमिना तिचं नाव. दरवर्षी बाळंत व्हायची! माणूस जात किती भयंकर आहे! त्याला स्त्री वेडी आहे की शहाणी आहे हे देखील समजत नाही. समजतं ते एकच! आपली कामवासना तृप्त करून घेणे, अन् ती घेताना माणूस कशाकशाचा विचार करीत नसतो. 'कामातुराणां न भयं न लज्जा!' तेव्हा पुरुष आणि स्त्री ही दोघं समान आहेत असं समजणं बरोबर नाही! आता हक्काच्या बाबतीत म्हणाल, तर स्त्रियांनी शिक्षण घेणं, ऑफिसांत, कचेऱ्यांत नोकरी करणं, यांसारख्या गोष्टी मी समजू शकतो; पण नसत्या ठिकाणी स्त्रिया समान हक्कासाठी झगडू लागल्या तर अनर्थ होईल!"

"युरोप-अमेरिकेत बायका पायलटस आहेत, सैन्यात अधिकारीही आहेत. पोलिसांत तर आहेतच! मग आपल्या इथं का अशी अपेक्षा करू नये?"

"जरूर करावी, पण मला प्रामाणिकपणे वाटतं की, स्त्रियांनी प्रथम आपलं घर सांभाळावं, अन् ते कर्तव्य पार पडल्यानंतर जर वेळ मिळत असेल तर दुसऱ्या क्षेत्रात शिरावं. कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त करणारं तत्त्वज्ञान मला कधी रुचणार नाही!"

"छान! घरात एक बायको असताना पुण्यात सलिमा उपभोगलीस, उल्काशी लग्न केलंस, कुमारीला वेड लावलंस, आणि वर मला शिकवतो कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त करणारं वर्तन स्त्रियांनी करू नये! खासा न्याय आहे तुझा! तुझा पूर्वेतिहास कोणाला माहीत नाही. अशा स्त्रीवर तुझ्या तत्त्वज्ञानाचा चांगलाच परिणाम होईल हं!"

"राजे, तुम्हाला सांगितलं ना, मी धुतल्या तांदळासारखा आहे असा माझा दावा मुळीच नाही. पण तुमच्यासारख्या सुशिक्षित, खानदान घराण्यातल्या राजकन्येनं तोंडाला रंग फासून उघड्यावर शरीरप्रदर्शन करणं मला कधीही रुचण्यासारखं नाही!"

"खानदान? राजघराणं? स्त्रियांना गुलामगिरीत खितपत ठेवण्यासाठी पूर्वीच्या लोकांनी निर्माण करून ठेवलेले सापळे आहेत हे! पण आता जमाना बदललाय, समर! आम्ही यातून बाहेर पडणार! स्टेटस्मधेदेखील वुइमेन्स लिबरेशन चळवळ मूळ धरू लागली आहे!

"हे स्टेटस् नव्हे, तिथं तुम्ही कशाही वागलात तरी कोण चौकशी करीत नाही!"

"तिथंदेखील जायची इच्छा आहे मनात! इथं एक चार-दोन चित्रपटांत चमकले की सरळ हॉलिवुडला जाणार आहे! इंडियन् प्रिन्सेस इन हॉलिवुड फिल्म!"

मी कपाळावर हात मारून घेतला. ही विक्षिप्त मुलगी माझं काहीएक ऐकणार नाही, याची खात्री होऊन चुकली होती.

हिंदू कॉलनीत तिच्या रहायच्या जागेजवळ टॅक्सी थांबताच मी म्हणालो, "बाय बाय!"

"हे काय? तू आत न येताच चाललास?"

"हो, जायला हवं! उल्काची तब्येत अलीकडे बरी नसते." टॅक्सीत बसल्याबसल्या मी

म्हणालो.

"काय होतंय काय?"

"किरकोळ."

"जेवून गेला असतास तर? माझ्याकडे हाफ जॉनी वॉकर आहे!"

"माफ करा!" टॅक्सीवाल्याच्या पाठीला तर्जनीनं टोचून मी म्हणालो, "चलो भाई बांद्रा."

एकाच वेळी राजकन्येचा मला राग आणि दया येत होती. अजून ती कल्पनेच्या साम्राज्यात वावरत होती. वास्तव जगातली झळ तिला लागलेली नव्हती.

मी घरी आलो तो घरासमोर ही ऽ गर्दी. त्या गर्दीत एक-दोन पोलीस आणि फौजदारही होते. माझ्या छातीत धस्स झालं. प्रथम वाटलं, ते उल्काचं काही बरंवाईट झालं की काय? पण उल्का सुखरूप होती. उल्का कुलूप लावून शाळेला गेल्यानंतर कोणीतरी चोरट्याने डुल्पिकेट चावी लावून घर फोडले होते. भांडीकुंडी जशीच्या तशी होती; पण मी परवा हॉटेल मिल्टनमधे मारलेला सर्व डल्ला तांदळाच्या डब्यातून गायब झाला होता! त्यात माझे आणखीही पैसे होते; पण ते निश्चित किती होते हे मला तरी कुठं ठाऊक होतं?....

"तुमचे पैसे किती होते?" फौजदारांनी उल्काला विचारलं. उल्कानं माझ्याकडे बोट दाखवलं. मला पंचाईत पडली, किती होते म्हणून सांगावे? पन्नास-साठ हजार म्हणून सांगावे तर 'तुम्ही नोकरी धंदा काय करता, इतके पैसे कशासाठी घरात ठेवले होते' ही लांबड लागायची! मी सांगून टाकलं,--

"फारसे नव्हते. असतील शेचारशे!"

"तसं लिहून घेऊ?"

"हो."

बिनाकष्ट मिळवलेल्या पैशाचं सुखही नाही अन् दु:खही नाही. उल्का मात्र माझ्या चेहऱ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहू लागली. नुकतेच तिनं ते पैसे पाहिले होते. पण मी खुणेनंच तिला गप्प बसण्याची सूचना केली.

चष्मा गेलाच होता. पण त्याच्यामागोमाग त्यानं केलेली सर्व कमाईही निघून गेली.

पोलीस पंचनामा करून आमचे जाबजबाब घेऊन निघून गेले. दुकानाहून परत आल्यानंतर रॉबर्टला चोरी झाल्याचं समजलं, तेव्हा लिलियनसह तो भेटायला आला.

"तू कुठं होतास?" त्यानं मला विचारलं. त्यावर मी उत्तर देण्याअगोदरच उल्का म्हणाली,-

"त्याचा काय एक ठिकाणा असतो? गावभर भटकत असतो!"

"एक शब्द उच्चारायचा राह्यला! 'गावभर' आणि 'भटकत' यांच्यामधला एक शब्द उच्चारायला विसरलीस वाटतं?" मी चिडून म्हणालो.

"लाज आहे का बघ!"

"अरे, जी वस्तुस्थिती आहे तिच्याबद्दल माणसानं लाजावं का? काय रे रॉबर्ट?"

"मी काय सांगू, गड्या! तुझ्या जीवनाची तऱ्हाच काही अनोखी! तू काय आम्हा चारचौघांसारखा आहेस?"

"का, मला काय चार पाय आहेत?"

"पाय चार नसतील, पण कान मात्र मोठे आहेत!" उल्का म्हणाली.

"जपून! जरा जपून बाईसाहेब, मला गाढव म्हणशील; पण त्यामुळे तू कोण होशील याची थोडी कल्पना कर."

एखाद्याचा एक पैसा हरवला तर त्याला बेचैन होतं, इथं माझे चाळीसपन्नास हजार कुणी भामट्यानं वास आल्यासारखे अचूक उचलले होते, पण मला विनोद सुचत होता.

हा काळ माझ्या स्वभावाचं स्थित्यंतर घडवणारा होता. माझ्यातला सहृदय, भावनाप्रधान समर हळूहळू लोप पावत होता. तसं म्हटलं तर बेहराम इराणीचा चष्मा चोरल्यापासूनच माझ्या स्वभावाच्या स्थित्यंतराला प्रारंभ झाला होता. त्या चष्म्याच्या जोरावर मी लोकांना हातोहात फसवून शेकडो रुपये मिळवले होते. ते खर्चही तसेच विनाहिशेब केले होते. कशाची ददात वाटत नव्हती. कुमारी माझ्यावर जीव टाकत होती. तिच्या घरी असताना किचनमधे जाऊन हातानं घेऊन खात होतो. तिच्या पश्चात तिची व्हिस्कीसुद्धा प्यायला कमी केलं नाही. मनाला वाटतील तसले कपडे घेत होतो. 'हॅपी-गो-लकी' असं जीवन चाललं होतं. पण तो चष्मा फुटला- नव्हे, दाऊदनं हिसकावून घेऊन फोडला... कुमारी मरून गेली... घरी चोरी झाली. होते नव्हते तेवढे धन चोरीला गेले... माझ्या जीवनात या घटनांनी एक निराळं वळण निर्माण करून ठेवलं. यापुढं जिच्या जिवावर काय वाट्टेल ते करावं ती कुमारी निघून गेली होती, दुसऱ्यांच्या खिशातले पैसे नजरेला भूल दिल्याप्रमाणे काढून घ्यावे अशी किमया करणारा चष्माही गेला होता.

नाही म्हणायला उल्का नोकरीला लागली होती आणि तिला दिवस गेले होते, या दोन गोष्टी दिलासा देणाऱ्या होत्या, यात शंकाच नव्हती.

-o-o-

३०

गेले चार महिने मी राजकन्येकडे फिरकलो नव्हतो. तिनं दोनतीन वेळा मला भेटायचा प्रयत्न केला होता; पण मी मुद्दामच तिला टाळत होतो.

आमची फॅमिली डॉक्टरीण होती चोक्सीबाई. तिचं बांद्रा टॉकीजजवळ छोटंसं कन्सिंल्टग रुम आणि हॉस्पिटलही होतं. त्या भागातली ती प्रसिद्ध गायनॅकॉलॉजिस्ट होती. तिचा नवरा ॲडव्होकेट होता. त्याचं नाव पार्डीवाला. पण या चोक्सीबाईंचं लग्नापूर्वी जे आडनाव होतं त्या आडनावावरच लोक तिला ओळखत होते. डॉली चोक्सी!

उल्काचा चौथा महिना सुरू होता; पण या सुमारास तिला थोडा त्रास होऊ लागला. सुरुवातीला किरकोळ ब्लिडिंग झालं म्हणून चोक्सीबाईंची ट्रीटमेंट सुरू केली. प्रकृतीला थोडा आराम मिळाला; पण औषध बंद केल्यानंतर पुन्हा त्रास सुरू झाला. मला लक्षण काही बरं दिसेना. त्या दिवशी तिला अंथरुणावरून उठायलादेखील येईना.

"समर, एक रजेचा अर्ज लिही, आणि येताना चोक्सीबाईंना घेऊन ये!"

"मला वाटतं, तू ॲडमिट व्हावंस हॉस्पिटलमधे. तिथं देखभाल बरी होईल!"

"मला हॉस्पिटलमधे रहाणं आवडत नाही रे!"

"आता आवड-निवड करत बसायची ही वेळ नाही, उल्का. यातून काही गुंतागुंत निर्माण झाली तर आपल्यालाच निस्तरावं लागणार आहे!"

"नाही रे! मी हॉस्पिटलमधे राहणार नाही. तुला बाईंना बोलावून आणायचं नसलं तर सोडून दे!"

एप्रिल उजाडला होता. ऊन रणरणत होतं. रस्त्यावरचं डांबर पातळ होऊन त्यावर येणाऱ्याजाणाऱ्या वाहनांचे ठसे उठत होते.

माझी आर्थिक स्थिती एकदम 'डाऊन' झाली होती. उल्काच्या पगारावर मला अवलंबून रहावं लागत होतं. अंग मोडून कष्ट करण्याची सवय नव्हती, किंबहुना कष्टाचं काम माझ्यावर करण्याची पाळी आजपर्यंत आलेली नव्हती. पण आता मात्र चणचण जाणवू लागली. उल्काच्या पगारातले तीन-साडेतीनशे रुपये औषधपाण्याला गेले होते. जे दोनअडीचशे शिल्लक होते त्यात महिना घालवायचा होता. फुकटचा पैसा जेव्हा खिशात खुळखुळत होता, तेव्हा मन मानेल तसा खर्च करायची सवय लागली होती आता ते जाचू लागलं.

चोक्सीबाईंच्या दवाखान्यात लांबच्या लांब रांग लावलेली असायची. पण त्या दिवशी फक्त तीनचारच बायका होत्या. मी 'फक्त पुरुषांसाठी' अशी पाटी लिहिलेल्या बाकावर बसलो. मला ती कल्पना फार आवडली. पुरुष डॉक्टरांच्या दवाखान्यांत 'फक्त महिलांसाठी' जसे बाक असतात, त्याच्या उलटा प्रकार इथं होता.

त्या तीन बायका तपासून होताच मी डॉक्टरीणबाईंकडे जाण्यासाठी उठलो, तोच स्वत: डॉक्टरीणबाईच हातात स्टेथॉस्कोप घेऊन बाहेर आल्या.

"हॅल्लो, मिस्टर ठाकूर? हाऊ इज उल्का?"

"तिला अजून बरं वाटत नाही; म्हणून तुम्हाला बोलवायला आलो!"

"खरं सांगू, ती औषधं वेळेवर घेत नाही; म्हणून असं होतं. तुम्ही तिला हॉस्पिटलमधे एक पंधरा दिवस ठेवून द्या! काय?"

"मीही तेच म्हणतो आहे. पण ती थोडीशी हट्टी आहे. आपण आज घरी या. तपासून तिला तसं सांगा! पण हे असं वारंवार का घडावं!"

डॉक्टरीणबाई माझ्याशी बोलत बोलत गाडीजवळ आल्या, आणि मला म्हणाल्या,

"मिस्टर ठाकूर, अती मद्यपानामुळं तिची सारी गात्रं शिथिल झालेली आहेत. गर्भाशयावरदेखील काहीसा परिणाम होण्याची शक्यता आहे. पाहू, तुम्ही तिला इथं एक पंधरा दिवस ठेवून द्या, मला डिटेल असं ऑब्झर्व्हेशन करता येईल!"

"आपल्याला सवड आहे ना?"

हातातल्या घड्याळाकडे पहात डॉक्टरीणबाई म्हणाल्या, "आता आले असते; पण एक पेशंट पाहायला जायचं आहे! असं करू, तुम्ही चला माझ्यासोबत, तो पेशंट पाहू आणि तसंच तुमच्या घरी जाऊ, चालेल?"

"ओ ऽ के!"

उल्का व्यसनाधीन झाल्यापासून डॉक्टरीणबाई तिला ओळख होत्या. तिचं मद्याचं व्यसन सुटावं म्हणून याच डॉक्टरीणबाईंनी प्रथम उल्काला मार्फियाची इंजक्शनं दिली. हळूहळू तो कमी करत करत इंजेक्शन्सदेखील थांबवली. शिवाय ज्या वेळी उल्का दवाखान्यात येई तेव्हा चोक्सीबाई तिला ब्रेनवॉश देत होती तो निराळाच! दवाखान्यात येणाऱ्या, अपत्यप्राप्तीसाठी उत्सुक असलेल्या अनेक स्त्रिया पाहून उल्काच्या विचारांतही हळूहळू फरक पडू लागला. मद्याच्या धुंदीपेक्षा संततीचं सुख अनेक पटींनी श्रेष्ठ आहे ही जाणीव तिच्यात निर्माण व्हायला चोक्सीबाईच कारणीभूत होती.

मी बाईशेजारी पुढं बसलो. बाई स्वत: ड्रायिंव्हग करीत होत्या. माहीमजवळ रस्ता ब्लॉक झाला होता. हातगाडीवाल्याचं चाक एका फियाटमधे अडकलं होतं. कोपऱ्यावरचा पोलीस तोंडानं त्या हमालाला शिव्या घालीत फियाटवाल्याला चाक सोडवायची सूचना देत होता.

"साला रास्तेपे मरनेको आता है!" हातगाडीचं चाक निघाल्यानंतर पोलीस हमालाला म्हणाला.

"फिर कहाँ जाऊ भाई?"

"जाव कबरस्तान में!"

चोक्सीबाई हसतहसत मला म्हणाली, "बघा मिस्टर ठाकूर, हा पोलीस म्हणजे सरकार, त्या गरिबाला कबरस्तानात जायला सांगतो आहे. खरं म्हणजे त्या फियाटवाल्याची चूक होती. त्यानं सिग्नल न देता गाडी वळविली होती. पण मोटारगाडीवाला हा नेहमी बरोबर असतो, हातगाडीवालाच मूर्ख ठरतो!"

मी म्हणालो, "जिथं तिथं हेच पहायला मिळतं! आणि वर म्हणायचं हे सरकार गरिबांचं आहे! गरीबी खतम करो!"

"शासनाचे लोक गरीबच खतम करतात!"

डॉक्टरीणबाई माहीम ओलांडून टिळक ब्रिजकडे गाडी वळवताना मला म्हणाल्या, "काही प्रमाणात सोसायटीत ही डिस्पॅरिटी राहणारच हे मी मानते; पण एकानं झोपडपट्टीत आणि दुसऱ्यानं पेडर रोडला हवेलीत रहायचं, धिस इज टू मच! इतकी तफावत फार काळ राहू शकणार नाही!"

"आपण वैद्यकीय व्यवसायाबरोबर समाजवादाचाही अभ्यास केलेला दिसतो!"

'अभ्यास करायची गरजच काय? जे डोळ्यांनी दिसतं आहे ते बोलते आहे मी. खोटं आहे का?'

बार्इंनी टिळक ब्रिजवरून डाव्या हाताला गाडी वळवली आणि ती सरळ हिंदू कॉलनीत ज्या इमारतीत राजकन्या रहात होत्या, त्या इमारतीसमोर आणून उभी केली. मी राजकन्येला मुद्दाम गेले चार महिने टाळत होतो आणि आज नेमका तिच्या घरासमोर येऊन थांबलो.

बाई दार उघड्यापूर्वी मला म्हणाल्या, "इथं एक पेशंट आहे. तपासून एक दहा मिनिटांत येते!"

"ओ के!" मी गाडीतच बसून राह्यलो.

पाच मिनिटं झाली, दहा झाली. बाई काही येण्याची चिन्हं दिसेनात. पण मला तिथं बसून राह्यल्याशिवाय दुसरं काहीच करता येणं शक्य नव्हतं. ती बिल्डिंग मोठी होती. चोक्सीबाई कोणाकडे गेली होती समजायला मार्ग नव्हता. पण कदाचित् राजकन्या मला पाहील म्हणून मी गाडीतला डॉक्टरीणबाईचा पेपर डोळ्यांसमोर धरून बसलो होतो.

पंधरावीस मिनिटांनी चोक्सीबाई खाली आली अन् मला म्हणाली, "एक्सक्युज मी मिस्टर ठाकूर! त्या बाईनं माझा फारच वेळ घेतला. जगात इतक्या नमुन्याची माणसं आहेत, कोणाशी कसं वागावं हेच समजत नाही!"

"काय झालं?" गाडी सुरू झाल्यानंतर मी विचारलं.

"एक बाई पेशंट आहे. तिचं दोन वेळा क्यूरेटिन केलं होतं. आता म्हणतेय की ट्युबेक्टॉमी करून टाका!"

"कोण आहे?"

"आहे तिकडची कोणी प्रिन्सेस! नवऱ्याला सोडून इथं मुंबईत येऊन राह्यलीय. वर्ष होत आलं!"

"माय गॉड! डॉक्टर, तुम्हाला नक्की माहिती आहे ती प्रिन्सेस आहे?"

"हो, अगदी पहिल्या वेळेपासून!"

मी कपाळाला हात लावला. राजकन्या इतक्या पुढं गेली असेल याची मला कल्पना नव्हती. दोन वेळा गर्भधारणा झाल्यानंतर 'क्यूरेटिन' करून घेतलं आणि आता वारंवार ते करायची वेळ येऊ नये म्हणून तिनं कायमची अशी गर्भप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेण्याची इच्छा प्रर्दिशत केल्याचं ऐकून मला जबरदस्त धक्का बसला. चोक्सीबाईला मी कपाळावर हात मारून घेतल्याचं पाहून काहीसं आश्चर्य वाटलं! बाईनं मला विचारलं-

"यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे? या व्यवसायात अशा असंख्य बायापोरी भेटतात!"

"भेटत असतील! ज्या अनोळखी असतील त्यांच्याबद्दल काही वाटायचं कारण नाही; पण ज्यांना आपण ओळखतो त्यांच्या बाबतीत असं काही ऐकायला मिळालं की धक्का बसतो!"

"काय? तुम्ही त्यांना ओळखता?"

"चांगलाच ओळखतो."

"मग त्यांना समजावून सांगा, एकदा ते ऑपरेशन केलं की संतती होणं अशक्य आहे. पुन्हा त्यावर शस्त्रक्रिया केली तरच ते शक्य होतं; पण ते ऑपरेशन थोडं गुंतागुंतीचं होतं. फक्त पन्नास टक्केच अशी ऑपरेशन्स यशस्वी होतात! मातृत्वाचं दार असं ऐन तारुण्यांत बंद

करणाऱ्या स्त्रियांची मला कीव करावीशी वाटते!''

''डॉक्टर, एकदा पाय घसरला की संपलंच! सांगून तरी काय उपयोग होणार आहे? सिनेमा हे तुझं क्षेत्र नाही हे किती वेळा तिला मी समजावून सांगितलं; पण तिनं ऐकलं नाही. आता या गोष्टी घडल्या त्याची जबाबदारी तिच्यावरच येते!''

''पण मिस्टर ठाकूर, तुमचा नि त्यांचा जर चांगलाच परिचय असेल तर या गोष्टीपासून तुम्ही त्यांना परावृत्त करावं हे बरं!''

''शक्य होणार नाही ते!''

''मीही तेच त्यांना पटवायचा प्रयत्न केला; पण त्यांचा निर्धारच झालाय. मी ते ऑपरेशन करायचं टाळलं तर दुसऱ्या कोणाकडून तरी ते करून घेतल्याशिवाय राहणार नाहीत! फार वाईट वाटलं मला. पहिल्यांदा जेव्हा माझ्याकडे आल्या तेव्हा काय रूप होतं म्हणून सांगू? अन् आज पाह्यलं तर अगदी ॲनिमिक वाटल्या, डोळ्यांभोवती काळी वर्तुळं जमली आहेत, चेहरा भेसूर झालाय, ओठ-डोळे निस्तेज दिसताहेत! पण काय हो, नवऱ्याला सोडून येण्यासारखं कारण तरी काय घडलं?''

''बाई, या राजेलोकांच्या तऱ्हाच काही अजब आहेत. तुमच्या-आमच्यासारख्या सर्वसामान्य माणसांना त्यांच्या आचारविचारांची कल्पनाच करता येणार नाही. हीच राजकन्या रत्नप्रभा एके काळी अबोल, अत्यंत विवेकी आणि धोरणी वाटली मला; पण तिचं लग्न झालं एका ऑर्थोडॉक्स राजपुत्राशी अन् हिच्या ट्रॅजेडीला सुरुवात झाली.''

''मुंबईत तुमची - तिची भेट झाली होती?''

''अर्थात्! तिला सिनेमाच्या क्षेत्रापासून चार हात दूर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला मी; पण ही चंदेरी दुनिया अशी काही मोहमयी आहे की, भल्याभल्यांचे विचार, विवेक लुळेपांगळे पडतात!''

बोलत बोलत गाडी आमच्या दारापर्यंत येऊन केव्हा थांबली हे समजलंदेखील नाही. बाईची बॅग घेऊन मी उतरलो. उल्का आमचीच वाट पहात होती.

''हॅल्लो उल्काताई, हाऊ आर यू? फाईन?'' चोक्सीबाईंचं व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रसन्न होतं. त्यात आल्या आल्या ती पेशंटशी असं काही गोड बोलायची, की रोग्याचं निम्मं दुखणं नाहीसं व्हावं!

चोक्सीबाईनं उल्काला तपासताना मी खिडकीतून बाहेर पहात राह्यलो. तपासून झाल्यानंतर बाई म्हणाल्या, ''काळजी करायचं काही कारण नाही; पण उल्काताई, तुम्ही एक आठ-पंधरा दिवस हॉस्पिटलमधे राह्यलात तर मला चांगलं ऑब्झर्व्हेशन करता येईल! काय मिस्टर ठाकूर?''

''माझं काहीएक म्हणणं नाही!'' मागे वळून मी म्हणालो.

''रजा मिळणं कठीण आहे!'' उल्कानं अडचण सांगितली.

''डोंट वरी, मी तुमच्या शाळेकडे देण्यासाठी सर्टिफिकेट देते!''

''पण पुन्हा डिलिव्हरीच्या वेळी रजा घ्यायची, मग आता रजा घेतली तर संचालक मंडळ नाखूष होणार!''

''तू त्याची चिंता करू नको उल्का. करूनकरून काय करतील? नोकरीवरून काढून टाकतील ना? दुसरी बघू! अगोदर तुझी तब्येत सुधारायचं बघ!'' मी म्हणालो.

हो - ना करीत शेवटी, उल्का चोक्सीबाईच्या हॉस्पिटलमधे ॲडमिट झाली. मी घरी आलो. आता पूर्वीसारखा खुशालचेंडूपणा करून मला भागणार नव्हतं. जबाबदारी वाढली होती आणि लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकून पैसा कमवण्याचा मार्गही खुंटला होता. मला यापुढं

फ्लशमधे पैसा कमावणं मुळीच शक्य नव्हतं, अन् केवळ उल्काच्या पगारावरही अवलंबून राहण्यानं भागणार नव्हतं!

मी खोलीत एकटाच कॉटवर विचार करत पडलो होतो. इतक्यात पोस्टमननं खिडकीतून एक पाकीट आत भिरकावलं अन् 'ठाकू ऽ ऽ ऽर' असं म्हणून तो पुढं निघून गेला. मी कॉटवरून उठून ते पाकिट घेतलं अन् फोडलं. भवानीनगरवरून आईनं पाठवलं होतं.

"प्रिय चि. समर,

मागे तुझी यांना तार आली होती, त्या वेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती, आता बरी आहे. पण ते फारच अशक्त झालेले आहेत. गेले दोन महिने कोर्टात गेले नाहीत. यंदा दुष्काळामुळं पिकं गेली, म्हणून कुशाप्पाकडून धान्यही आलं नाही. अमरची फी भरायची राहिली आहे. तुझी आर्थिक स्थिती बरी असली तर आम्हाला एक पाचशे रुपये पाठवून दे! इथे कोणाकडून अद्याप पैसा उसना घेतलेला नाही. अलकामधे फारच बदल झाला आहे, मला वाटतं, तू आता तिला तिकडे घेऊन जावे. तिला मास्तरकीची डिग्रीही मिळाली आहे, झाले एवढे शासन तिला पुरे झाले. तुझ्या मनीऑर्डरची वाट पहात आहे!

तुझी,
आई."

पत्र वाचलं आणि क्षणभर डोकं सुन्न झालं. कधी नाही ते मी कफल्लक व्हायला आणि आईनं पैसे मागायला एक गाठ पडली होती. चोरी झाली नसती तर पाचशेच काय. पण पाच हजारदेखील मी घरी पाठवले असते. पण आता काय करू? तशी निकड असल्याशिवाय आई कधीच माझ्याकडे पैसे मागणार नाही! काय करावं? कुणाकडे पैसे मागावेत?...

मी उठलो. कपडे चढवले आणि बसस्टॉप गाठला. चोरी झाल्यापासून टॅक्सी करणं शक्य नव्हतं. वरळी नाक्यावर आलो. रॉबर्ट दुकानात होता. पण एकदम त्याच्याकडे पैसे मागण्याआधी मला त्याच्याजवळ पैसे आहेत का याचा अंदाज घ्यायचा होता.

"रॉबर्ट, एक अडचण निर्माण झालीय!"

"बोल!"

"माझ्या एका मित्राला पाचशे रुपयांची गरज लागली आहे!"

"कोण मित्र? ती राजकन्या नव्हे ना? हो! नाहीतर मित्राऐवजी मैत्रीण असायची!"

"तुला तसं वाटणं साहजिक आहे; पण अगदी बाय गॉड सांगतो, त्याला खरंच निकड आहे!"

"हे बघ समर, उसने पैसे मी आयुष्यात कोणाकडून घेतले नाहीत आणि कोणाला दिलेही नाहीत. उसने पैसे देणं म्हणजे आपआपल्यांत संबंध तोडून घेणं असं मी मानतो. शिवाय पैशाची गरज तुला नसून तुझ्या मित्राला आहे, ज्याची मला जानपहेचानदेखील नाही. तुला गरज असती तर मी पाचशे नसले तरी शेदोनशे तरी नक्की दिले असते, पण ते कर्ज, किंवा उसने म्हणून नव्हे, भेट म्हणून दिले असते. पण तुला स्वत:ला गरज दिसत नाही!"

"रॉबर्ट! बस्स बस! समजलो मी. गरज मला आहे असं समज आणि तीनशे रुपये दे! हवं तर कर्ज समज, हवं तर भेट दिली म्हणून समज!"

"ओ ऽ के, एक तासानं ये!"

आजपर्यंत मी कोणाकडे चार आणेदेखील उसने मागितले नव्हते. माझ्यावर तशी वेळच आली नव्हती. मनातून शरम वाटत होती. रॉबर्टवर मी उपकार केला होता ही वस्तुस्थिती होती; पण त्याचा अर्थ असा नव्हे की, मी मागितल्याबरोबर त्यानं मला पैसे आणून द्यावेत! रॉबर्टनं उसने पैसे देण्याच्या व्यवहाराबद्दल आपले जे अनुभव सांगितले त्यात असत्य असं

काहीच नव्हतं! पैसे मागणारी अन् ते नंतर बुडवणारी माणसांची एक जात आहे. आयुष्यात प्रत्येकाला ही जात केव्हा ना केव्हा दगा देते. ज्या माणसाविषयी आपल्याला अत्यंत आदर आहे, जो आयुष्यात उसनं म्हणून कधीही मागणार नाही अशी माणसंदेखील जेव्हा तोंडावर लाचारी आणून हात पसरून दारात उभी राहतात तेव्हा नाही म्हणणं अगदी जिवावर येतं. अशा वेळी आपण माणुसकी म्हणून मदत करतो आणि नंतर पस्तावतो. पैसे घेणारे नव्याण्णव टक्के ठग असतात. एक टक्का प्रामाणिकपणानं परत करणारे असतात. आपण परतफेडीची मागणी केली तर मुजोरी करणारेही महाभाग असतात. आम्ही काय गाव सोडून पळून चाललो काय? अशी मग्रुरीची भाषा करतात तेव्हा कुठं आपले डोळे उघडतात! पण वेळ टळून गेलेली असते. वाकडेपणा पदरात आलेला असतो!...

मी विचार करत चाललो होतो. रॉबर्टकडून पैसे न घेतलेलेच बरे, असे मला वाटू लागले. एकदा तुटलेले त्याचे माझे संबंध जुळले होते, या पैशाच्या व्यवहारानं पुन्हा त्यात अंतर पडावं असं मनापासून वाटत नव्हतं.

विचार करतकरत मी लालबागपर्यंत पायी चालत गेलो. भायखळा ब्रिज ओलांडून गेल्यानंतर मला आठवली ती राजकन्या!

चोक्सीबाईनं तिची झालेली अवस्था मला सांगितली होती. दोन वेळा 'क्युरेटिन' करून घेतल्यानंतर आता तिला 'ट्युबेक्टॉमी' करून घ्यायची होती! याचा अर्थ स्पष्ट होता, तिला या मुंबईत स्वच्छंदी जीवन भोगायचं होतं!

मला आठवली ती रत्नापूरला पॅव्हेलियनमधे महाराजांच्या उजव्या हाताला बसलेली राजकन्या! काय तिचं ते रूप! चेहऱ्यावरचे खानदानी भाव, बोलण्यातलं मार्दव. नजरेतली स्निग्धता! राजकन्या जेव्हा जेवायला माडीवरून येई तेव्हा चाल अशी काही ग्रेसफुल वाटे की, काही विचारू नका! काही मुलींचे चेहरे गोंडस असतात, पण त्यांची चाल अगदीच अनाकर्षक असते. काही पोरी चालतात टेचांत, पण सौंदर्याची अन् त्यांची जन्मत:च ताटातूट झालेली असते. पण राजकन्येचं सौंदर्य आणि तिची चाल दोन्हीही लोभस होती. याहीपेक्षा राजकन्येनं माझे प्राण वाचवल्यामुळे तिच्याविषयी अंत:करणात आदर अन् जिव्हाळा होता. इतक्या वेळा तिनं माझं म्हणणं धुडकावून लावलं, तरीही तिची जी अवस्था झालेली आहे ती डॉक्टरीणबाईनं सांगताच मला तिच्याकडे जावंसं वाटू लागलं. फारसा विचार न करता मी बस पकडली.

राजकन्या कॉटवर आडवी पडलेली होती. पलीकडे केस पिकलेल्या केसांची बाई शेगडी पेटवून जेवण करीत होती.

"समर! हाऊ नाइस ऑफ यू! अरे सद्गृहस्था, तुझा पत्ता आहे तरी कुठं?"

"इथं मुंबईतच आहे अन् काय! पण तुम्ही ही काय अवस्था करून घेतलीत?"

काळ्या वर्तुळांनी वेढलेल्या डोळ्यांची उघडझाप करीत राजकन्या हसल्या आणि म्हणाल्या,-

"शेवटी तू म्हणालास तेच खरं झालं!"

"काय?"

"नव्होना, रोबो आणि शीतलकुमार या तिघांनीही मला साफ बनवलं! मला चित्रपटांत भूमिका दिली आहे असं भासवून माझं शूटिंग घेण्याचं नाटक केलं त्या तिघांनी. चार महिने आलटूनपालटून मला त्यांनी..." राजकन्येला ते वाक्य पूर्ण करता आलं नाही! थोड्या वेळात त्याच म्हणाल्या, "नंतर सांगितलं की, काही तांत्रिक अडचणीमुळे ती फिल्म पूर्ण करता येत नाही!"

मी हसलो, आणि म्हणालो, "राजे, म्हणूनच मी तुम्हाला बजावत होतो, की हा तुमचा

प्रांत नव्हे!''

''अरे, पण मला सांग, स्टुडिओत नेऊन, लाइटस अॅडजस्ट करून फिल्म नसलेला मोकळा कॅमेरा माझ्यावर फिरवतील याची शंका तरी येऊ शकेल का? रास्कलस्! मला त्यांच्यावर काही लीगल अॅक्शन घेता येईल का रे? तुला कोर्टकचेरीतलं बरंचसं समजतं म्हणून विचारते!''

''तो विचारदेखील डोक्यात आणू नका! तुमची उरलीसुरली अब्रू देखील चव्हाट्यावर येईल! तुम्ही त्या लोकांशी स्वैर वर्तन केलंत हे जर रावेरच्या महाराजांना समजलं तर तुमची पोटगीदेखील बंद होईल! त्यांना आयताच पुरावा मिळेल!''

''असं म्हणतोस?''

''उलट आपण परत रावेरला जावं आणि रावेरकरांशी कॉम्प्रमाइज करावं हे बरं!''

''दॅट इज इंपॉसिबल, समर! प्राण गेला तरी मी परत रावेरला जाणार नाही! माझ्या डोक्यात एक नवीन कल्पना आहे!''

''कसली?''

''रावेरकरांच्या विरुद्ध वाटणीचा दिवाणी दावा करायचा अन् माझा हिस्सा मागायचा! फौजदारी कोर्टातून पोटगी मिळाली म्हणून दिवाणी कोर्टातील हक्काला बाध येत नाही ना?''

''बरोबर, पण तुम्ही हे आरंभलंय तरी काय?''

''मला एकानं सल्ला दिला आहे की, त्यांच्या प्रॉपर्टीत मला हिस्सा मिळू शकतो; मग त्यांना सोडायचं का?''

''ते ठीक आहे; पण तुमची ही अवस्था पाहून असं वाटतं की, तुम्ही अगोदर प्रकृती सुधारावी!''

''अरे, मानसिक त्रास असताना प्रकृती कधी सुधारते का!''

''हा मानसिक त्रास स्वत:च निर्माण करून घेतलेला आहे आपण!''

''कबुली दिली ना तुला? मग आता तो विषय दे सोडून. उल्का कशी आहे?''

''हॉस्पिटलमधे आहे.''

''का?''

''थोडा त्रास सुरू झाला आहे. चार महिने झाले आहेत प्रेग्नन्सीला!''

''आय. सी. काँग्रॅटस! डॉक्टर कोण?''

''तुमची अन् आमची डॉक्टरीण एकच आहे, चोक्सीबाई.''

''व्हॉट आर यू टेलिंग मी?''

''खरं तेच सांगतो आहे!''

''मग माझ्याबद्दल बाईनं तुला काही सांगितलं?''

''काही नाही!'' मी चक्क थाप ठोकली अन् म्हणालो, ''इट इज ए प्रोटेक्टेड कम्युनिकेशन! डॉक्टरानं पेशंटबाबत गुप्तता राखायची असते!''

''नाही, तिनं तुला काही सांगितलं असेल तर मला त्यात काही गैर वाटलं नसतं! तुझ्या-माझ्यात तसा परकेपणा नाहीच आहे!''

''परकेपणाही नाही अन् जिव्हाळाही नाही!'' मी एक क्षणभर विचार करून म्हणालो.

''असं का म्हणतोस?''

''तसा जिव्हाळा असता तर मी सांगितल्यानंतर त्या नरोन्हाच्या नादाला लागला नसतात!''

''त्या अर्थानं म्हणतोस, होय? पण आता मात्र मी तुझ्या सल्ल्याशिवाय कोणताच

निर्णय घेणार नाही. प्रॉमिस!'' असं म्हणून राजकन्येनं माझा हात हातात घेऊन त्यावर टाळी दिली.

मला या राजघराण्यातल्या लोकांच्या वागण्याचं कोडं कधीच सुटलेलं नाही. ज्याला इंग्रजीत 'कॉंट्रॅडिक्टरी कॅरॅक्टर्स' असं म्हणतात, अशा प्रकारच्या परस्परविरोधी गुणांचं मिश्रण त्यांच्या स्वभावात असतं. कधी ते दयाळू वाटतील तर कधी हिंस्त्र श्वापदासारखे क्रूर! कधी विचारी अन् संयमी भासतील, तर कधी अविवेकी अन् बेताल! क्षणात शांत तर क्षणात रौद्र स्वरूप धारण करतील!

''राधाकाकू, चहा करा ना!'' राजकन्येनं बाईला सांगितलं, अन् माझा हात हातात घेऊन म्हणाल्या, ''काही म्हण समर, पण स्त्रीला कोणातरी पुरुषाचा आधार हा हवाच असतो. कुमारीनं तुला घरी का ठेवून घेतलं हे आता मला समजलं! कितीही नाव कमावलं, सत्ता-संपत्ती हाती आली, तरी स्त्रीला पुरुषाचा आधार हा हवाच!''

''केवळ बुजगावणं म्हणून?''

''छे:! मला सांग, कुमारीच्या पाठीशी तू उभा होतास म्हणून खालच्या अन् वरच्या कोर्टात ती संपूर्ण निर्दोष सुटली. आता दुर्दैवानं तिनं आत्मघात करून घेतला ते सोडून दे!''

''दुर्दैवानं नाही राजे! माझ्या असहाय्यतेमुळं तिचा बळी गेला. त्या रात्री ती मला बाहेर सोडायला तयार नव्हती, पण नेमकं त्या रात्री उल्कानं मला घरी डांबून ठेवलं. हट्टालाच पेटली. ती खंत मला अजूनही जाळते आहे! कल्पना करा राजे, अपिलात निर्दोष सुटली हे तिला समजलं असतं तर तिच्या हातून असा अविचार कधी झाला असता? नियतीदेखील किती क्रूर असते बघा!''

काकूनं ताटातून दोन कप चहा आणला. मला या संस्थांनी लोकांचं हे दुसरं वैशिष्ट्य अनेक वेळा आश्चर्यचकित करतं! कितीही दैन्यावस्था आली तरी संस्थानी रीतिरिवाज सुटत नाहीत. त्या काकूनं हातातून चहा नाही आणला, ताटातून!

''आता इथंच जेव, समर!''

''जेवू? राजे, मला भवानीनगरला जायचंच. आईचं पत्र आलंय. डॅडींची प्रकृती बरी नाही. गेले दोन-अडीच महिने ते कोर्टातदेखील गेले नाहीत!''

''असं, मग तुला जायला हवं! अडचण आहे का कसली?''

मी काही न बोलता छताकडे पहात राह्यलो.

''अडचण असली तर सांग, कालच माझ्या पोटगीचे पैसे आलेले आहेत. पैसे हवेत का तुला?''

''राजे, पाचशे रुपयांची गरज होती; पण मला ते तुम्हाला परत करायला जमतील अशी ग्वाही देता येत नाही!''

''एक महिना काटकसर करीन मी. आहे काय त्यात एवढं? तू बेशक घेऊन जा!'' असं म्हणत राजकन्या कॉटवरून उठल्या. उशाची किल्ली घेऊन त्यांनी कॉटखालच्या ट्रंकेचं कुलूप उघडलं आणि पाचशे रुपयांच्या नोटा माझ्यासमोर धरल्या.

''हं, घे!''

''रॉबर्ट मला तीनशे देणार आहे, त्याच्याकडून मी अडीचशे घेईन, तुम्ही फक्त अडीचशे द्या!''

''अरे, सतराजणांकडून घेण्यापेक्षा एकाकडूनच घ्यावेत, देणाऱ्यालाही समाधान मिळतं. आपण गरजेला उपयोगी पडलो याचं!''

''राजे, या हातांनी एका रात्रीत पन्नास हजार कमावले आहेत; पण आज माझ्यावर

पाचशे रुपये घ्यायची वेळ येते आहे!''

''अशीच चंचल असते लक्ष्मी!''

काकूनं पोळीभाजी बनवली. दोन ताटं वाढून आणली.

राजकन्या मला म्हणाल्या, ''तुझी आणखीन चार दिवस वाट पाहून पत्ता काढत घरी येणार होते!''

तोंडातला घास गिळून, घोटभर पाणी पिऊन मी म्हणालो, ''मी इकडे आलो नसतो तरी तुमचा विचार डोक्यांत आला नाही असा एकही दिवस गेला नाही.''

''पण आता मी ठरवलं, तुझ्या सल्ल्याशिवाय कोणताच निर्णय घ्यायचा नाही! तू भवानीनगरला गेल्यानंतर तुझ्या डॅडींना विचारून ये, मला रावेरकरांच्या प्रॉपर्टीत हिस्सा मिळू शकतो की नाही!''

''त्याला डॅडींच्या सल्ल्याची गरज काय? मला ठाऊक आहे ना!''

''मग तू परत आल्यानंतर ते काम सुरू करू!''

उल्काला हॉस्पिटलमधे जाऊन आईचं ते पत्र दाखवलं. तिनंही चारसहा दिवस जायला परवानगी दिली. राजकन्येनं पैसे दिले. उल्कानं परवानगी दिली. मी भवानीनगरचं तिकीट काढलं.

-o-o-

३१

डॅडींची प्रकृती पार ढासळली होती. अगोदरच तोळामासा प्रकृती, त्यात आजारानं त्यांना जर्जर केलेलं, त्यामुळं ओळखू नये इतका फरक पडला होता त्यांच्यात.

मी रडत बाजूला उभ्या असलेल्या आईला विचारलं, "इतकी वेळ होईपर्यंत मला का नाही कळवलंस?"

"कळवायचं नाही म्हणून यांनी बजावून ठेवलेलं!"

"का?"

"काय सांगायचं तुला समर? म्हणायचे, त्याच्यामागं बरेच व्याप आहेत, त्याला नको बोलवू! त्या बाईच्या केसचं काय झालं रे?"

"बाई सुटली, कायमची!"

"म्हणजे?"

"निकाल होण्याच्या आदल्या दिवशीचं तिनं आपली इहलोकाची यात्रा संपवली! सुटली एकदाची! पण आई, डॅडींची प्रकृती अशी ढासळण्याचं कारण तरी काय?"

"पिणं! दिवस अन् रात्र पुन्हा प्यायला सुरुवात केली होती! जेवण नाही, खाणं नाही, फक्त प्यायचे!"

"औषधपाणी सुरू आहे ना?"

"औषधाचा काय उपयोग? डॉक्टरांनी एक थेंबदेखील दारू घ्यायची नाही असं बजावलं, तरीही पिणं सुटलं नाही! डॉक्टर म्हणाले, मी काही औषध देणार नाही!"

डॅडींनी माझ्याकडे डोळे उघडून पाह्यलं. डोळे पिवळे जर्द झालेले! 'जॉन्डिस' झालेलं असावं असं स्पष्ट दिसत होतं. अमर खिन्न चेहऱ्यानं बाजूला उभा होता. अलका मात्र कुठं दिसत नव्हती. मी आईच्या चेहऱ्याकडे पाह्यलं, तिनं माझ्या नजरेतला भावार्थ ओळखला.

"हायस्कूलला जाते ती, एक महिना झाला!"

"मास्तरीण झाली तर एकदाची!"

"तू आता परत जाऊच नकोस. तिच्यात फार फरक पडला आहे. घरची सारी कामं पहाते आणि शिवाय नोकरीला जाते."

"आई, मी आता इकडे येऊ शकत नाही. इतका दूर गेलो आहे मी, आता मागे वळता येणंही अशक्य आहे!"

"अरे, पण आम्ही काय तुला कायमचा इथून घालवून दिलेला नाही! अलकामधे बदल होईपर्यंत तू बाहेर रहावं असं तुला सुचवलं होतं!"

"हो, पण आता मी इथं वास्तव्य करू शकत नाही!"

आमच्यासमोर कॉटवर पडलेले डॅडी हातांनी खूण करून पाणी मागू लागले. उशाच्या ग्लासातलं पाणी मी डॅडींना पाजवलं. अन् म्हणालो, "डॅडी, मी आलोय, ओळखलं ना मला?"

डॅडींनी आपले पिवळे जर्द डोळे उघडून माझ्याकडे पाह्यलं आणि डोळे लगेच मिटून

घेतले. फार काळ डोळे उघडे ठेवणंदेखील त्यांना जड होत होतं. डॅडींचं लक्षण बरं नाही हे मी ओळखलं. डॉक्टरकडे धावत जावं असं काही मला वाटलं नाही, कारण डॅडी आता फक्त काही दिवसांचे सोबती आहेत हे मी ओळखून चुकलो होतो. ते माझे जन्मदाते पिता होते. त्यांनी मला लहानाचा मोठा केला, माझं पालनपोषण केलं, हे सर्व जरी खरं असलं तरी एक पाय मृत्यूच्या उंबरठ्यावर आणि एक पाय इहलोकी अशी त्यांची अवस्था पाहून मला वैद्यकीय उपचार निरर्थक वाटले. त्यांची सुटका लवकर होईल तर बरं असं वाटलं.

मी माडीवर आलो. तिसरा मजला. हीच माझी खोली! अलकानं अगदी नीटनेटकी लावली होती. खिडक्यांना रेशमी पडदे, गादीवर परीटघडीचा बेडशीट, उशांची कव्हर्स त्याच रंगाची, कोपऱ्यात ओळीनं तीनचार प्रकारच्या चपला. कपाटात ओळीनं लावलेल्या साड्या! मी तिथल्या वस्तू न्याहाळत खुर्चीवर बसलो.

मी माडीवर आल्यानंतर आई कठड्याला धरून हळूहळू वर आली. तिला ब्लडप्रेशर असल्यामुळे ती सहसा तिसऱ्या मजल्यावर येत नसे. मी आलो म्हटल्यावर ती माझ्यामागोमाग आली आणि पलंगावर बसली.

"समर, जवळ ये रे " आईनं मला जवळ बोलावलं. मी जवळ गेलो. आईनं माझं डोकं कुशीत घेतलं अन् ती धाय धाय रडू लागली.

"गप आई, रडू नको. रडून काय होणाराय?"

"भरल्या कपाळानं मी अगोदरच जायला हवं होतं रे!"

"ते सगळं खरं; पण त्या गोष्टी आपल्या हातात का आहेत?"

"तू आता इथून जाऊ नकोस. माझी शप्पथ आहे तुला. अलका पूर्ण बदलली आहे!"

"प्रश्न अलकाचा नाही, आई. प्रश्न आहे मी जिच्याशी दुसरं लग्न केलंय त्या उल्काचा! तिला दिवस गेलेले आहेत. ती दवाखान्यात आहे! मला चार दिवसांत परत जायला हवंय! काहीतरी कामधंदा पाहायला हवा!"

"म्हणजे? अजूनपर्यंत काहीच कामधंदा केला नाहीस?"

"काही ऽ नाही!"

"तिलाही इकडे घेऊन ये, आणि इथंच काहीतरी नोकरी बघ. हवं तर शेत बघ. कुशाप्पा जमीन सोडायला तयार आहे, तेवढं शेत पाह्यलंस तरी चांगलं चालेल!"

मी शेत पहावं ही आईची फार जुनी इच्छा! शेतात एक विहीर होती. तिचा गेल्या कित्येक वर्षांत गाळ उपसलेला नव्हता. गाळ उपसला असता तर पाच एकर जमीन अगदी उन्हाळा अखेरपर्यंत पाणी प्यायली असती. शेतांत दुमजली घर होतं. थोडी पडझड झाली होती, पण माणसं रहात नसली की कुठल्याही इमारतीची अशीच दशा होते की!

काही असलं तरी आता माझं मन भवानीनगरमधे रमणार नव्हतं. अलकानं अगदी चांगुलपणानं वागायचं वचन जरी दिलं तरी अलका आणि उल्का या दोघी एका गावात सुखासमाधानानं मला जगू देणार नाहीत याची मला खात्री होती. मुंबईच्या गतिमान जीवनाची मला सवय जडली होती. बसेस, टॅक्सीज, प्रत्येक रस्त्यावरून रात्रंदिवस धावणाऱ्या असंख्य प्रकारच्या मोटारी, धडधडणाऱ्या लोकल्स आणि बघावं तिकडे माणसंच माणसं, ही दृश्ये पहायची सवय झाल्यानं मला भवानीनगर एखाद्या शुष्क खेड्यासारखं वाटू लागणार होतं. मुंबापुरीच्या गतिमान जीवनाशी मी एकरूप झालो होतो. ती गतिमानता अचानक थांबवणं मला अशक्य होतं. धावत्या लोकलमधून फलाटावर उतरायचं म्हटलं तरी गाडीच्या दिशेनं दहा-पाच पावलं धावत जावं लागतं, नाहीतर माणूस तोंडावर पडतो. माझी अवस्था अगदी लोकलमधल्या प्रवाशांसारखी झालेली होती. गाडी चालू असताना आपण डब्यात स्थिर आहोत

असं वाटतं, पण ते चुकीचं असतं. आपलं शरीरही गतिमान झालेलं असतं. तसा मुंबईत राहून मी गतिमान झालो होतो.

तेव्हा मला माझ्या आयुष्याला प्राप्त झालेली गतिमानता अशी एकाएकी थांबवणं अशक्य होतं.

"आई, मी इथून गेल्यानंतर माझ्या आयुष्यात इतकी उलथापालथ झाली आहे की, आता मला परत इकडे येऊन सुरळीत असं जीवन कंठणं अशक्य आहे!"

"मग या मुलीच्या आयुष्याची वाट काय?"

"ती काय आता माझ्यावर अवलंबून आहे थोडीच? बी. ए. बी. टी. झाली. शेपाचशे रुपये मिळवत असेल, तिला आता माझी गरजच काय?"

"वेडा आहेस! मिळवती असो वा नसो, ती तुझी बायको आहे!"

"मागच्या खेपेलादेखील तू असंच काहीतरी म्हणालीस, म्हणून मी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला; पण तेव्हा तिचा ताठा कायम होता. कमवत नव्हती तेव्हा इतकी ताठ होती, आता कमावते आहे तर मग विचारायलाच नको!"

"नाही रे! बाईमाणसाचं अंतरंग तुला समजायचं नाही. वरून जरी ती तुला ताठ भासली तरी मनातून ती एकसारखी क्षमेची याचना करीत असते! एकदा पाऊल घसरलं म्हणून जन्मभर अबोला धरणं बरं नव्हे!"

"आई, पाऊल घसरण्यालाही मी फारसं महत्त्व देत नाही. पण ते घसरलं होतं याची बिनशर्त कबुली द्यायला हवी तिनं मला!"

"अरे, वर्तन सुधारलं, शिकून मास्तरीण झाली याचा अर्थ काय? तिनं आपली चूक सावरली असं नाही का होत?"

"पण तोंडानं माझ्यासमोर कबूल करायला हरकत काय आहे?"

"तू तसा अट्टहास करू नयेस असं वाटतं मला!"

इतक्यात अलका शाळेतून परत आली. मी वर असेन याची तिला कल्पनाच नाही. आईकडे अन् माझ्याकडे पहात तिनं वहाणा कोपऱ्यात ठेवल्या. हातातली पुस्तकं, मुलांच्या होमवर्कच्या तपासायला आणलेल्या वह्या टेबलावर ठेवल्या आणि माझ्या अस्तित्वाची दखल न घेता आईला विचारलं,-

"मामासाहेबांनी काही घेतलं?"

"काही नाही!"

"त्या गोळ्या?"

"घ्यायला तयार नाहीत! अलका, समर आला आहे, दिसतं ना तुला? आपल्यात गावावरून आलेल्या पतीचे पाय स्पर्शण्याचा रिवाज आहे, विसरलीस?"

अलका माझ्या खुर्चीजवळ येऊन मला वाकून नमस्कार करून खाली गेली.

"हे! बघितलं आई! यालाच म्हणतात जुलुमाचा रामराम! तू सांगितलंस, नाईलाज झाला म्हणून इतकं तरी घडलं!"

"पुरे पुरे! आल्या आल्या असा तिच्याशी एकेरीवर येऊ नको!" आई उठून खाली गेली.

मी तिसऱ्या मजल्यावरच्या छोट्या गच्चीत आलो. भवानी देवालयाच्या मंदिराचा चकचकीत कळस दिसला. महाविद्यालयाच्या आवारातील नारळाच्या झाडांचे शेंडे झुलत होते. त्यापलीकडे गावच्या पश्चिमेचा प्रचंड जलाशय सूर्यप्रकाशात चमकत होता. समोरच्या परटाच्या घराला तोरण बांधलं होतं. बहुधा परटाच्या पोरीचं, बिंदीचं लग्न झालेलं असावं! मला ज्यावेळी

समजायला लागलं, तेव्हा माझ्याकडे पाहून हसणारी ती परटाची मुलगी बरीच वर्षं अविवाहित होती. पण गल्लीमधे तिच्याविषयी कोणी वाईट बोलल्याचं ऐकिवात नव्हतं. माझे बालपणीचे कोणी मित्र दिसत नव्हते. जो तो पोटाच्या मागे लागला होता. नवीन प्रजा मला ओळखत नव्हती.

मी कपडे बदलून धोंडू मास्तरला भेटायला म्हणून गेलो. धोंडू मास्तरचं धानोरी नाक्यावर सोडालेमनचं दुकान होतं. दुकानात जातो तो समोर धोंडू मास्तरांचा मोठा फोटो लटकावलेला. त्याला गुलछडीचा हार घातलेला. प्रतिमेला अष्टगंध लावलेलं.

धोंडू मास्तरांचा मुलगा तोंडाला जाळी बसवून सोड्याच्या बाटल्या भरत होता. मला पाहून जाळी काढून ठेवीत तो पुढं आला आणि म्हणाला,-

"महिना झाला! अचानक रात्री छातीत कळ आली म्हणून उठून बसले. मी डॉक्टरांना बोलावून आणीपर्यंत सगळं संपलं!"

"अरेरे! मला कोणी साधं कार्डही पाठवलं नाही! वाईट झालं!"

मास्तरांच्या मुलानं एक आईस्क्रीम सोडा बनवून दिला आणि तो म्हणाला,--

"मरायच्या अगोदर आठच दिवस तुमची आठवण काढली होती दादांनी!"

"का?" एक घोट घेऊन मी विचारलं.

"बरेच दिवस झाले तुम्हाला भेटून, म्हणून मुंबईला जातो म्हणत होते! पण तुमचा पत्ताच मिळाला नाही!"

"रंगा, तुझ्या बापानं माझ्यावर खूप उपकार केलेत. फुटबॉल शिकलो ते त्यांच्या कृपेनंच!"

धोंडू मास्तरच्या सहवासातल्या असंख्य आठवणी डोळ्यांसमोर तरळल्या. रत्नापूरहून मी नाट्यमय रीतीनं सुटून आल्यानंतर धोंडू मास्तरला मी सर्व हकीकत सांगितल्यानंतर तो मला म्हणाला होता, "राजे लोकांची ही अवलादच तऱ्हेवाईक आहे, समर! बापजाद्यांच्या पराक्रमावर जगणारी ही जात चक्करछाप आहे!"

गेला! मला हाताला धरून पेनल्टी कॉर्नर मारायला शिकवणारा मास्तर निघून गेला होता. खिन्न मनाने मी घरी परतलो. संध्याकाळ झाली होती. बाहेरून आलो होतो तोच खिन्न होऊन, त्यांत घरात मृत्युशय्येवर पडलेले डॅडी! इतका बुद्धिमान अन् हुषार माणूस; पण या व्यसनानं त्यांना पार रसातळाला नेलं होतं! मध्यंतरी काही दिवस प्यायचं सोडलं होतं, तेव्हा वाटलं होतं की, आता पुन्हा चांगले दिवस येतील; पण कसचं काय नि कसलं काय!

रात्री कसेतरी चार घास पोटात ढकलले आणि तिसऱ्या मजल्यावर आलो. अलका खरोखरच बदलली की काय, याचा अंदाज घ्यावयाचा होता. ती रात्री साडेनऊच्या सुमाराला सारं आवरून वर आली. माडीवर दोन कॉटस् होत्या. मी एका कॉटवर रेलून अलकाची हालचाल न्याहाळत होतो. पाण्याचा तांब्या माझ्या उशाला टेबलावर ठेवला. वाचायला छोटा दिवा लावून ती कसलंसं पुस्तक वाचू लागली,--

"अलका!"

उत्तर नाही.

"अलका ऽ!"

तरीही जबाब नाही.

"अजून माझ्यावरचा राग गेला नाही?"

या प्रश्नावर ती माझ्याकडे पाठ करून झोपली.

"ठीक आहे, माझ्याशी बोलायचं नसेल तर माझा अट्टहास नाही!" असं म्हणून मीही

पाठ फिरवून झोपलो. खरं म्हणजे मी आमूलाग्र बदललो होतो. नीती-अनीतीच्या माझ्या कल्पनाही मुंबईत राह्यल्यानं बदलल्या होत्या. एका ठराविक वयात मुलीच्या हातून थोडा थिल्लरपणा घडतो, म्हणून त्या जन्मभर थिल्लरपणाच करीत राहणार आहेत, असा अंदाज करणं चुकीचं आहे, असा माझा दृष्टिकोन झाला होता. अलकावर तो आरोप आता करता येणं शक्य नव्हतं. बी. टी. होऊन ती नोकरी करू लागली होती. तिच्या वागण्यातदेखील मला थोडीशी प्रौढत्वाची छटा दिसून येत होती. भडक रंगाच्या साड्या-ब्लाऊज आता कुठं दिसत नव्हते. टेबलावरच्या प्रसाधनांतही जाणवण्याइतकी घट दिसून येत होती. हा शिक्षणाचा प्रभाव की वाढत्या वयाचा?...

तसं पाह्यलं तर आज अलकाबद्दल विचार करण्याच्या मन:स्थितीत मी मुळीच नव्हतो. डोक्यात विचार होता तो डॅडींचा आणि आईचा! डॅडींची आयुमर्यादा संपुष्टांत आल्याचं मला स्पष्ट दिसत होतं. मी खाली आलो. आई रात्रभर डॅडींच्या कॉटजवळ बसून राहणार होती. त्यांना अधूनमधून तहान लागे; पण पाणी हे शब्द उच्चारायचेदेखील त्राण त्यांच्या ओठात नव्हते. मोठ्या कष्टानं अंगठा ओठाजवळ न्यायचे. ते पाहून मला कससंच वाटलं. मीही मध्यरात्रीपर्यंत तिथं बसून होतो.

साडेबारा-एकच्या सुमारास मी वर झोपायला गेलो. अंथरुणावर अंग टाकलं असेलनसेल तोच आईचा हंबरडा ऐकू आला. मी धावतच खाली आलो. पाण्याचा घोट तोंडात असतानाच डॅडींची प्राणज्योत मालवली होती. मी आणि अमरनं आईला सावरलं. वरून माझ्यामागोमाग आलेल्या अलकानं डोळ्यांना साडीचा पदर लावला.

भवानीनगरमध्ये बोटावर मोजण्यासारखे आमचे नातेवाईक होते, त्यांना निरोप धाडला. शेजारच्या आयाबाया जमल्या. आमच्या गल्लीत सर्व धर्माचे अन् पंथाचे लोक रहात होते. त्यात परीट समाजाचे बहुसंख्य होते. काही मुस्लिम होते, काही हिं'दू होते. आमच्या भवानीनगरचं आणखी एक वैशिष्ट्य, जन्मभर शेजारी एकमेकांशी भांडतील; पण त्यातला एखादा मेला की त्याच्या मातीला सर्वात अगोदर जातील! एकेका गावाचं वैशिष्ट्यच! मुंबईत माणूस मेला तर न्यायला चार माणसंदेखील मिळणं कठीण! माणूस जिवंत असला तरी त्याची पर्वा तिथं कोणी करीत नसे आणि तो मेला तरी कोणाला ढुंकून पहायची इच्छा होत नाही. कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीचा वारसा मिळवणाऱ्या मुंबईची एकमेकांविषयीची ही अनास्था कधी कधी मला त्या शहराचा डौल पोकळ असल्याची जाणीव देऊन जाते.

डॅडी भवानीनगरचे प्रख्यात फौजदारी वकील होते, अनेकांना त्यांनी उपकृत करून ठेवलं होतं. डॅडींच्या मृत्यूची वार्ता हा हा म्हणता साऱ्या भवानीनगरात पसरली. आमच्या घरासमोरचा रस्ता वाहनांना बंद झाला. सकाळी अकराच्या सुमारास त्या रस्त्यावरून गर्दी हटवीत एक भगव्या रंगाची गाडी आली. भवानीनगरचे महाराज डॅडींना पुष्पहार अर्पण करण्यासाठी आले होते. नजीकच्या पोलीस स्टेशनचे फौजदार पहाटेपासून बंदोबस्ताला दहा पोलीस घेऊन उभे होते. डॅडींच्याबद्दल लोक आपसात कुजबुजत होते,-

"असा खंदा वकील यापुढं होणार नाही!"

"जज्जाला घाम फोडणारा असा ॲडव्होकेट आजपर्यंत झाला नाही!"

"इतका बुद्धिमान माणूस पण दारूत बुडाला!"

"या माणसाच्या वाणीत जादू होती. तो कोणाला आपलं म्हणणं पटवून देऊ लागला की समोरचा माणूस मुकट्यानं ऐकून घेत असे. शब्दन् शब्द त्याला पटत असे!"

डॅडींची अंत्ययात्रा दुपारी चारच्या सुमाराला निघाली. दहनाला संध्याकाळचे सात झाले. मी चितेला अग्नी दिला त्या वेळी सूर्यिंबब क्षितिजाला जाऊन भिडलं होतं. मुंबईहून

आल्यापासून माझ्या डोळ्यांत एक थेंबदेखील पाणी आलं नव्हतं; पण चितेला अग्नी देताच माझा सारा धीर कोसळला. मी धाय धाय रडू लागलो. लोकांनी मला बाजूला ओढून आणलं, चिता बघताबघता भडकली होती. कृश झालेली डॅडींची काया अल्पावधीतच भस्मसात झाली.

-०-०-

३२

क्रियाकर्म पार पडलं. आलेले गणगोत निघून गेले. आमचा रयई कुशाबा बाजूला लाकडी खांबाला टेकून बसला होता. आई आपलं पांढरं फटफटीत कपाळ दिसू नये म्हणून देवघराजवळच्या अंधाऱ्या खोलीत बसली होती. अमर कसलंसं पुस्तक चाळत होता; पण त्याचं लक्ष नव्हतं. मी शिकलो नाही ते नाही, निदान अमरनं तरी मन लावून शिकावं, ही डॅडींची इच्छा पूर्ण होण्याची शक्यता दिसून येत नव्हती. अमर गेल्या वर्षी चार विषयांत नापास झाला होता, तेही महत्त्वाच्या इंग्रजी, गणित, सायन्स आणि भाषा! शाळेला म्हणून तो जायचा आणि मवाली पोरांच्या सोबत भटकायचा. तसा मी तरी कुठं सज्जन होतो म्हणा! पण मला प्रामाणिकपणे वाटायचं की, अमरनं मी गेलेली वाट तुडवू नये!

"मग तुझ्या मनात काय आहे ते सांगून टाक एकदाचं!" अमरला मी म्हणालो.

"मला शाळा काही जमणार नाही!"

"म्हणून म्हंतो धाकल्या धन्यास्नी शेतावर ठिवा!" कुशाबा मधेच बोलून गेला.

आई अंधाऱ्या खोलीतून म्हणाली,--

"निदान घराला लागतं तेवढं धान्य तरी घरी येऊन पडेल!"

"आई, मी एक सुचवू?" पण आईनं उत्तर द्यायच्या आतच मी म्हणालो, "याचं लग्न करून टाकू, त्याशिवाय तो शेतावर रमणार नाही!"

"तसंच कराय पायजे मालक! पायांत आडना आडकिवला म्हंजे बराबूर ताळ्यात येतील!" कुशाबा.

अमरला तेवीस संपून चोविसावं लागलं होतं. तसं म्हटलं तर तो लग्नाला आलाच होता. माझ्या आयुष्याचा 'फियास्को' झाल्यानं अमरला बायको ठरवताना विशेष चिकित्सा करायला हवी असे मी मनातून ठरवून टाकलं होतं.

डॅडींच्या मृत्यूनंतर अनेक परिचितांची पत्रं आली. भवानीनगरमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'नेता' या दैनिकानं डॅडींच्यावर अग्रलेख लिहिला होता. त्यात त्यांनी डॅडींच्या कायद्याविषयक ज्ञानाची आणि त्यांच्या इंग्रजी भाषेवरील असामान्य प्रभुत्वाची बरीच स्तुती केलेली होती. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणं त्या वेळी एक प्रतिष्ठेचा आणि कौतुकाचा विषय मानला जात होता. इंग्रजांचं राज्य गेल्यानंतर इंग्रजीला महत्त्व देऊ नये असं ज्यांना वाटलं ते खरोखरच मूर्ख होते. इंग्रजी ही केवळ इंग्रजांची भाषा नसून ती साऱ्या जगाशी नातं जोडणारी भाषा आहे असं समजणारे थोडेच! मला तर वाटतं, ज्यांना इंग्रजी येत नव्हतं त्यांनीच इंग्रजीविरुद्ध हाकाटी केली... जाऊ द्या, भाषेवर अधिकारवाणीनं बोलायला मला अधिकार नाही; पण आपलं वाटतं की, ही 'इंटरनॅशनल लँग्वेज' बहुसंख्य भारतीयांना लिहिताबोलता यावी. एखादी भाषा अधिक समजत असली तर फारसं कुठं अडत नाही, पण ती येत नसली म्हणजे किती पंचाईत होते हे प्रवासाची हौस असणाऱ्यांनाच समजेल!

'नेता'नं डॅडींच्याविषयी अग्रलेख लिहिल्यानंतर पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रांनीही डॅडींच्या

निधनाची वार्ता प्रसिद्ध केली. डॅडींच्या ओळखीचे असंख्य लोक होते, त्यांना ती वार्ता समजणं त्यामुळं सुलभ झालं.

घरातलं वातावरण शांत होतं. अमरनं शेतावर जाऊन रहायची तयारी दर्शवली होती. त्याच्या लग्नाबाबत दूरच्या नातेवाईकांना पत्रं टाकली. आता डॅडींच्या पश्चात घराचं कर्तेपण मलाच संभाळायला हवं होतं.

अलकाचा ताठा काही कमी होत नव्हता. तिच्या चेहऱ्यावर एखादीदेखील स्मिताची छटा मला दिसत नव्हती. त्यात माझ्याविषयी तिरस्कार म्हणावा तर तोही नव्हता. ती माझ्याशी त्रयस्थासारखी वागायची. बघून न बघितल्यासारखं करणं, मी असेन त्या ठिकाणी कटाक्षानं येण्याचं टाळणं! ओळख नसल्यासारखं तिचं ते वागणं पाहून मी विचार केला, हिला मन, भावना, काही आहे की नाही? वर्ष सव्वा वर्ष होत आलं मी घर सोडून, अजूनही माझ्याबद्दल हिच्या मनात अढी?... उल्का हिच्यापेक्षा तऱ्हेवाईक; पण माझ्याकडे पहाताना तिच्या नजरेत मला केवढी स्निग्धता जाणवायची? मध्यंतरी व्यसनाधीन झाली होती तो काळ सोडला तर उल्कानं खरोखर माझ्या जीवनप्रवाहाला एक प्रकारचा संथपणा दिला होता. ती माझ्या बेलगाम वृत्तीवर टीका करायची, रागवायची; पण रात्री मी तिच्याजवळ आलो की? मला कुशीत घेत म्हणाची, "समर, असं आयुष्य किती दिवस जगणार? आयुष्यात काहीतरी चाकोरी हवी रे, मीदेखील नाही का बदलले? तुला यापुढं स्वत:वर काही नियम, संयम लादून घ्यायला हवेत!" मी म्हणायचा, "चाललंय ना! चालतंय तोपर्यंत असंच चालू द्या. उद्याचं उद्या!"

असं मोघम, पण जवळ जवळ निरर्थक उत्तर मी द्यायचो, ते पैशाची फिकीर नव्हती म्हणून! फ्लशचे चार डाव टाकले की हजार-दोन हजार खिशात घालून यायचो मी! पण आता ते दिवस सरले! चष्म्याचा चिंतामणी हरवला! त्यात चोरी झाली! इकडे येताना काय हाल झाले माझे! पैशासाठी दुसऱ्यांपाशी मला हात पसरावे लागले! राजकन्येनं माझी मनस्थिती ओळखून स्वत:जवळचे पैसे दिले म्हणून येऊ तरी शकलो!...

मी असा विचार करीत बसलो होतो, तोच खाली टांगा थांबल्याचा आवाज आला. गॅलरीत येऊन डोकावलो. आश्चर्य वाटलं! रॉबर्ट आणि लिलियन् टांग्यातून उतरली!

मी खाली आलो. रॉबर्टने टांगेवाल्याचे पैसे चुकते केले आणि तो आत आला.

"व्हेरी सॉरी समर! काल पेपर वाचल्यावर समजलं. तू पैसे न्यायला येशील म्हणून त्या दिवशी दिवसभर वाट पाहिली. संध्याकाळी घरी गेलो तुझ्या, तर घराला कुलूप! मग आजूबाजूला चौकशी केली. तिथल्या कोळ्याच्या बाईनं सांगितलं की, पारश्याची डॉक्टरीण आली होती तिच्याबरोबर उल्का गेली! बांद्र्यात पारशाची डॉक्टरीण म्हटल्यावर चोक्सीबाई आठवली. तिच्या हॉस्पिटलमधे गेलो, तिथं उल्का भेटली. तिनंच सांगितलं की, तुझ्या डॅडींची प्रकृती बरी नाही; म्हणून तू इकडे आलायस! काल पेपरमधे वाचल्यानंतर लिलियन म्हणाली, "भेटूनच येऊ!"

"व्हेरी काइंड ऑफ यू रॉबर्ट! लिलियन, आत ये, तुला माझ्या आईची ओळख करून देतो!" लिलियन सँडल्स बाहेर काढून ठेवून आत आली. मी आईला म्हणालो, "आई, मी बांद्र्याला जिथं रहातो तिथं ही असते! हिच्या नवऱ्याचं घड्याळदुरुस्तीचं दुकान आहे वरळी नाक्याजवळ!"

मार्टिन पतीपत्नी खिश्चन, पण आमच्या घरात जातीभेद मानण्यात येत नसे. डॅडी आपल्याकडे आलेल्या उच्चवर्णीय वकिलांना ज्या कपबशातून चहा द्यायचे, त्याच कपबशातून एखाद्या हरिजन पक्षकाराला चहा मिळे. माणसामाणसांत फरक करणाऱ्यांच्या मेंदूत काहीतरी बिघाड असतो असं डॅडी विनोदानं म्हणायचे. आईनंही कधी जातीभेद मानला नव्हता.

गल्लीतल्या मुस्लिम समाजाच्या कित्येक बायका आईकडे यायच्या. त्यांच्या घरगुती अडचणीत तिचा सल्ला विचारायच्या. सल्ला देणं तिच्या कुवतीबाहेर असलं किंवा प्रकरण काहीसं गुंतागुंतीचं असलं तर आई म्हणायची, 'बू ऽ तू वकिलसाहेबांना विचार!' आणि स्वत: त्यांना घेऊन डॅडींच्याकडे जायची! अशा आईच्या मार्फत सल्लामसलतीसाठी येणाऱ्या बायकांच्याकडून फी मिळत नसे, पण म्हणून काही डॅडी कधी तक्रार करीत नसत!

डॅडींच्या अंत्ययात्रेत बरेच हरिजन आणि मुस्लिम दिसले ते या कारणामुळं!

लिलियनला अलकानं पाह्यलं. माझी अपेक्षा होती की, ती लिलियनशी मनमोकळेपणानं बोलेल. तिला तिसऱ्या मजल्यावर घेऊन जाईल. पण व्यर्थ! या घरात येणाऱ्याजाणाऱ्या माणसांशी आपल्याला काहीच कर्तव्य नाही, अशा आविर्भावात ती वावरत होती.

लिलियनकडून आईनं उल्काबद्दल बरीच माहिती मिळवली असावी. अलका हायस्कूलला गेल्यानंतर त्या दोघी बराच वेळ दार बंद करून बोलत होत्या. मी आणि रॉबर्ट भवानीमंदिराकडून एक चक्कर टाकून आलो. येताना रॉबर्ट म्हणाला,-

"समर, तुझ्या आयुष्याचं हे त्रांगडं कधी सुटणार रे?"

"कसलं त्रांगडं?"

"ही अलका, तुझी लग्नाची बायको इथं. तिथं मुंबईत उल्का, तिच्याशीही लग्न केलंस! कुमारी मरून गेली, पण अजून ती राजकुमारी तुझा पिच्छा काही सोडत नाही! हे त्रागडं नव्हे तर काय?"

"चालायचंच! रॉबर्ट, मी कशाचाच आजपर्यंत सीरिअसली विचार केलेला नाही! माझ्या स्वभावातच ते नाही. पण एक मात्र जाणवतं, लग्नाच्या बायका सोडल्या तर बाकीच्या बायकांच्या सहवासांतच मला सुख मिळतं, मनमोकळेपणानं मी त्यांच्याशी वागू शकतो! उल्कानं लग्नाचा आग्रह धरला नसता तर तिच्याशीसुद्धा...!"

"मॅड आहेस! अरे, आणखी चारपाच महिन्यांनी ती बाळंत होईल. बाप होशील तू? आहेस कुठं?"

"नसती जबाबदारी अंगावर येतेय्, गड्या!"

"नसती? हॅट्! अरे, मूल झालं की माणसाचं प्रारब्ध पालटतं! बघ, तुझ्या आयुष्याला कसं निराळं वळण लागेल ते!"

"पण मला नको वाटतं ते!"

"ते आता काय तुझ्या हातांत आहे थोडंच? तुझं काय झालंय सांगू!"

"काय?"

"तुला बायकांना भुलवायचं ते शास्त्र जमून गेलंय! कुणाला दीदी तर कुणाला ताई म्हणत अगदी सरळ स्वयंपाकघरापर्यंत वावरतोस! शिवाय प्रत्येक बाईचा 'वीक पॉइंट' कोणता हे तू अचूक ओळखतोस. त्यांना सहानुभूती दाखवतोस आणि त्यांना जिंकतोस! मग त्या तुझ्याजवळ मन मोकळं करतात, वेळीप्रसंगी सगळंच तुझ्याजवळ 'मोकळं' करतात. तुला त्या तसल्या मोकाट जीवनाची लागलीय चटक! म्हणून तुला लग्न, मुलं ही बंधनं वाटतात. पण शेवटी आयुष्याच्या उत्तरार्धात लग्नाची बायको, अन् मुलंच साथ देतात! वाऱ्यावर भेटलेल्या वाऱ्यावरच निघून गेलेल्या असतात!"

रॉबर्टनं माझं केलेलं निरीक्षण बिलकुल अतिरंजित नव्हतं! विलासच्या घरी पुण्यात राह्यल्यापासून माझा उच्चस्तरातील असंख्य बायापोरींशी परिचय झाला होता. त्यात अगदी नुकत्या वयात आलेल्या पोरीपासून ते अगदी पन्नाशी उलटलेल्या स्त्रियादेखील होत्या. माझी

एकदा ओळख झाल्यावर त्यांना माझ्या सहवासात वावरणं बरं वाटायचं! मी फार मनमोकळा, दिलदार माणूस आहे, असं त्यांना वाटायचं! अन् तिथंच त्या फसायच्या! मी मात्र एकाही बाईला फसवलेलं नाही पैशाच्या बाबतीत! कुमारीला जर कात्री लावायचं मनात आणलं असतं तर अक्षरश: लाखभर रुपये तरी सहज मिळवले असते! आता राजकन्या माझ्या अर्ध्या वचनात आलीय, तिला लुबाडण्यासारखं काही शिल्लक नाही; पण मला चुकूनही तसं वाटत नाही! निदान आजपर्यंत तरी तसं वाटलेलं नाही! पुढं काय होणार आहे, ते मी आता काही सांगू शकत नाही. माणसाचं भवितव्य हा एक अजब जादुगार आहे. आपल्या पोतडीतून काय बाहेर काढेल त्याचा अंदाजच करता येणार नाही!....

रॉबर्ट आणि लिलियन दोन दिवस राहून मुंबईला परतली. जाताना मी त्यांना उल्काची देखभाल करायला सांगायचं विसरलो नाही. पण मी जरी सांगितलं नसतं तरी त्या उभयतांनी ती केलीच असती! माझ्या गुणदोषांसकट त्या दोघांनी आता मला स्वीकारलं होतं! भांडणतंटे होऊन प्रस्थापित झालेली मैत्री चिरकाल टिकते असं म्हणतात! तसंच आमच्या मैत्रीच्या बाबतीत घडलं होतं.

अमरचं लग्न असं लगेच ठरणार नव्हतं. अन् मला इथं तोपर्यंत रहाणं शक्य नव्हतं! उल्काची ओढ लागून राह्यली होती. आईला मी म्हणालो, "मुलगी पहायला जाण्याआधी फोटो मागवून घे. बरीच कल्पना येते. फोटो पसंत पडल्यानंतर प्रत्यक्ष पहायला जाऊ. उगाच कोणीही सुचवतं म्हणून मुलगी पहायला जाणं मला पसंत नाही."

"असं करतोस?"

"कसं?"

"इथून जवळच रजपूतवाडी आहे. तिथं रामनारायण भालेकर राहतात. त्यांची एक लग्नाची मुलगी आहे. मी एकदा पाह्यलीय तू आणि अमर एकदा पाहून या तिला. पसंत पडली तर ठरवूनच टाकू! तू जायचास मुंबईला, मी बाईमाणूस काय करणार?"

"ठीक आहे, उद्याच जातो अमरला घेऊन!"

अमर माझ्यासारखाच उंच आणि रुंद छातीचा होता. चेहरा माझ्यापेक्षा आकर्षक होता. माझा भाऊ म्हणून मी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचं गुणगान करतो असं नाही, तर तो दाराच्या पायरीवर पंजाबी ढंगाचा मलमली कुडता आणि लुंगी लावून उभा राह्यला की शाळेला जाणाऱ्या पोरी आणि कॉलेजकन्या त्याच्याकडे तिरके डोळे करून बघितल्याशिवाय पुढे जात नसत. हात पाय गोरे आणि सणसणीत एखाद्या रोहिल्यासारखा दिसायचा तो!

रजपूतवाडी भवानीनगरपासून दहा मैलांवर होती. भवानीनगरच्या थोरल्या महाराजांना साठमारीचा छंद होता. ही साठमारी म्हणजे जमिनीत खोल असा प्रचंड तट बांधायचा. एक फर्लांग लांबीचा अन् एक दीड फर्लांग रुंद असा. जागोजागी छोटे बुरुज पक्क्या काळ्या दगडांनी बांधलेले होते. पिसाळलेला हत्ती या साठमारीत सोडायचा अणि त्याला मागच्या बाजूनं भाल्यानं टोचून चिडवायचं. अगोदरच हत्ती पिसाळलेला असे, त्यांत माणसांनी मागच्या बाजूनं भाल्यानं डिवचल्यानंतर तो गर्रकन् वळून चीत्कारत माणसाच्या अंगावर धावत जायचा, अन् त्या वेळी भालेकऱ्यानं चपळाईनं बुरुजाच्या छोट्या खिंडीतून आत घुसायचं! असे पाचसहा भालेकरी असत आणि त्या उन्मत्त हत्तीला असा टोचून टोचून बेजार करत, शेवटी माणूस टोचून गेला तरी हत्ती जागचा हलत नसे. या वेळी तो 'गेम' संपला असं समजायचं. असा हा साठमारीचा खेळ पहायला जितका रोमहर्षक तितकाच धोक्याचा. भालेकऱ्याला चटकन बुरुजाची िंखड गाठता आली नाही तर क्रुद्ध झालेला गजराज भालेकऱ्याला सोंडेत धरून खाली आदळत असे आणि त्यावर आपला भला मोठा झाडाच्या बुंध्यासारखा पाय ठेवून

चिरडत असे. हे भालेकरी विशेष शूर असत. त्यांना भवानीनगरच्या महाराजांनी जमिनी बहाल केल्या होत्या. रामनारायण हे त्या भालेकरांपैकीच! आमच्या ज्ञातीत ते मोडत असल्याने मी अमरसाठी त्यांची मुलगी पहायला गेलो.

मुलगी खरोखरच सुस्वरूप होती. समाधानाची गोष्ट म्हणजे फार शिकलेली नव्हती! मुलींच्या शिक्षणाबद्दल माझ्या मनांत आकस नव्हता, पण अलका इतकी शिकून, सुस्वरूप असून तिनं जे आपल्या वृत्तीचं प्रदर्शन केलं होतं त्यामुळं शिकलेल्या पोरींच्याविषयी माझ्या मनांत एक प्रकारची अढी निर्माण झाली होती खरी! दुधानं तोंड पोळलं म्हणून ताक फुंकून पिण्यासारखाच प्रकार होता तो माझा!

मुलीचं नाव होतं शरावती! शरावती मला खरोखरच आवडली. अमरलाही ती आवडली असल्याचं त्याच्या लाजण्यावरून मी ओळखलं होतं. आईनं इतके दिवस ही मुलगी आपल्या मनात हेरून ठेवल्याबद्दल मला आईच्या निवडबुद्धीचं कौतुक वाटलं.

रामनारायणना मी म्हणालो, "आपण भवानीनगरला केव्हा याल?"

"येईन, पण मला जरा तुमच्याशी खासगीत एक चार शब्द बोलायचे आहेत!"

या म्हाताऱ्याने आणखीन काय खुस्पट काढलं म्हणून मी उठून बाहेर आलो. माझा हात हातात धरून रामनारायण म्हणाले,-

"समर बाबू, तुमचं घराणं मोठं. वडील कायदेपंडित होते, तलावाजवळ तुमची जमिनही मोठी आहे. तुमच्या मानानं मी अगदीच फाटका माणूस आहे! पूर्वी राजेशाही होती तेव्हा साठमारीत मोठमोठी इनामं मिळायची. महाराज एखाद्या भालेकऱ्यावर खूष झाले की हातातलं सोन्याचं कडं अंगावर टाकायचे! ते दिवस गेले आता. आम्हाला काय चारदोन एकर जमीन वाटणीला आलीय त्यावर कसंतरी पोट भरतो. तुम्ही बडी माणसं काहीतरी मोठी अपेक्षा कराल तर ती माझ्याच्याकडून पूर्ण होणार नाही! हो! हे अगोदरच सांगितलेलं बरं!"

मी हसलो आणि त्यांचा हात कुरवाळीत म्हणालो, "भालेकरकाका, तुम्ही काही चिंता करू नका. अमरला आणि मला दोघांना मुलगी पसंत आहे. शिवाय आम्ही कोणा मध्यस्थामार्फत आलेलो नाही. हे मध्यस्थ लोक लग्न जुळवतात, पण ती जुळवताना अशा काही अटी घालतात, की बहुतेक लग्नं जुळण्यापेक्षा मोडतातच! मला असल्या मध्यस्थांचा तिटकारा आहे म्हणून आम्ही सरळ तुमच्याकडे आलो. आत्ताच सांगून टाकतो की, तुम्ही मुलगी आणि नारळ द्या! लग्नाचा गाजावाजा करणं मला पसंत नाही. शिवाय आमचे वडील वारले आहेत. अत्यंत साध्या पद्धतीनं लग्न केलं जाईल! मी फारसे नातेवाईक बोलावण्याच्या भरीला पडणार नाही! हो, तुमची आम्ही फार सुखवस्तू आहोत अशी समजूत असली तर विसरून जा!"

"असं कसं होईल समरबाबू! आम्ही वकिलसाहेबांना किती वर्षं ओळखत होतो! फौजदारी खटले चालवावे तर ठाकूर वकिलांनीच! उलट तपासाला उभे राह्यले की प्रश्नांच्या भडीमारानं साक्षीदाराला थंडगार करून चिमटा लावायचे!"

"चिमटा? हा काय प्रकार?"

"पिसाळलेला हत्ती भालेकराकडून पराजित झाला की भालेकर त्याच्या मागच्या पायाला काटेरी 'चिमटा' लावत, मग हत्ती हालचाल करू शकत नसे! फौजदारी कोर्टात कित्येक साक्षीदार असे चिमटा लावलेल्या हत्तीसारखे वकिलसाहेबांना शरण येत."

रामनारायणकाकांनी डॅडींचं जे वर्णन केलं हातं ते अगदी सार्थ होतं. पण आमच्या आर्थिक स्थितीबाबत त्यांच्या मनांत एक गोड गैरसमज होता. मी कितीही प्रामणिकपणे सांगण्याचा प्रयत्न केला तरी तो त्यांचा समज निघून जाणार नव्हता.

इतक्या तातडीनं अमरचं लग्न ठरेल याची मला स्वत:लादेखील कल्पना नव्हती. पण एखाद्याचं लग्न ठरताना असंख्य अडचणी येतात तर एखाद्याचं चटकन् जमून जातं. असं घडलं खरं!

माझ्या मनांत अमरचं लग्न जितक्या साधेपणानं करायचं होतं, तितक्याच साधेपणानं झालं!

मी मुंबईला जायला मोकळा झालो. पण जाताना आई नेहमीप्रमाणं डोळे ओलावून म्हणाली, "भावाला रांगेला लावलंस, पण तुझं कसं? मी डोळे मिटण्यापूर्वी तुझं व्यवस्थित झालेलं मला पहायला मिळेल का?"

"आई, माझी काही एक चिंता करू नको! मी अगदी सुखात आहे!"

"कसलं सुख बेटा? या अलकानं थोडा समजूतदारपणा दाखवला असता तर एव्हाना माझ्या मांडीवर नातवंड खेळलं असतं!"

"तिनं ताठरपणा दाखवूनही लौकरच तो योग येणार आहे, आई! त्या वेळी मात्र मी तुला मुंबईला बोलावणार आहे हं! त्या वेळी थोडी मोठी जागा मिळते का पहायला हवंय मला!"

"हे बघ, खोपटं जरी असलं तरी मी येईन!"

आईचा निरोप घेऊन मी भवानीनगर सोडलं. मुंबापुरीच्या गर्दीत अन् कोलाहलात स्वत:ला हरवून घेण्यासाठी!

-o-o-

३३

दादर स्टेशनवर उतरून बांद्र्याला जाण्यासाठी टॅक्सी पकडण्याचा प्रयत्न करू लागलो, पण साले टॅक्सीवाले असे माजलेले, त्यांना जवळपासची गिऱ्हाईकं नको होती. आता दादर-बांद्रा हे अंतर काही थोडंथोडकं नव्हे, पण तरीही त्यांना त्याहीपेक्षा दूरचंच गिऱ्हाईक हवं! शिवाजी पार्क, माहीम, परळ इथं जाणाऱ्यांना अर्धा-अर्धा तास टॅक्सी मिळत नव्हती. पांढऱ्या डगल्याचा पोलीस टॅक्सीवाल्यांवर नजर ठेवून होता, पण टॅक्सीवाले बेटे पोलिसांचं बारसं जेवलेले!

शेवटी एकदाची मिळाली टॅक्सी! बांद्र्याला चोक्सीबाईच्या हॉस्पिटलमधे प्रथम गेलो. उल्का तिथं नव्हती. तिथली नर्स म्हणाली, तिला दोनच दिवसांपूर्वी डिसचार्ज दिला. उल्काची प्रकृती सुधारली या आनंदात मी घर गाठलं.

उल्का कॉटवर पडली होती. चेहऱ्यावर पांढरपणा दिसला. मला पहाताच तिचे डोळे भरले. ती म्हणाली,-

"समर, मी ज्या गोष्टीला भीत होते तेच झालं!"

"काय, झालं काय?"

"ॲबॉर्शन! मुलगा होता!" पुढं तिला बोलवेना.

"बॅड लक!" मी तिच्या कॉटशेजारी बसून तिचा हात हातात घेतला. मलाही खूप वाईट वाटलं. आई म्हणत होती त्याप्रमाणं पुत्रप्राप्तीनंतर कदाचित माझ्या आयुष्यात बदल घडला असताही! पण तीही शक्यता गेली! अंधश्रद्धेवर माझा फारसा विश्वास नाही. पण तरीही उल्काला मूल व्हायला हवं होतं! मनाला रुखरुख लागून राह्यली.

इतक्यात लिलियन जेवणाचा डबा घेऊन आली.

"तू कधी आलास?" लिलियननं विचारलं.

"आत्ताच!"

"समजलं इथं काय झालं ते?"

"हो! असं कसं झालं?"

"कसं नि काय? बरं, तू इतके दिवस का थांबलास?"

"अमरचं लग्न उरकून आलो. आईला आता चिंता नाही!"

"इतक्या झटपट!"

"हो! तसं पाह्यलं तर वडील वारल्यानंतर वर्षाच्या आत लग्न करावं अशी प्रथा आहे!"

"ठीक झालं!"

"रॉबर्ट कुठं आहे?"

"दुकानावर गेलाय! हं-- सांगायचं विसरले, ती राजकन्या दुकानावर येऊन रोज तुझी चौकशी करते आहे! विलासचं एक पत्र आलंय पुण्यावरून, घरी आहे!"

"बरं! पण तुला हे निरोप नंतर देता आले नसते?"

उल्काकडे पहात मी लिलियनला म्हणालो. त्यावर चटकन् तिच्या लक्षात आलं की, आपण खरंच चूक केली. उल्कासमोर राजकन्येचा नामनिर्देश करायला नको होता. शिवाय विलास आणि इंदूवहिनींचं नाव घेतलेलं उल्काला खपत नसे. पण लिलियन अनवधानानं बोलून गेली होती. विषयांतर करणं आवश्यक होतं म्हणून मी म्हणालो, "उल्काला केव्हा घरी आणलं?"

"परवा. चोक्सीबाईनं घेऊन जायला सांगितलं! बरं समर, मी जरा बाहेर जाणार आहे, तू हिला जेवायला घाल! काल हिनं एक घासदेखील खाल्ला नाही. एकसारखी रडत असते!"

"रडून काय फायदा आहे? स्वत:लाच त्रास होणार ना?"

लिलियनशी बोलतबोलत मी बाहेर आलो नि तिला विचारलं, "चोक्सीबाईला विचारलंस का, असं कशानं झालं?"

"हो विचारलं! ती म्हणाली, जेव्हा ही व्यसनाधीन झाली होती तेव्हा गर्भाशयावर परिणाम झालेला आहे. मूल पेलण्याची गर्भाशयाची क्षमता दुर्बल झाली आहे!"

"यावर उपाय?"

"उपाय आहे, पण तो दुसऱ्या प्रेग्नन्सीच्या वेळी. आता काही करता येणं शक्य नाही!"

"म्हणजे गुंतागुंतीचं प्रकरण आहे तर!"

"काय करायचं सांग?"

दोन्ही खांदे अन् गळ्यातल्या क्रॉसला स्पर्श करून लिलियन म्हणाली, "जन्मलं असतं तर इतकं 'हेल्दी' दिसलं असतं म्हणतोस मूल!"

"तू हजर होतीस त्या वेळी?"

"तर काय? रॉबर्ट सकाळी गेला होता तो सांगत आला, चोक्सीबाई म्हणते कोणीतरी जवळचं असं बाईमाणूस आज सोबतीला हवं! मग गेले!"

"बरं झालं, अशा वेळी तू तिच्यासोबत होतीस!"

"हो, आता जाते मी. तिला गरमगरम भात आणि टोमॅटो सूप आणलंय, तेवढं खायला घाल!"

"ओ के! थँक्यू लिलियन! रॉबर्टकडे जाईन म्हणतो, पण गेलो नाही तर संध्याकाळी भेटायला सांग!"

"तू आला आहेस म्हणून समजल्यावर तो येईलच!"

लिलियन गेल्यानंतर मी उल्काला जेवायला घातलं. जेवताना तिच्या डोळ्यांत एकसारखे अश्रू तरळत होते.

"ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत, त्याचं दु:ख करून काय फायदा?"

"समर, मला फार मोठं शासन घडलंय रे!"

"कसलं शासन?"

"व्यसनाधीन झाले होते म्हणूनच असं झालं!"

"जाऊ दे! आता झाल्यागेल्या गोष्टी उगाळत बसू नकोस. डॅडी गेले तेव्हा आईला असंच दु:ख झालं. पण दिवस झाल्यानंतर तिनं अमरच्या लग्नाची सूचना मांडली. सुदैवानं सारं जुळून आलं! झालेलं दु:ख विसरून पुढची वाटचाल करावी लागते, उल्का!"

"मला फक्त एकच मूल हवं रे!"

"होईल! तुझं काय वय झालंय का? आता पुन्हा मूल होईल की नाही ही शंका येण्याचं कारणच नाही तुला!"

"कुणास ठाऊक!"

ज्या स्त्रियांना मूल होत नाही त्या दु:खी असतातच; पण ज्यांना होता होता ती शक्यता नाकारली जाते त्यांचं दु:ख अधिक तीव्र! उल्काच्या बाळंतपणाच्या वेळी आईला भवानीनगरवरून बोलावून घ्यायचं ही स्वप्नं रंगवीत मी मुंबईला आलो होतो; पण ते स्वप्नच राह्यलं!

दुपारी वरळीला रॉबर्टकडे जायचं होतं; त्याआधी राजकन्येकडे एक चक्कर टाकणं आवश्यक होतं. पण खिशात पैसा नव्हता. उल्काकडून आजपर्यंत मी कधी पैसे मागितले नव्हते; पण आज मला पैसे मागणं अत्यावश्यकच होतं!

"तुझ्याकडं दहा रुपये आहेत?"

"पर्समधे बघ! आणि शाळेकडे जा. रजेची मुदत वाढवायला अर्ज द्यायला हवा! लिहून ठेवलाय बघ ड्रॉवरमधे!"

दहा रुपये आणि उल्काचा रजेचा अर्ज खिशात घालून मी घरातून बाहेर पडलो. उल्का ज्या शिक्षणसंस्थेत नोकरीला होती त्या शेठ रतनभाई धीरजी प्रशालेत मी उल्काच्या रजेचा अर्ज घेऊन गेलो.

मुख्याध्यापक ऑफिसमध्ये होते. मी त्यांना नमस्कार करून तो अर्ज दिला. त्यांनी माझ्याकडे नखशिखान्त पहात विचारलं, "आपण कोण त्यांचे?"

"मी समर ठाकूर! उल्का माझी पत्नी!"

"बसा! काय होतंय त्यांना?"

"ॲबॉर्शन झालं!"

"सॉरी! पण काय हो, त्या बा◌ईंचं मुलांना शिकवण्यात लक्ष नाही दिसत!"

"असं होणार नाही! ती फार सिन्सिअर आहे!"

"पण त्यांच्याविषयीचे रिपोर्टस बरे नाहीत! तुम्हाला ठाऊक आहे ना, शिक्षणसंस्थेत काम करणाऱ्यांचं चारित्र्य संशयातीत हवं. त्यांच्या घरच्या माणसांच्या बाबतीतदेखील काही वदंता नसाव्यात!"

"आपणाला काय म्हणायचंय ते मला समजत नाही!"

"मग आता स्पष्टच सांगतो! बसा! आमच्या शाळेत पोलीस अधिकाऱ्यांची काही मुलं आहेत, त्यांच्या पालकांकडून आम्हाला कळलं की, तुम्ही एका पोलीस इन्स्पेक्टरच्या खुनाच्या केसमधे गुंतला होता!"

"सर! उल्काला रजा द्यायची आहे की नाही?" मी काहीसा चिडून म्हणालो.

"त्यांना कायमचीच रजा द्यायची असा मंडळानं निर्णय घेतलेला आहे! आम्ही काल दुसऱ्या शिक्षिकेची नेमणूकदेखील केली!... एकदोन दिवसात मिसेस ठाकूरना एक महिन्याचा पगार आणि 'सिक्स्हस टिमनेट' झाल्याबद्दलची ऑर्डर पोस्टानं पाठवली जाईल!"

"हा अन्याय आहे!"

"न्याय-अन्याय ठरवायला हे काही कोर्ट नव्हे! आपण निघू शकता!"

माझं डोकं एकदम गरम झालं. योग्य कारण नसताना त्या शिक्षणसंस्थेनं उल्काला नोकरीवरून दूर करण्याचा घेतलेला निर्णय अन्यायकारक होता. मी तिथून तडक निघालो अन् दादरला पोहोचली. राजकन्या रॉबर्टकडे गेल्याचं लिलियननं सांगितलं होतं. मी भवानीनगरला गेल्यानंतर तिला पत्र टाकणं भाग होतं; पण डॅडींचा मृत्यू आणि नंतर अमरच्या लग्नाच्या वाटाघाटीतून मला सवडच मिळालेली नव्हती!

हिंदू कॉलनीत जिथं राजकन्या रहात होती त्या इमारतीसमोर एक अलिशान गाडी

उभी होती. त्या इमारतीत आणखी चारसहा भाडेकरू होते, तेव्हा ही गाडी कुणाकडे आली आहे याचा अंदाजच करता येण्यासारखा नव्हता. गोल जिन्यावरून मी विचार करीत चाललो असताना मला खोलीसमोर राजकन्येचं जेवण करणारी काकू उभी असलेली दिसली.

"कुठं आहेत राजे?"

"आत आहेत की! पण...."

"कोण आहे आणखी?"

"शिदोजी राजे!"

"शिदोजी राजे?"

"हो! मंत्री आहेत ते!"

"ओळखतो! ते शिंदोजी राजे? अस्सं!"

राज्यमंत्री शिदोजी राजे यांचं नाव मी ऐकून होतो; पण ते एका निराळ्या संदर्भात! बायकांचा भलता छंदिष्ट! पण तो इथं कसा पोहोचला? तो इथं आला याचा अर्थ एकच, राजकन्येला तो नादी लावल्याशिवाय रहाणार नाही!

या राजेलोकांचं एक वैशिष्ट्य असं की, त्यांना आपली एक भिन्न अशी जात आहे असं वाटत असतं. त्यांच्यात्यांच्यात कितीही मतभेद निर्माण झाले तर ते चव्हाट्यावर येऊ देणार नाहीत. यांच्या रूढी अन् परंपरादेखील आपल्या सामान्य माणसांहून भिन्न! संपत्तीसाठी आपआपसांत झगडतील, कोर्टकज्जे खेळतील, एकमेकांना विषप्रयोग करून मारण्याची कारस्थानंदेखील रचतील. पण समाजात एकमेकांसमोर आले की एकमेकांना अगदी लवून मुजरे करतील! मनात एक आणि जनात एक!... मला त्याच्याशी काय कर्तव्य आहे? ही राजकन्या ह्या स्त्रीलंपट मंत्र्याच्या नादी लागली तर सिनेमात काम करण्यानं होणार नाही, इतकी तिची बरबादी होईल म्हणून मी चिंताग्रस्त झालो.

काकूला न जुमानता मी दार ढकलून सरळ आत गेलो. चाळीस-बेचाळीस वर्षांचे शिदोजी राजे पाइप तोंडात धरून राजकन्येशी बोलत होते. दोघांत बरंच अंतर होतं. मी राजकन्येच्या खोलीत असं अचानक शिरणं मॅनर्सला सोडून होतं, याची मला जाणीव होती, पण जिथं, तिथं आलेला माणूस अत्यंत कारस्थानी अन् लफडेबाज आहे हे ठाऊक होतं, तिथं मॅनर्स पालन करायची जरूरी नाही वाटली मला.

मला पहाताच राजकन्या हसतहसत म्हणाल्या, "ओह! लूक! यू थिंक ऑफ द डेव्हिल ॲन्ड ही इज हिअर! समर, आता तुझं नाव निघायला अन् तू यायला एकच गाठ पडली!"

शिदोजी राजे खोटं खोटं हास्य करीत माझ्याकडे पहात राह्यले. आजपर्यंत मी त्यांचं फक्त नाव ऐकलं होतं. प्रत्यक्ष पहाण्याचा योग कधीच आलेला नव्हता. राजघराण्यातल्या माणसांना एक वरदान असतं. त्यांचं व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी असतं किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती लोकांनी एक असं विलक्षण वलय निर्माण करून ठेवलेलं असतं, की त्यामुळं त्यांचं व्यक्तिमत्त्व प्रभावी असल्याचा भास होतो. पण शिदोजी राजेंना बघताक्षणीच त्या गृहस्थाबद्दल मला घृणा वाटली. चपटं नाक, धूम्रपानामुळं काळे झालेले ओठ, बटबटीत डोळे आणि डोक्यावर विरळ झालेले केस, हे सर्व पहाताच हा राजघराण्यातला माणूस आहे हे सांगूनदेखील कोणाला पटलं नसतं!

"समर, तू राजेंना ओळखतोस की नाही?" नकार दर्शवीत मी शिंदोजी राजेंना नमस्कार केला.

त्यांनी आपला हातदेखील उचलला नाही. माझ्या त्यांच्याबद्दलच्या तिरस्कारात आणखी थोडी भर पडली.

"हा समर ठाकूर! भवानीनगरचा एके काळी मशहूर असा फुटबॉल प्लेअर होता. आर्मीत गेला, तिथं हॉकी खेळताना पाय दुखावला अन् तेव्हापासून याचं खेळणं संपलं!"

शिदोजी राजे लक्ष देऊन ऐकल्यासारखं करीत अधूनमधून माझ्याकडे पाहून स्मित करीत होते.

"अरे, विचारायचं राह्यलंच! तुझ्या डॅडींचं असं कसं घडलं?"

"आजारी होते बरेच दिवस!"

"व्हेरी सॉरी! राजे, यांचे वडील एक प्रसिद्ध कायदेपंडित होते."

"काय नाव होतं त्यांचं?"

"धीरजलाल ठाकूर!"

"ओह हं! आय सी! ही डाइड?"

"हो." राजकन्या किंचित गंभीर होऊन म्हणाल्या. शिंदोजी चेहऱ्यावर कोणतेही भाव व्यक्त न करता उठले. तोंडातला पाईप हातात घेत म्हणाले,-

"बरंय रत्नप्रभा. मी निघतो. तुम्ही सांगितलेलं काम होऊन जाईल! प्लीज डोंट वरी! आणखी काही गरज लागली तर मला फोन करा. मी माझ्या पी. ए. ला सांगून ठेवीन! तुमचा फोन आला की तो लागलीच कनेक्ट करील. त्याचं काय होतं, रोज हजारो फालतू माणसं मला फोन करून सतावतात, मग पी. ए. त्यांना सरळ नाहीत असं सांगून टाकतो. पण तुमचा फोन आला की तो लगेच मला कनेक्ट करून देईल! ओ के ऽ सी यू!"

शिदोजी राजे उठले, तेव्हा राजकन्याही उठून उभ्या राह्यल्या. मंत्रिमहाशय जाताना राजकन्येनं त्यांना वाकून नमस्कार केला. मलाही उठून नाईलाजानं हात जोडावे लागते होते! राजकन्या त्यांना पोहोचवायला पॅसेजपर्यंत गेल्या आणि तिथंही बोलत राह्यल्या. मी मात्र खुर्चीवर बसून दोन्ही हाताची बोटं एकमेकांत रुतवीत माझ्या मनाची अस्वस्थता घालवण्याचा यत्न करीत होतो.

बाहेरची गाडी निघून गेल्यानंतर राजकन्या आत आल्या आणि म्हणाल्या, "आता माझ्या मनासारखं झालं!"

"काय?"

"तो हरामखोर नरोन्हा, रोबो माझ्या पाया पडत इथं येतील!"

"का?"

"शिंदोजी राजेंना त्या लोकांनी मला कसं फसवलं हे मी सांगितलं तेव्हा त्यांनी त्यांच्याविरुद्ध कारवाई करायचं ठरवलं आहे! अरे, ते राज्यमंत्री आहेत!"

"काय करणार आहेत ते नरोन्हाचं?"

"त्याचा फिल्मचा कोटा बंद करतील, किंवा त्याचे निर्माण होणारे नवीन चित्रपट सेन्सॉरमधे अर्धेअधिक छाटले जातील! मला फसवतो काय नरोन्हा!"

नरोन्हावर पश्चात्तापाची पाळी येईल या कल्पनेनेच राजकन्या सुखावली होती.

"समर, शिदोजीराजे फारच सज्जन हं!"

मनात आलं होतं, म्हणावं, 'सज्जन' या शब्दाचा आजपर्यंत असा कधी अवमान झाला नसेल! पण ओठांवरचे शब्द पोटात गिळून मी म्हणालो,-

"राजे, सिनेमात काम करायची हौस जात नाही तर!"

"कशी जाईल? आज शिदोजी राजे म्हणाले की, बरेचसे प्रोड्युसर्स आणि डायरेक्टर्स त्यांच्या माहितीचे आहेत. शिदोजी राजेंनी फक्त शब्द टाकायचाच अवकाश, माझ्याकडे प्रोड्युसर्सची रीघ लागेल! हीरॉइन म्हणून काम केल्याशिवाय माझं मन कधी तृप्त होणार नाही,

समर!''

''बरं होईल तसं झालं तर!'' काहीतरी बोलायचं म्हणून मी म्हणालो.

''बरं, आज तुझा कार्यक्रम काय आहे?''

''कसला कार्यक्रम आला आहे मला? कुठंतरी नोकरी शोधायला हवी. उल्काला कामावरून काढून टाकलेलं आहे. त्यात ती आजारी आहे. तुमचे घेतलेले पैसेही फेडायला हवेत!''

''व्हॉट ए सिली बॉय!'' असं म्हणत राजकन्येनं माझा गालगुच्चा घेतला अन् त्या पुढे म्हणाल्या, 'फर्गेट इट! मला आता पैशाची कमतरता नाही पडणार!'

''का?''

''मी रावेरकरांच्याविरुद्ध वाटणीचा दावा करणार आहे. त्यांच्या संपत्तीत माझा हिस्सा आहे, आणि दावा केल्याशिवाय ते लोक तो देणार नाहीत, असं म्हणाले शिदोजी राजे!''

''ते असं म्हणाले?''

''हो! त्यांत आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे?''

''आश्चर्य वाटलं खरं!''

''आणि तुला सांगू का समर, आपल्या पाठीशी असा कोणी जबरदस्त माणूस उभा असल्याशिवाय असली कामं होत नसतात!''

''खरंच, पण तो माणूस प्रामाणिकपणे मागे उभा असावा. मागे उभं राहून 'स्टॅबिंग इन द् बॅक' करण्याच्या प्रवृत्तीचा नसावा, एवढंच!''

''काय वेड्यासारखं बोलतोस तू, समर! अरे, शिदोजी राजे केवळ राजघराण्यातले नाहीत, तर आजच्या सरकारांतदेखील त्यांचं वजन आहे! काही पात्रता असल्याशिवाय का असं मानाचं स्थान त्यांना मिळालं?''

''पॉलिटिक्स इज द् लास्ट रेझॉर्ट ऑफ द स्कॉंड्रल्स!''

''हा तुझा स्वभाव बदलून टाक तू, समर! प्रत्येकाविषयी तुला वाईट बोलायलाच आवडतं का?''

''राजे, क्षमा करा, तुमच्यापेक्षा मी हे जग फार जवळून पाह्यलंय, अन् पहातो आहे!''

''अरे, तसं असतं तर ज्याच्याविषयी काही माहिती नाही, त्यांच्याविषयी असे मानहानिकारक उद्गार काढलेच नसतेस! तुला शिदोजी राजांच्या शब्दाला किती महत्त्व आहे पहायचंय का?''

''काही नको!''

''नोकरी हवी असली तर सांग, त्यांनी एक फोन केला तरी पुरे. पहायचंय का तुला?''

''नो थँक्स! राजे, मी येतो. मला मिळतील तेव्हा तुमचे पैसे देईन. थोडा विलंब लागेल इतकंच!''

''पैशाचं कशाला वारंवार काढतोस रे? मी काय पैशाला हपापली आहे का? हे बघ, जाताना शिदोजी राजांनी हजार रुपये दिले. मी फक्त म्हणाले की मुंबईत फार महागाई वाढली आहे, तर त्यांनी हे पैसे काढून दिले!''

''महागाई वाढली असं सांगणारे उद्या एक दहावीस लोक त्यांच्याकडे घेऊन जातो, बघू कितीजणांना पैसे काढून देतात!''

''तुझं काहीतरीच असतं! अरे, माझ्याबद्दल त्यांना जवळीक वाटते तशी रस्त्यावरच्या लोकांबद्दल कशी वाटेल?''

''बरोबर बोललात! पण मंत्री म्हणून त्या खुर्चीवर बसणाऱ्याला प्रथम रस्त्यावरच्या

लोकांबद्दल जवळीक वाटायला हवी, आणि नंतर नातेवाईक, परिचित यांच्याबद्दल!''

''जाऊ दे, सोड तो विषय! तुझ्या बायकोची तब्येत काय म्हणते?''

''कुठल्या?''

''अरे, उल्काची! मी भवानीनगरच्या तुझ्या बायकोबद्दल कशाला विचारू?''

''उल्का घरी आहे. मी गावी गेलो असताना इकडे तिचं ॲबॉर्शन झालं!''

''बॅड लक! समर, माझ्याप्रमाणं तुझ्याही मागे साडेसाती आहे वाटतं!''

''कुणास ठाऊक! पण आता नोकरीशिवाय गत्यंतर नाही अशी वेळ आली आहे!''

''ए, प्लीज, माझं एक ऐक! मी शिदोजी राजांना शब्द टाकते. तुला चांगल्या फर्ममध्ये किमान हजार रुपयांची नोकरी लावून देण्याचं लागलं माझ्याकडे! ऐक माझं!''

''राजे, नियमाला अपवाद म्हणून मी तुमच्याकडे पाहतो. बाकीच्या राजघराण्यातील माणसांबाबत माझं मत फारसं अनुकूल नाही. ते कपटी, स्वार्थी, आपमतलबी आणि कारस्थानी असतात, अशी माझी खात्री झाली आहे!''

''मी नियमाला अपवाद काय?''

''हो म्हणूनच सुरुवातीला सांगितलं!''

''बरं समर, एखादे वेळेस मला रत्नापूरला जावं लागेल. डॅडींची प्रकृती बरी नाही असं पत्र आलंय!''

''आय डाऊट! मला शंका आहे! तुम्ही इथं मुंबईत स्वच्छंदी जीवन जगता आहात, म्हणून तुम्हाला तिकडे बोलावून डांबून टाकायची योजना नसेल कशावरून? कदाचित् रावेरकरांनी आपली राजघराण्याची अब्रू चव्हाट्यावर येते, म्हणून त्यांना विनंती केली नसेल कशावरून?''

''तीही शक्यता नाकारता येत नाही म्हणा! पण मग काय करावं?''

''खात्री करून घ्यायला हवी!''

''पण समज, गेले अन् ते नाटक असलं तर काय करतील?''

''घराण्याची प्रतिष्ठा जाते म्हणून जीवदेखील घ्यायला कमी करणार नाहीत!''

''दॅटस् इट! तू म्हणतोस ते काही खोटं नाही!''

''निघू मी?''

''ये. परत केव्हा येशील?''

''मला वाटतं, गरज नसताना मी येणं आणि तुम्हाला हवा नसताना सल्ला देणं काही इष्ट नाही. त्यापेक्षा तुम्हाला माझी गरज लागेल तेव्हा रॉबर्टकडे निरोप ठेवा!''

''हे काय रे? तू माझ्यापासून दूर रहायचं ठरवलेलं दिसतंय! रहा बापडा! मी कोण तुझी?''

''राजे, एके काळी तुम्ही माझे प्राण वाचवलेत, या एकाच जाणिवेनं मला तुमच्याकडे आजपर्यंत खेचून आणलेलं आहे. तुम्ही माझा अपमान केलात, माझ्या वर्तनावर टीका केलीत, माझा सल्ला मानला नाहीत, तरीही तुम्ही माझ्या प्राणदात्या आहात ही जाणीव मी विसरू शकत नाही. तुम्हाला ज्ञान, व्यवहार शिकविण्याची माझी पात्रता नाही. परंतु तुमच्याविषयी अंतर्यामी कुठंतरी प्रेमाचा ओलावा आहे म्हणून यावंसं वाटतंय् इथपर्यंत!''

राजकन्या माझ्या जवळ आल्या आणि माझा हात हातात घेत म्हणाल्या, ''मलादेखील तुझ्याविषयी तसंच काहीतरी वाटतंय. एरव्ही मला अक्कल शिकवणाऱ्यांचा फारफार राग येतो!''

मी राजकन्येचा निरोप घेऊन दादर सोडले. डोक्यात विचारचक्रं इतक्या गतीनं धावत

होती की, टिळक ब्रिज खालून जोरांत चाललेली प्रâंटियर मेलदेखील हळू चाललीय असा भास झाला.

संकटं आली की एकामागून एक येतात-पावसाळी ढगांच्यासारखी! आणि विवेक अन् विचारांचा सूर्यगोल झाकळून जातो. तसाच प्रकार मी अनुभवत होतो. उल्काचं ॲबॉर्शन झालं, नोकरी गेली, चोरी झाली, त्यात होते- नव्हते ते पैसे गेले. पैसे कमवायला साहाय्य करणारा चष्माही गेला. आता पुढं करायचं तरी काय? जगायला तर हवं?... तरी बरं, उल्काची एकटीची जबाबदारी शिरावर आहे!...

विचार करीत मी परत बांद्र्याची बस पकडली. बसनं प्रवास करणं मला आवडत नव्हतं; पण आता नाईलाजच झाला होता. सकाळी उल्काकडून दहा रुपये घ्यावे लागले. तिचीही नोकरी संपलीय. आता काय करायचं, कसं जगायचं?

बांद्र्याला आलो तेव्हा दारासमोर माणसं! पुन्हा छातीत धस्स! काय झालं म्हणून गर्दीत घुसलो. तर या वेळी घरमालकानं दोन महिन्याचं भाडं तटलं म्हणून उल्काला नको-नको ते बोलल्याचं समजलं. वाण्याची, धोब्याची बिलं तटली होती. तशांत उल्काची नोकरी गेल्याचं तिला सांगावं की नाही या संभ्रमात मी आत गेलो. ती उठून बसली होती. लिलियन तिला समजावीत होती.

मी कपाळ हातात धरून बसलो, तेव्हा उल्का म्हणाली, "या मालकाला थोडीसुद्धा माणुसकी नाही. येत्या पगाराला सारं चुकतं करते म्हणून सांगितलं तरी हातघाईवर आला हरामखोर!"

"उल्का!" मी शांतपणे म्हणालो, "त्यांना नावं ठेवू नको. आपलीच वेळ खराब आली आहे. जेव्हा हातात हजारो रुपये होते, तेव्हा पैशाचं मोल समजलेलं नव्हतं!"

"अरे, पण आता एक तारीख का लांब आहे? मी पगार झाल्यावर देईन म्हणाले!"

"तेही तू देऊ शकणार नाहीस, उल्का!"

"का नाही?"

"तुला नोकरीवरून काढून टाकलेलं आहे. एक महिन्याच्या पगारासोबत नोकरी संपल्याचीही नोटीस येईल!"

"काय, सांगतोस काय?"

"माय गॉड!"

"पण कशासाठी?"

"माझा त्या गडकरी मर्डर केसशी संबंध असावा या संशयावरून त्यांनी असा निर्णय घेतलेला आहे!"

"नॉन्सेन्स! मी विचारते त्यांना!"

"ते मूर्खपणाचं ठरेल, उल्का! एकदा त्यांनी नको म्हटल्यावर त्यांच्याशी झगडा करून तिथं राहण्यात काही प्रयोजन नाही! बरं वाटलं की दुसरीकडे पाहू!"

"पण हा अन्याय झाला!"

"ते म्हणतात न्याय-अन्याय कोर्टात! शिक्षणसंस्थेत नव्हे!"

लिलियन सारं बोलणं ऐकत होती. ती उल्काला म्हणाली, "आपल्या गल्लीतली पाचपन्नास मुलं रोज मॉंटेसरीच्या स्कूलमधे जातात, त्यांनाच जर तू इथं शिकवलंस तर?"

"माझी तयारी आहे एका पायावर! पण लिलियन, तशी घरगुती शिकवणी चालेल का?"

"न चालायला काय झालंय? नक्कीच चालेल! प्रयत्न तरी करून बघ!"

लिलियननं जो मार्ग सुचवला होता तो पडताळून पहायला हरकत नव्हती. पण जागेची अडचण जाणवणार होती.

असेच दोन महिने गेले. पावसाला सुरुवात झाली होती. उल्काची प्रकृती काहीशी सुधारली होती. दुसरी नोकरी मिळाली नव्हती. अन् मिळण्याची शक्यता दिसत नव्हती. घरगुती बालमंदिर चालवण्याची लिलियनची कल्पना चांगली होती. पण ती कार्यान्वित होण्यासाठी जागेची अडचण होती. बांद्र्याला आम्ही रहात होतो त्या जागेमागे कोळ्यांची अन् भंडाऱ्यांची घरं होती. खिश्चनांची वस्ती विशेष होती. उल्कानं बालमंदिर चालवण्याचं ठरवलं असतं तरी चालण्यासारखं होतं, पण तो योग काही लवकर जमेल असं दिसत नव्हतं. घरातले पैसे जवळजवळ संपले होते. देणेकऱ्यांनी दाराची सालं काढायला सुरुवात केली. घरात बसणंही मुष्किल होऊन गेलं. त्या दिवशी सकाळी चहा बनवायला साखरदेखील घरात नव्हती. उल्का मला म्हणाली,-

"हे असं किती दिवस चालायचं? मला काही कामधंदा मिळत नाही. निदान तू तरी थोडे हातपाय हलव? हजारबाराशे रुपये लोकांचं देणं झालेलं आहे!"

"तोच विचार करतो आहे रात्रंदिवस! पैसा मिळवायला हवा! पैसा जवळ होता तेव्हा त्याची किंमत कळत नव्हती! ती आता समजली!"

उठलो, कपडे चढवले आणि दादर गाठलं. राजकन्येकडे महिनाभर फिरकलो नव्हतो. तो शिदोजी राजे तिच्या घरी बघितल्यापासून मला तिच्याकडे जावंसं वाटत नव्हतं!

दारावर टकटक केलं. राजकन्येनंच दार उघडलं.

"हॅल्लो समर! अरे, तुझा पत्ता कुठंय?"

"इथंच!"

"फिरकला नाहीस इकडे?"

"कशाला फिरकू? मोठमोठी माणसं येतात इकडे!"

"आय नो, आय नो! पण खरं सांगू समर, इथून तिथून सगळी पुरुष जात हरामखोर!"

"ते का? शिदोजी राजेंच्यासारखा एखादा सज्जन भेटतो की!"

"समर, तुला कसं सांगू? माझा भ्रमनिरास झाला आहे रे! शिदोजी राजांची वचनं, आश्वासनं सारी खोटी ठरली. त्या गृहस्थाला हातोहात फसवता येतं! तू मागच्या वेळी अनुदार उद्गार काढलेस तेव्हा मला आवडलं नव्हतं. पण काही म्हण, तुझे मनुष्यस्वभावाचे आडाखे अगदी बिनचूक ठरतात!"

"राजे, मलादेखील अलीकडे असं वाटू लागलं की, अशी बडी धेंडं कापावीत! त्यांना पेचात पकडून पैसा उकळावा!"

"मग तसा प्रयोग करायचाच झाला तर हा शिदोजी राजे उत्तम बकरा आहे बघ! त्या नरोन्हाला इथं येऊन माझी माफी मागायला लावली अन् माझा विश्वास संपादन केला, तेव्हापासून मला अगदी रखेलीसारखं वागवताहेत! लहर लागेल तेव्हा येतात, रहातात आणि माझ्यावर उपकार केल्याचा आभास निर्माण करून जातात!"

"अस्सं? मग हरकत नाही! तुम्ही त्यांना पूर्वी वागत होता तसंच भासवत रहा. त्यांना कसं पेचात पकडायचं ते मी बघतो!"

शिदोजी राजे मूळचे राजघराण्यातले, पण राजघराण्यात आजपर्यंत असा घाणेरडा माणूस जन्मल्याचं माझ्या पहाण्यात नव्हतं! त्यात मंत्रिपद हाती आलेलं! मग काय विचारता! आधीच मर्कट तशात मद्य प्याला, अशी त्यांची अवस्था झाली होती.

खरं म्हणजे मला, शिदोजीराजांना दोष देण्याचा किंवा त्यांच्यावर टीका करण्याचा

अधिकार नव्हता. कारण बायकांची लफडी मी काय कमी केली होती? पण माझ्यात अन् त्यांच्यात एक मूलभूत फरक होता. मी स्त्रियांना भूलथापा देत नव्हतो. त्यांच्या असहाय्य स्थितीचा फायदा घेऊन त्यांच्याशी संधान बांधत नव्हतो. माझ्या सहवासांत येणाऱ्या स्त्रिया स्वखुशीनं माझ्या सहवासाची अपेक्षा बाळगत असत! सलिमानं काय केलं? कुमारीच्या बाबतीत काय घडलं? उल्का आपण होऊन माझ्या प्रेमात पडली. एवढंच कशाला, या राजकन्येला मी मनात आणलं असतं तर कुलाब्याच्या त्या हॉटेलमधे केव्हाच उपभोगलं असतं! पण त्या रात्री मी स्वतंत्र कॉटवर झोपलो. मी फक्त जवळ जायचाच अवकाश होता! त्यानंतर मी राजकन्येकडे जेव्हा जेव्हा आलो तेव्हा ती माझा हात हातात घ्यायची, कधी कधी चेष्टेनं गालगुच्चादेखील घ्यायची. पण मी मात्र कधी तिच्या मोकळेपणाचा गैरफायदा घेण्याचं मनात आणलं नव्हतं! याचं कारण एकच. मला राजकन्येनं जीवदान दिलेलं होतं, तिच्याविषयी मनात कुठंतरी आदराचं स्थान होतं. तिच्या तऱ्हेवाईकपणामुळं अगर अविचारी निर्णयामुळं त्या आदरस्थानाला धक्का बसलेला नव्हता! निदान आजपर्यंत तरी! पुढं काय होईल ते आज सांगता येणार नाही!

"राजे, शिदोजी राजे आता कधी येणार आहेत इकडे?"

"ते काही निश्चित नसतं! लहर लागली की चिठ्ठी पाठवतात आणि येतात!"

"अशा किती चिठ्ठ्या आहेत तुमच्याजवळ!"

"खूप! दहा-पंधरा तरी आहेत!"

"दोन महिन्यात दहा-पंधरा?"

"अरे, मधे ते आपल्या कॉन्स्टीट्यूअन्सीत दौऱ्यावर गेले, तेव्हा मला पत्रंदेखील पाठवलीत!"

"किती आहेत अशी पत्रं?"

"चारसहा तरी मी ठेवली आहेत!"

"बघू जरा!"

राजकन्येनं मला जी पत्रं दिली ती वाचताना वाटलं की, निर्लज्ज माणसाचा अगदी मासलेवाईक नमुना आहेत हे शिदोजी राजे. राजकन्या रत्नप्रभा हिच्याशी केलेल्या रतिक्रीडेचं वर्णन त्या पत्रातून होतं आणि त्या क्षणांची दौऱ्यावर आठवण येतेय असंही त्यात नमूद होतं!

मी ती पत्रं नीट घडी करून ठेवली आणि राजकन्येला विचारलं,

"काय वाटलं ही पत्रं वाचताना?"

राजकन्येच्या डोळ्यांत चटकन् अश्रू जमले. "समर, सांगितलं ना, पुरुष जात इतकी निमकहराम असेल याची कल्पना नव्हती! मला त्यांनी एकदा एक हजार रुपये दिले, पण त्या माणसासाठी माझे चार हजार खर्च झाले! अंगावरचे दागिनेसुद्धा विकून मी त्या माणसाची चैन पुरवली!"

"त्यांच्यासाठी खर्च झालेली पै न् पै वसूल करून घेईनच, पण आणखी दहावीस हजारांची टोपी घालतो त्यांना! तुम्ही मला फक्त साथ द्या!" मी म्हणालो.

राजकन्येच्या खोलीला जे दार होतं त्या दारावर एक व्हेंटिलेटर होता, त्या व्हेंटिलेटरला लहानसं भोक पाडून त्यात कॅमेरा बसवण्याची व्यवस्था केली. रॉबर्टकडे थर्टिफाइव्ह एम. एम. चा एक अतिशय पॉवरफुल कॅमेरा होता तो त्यात बेमालूम बसता केला आणि शिदोजी राजे राजकन्येशी प्रणय करताना मी त्यांचे फोटो टिपले. त्यातले एक संपूर्ण नग्नावस्थेतले होते. त्या दिवशी राजकन्या रत्नप्रभा आणि मी गच्चीत उभे होतो. बारीक पाऊस पडत होता. इतक्यात मंत्रिमहाशय शिदोजी राजे आले. मला राजकन्येजवळ उभा असलेला पाहून

म्हणाले,-

"तुला काही कामधंदा दिसत नाही! जेव्हा बघतो तेव्हा तू अल्सेशियन कुत्र्यासारखा इथं पडून असतोस! रत्नप्रभा, याला काही नोकरीधंदा करू देतेस की नाही?"

मला कुत्रा म्हटल्यामुळं मी जाम चिडलो होतो. मिशीवर हात फिरवून दारातून आत येत मी म्हणालो, "मिस्टर शिदोजीराव, तुम्ही मला कुत्रा म्हणालात, ठीक आहे, पण तुमच्यासारखा गाढव दुसरा कोणी नसेल!"

राजकन्या त्यावर मोठ्यानं हसली.

"हरामखोर! काय समजलास तू मला? अटक करीन आत्ताच्या आत्ता! खडी फोडायला तुरुंगात पाठवीन! तुझ्या घरादारावर गाढवाचा नांगर फिरवीन!"

"झालं बोलून?" मी खिशातले त्यांचे नग्न फोटो काढून त्यांना दाखवत म्हणालो, "तुमची खुर्ची एका क्षणात घालवायचं सामर्थ्य आहे या फोटोत! पहा ही आपली नैर्सिगक अवस्थेतली छबी!"

"रत्नप्रभा! चांडाळणी, हे काय केलंस?" शिदोजी राजे रत्नप्रभा राजेंच्या अंगावर मारायला धावले, तेव्हा मी त्यांना बकोट्याला धरून मागे खेचत म्हणालो,-

"मिस्टर शिदोजीराव, ही तुमची रखेली नव्हे अंगावर धावायला! हिच्या भोळेपणाचा आजपर्यंत तुम्ही पुरेपूर फायदा घेतलात, लुबाडलंत हिला! सिनेमात काम मिळवून द्यायचं आमिष दाखवून उपभोगलीत. आता तुम्हाला माझ्यापुढं त्या साऱ्या दुष्कृत्यांचा पाढा वाचायचा आहे! हे फोटो आणि हिला पाठवलेली स्वत:च्या हस्ताक्षरातील सारी पत्रं-चिठ्ठ्या उद्या तुमच्या संस्थानला जाऊन तुमच्या राणीसाहेबांना दाखवणार आहे! अल्सेशियन कुत्रा गुन्हेगाराची मानगूटदेखील पकडत असतो, समजलं'?"

शिदोजी राजांचा नक्शा एका मिनिटात पार उतरला. त्यांना दरदरून घाम फुटला, जवळच्या खुर्चीत बसून त्यांनी कपाळावरचा घाम टिपला. बाहेर पाऊस पडत असूनही शिदोजीरावांना घाम फुटल्याचं पाहून मला हसू येत होतं. तोंडाला रुमाल लावून रत्नप्रभा एकसारखी हसत होती.

"काय घेशील ती पत्रं आणि फोटो परत द्यायला?" आवंढा गिळत शिदोजी राजांनी विचारलं.

"दर महिन्याला दोन हजार रुपये अशी पाच वर्षं! किंवा एक लाख वीस हजार रुपये रोख!"

"हे फार होतात!"

"हे फार कमी झाले. उद्या 'मराठा' नाहीतर 'सकाळ' मधून ही पत्रं आणि फोटो छापले तर काय होईल याची कल्पना करा!"

"हात जोडतो, समर! रत्नप्रभा, त्याला सांग असं काही करू नको म्हणून!"

"तो काय माझा नोकर नाही ऐकायला! तुम्ही आहात आणि तो आहे! तुमचं तुम्ही पाहून घ्या!"

"अगं, पण माझ्याबरोबर तुझीही जाहीर बदनामी नाही का होणार?"

"आता कुठं व्हायची राह्यली आहे? तुमच्यासोबत आणखीन एकदा! मला त्यात काही वाटत नाही!"

शिदोजी राजे उठले आणि जायला निघाले, तेव्हा मी म्हणालो,

"मंत्रिपदाच्या जोरावर माझ्यावर मारेकरी घालाल; पण माझ्या जीविताला काही धोका झाला तर दुसऱ्याच दिवशी हे सर्व फोटो आणि पत्रं प्रसिद्ध होतील अशी व्यवस्था करून ठेवली

आहे मी! लक्षात असू द्या!''

-o-o-

३४

उल्काला मी जेव्हा एक हजार रुपये आणून दिले तेव्हा ती आश्चर्यानं माझ्याकडे पहात म्हणाली,—

"हे काय? एकदम इतके पैसे कुणी दिले? चोरीबिरी केलीस की काय कुठं?"

"चोरी नाही, शिरजोरी! उल्का, या जगात सरळपणानं जगणं हे पाप आहे! लाथ मारीन तिथं पाणी काढायची पात्रता हवी! गेले चार महिने नोकरीसाठी वणवण हिंडलो. दोन-अडीचशे रुपयांचीसुद्धा कोणी नोकरी देऊ केली नाही. तेव्हा ठरवलं, यापुढं आपली चाल बदलायची! हात जोडून कोणाजवळ काही मागायचं नाही, तर हात उगारून हवं ते घ्यायचं!"

हातातल्या नोटा चाळवीत उल्का म्हणाली, "तुझं डोकंबिकं फिरलंय की काय, समर? अरे, हे पैसे कुठून आणलेस? कुणी दिले तुला?"

"दिलेले नाहीत, घेतलेले आहेत!"

"कोणाकडून?"

"सत्ता आणि घराणं यांच्या जोरावर दादागिरी करणाऱ्या एका गुंडाकडून ही वसुली केली आहे!"

"मला काहीच बोध होत नाही तुझ्या बोलण्याचा!"

"तो न व्हावा हेच बरं! कोणाकोणाचे पैसे भागवायचे आहेत ते भागवून टाक. डोक्याला ताप करून घेऊ नकोस. यापुढं दरमहा एक हजार मला आणि एक हजार—"

"कोणाला?"

"असेच एका व्यक्तीला मिळणार आहेत सतत पाच वर्षं!"

"समर, तू जेव्हा जुगारात पैसे कमावत होतास तेव्हाचे दिवस आठव, फुकटचा पैसा फार काळ टिकत नाही. शिवाय असा विनाकष्ट मिळणारा पैसा आपल्यावर सूड उगवून निघून जातो!"

"तू शाळेत शिकवून मिळवत होतीस तो पैसा तरी तुला सुख देऊन गेला का? पैसा सुखही देत नाही अन् दु:खही! सुख आणि दु:ख यातलं काहीच खरं नाही! सारं मानण्यावर अवलंबून आहे. 'There is nothing good or bad--"

There is nothing happy or sad--

"But thinking makes it so,' ही म्हण आठवते ना तुला?"

"पण मला सांग ना, दरमहा एक हजार रुपये कोण देणार आहे तुला? राजकन्या?"

मी मोठ्यानं हसलो आणि म्हणालो, "तिला नवऱ्याकडून दरमहा एक हजार रुपये पोटगी मिळते. मला एक हजार रुपये देऊन ती काय उपाशी मरेल?"

"मग हे कुठले?"

"उल्का," मी अचानक गंभीर होऊन म्हणालो, "मी कोणा गरिबाला लुबाडत नसतो हे तुला ठाऊक आहे ना? जुगार खेळताना मी हातचलाखी करीत होतो; पण ती जहागीरदारांशी,

काळा पैसा अमाप असणाऱ्यांशी, सज्जन अन् सालस माणूस जुगार खेळायला येईलच कसा? तसंच याही पैशाचं आहे. मी एक मासा पकडलेला आहे. निदान पाच वर्षं तरी तो माझ्या गळातून निसटणार नाही! तू एवढी मेहेरबानी कर, मला या पैशाबद्दल फार विचारू नकोस.''

खरोखरच त्या दिवसानंतर उल्कानं मला त्या पैशाबद्दल कधी विचारलं नाही. तिलाही अत्यंत कष्टप्रद दिवस कंठावे लागले होते; देणेकऱ्यांच्याकडून मानहानी करणारे शब्द ऐकावे लागले होते. योग्य कारण नसताना शाळेतून तिला काढून टाकण्यात आल्यानंतर ती स्वत: शाळेत गेली तेव्हा स्वत: शेठ रतनजीभाईंनी तिची भेटसुद्धा घ्यायचं टाळलं. सत्य अन् न्यायप्रियता यांनादेखील एक मर्यादा असते. ज्यांना काही दिवस जगायचं आहे व दुसऱ्यांना जगवायचं आहे त्यांना या दोन्ही तत्त्वांना थोडीशी मुरड घालावी लागते. गाईच्या मागे लागलेल्या कसायाला ती निराळ्याच दिशेनं गेली असं खोटं सांगणं जसं पाप मानलं जात नाही तसंच, कुमारीसारख्या स्त्रीवर खुनाचा आरोप आल्यानंतर खोटा पुरावा सादर करून न्यायप्रियतेलाही थोडीशी मुरड घालावी लागते!

मी थोडासा 'रिलॅक्स' मूडमध्ये असताना रॉबर्ट मार्टिन आपलं मोठं पोट हलवीत आला आणि म्हणाला, ''काल संध्याकाळी तुझ्याकडे एक मद्रासी बाई आली होती. तू केव्हा भेटशील असं विचारीत होती!''

''मद्रासी बाई? ही कोण बुवा?'' मी खुर्चीवरून उठून खिडकीशी येऊन म्हणालो.

''काही कल्पना नाही; पण ती आज दुपारी तीन वाजता परत येणार आहे.''

उल्का माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पहात होती. पण मला ती मद्रासी बाई कोण आहे या अदांजच करता येईना!

''येतो मी तीन वाजता, आणि आज रात्री तू अन् लिलियन् आमच्याकडे जेवायला या!''

''का?''

''सहज!''

''येतो.'' असं म्हणून रॉबर्ट हसतहसत निघून गेला. डॅडी वारले तेव्हा मार्टिन पतिपत्नी माझं सांत्वन करायला भवानीनगरला येऊन गेली. इकडे उल्का आजारी असताना लिलियननं तिची देखभाल केली होती. तसं म्हटलं तर आम्हा दोघांना अगदी जवळचं असं वाटणारं या मुंबईत या दोघांशिवाय दुसरं कोणीच नव्हतं!

''बरं केलसं त्या दोघांना जेवायला बोलावलंस! माझ्याही मनात बऱ्याच दिवसांपासून ते होतं; पण हातात पैसा नव्हता, म्हणून गप्प होते!''

''उल्का, तुला यापुढं काही उद्योग करायची गरज पडणार नाही!''

''अरे, पण परवा त्या मिशनऱ्यानं मला चर्चमागचा हॉल बालमंदिरासाठी द्यायचं कबूल केलंय! अगदी नॉमिनल पन्नास रुपये भाडं 'पुअर एड फंडा'ला द्यायचंही मी मान्य केलं आहे! लिलियन मला मदत करणार आहे. तिच्या प्रयत्नांनीच तो चर्चमागचा हॉल मिळाला!''

''मग ठीक आहे!''

''हं, निदान तेवढा वेळ तरी चांगला जाईल!''

''ओ ऽ के! गो अहेड! बरं, आज रात्री काय बनवतेस!''

''तू सांग!''

''चिकन, करी, फ्राय फिश आणि प्लेन राइस!''

''अरे, त्या चोक्सीबाईला आणि तिच्या नवऱ्याला पण बोलवायला हवंय! माझी नोकरी गेल्याचं समजल्यानंतर तिनं फीदेखील घेतली नाही माझ्याकडून!''

"ओ ऽ के! ही दोघं आणि ती दोघं! मी बाजार आणून टाकतो अन् जातो वरळीला. कोण मद्रासीण माझी प्रतिक्षा करते आहे ते पहातो!"

दुपारचे तीन वाजले होते. पाऊस नुकताच थांबला होता. पण रस्त्यावर ओल होती. बाजूची गटारं भरून वाहत होती. मुंबईत उन्हाळा जसा वैताग आणतो तसाच पावसाळादेखील. ग्रँटरोडसारख्या 'लो लेव्हल' विभागात साचलेल्या कमरेइतक्या पाण्यातून जाण्याचा प्रसंग अनेक वेळा माझ्यावर आलेला होता. दूरच्या ठिकाणी जायचं तर टॅक्सीवाल्यांना भलताच भाव चढायचा! लोकांना नडलेलं पाहून लुबाडणाऱ्या या टॅक्सीवाल्यांचा मला कधी कधी असा राग येतो, की काही विचारू नका!

बरोबर तीन वाजून दहा मिनिटांनी गडद निळी आणि भडक लाल रंगाचे काठ असलेली साडी नेसलेली सुमारे पस्तीस वर्षांची एक दक्षिण भारतीय स्त्री टॅक्सीतून उतरली. रॉबर्टजवळ येऊन म्हणाली, "मिस्टर, ठाकुरना निरोप दिला?"

"हा काय तुमच्या समोर बसला आहे!" रॉबर्ट माझ्याकडे बोट करून म्हणाला,

"ओह! एक्सक्यूज मी! मिस्टर ठाकूर, आपण मला ओळखलं नसेल!"

"कधी पाह्यलेलं नाही मी आपल्याला!" मी दुकानाच्या बाहेर येत म्हणालो.

"मी मीनाक्षी सुंदरम!"

"मीनाक्षी सुंदरम्! हां. आलं लक्षात! कुमारीच्या मैत्रीण. कुमारीची कन्या गोल्डा तुमच्याकडेच असते ना?"

"होय, तिला ट्रीटमेंटसाठी घेऊन आले आहे!"

"कसली ट्रीटमेंट?"

"तिच्या डोळ्यांना एकसारखं पाणी येतंय! म्हैसूर-बंगलोरचे सारे डॉक्टर झाले, आता इथल्या डॉक्टरना दाखवायला आणलं आहे! शिवाय तुम्हालाही एकदा भेटावं असं बरेच दिवस मनांत होतं!"

"मिसेस सुंदरम्, मी भेटण्यासारखी व्यक्ती मुळीच नाही!"

"नाही कसं म्हणता? फर्निचर विकून आलेले वीस हजार रुपये तुम्ही ड्राफ्टनं मला पाठवलेत. अशी प्रामाणिक माणसं आजकाल जगात मिळणं दुर्मिळ आहे, मिस्टर ठाकूर!"

"खरं सांगू, माझं व्यक्तिमत्त्व हे परस्परविरोधी अशा गुणांनी युक्त आहे! माझ्यातला प्रामाणिक माणूस कोणाला दिसतो तर कोणाला मी अट्टल मवाली वाटतो. या मुंबईत म्हणाल तर माझ्याविषयी चांगलं बोलणारे लोक फारच थोडे भेटतील!"

मीनाक्षी हसून म्हणाली, "मला ती चर्चा नको आहे. तुमची थोडी मदत हवी!"

"बोला, काय मदत हवी?"

"मी गोल्डाला डॉक्टरांना दाखवायला आणलेलं आहे. माझे मिस्टर परवा यायचे आहेत, तोपर्यंत गोल्डाची प्राथमिक तपासणी आज करून घ्यायची आहे. तुम्ही इथलेच आहात, सर्व माहिती असेल तुम्हाला! तिची रक्त तपासणी, डोळ्याचे फोटो इत्यादि चिकित्सा उद्या संध्याकाळपर्यंत संपली तर बरं होईल!"

"चला!" मी टॅक्सीत जाऊन बसलो. खरं म्हणजे कुमारीच्या मुलीला, गोल्डाला पहायला मी आतूर झालो होतो.

हॉटेल वेस्ट एंड या मोठ्या हॉटेलात मीनाक्षी सुन्दरम् उतरल्या होत्या. आम्ही त्या खोलीत गेलो तेव्हा आठ वर्षाची गोल्डा दिसली. कुमारीचीच थेट प्रतिकृती, पण डोळे अन् नाक यावर दाऊदची छटा पडलेली. मी त्या मुलीला जवळ घेतली, अन् नकळत माझे डोळे ओलावले. खिशातला रुमाल काढून मी डोळे टिपले अन् मीनाक्षीला म्हणालो,-

"जगातली माणुसकी संपली अशी खूप विद्वान मंडळी ओरड करतात; पण तुमच्यासारखी माणसं बघितली की वाटतं, त्या ओरडण्यात काही तथ्य नाही! मिसेस सुंदरम्. आपण हॉस्पिटलला जाऊ."

गोल्डाला मी कोण, कुठला, माझ्या डोळ्यात पाणी का आलं, याचा काही काही पत्ता नव्हता. ती बावरल्या नजरेनं माझ्याकडे पहात होती. टॅक्सीत बसल्यावर मीनाक्षीनं मला विचारलं, "हल्ली मार्था कुठं असते?"

"गोव्याला गेलीय ती! खूप रडली जाताना! कुमारीवर नि:स्सीम प्रेम करणाऱ्यांपैकी ती एक होती."

"हां!" दीर्घ नि:श्वास सोडून मीनाक्षी म्हणाली, "आणखी थोडे दिवस जगायला हवी होती. मरायचं वय नव्हतं तिचं!"

"शिवाय मरायला सबळ कारणदेखील नव्हतं. मिसेस सुंदरम्, आपण या मुलीच्या समोर बोलतो आहोत, त्यामुळं हिच्या मनावर काही परिणाम व्हायचा नाही ना?"

"डोंट वरी! तिला मराठी समजत नाही. ती फक्त कानडी आणि इंग्लिश बोलते!"

"काय सांगता?"

"खरं तेच सांगते. शिवाय तिला कुमारी ही कोण होती याचीदेखील फारशी कल्पना नाही. ती मलाच 'आई' म्हणते!"

"वंडरफुल!"

"दोन वर्षांपूर्वी कुमारी बेंगलोरला आली होती, तेव्हा घरी आली. हिला जवळ घेतलं नि खूपखूप रडली. पण ही मला म्हणते, 'मम्मी, व्हाय आण्टी इज क्राइंग!"

"मग?" मी विचारलं.

"मग मी तिला सांगितलं, आण्टीज डॉटर इज लॉस्ट!"

"काय दैव असतं बघा एखाद्याचं?" माझा कंठ दाटून आला होता तो प्रसंग ऐकताना.

"मिस्टर ठाकूर, ही कुमारी आणि मी रत्नागिरीला एका शाळेत होतो. माझे वडील डेप्युटी कलेक्टर होते. डेप्युटी कलेक्टर सुदंरम् हे नाव अजूनही रत्नागिरीतल्या जुन्या लोकांच्या परिचयाचं आहे. पुढे आमची बदली झाली यवतमाळला. पण कुमारीचं येणं-जाणं होतं. पुढं त्या बिचारीला एका विचित्र जीवनाशी निगडित व्हावं लागलं! पण अशी मैत्रीण मला पुन्हा भेटली नाही!"

"तुमच्या मिस्टरना ती कोण होती हे कळलं होतं?"

"होय! ते समजलं तरीही त्यांनी हिला घरात घेतलं! स्वत:च्या मुलीपेक्षा हिच्यावर जास्त प्रेम आहे त्यांचं! आता पहा ना, हिच्या डोळ्यातून पाणी येतं म्हणून दक्षिणेतले सारे प्रख्यात आय स्पेशालिस्ट झाले. उपयोग होत नाही म्हणून इकडे घेऊन यायचं ठरलं! त्यांना थोडं काम होतं म्हणून मी पुढं आले!"

"गोल्डाच्या डोळ्यांतून गळणारं पाणी गालावरून खाली ओघळत होतं. ती एकसारखं ते रुमालानं टिपत होती. मला वाटू लागलं, अभागी मातेच्या पोटी जन्मल्याबद्दल एकसारखी अश्रू ढाळते आहे..."

"मिसेस सुंदरम्, या गोल्डाला त्रास असा काय होतो?"

"हे डोळ्यातून पाणी येतं; शिवाय हिला रात्रीचं दिसत नाही, तेव्हा माझे मिस्टर म्हणाले मुंबईत तज्ज्ञ डॉक्टर्स आहेत, दाखवून येऊ!"

वाडिया नावाचे एक प्रख्यात नेत्रतज्ज्ञ होते. ते रविवारी रेसला यायचे. विलासच्या डोळ्यांत एकदा धुळीचा कण गेल्याचं निमित्त झालं अन् डोळा सुजला, ब्लीडिंग व्हायला

लागलं, म्हणून त्याला डॉ. वाडियांनी ट्रीटमेंट दिली होती. मी गोल्डाला त्याच डॉक्टरांच्याकडे घेऊन जायचं ठरवलं. कुमारीच्या पश्चात तिच्या फर्निचरविक्रीतून आलेले वीस हजार रुपये मी मीनाक्षी सुंदरम्ला पाठवल्यामुळे तिच्या दृष्टीनं गोल्डाबाबत आपुलकी वाटणारा माझ्याइतका दुसरा कोणीच लायक माणूस नव्हता अन् त्यात खोटं काय होतं?

डॉ. वाडियांनी गोल्डाला अगदी बारकाईनं तपासलं आणि सांगितलं, "हे डोळ्यातून पाणी येणं थांबवता येईल; पण हिला रात्री कमी दिसतं याचाच अर्थ तिला R ाूग्हग्ूग् ेझ्ुस्aहूर्दैa हा गंभीर स्वरूपाचा नेत्रविकार असल्याची लक्षणं आहेत!"

"यावर उपाय?" मी चिंताग्रस्त होऊन विचारलं.

"यावर ऑपरेशन करावं लागतं; पण ते करणारं भारतात कोणी नाही!"

"मग कुठं आहेत?"

"या प्रकारच्या नेत्रविकारांवर ट्रीटमेंट दिली जाते ती जर्मनीत! बर्लिन आणि हिंडेनबर्ग येथे प्रख्यात आय हॉस्पिटल्स् आहेत!"

"माय गॉड! मिसेस सुंदरम्, मग काय करायचं?"

"उद्या ते येतील. आपण सगळेजण बसून चर्चा करू! जसं वय वाढत जाईल तसा हा विकार वाढत गेला, तर पुढं हिचं काय होईल?"

"बरंय डॉक्टर, उद्या हिचे डॅडी येतील; मगच काय करायचं ते ठरवू!" मी म्हणालो.

"वन् मिनिट मिस्टर ठाकूर! हा रेटिनायटीस् पिग्मेंटोझा नावाचा जो विकार आहे तो हेरेडिटरी असू शकतो! कधी कधी ऑपरेशननं तात्पुरता रिलीफ मिळतो. शिवाय जर्मनीला जाणं, तिथं उपचार करणं हे फार खर्चाचं होणार आहे, हे लक्षात असून द्या!"

"साधारण किती खर्च येईल?"

"हे पहा, या मुलीला तिकडे न्यायचं म्हणजे एक अटेंडंट पाहिजे. म्हणजे जवळजवळ दोन माणसं, दीड असली तरी दोनच समजू. मग जर्मनीला जायचा व्हिसा, पासपोर्ट, फॉरेन करन्सी या सर्व अडचणी आहेतच! शिवाय तिथं ऑपरेशनचा, औषधांचा, राहण्या-जेवणाचा खर्च आलाच! सगळे मिळून पन्नास हजारांपर्यंत खर्च येईल!"

"एवढाच?" माझ्या तोंडून सहज उद्गार बाहेर पडला. जणू काही मी खिशात लाख दोन-लाख घालून डॉक्टर वाडियांकडे गेलो होतो.

मीनाक्षी सुंदरम् मात्र डॉक्टरांच्या बोलण्यानं नाराज झाल्यासारख्या दिसल्या. गोल्डाच्या नावावर कुमारीनं पैसे ठेवले होते. परवा मी पाठवलेले वीस हजारही होते. पण एकदम पन्नास हजार खर्च करणे ही त्यांच्यासारख्या मध्यमवर्गीयांना कठीण बाब वाटत होती, अन् ते साहजिकच होतं.

बिचारी गोल्डा! आठ वर्षांची ती निष्पाप, निरागस पोर! आई हा शब्द उच्चारण्याच्या आतच आईपासून विलग झाली होती!

मीनाक्षी सुंदरम् हॉटेलात आल्याआल्या गोल्डाला जवळ घेऊन रडू लागल्या, तेव्हा मी म्हणालो, "मिसेस सुंदरम्, रडून काही फायदा नाही! आपल्याला यातून काहीतरी मार्ग काढायला हवा!"

"मला तरी काही मार्ग दिसत नाही. ही माझी पोर आंधळी झाली तर काय होईल हो हिचं!"

पोर कुणाची आणि दु:ख कोण करत होतं?

मी मीनाक्षी सुन्दरम्ला दुसऱ्या दिवशी भेटायचं आश्वासन देऊन हॉटेल वेस्ट एंड सोडलं.

संध्याकाळ टळून गेली होती. गाड्यांची ये-जा अव्याहत सुरूच होती. मी हॉटेलची इमारत सोडून सुमारे एक फर्लांगभर गेलो. माझंही डोकं विचारानं आऊट झालं होतं. गोल्डाचे किंचित् सोनेरी झाक असलेले केस, निळसर डोळे, कपाळातून उमटलेलं पिरॅमिडसारखं नाक, हे सारं डोळ्यांसमोर उभं रहात होतं. दाऊद मोहंमदची दाट छाया या मुलीच्या चेहऱ्यावर असूनही कुमारीची नाजुक काया घेऊनच ती जन्माला आली होती.

गोल्डाचा विचार करीत मी वेस्ट एंड सिनेमाजवळ आलो. इथल्या मोठ्या कापड दुकानांना, सिनेमा थिएटरला, हॉटेलला 'वेस्ट एंड' हीच उपाधी होती. तिथल्या एका बोळात फॉरेन लिकर मिळायची! आज घरी रॉबर्ट मार्टिन जेवायला येणार होता; म्हणून मलाही एक अर्धी स्कॉच विकत घ्यावीशी वाटली.

अर्धी 'वॅट' घेताना एकदोन पेग तिथंच उभ्याउभ्या मी घेतले, आणि सिगारेट शिलगावली. जायला निघतो, तोच समोर जोसेफ दिसला. हा जोसेफ हॉटेल मिल्टनमधला लाइफ लाँग मेंबर! मला पाहाताच तो थबकला.

"हॅल्लो समर! अरे, तुझा पत्ता कुठं आहे?"

"इथंच आहे की!"

"त्या दिवसानंतर तू मिल्टनवर आलाच नाहीस! पण दाऊद मोहंमदला तू फार मारलंस त्या दिवशी! आठ दिवस अंथरुणावर पडून होता. त्यानं तुझा चष्मा फोडून इन्सल्ट करायला नको होतं!"

"म्हणजे? मी केलं ते योग्य होतं असं वाटतं तुला?"

"अर्थात्! पैसे हरले म्हणून प्रतिस्पर्ध्यावर असं चिडायचं नसतं!"

"म्हणजे तुम्हा लोकांना दाऊद मोहंमदनं आपण चष्मा का फोडला हे सांगितलंच नाही?"

"नाही, का बरं, असं का विचारतोस?"

"जोसेफ, चल, एक-एक पेग स्कॉच घेऊ!"

ऐन दारूबंदीत मुंबईत दारूचा सुकाळ होता. मोठमोठे गांधीभक्त पुढारी दारूविरुद्ध ओरडत होते. अखिल भारतीय दारूबंदी करण्याच्या घोषणा देत होते. पण त्यांची अन् व्यवहारी दृष्टिकोनाची फारकत झालेली होती. दारूबंदी झाल्यानंतर दारू पिणाऱ्यांचं प्रमाण वाढलं हे ढळढळीत सत्य होतं. 'वेस्टएंड' बार हा त्याला पुरावा होता.

"चीअर्स जोसेफ!"

"चीअर्स, समर!"

"त्यावर दाऊद आला होता का?" मी विचारलं.

"हो! आजदेखील तो मिल्टनवर येणार आहे. आज त्याची पार्टी आहे!"

"कशाबद्दल?"

"त्यानं लग्न केलंय!"

"कोणाशी?"

"रिटाशी!"

"माय गॉड! दॅट ऑफुल गर्ल?"

"हा हा! दॅट टॉल स्लीम लेडी, वुइथ कम टु बेड आइज! यु रिमेंबर हर?"

"ऑफ कोर्स! पण त्या चायनीज पोरीचं काय झालं?"

"ती गेली पळून!"

"पळून, आणि मिल्टनच्या कडेकोट बंदोबस्तातून?"

"हो! चायनीज होती ती!"

"जोसेफ, दाऊद मोहंमदशी मला थोडं बोलायचंय."

"मग बोल ना? चल, आज तो येणारच आहे."

"नको! मी आलो तर मागचा राग आठवून तो माझा खिमा करील! त्यापेक्षा मी त्याच्याशी फोनवरच बोलतो; पण मला तो नंबर ठाऊक नाही रे."

"डबल फोर-सिक्स-नाइन-फोर-थ्री. पण हा नंबर एका प्रायव्हेट माणसाच्या नावावर आहे हं! डिरेक्टरीत मिल्टन हॉटेलचं नावदेखील मिळणार नाही तुला."

"माझ्या लक्षात आलं."

मी घड्याळात पाह्यलं, साडेसात वाजायला आले होते. जोसेफ आरामात पीत सिगारेटचे झुरके घेत बसला होता. त्यानं मिल्टनमधे जाऊन दाऊदला कल्पना देण्याअगोदर मला त्याच्याशी बोलायची इच्छा होती. जोसेफला आणखी एक पेग देऊन मी त्याच 'क्लॅडेस्टाइन' बार मधून डबल फोर-सिक्स-नाइन-फोर-थ्रीला रिंग फिरवली.

"हॅल्लोऽ! सॉलेभाय स्पीकिंग."

"सॉलेभाय? मी समर ठाकूर बोलतो आहे."

"अरे व्वा! क्या बात है समरभाई?"

"मला जरा दाऊदशी बोलायचं आहे! तो येणार होता असं समजलं म्हणून रिंग दिली."

"अरे भाई, वो तो अभ्भी आ गये! दाऊद भाऽऽऽय आपका फोन!" सॉलेभाय फोनवर ओरडल्याचा आवाज मला स्पष्ट ऐकू आला. एका मिनिटाच्या आत रिसीव्हरमधून शब्द आले.

"हॅल्लो! कौन बात कर रहा है?"

"मी समर ठाकूर! दाऊद, प्रथम मी तुझी माफी मागतो! त्या दिवशी मी तुझ्याशी गलत वागलो."

"अरे भाई छोडो! मी काय तुझं कमी नुकसान केलं? रागारागानं तुझा तो मौल्यवान चष्मा फोडून टाकला."

"तो चष्मा फोडलास म्हणून काही मी आंधळा झालो नाही; पण आज तुझ्या रक्तामांसाची एक निष्पाप पोर मात्र आंधळी होण्याच्या मार्गावर आहे."

"काय म्हणालास? मला काही समजलं नाही."

"मला तुझ्याशी एक अर्धा तास बोलायचंय्."

"मग ये मिल्टनवर. पण तू भितोस यायला? थांब, मीच येतो तुझ्याकडे. तू कुठून बोलतोयस?"

"वेस्ट एंड बारमधून. वेस्ट एंड टॉकीजच्या मागे बोळात आहे बघ."

"तू मला मुंबईतल्या बारचे पत्ते सांगतोस? अरे, तो वेस्ट एंड बारवाला माझ्याकडूनच स्कॉच घेत होता. तिथंच थांब, मी येतो! तुला जोसेफ भेटलेला दिसतो."

"तुला कसं ठाऊक?"

"आज मी मिल्टनवर आहे हे तुला निश्चित समजलं ते त्याच्याकडूनच! देशोदेशीचं पाणी प्यायलो मी, असं तू खेळताखेळता म्हणाला होतास ना त्या दिवशी."

"हो."

"ओ ऽ के. आय ॲम कमिंग."

दाऊद आला की तास-दोन तास आमचं बोलणं लांबणार, हे मला ठाऊक होतं. तिकडे उल्का, मार्टिन लिलियन, चोक्सीबाई, तिचा नवरा माझी वाट पहात ताटकळत राहणार, याची खात्री होती. चटकन् कल्पना सुचली. मी चोक्सीबाईला फोन लावला.

"हॅलो, डॉक्टर चोक्सी स्पीकिंग!"

"बाई, मी समर ठाकूर बोलतो आहे!"

"ओ ऽ! मिस्टर ठाकूर, फोन करण्याची काही गरज नव्हती. आम्ही साडेआठला निघणारच आहोत!"

चोक्सीबाईंचा समज झाला होता की मी तिला जेवायला यायची आठवण देण्यासाठी फोन करतो आहे, तेव्हा सर्व खुलासा करणं भाग होतं.

"बाई, मी इथं वेस्ट एंड सिनेमाजवळून बोलतो आहे. माझा एक बालपणीचा मित्र बऱ्याच वर्षांनी भेटलेला आहे. तो बेरुटला असतो. रात्री एकच्या प्लेननं तो परत चालला आहे. मी तुम्हा लोकांना जेवायला बोलावलं; पण मीच येऊ शकत नाही, याबद्दल क्षमा करा, अन् उल्काची समजूत तुम्हीच काढा! अगदी हात जोडून विनवतोय मी तुम्हाला. शिवाय मी आज का येऊ शकत नाही, हे तुम्हाला सांगितलं तर तुम्हीदेखील मला क्षमा कराल! पण उल्काची समजूत होणं कठीण आहे! प्लीज, तुम्ही जेवायला जा आणि उल्काची समजूत काढा!"

"ओ ऽ के, डोंट वरी. मी आणि रुसी जातो. लिलियन मार्टिन आणि रॉबर्ट मार्टिन यांनाही तुझी 'इनॅबिलिटी' सांगते. मग तर झालं?"

मी सुटकेचा नि:श्वास सोडला. जोसेफजळ येऊन राहिलेला ग्लास एका दमात संपवला - समाधानात!

दाऊदनं आपला नेहमीचा पोषाख केलेला नव्हता. तो क्रीम कलरच्या फ्लॅनेलच्या सुटात होता. हातात ५५५ चा गोल डबा होता. आल्याआल्या त्यानं माझ्याशी शेकहँड केलं. मला दाऊदशी काहीतरी खाजगी बोलायचं आहे, असं पाह्यल्यावर जोसेफ बाजूला निघून गेला. मी आणि दाऊद वेस्ट एंड बारच्या प्रायव्हेट रूमकडे गेलो.

"बोल! काय म्हणतोस?" टायची गाठ सैल करीत करीत दाऊदनं विचारलं.

"दाऊद, कुमारीपासून तुला जी मुलगी झाली ती आज मुंबईत आलेली आहे."

"काय?" दाऊद माझा हात घट्ट पकडून मी काहीतरी चमत्कारिक सांगतो आहे, असा चेहरा करून म्हणाला.

"तुझ्यापासून कुमारीला एक मुलगी तरी झाली होती?"

"येस्! पॅरिसमधे जन्मली."

"त्यानंतर तिचा ठावठिकाणा तुला माहीत होता?"

"मुळीच नाही. कुमारीला मी त्या मुलीला घेऊन जाईन म्हणून भीती वाटत होती; म्हणून तिनं मला ती मुलगी चार महिन्यांची झाल्यावर गेली म्हणून सांगितलं. मीही फारसा 'इंटरेस्ट' दाखवला नाही! पण ती मुलगी जिवंत आहे म्हणतोस?"

"हो."

"पण ती माझ्यापासूनच जन्मलेली कशावरून?"

"तिला तू प्रत्यक्ष बघितल्यावरच कल्पना येईल."

"असं म्हणतोस? मग चलच तर!"

आम्ही दोघे मीनाक्षी सुन्दरम् उतरलेल्या हॉटेलवर आलो. जेवण उरकून त्या झोपायच्या तयारीत होत्या. माझ्यासोबत आलेला गृहस्थ कोण आहे हे मी मिसेस सुन्दरम्ला बाजूला नेऊन सांगितल्यानंतर तिच्या चेहऱ्यावरची शंका अन् भीती मावळली.

दाऊद गोल्डाकडे टक लावून पहात राह्यला. ते भव्य गोरं कपाळ, कपाळातून उमटलेलं पिरॅमिडसारखं नाक. केसांची किंचित् सोनेरी छटा जिवणीतलं साम्य पाहून दाऊद धीमेधीमे पावलं टाकीत पुढं गेला आणि गोल्डाला उचलून छातीशी कवटाळलं. कधीही न बघितलेल्या

जन्मदात्याला पाहून गोल्डा भयभीत झाली होती.

दाऊदचे डोळे भरले होते. तो तोंडानं एकसारखं पुटपुटत होता, "माय चाइल्ड! इट्स् ऑल माईन."

गोल्डाला खाली ठेवल्यावर तो माझ्याकडे वळून म्हणाला, "समर, बोल, काय अडचण आहे?"

मी त्याला सर्व प्रकार कथन केला आणि म्हणालो, "या मिसेस सुन्दरम् आणि त्यांचे पती या दोघांनी हिला आपल्या मुलाप्रमाणं लहानाची मोठी केली. पण गेल्या सहा महिन्यांपासून तिला 'रेटिनायटिस पिग्मेंटोझा' नावाचा नेत्रविकार जडलेला आहे. आम्ही आजच इथं डॉ. वाडियांना दाखवलं हिला. त्यांनी सांगितलंय की, या विकारावर ऑपरेशन करावं लागेल, आणि ते जर्मनीत फक्त दोनच ठिकाणी होतं. एक बर्लिनमधे आणि दुसरं हिंडेनबर्गला."

"अच्छा. मी काय करायला हवं ते सांग? मी समक्ष आलो असतो; पण गेल्या महिन्यात माझा एक कार्गो जर्मन पोलिसांनी पकडलेला आहे. ते माझ्यावर टपून बसलेले आहेत. मी गेलो की अटक झालीच असं समज. त्यापेक्षा तुम्ही जा. मी खर्चाची व्यवस्था करतो. तिथं खर्चाला तुम्हाला जर्मन करन्सी मिळेल याचीही तजवीज करतो. बर्लिनला माझा एक दोस्त आहे. 'अडॉल्फ जेराल्ड, थर्टी नाइन, नाझी चेंबर्स, हा पत्ता लक्षात ठेव."

मी पटकन् कागदावर ते नाव, पत्ता टिपून घेतला.

"समर, मी आज रात्रीच तुमच्या जाण्यायेण्याच्या खर्चाची व्यवस्था करतो. तू फक्त पासपोर्ट-व्हिसा वगैरे मिळवण्याची खटपट कर. ओळख असली तर ही कामं झटपट होतात."

"उद्या उठल्याउठल्या मी त्या कामालाच लागतो, दाऊद." मी म्हणालो,-

दाऊदनं जाताना गोल्डाच्या गालाचं चुंबन घेतलं आणि खिशांत हात घालून जितक्या नोटा होत्या तितक्या बाहेर काढून गोल्डाला खाऊसाठी ते पैसे दिले. लिफ्टमधून त्याला पोहोचवायला मी खाली आलो तेव्हा तो माझा हात हातात घट्ट पकडून म्हणाला, "समर, पोरीचे डोळे बरे झाले पाहिजेत, पैशाची विवंचना मुळीसुद्धा करू नकोस."

"दाऊद, माझ्याकडून फार मोठा अपराध झाला. मी तुझ्यावर हल्ला करायला नको होता."

"अरे, छोड दे यार. मी तुझा 'फ्लश' नाही कायमचा बंद केला? कुठून मिळवला होतास तो चष्मा?"

"असाच एका मित्रानं दिला होता."

"जगात कोणताही माणूस अशी वस्तू आपल्या मित्राला देत नसतो. त्याचा खून तरी करायला हवा किंवा तो चोरून तरी आणायला हवा."

"पण तू हॉटेल मिल्टनमधे त्या चष्म्याचं गूढ नाही बोललास?"

"कशाला बोलू. मला कधी काळी तसला चष्मा मिळालाच तर मिल्टनमध्ये मला खेळता आलं नसतं मग?" हसतहसत दाऊद म्हणाला.

"पण खरं सांगू, मी त्या दिवसापासून हॉटेल मिल्टनकडे फिरकलोसुद्धा नाही. वाटायचं, तू त्यांना त्या चष्म्याचं रहस्य जर सांगितलं असेल तर ते लोक मला फसवल्याबद्दल पिटून काढतील."

दाऊद मोठ्यानं हसला आणि म्हणाला, "लोकांना फसवणारे नेहमीच असा भ्याडपणा करतात, माझं तरी काय आहे? एवढा कोट्यवधी रुपयांचा धंदा करतो दरसाल; पण सतत भीती वाटत असते. आपण भ्याड नाही हे नाटक करत असतो आपण!"

गाडीजवळ येताच दाऊद माझ्या पाठीवर हात ठेवून म्हणाला, "उद्या इथं बरोबर अकराला येईन. तोवर तू पासपोर्टच्या तयारीला लाग."

दाऊद निघून गेल्यानंतर मी परत वेस्ट एंड हॉटेलमधे आलो. मीनाक्षी सुंदरम् मला पाहून म्हणाल्या, "अगदी वेळेवर मिळाला हा माणूस तुम्हाला!"

"त्याचं काय आहे मिसेस सुंदरम्, या मुलीचं भाग्य मोठं! तुम्ही उभयतांनी इथं तिला बरी करण्याची शिकस्त केली असती; पण ज्या ठिकाणी इलाज व्हायला हवा तिथं करणं थोडं कठीण झालं असतं एवढंच!"

"जवळजवळ अशक्य! कठीण कसं म्हणता? कुमारीनं हिच्या नावावर जे पैसे ठेवले आहेत ते ही अठरा वर्षांची झाल्याशिवाय काढता येत नाहीत. तुम्ही पाठवलेल्या वीस हजारात काय होणार होतं? बरं, एकदा डोळे कायमचे गेले म्हणजे सारं आयुष्यच बरबाद व्हायचं!"

"मी येतो उद्या. ठीक अकरा वाजता!"

घरी बांद्र्याला पोहोचलो तेव्हा रात्रीचा दीड वाजला होता. दार उघडायला आलेल्या उल्कानं माझ्या तोंडाचा वास घेतला.

"शेण खायला कुठं गेला होतास?"

"मी जेवलेलो नाही. काम संपलं आणि तसाच इकडे आलो आहे. काय शिल्लक असलं तर वाढ!"

"काही शिल्लक नाही. पाणी पी एक ग्लासभर आणि झोप. म्हणे उपाशी आहे. दारू प्यायला देणाऱ्यानं खायला नाही का दिलं?"

मी एक ग्लास पाणी पिऊन झोपलो. उपाशी होतो, पण हातून जे घडलं होतं त्यामुळं पोट मात्र भरलं होतं.

-o-o-

३५

पासपोर्ट, व्हिसा-फॉरेन एक्सचेंज! सकाळी उठल्या उठल्या लक्षात आलं, वशिला लावल्याशिवाय ही कामं झटपट होणार नाहीत. पण आज अकरा वाजता गोल्डासोबत जर्मनीला कोणी जायचं हे ठरवायचं होतं. दाऊदच्या पैशावर गोल्डाच्या उपचारासाठी मला फुकट जायला मिळालं असतं तर स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीही साधणार होतं, पण मला जाता येणं शक्य नव्हतं. गोल्डासोबत सुंदरम् किंवा मीनाक्षी यांनी जाणंच अगत्याचं होतं.

सुंदरम् सकाळीच आले. मी हॉटेलवर गेलो तेव्हा त्या दोघांच्या वाटाघाटी झाल्या होत्या. सुंदरम् मला म्हणाले, "वेल मिस्टर ठाकूर, तुमचे अनंत उपकार झाले आमच्यावर!"

"माझे कसले उपकार झाले!" त्यांचा हात हातात घेत मी म्हणालो.

"अहो, मुलगी कोणाची, लहानाची मोठी केली कोणी? आणि तिला उपचार करण्यासाठी धडपडतो कोण? तुम्हाला काय गरज होती?"

"साहेब, मी तिच्या आईचं अन्न खाल्लं आहे आणि तसं म्हणाल तर त्या दिवशी तिच्या घरी नव्हतो; म्हणूनच तिनं आत्मघात करून घेतला अशी माझी समजूत आहे. मरेपर्यंत मला ती खंत जाळत रहाणार! या दाऊदनं आर्थिक सहाय्य दिलं नसतं तरी मी इकडची दुनिया तिकडे करून हिला जर्मनीला न्यायची व्यवस्था केली असती."

सुंदरम् यांच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेचे भाव उमटले. अकराच्या टोल्याला दाऊद आला. तो पत्ते खेळायला येताना त्याच्या हातात असायची तसली ब्रीफकेस होती. मी त्याची अन् मिस्टर सुंदरम्ची ओळख करून दिली.

गोल्डा निळा फुलाफुलांचा फ्रॉक घालून बसली होती. तिला आपल्यासारखाच दिसणारा हा उंच माणूस कोण आहे हे समजत नव्हतं. माझ्याकडेही ती परकेपणानंच पहात होती.

दाऊदनं वचन दिल्याप्रमाणं पन्नास हजार रुपये सुंदरम्कडे देऊन म्हटलं, "कदाचित् तुम्हा लोकांना वाटेल, की हा माणूस मूर्ख आहे. एका वेश्येपासून झालेल्या मुलीसाठी इतका पैसा खर्च करतो आहे, तेव्हा याचं डोकं ठिकाणावर नसेल."

"पण माझी खात्री आहे, पॅरिसमधे कुमारीनं जिला जन्म दिला ती हीच मुलगी आहे. एक हजार मुलीत जरी हिला तुम्ही उभी केलीत तरी मी हिला ओळखून काढलं असतं! लहानपणी मी अगदी अस्सा दिसत होतो!"

दाऊद स्मगलर होता; आंतरराष्ट्रीय गुन्हेगार होता. फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी इथं ज्या वस्तू आयात करण्यावर बंदी होती, त्या तो तिथं निर्यात करीत होता. भारतात सोनं आणि मद्य आणायला बंदी होती तर हा महिना दोन महिन्यातून मद्य आणि सोनं भारतात आणत होता. अफाट पैसा कमवत होता. सुंदरसुंदर पोरी उपभोगत होता. मिल्टनसारख्या हॉटेलात जुगार खेळत होता, दारू पीत होता; पण इतकं असूनही त्याच्यातला 'माणूस' जागृत होता. कुमारी एक वेश्या, तिला याच्यापासून दिवस गेल्यानंतर हा तिला फ्रान्सला घेऊन जातो, तिथंच तिची

डिलिव्हरी होते, अन् ती परत भारतात येते, नंतर याचा-तिचा संबंध तुटतो. मुंबईचं पोलीसखातं आणि त्यात गडकऱ्यांसारख्या कडवा पोलीस अधिकारी दाऊदला आपल्या जाळ्यात पकडण्यासाठी टपून बसलेला असतो. पण दुर्दैवानं त्याचाच खून होतो. या साऱ्या घटना सत्य होत्या, हे कोणाला सहजासहजी सांगून पटण्यासारखं नव्हतं. पण हे सत्य होतं. यात अणूरेणूइतकीही अतिशयोक्ती नव्हती. मानवी जीवनाचं हे विलक्षण नाट्य मी अगदी जवळ उभा राहून पहात होतो आणि हे असं घडलं तरी कसं याचं वारंवार आश्चर्य करीत होतो.

दाऊद पैसे देऊन जाताना मला म्हणाला, "तुझी ओळख किंवा वशिला लागेल का पासपोर्ट व्हिसासाठी?"

"हो. मी आत्ताच सुंदरम्ना घेऊन जातो!"

"तिकडे गेल्यानंतर मात्र ॲडॉल्फ जेराल्डला भेटा, फार चांगला माणूस आहे. वाट्टेल ती मदत करील! शिवाय जर्मन पोलिसांची गस्त थोडीशी शिथिल झालीय असं मला कळलं तर मीदेखील एखादी धावती भेट देऊन जाईन! पण त्या वेळी मी आज जसा दिसतो तसा मात्र दिसणार नाही हं! संपूर्ण वेशांतर आणि मेकअप् केलेलं असेल!"

जाताना गोल्डाला जवळ घेऊन दाऊद म्हणाला, "वुइश यू ए हॅपी जर्नी ॲण्ड स्पीडी रिकव्हरी माय बिलव्हड चाइल्ड! थँक यू मिस्टर ॲण्ड मिसेस सुंदरम्! सी यू, समर!"

दाऊद निघून गेल्यानंतर आम्ही तिघे एकमेकांकडे बराच वेळ पहात राहिलो.

"धिस इज समथिंग फंटॅस्टिक, मिस्टर ठाकूर! आय स्टील फील दॅट आय ॲम इन् ड्रीम!" सुंदरम् म्हणाले.

मी हसलो आणि म्हणालो, "मला देखील हे सर्व स्वप्नमय भासतंय; पण मला एक अगदी अशीच सत्य घटना घडल्याचं स्मरतं आहे!"

"कोणती?" सुन्दरम्नी चिरुट पेटवला.

"आठ-दहा वर्षांपूर्वी याच मुंबईत कुलाब्याच्या चर्च आवारामधे एक तरुण स्त्री मृतावस्थेत आढळली. एक लहान मुलगी त्या मृत स्त्रीचे स्तन चोखत होती. चर्चच्या मागे रहाणारे रेव्हरंड सॅम्युअल फिरायला बाहेर पडताना त्यांनी ते दृश्य पाह्यलं आणि पोलिसांना खबर दिली. पोलीस आले. पंचनामा झाला. ती लहान मुलगी अवघी एक वर्षाची होती; पण अतिशय गोंडस होती. गोरी गोरी पान. हिरवे डोळे, लाल-गुलाबी गाल, सोनेरी केस! पोलिसांना वाटलं, की ही मृत स्त्री दाई असेल किंवा एखाद्या अँग्लोइंडियन माणसाच्या घरात नोकरीला असलेली 'मेडसर्व्हंट' असेल. मुलीला अनाथबालकाश्रमांत पाठवलं अन् त्या स्त्रीचं पोस्टमॉर्टम केलं. ती स्त्री रंगाने सावळी, नाकांत चमकी असलेली, कुरळ्या केसांची अशी साधारण दक्षिण भारतीय दिसत होती. प्रेताचे अन् मुलीचे फोटो घेऊन सर्व वृत्तपत्रातून प्रसिद्ध केले व लोकांना फोटोतल्या व्यक्तीविषयी माहिती असेल तर पोलिसांशी संपर्क साधण्याविषयी विनंतीही केली. पण सहा महिने झाले तरी त्या स्त्रीच्या अगर त्या लहान मुलीच्याबद्दल माहिती देणारं असं कोणीच पुढं आलं नाही."

"मग काय झालं?" मीनाक्षीनं अधीर होऊन विचारलं.

"मग काय, पोलिसांना वाटलं, या तपासात काहीच निष्पन्न होणार नाही!"

"ह्या स्त्रीला मृत्यू कशानं आला होता?" सुंदरमनी विचारलं.

"हां, ते सांगायचंच विसरलो." मृत्यूचं कारण डॉक्टरनी असं दिलं होतं की, "न्युमोनिया आणि मालन्यूट्रिशनमुळे मृत्यू आलेला आहे."

"आय सी! बरं, मग पुढं काय झालं?"

"पुढे तपास करणारे फौजदार कुलाब्याच्या एका वेश्यागृहात तक्रार अर्जाच्या

चौकशीसाठी गेले होते. कुलाब्याला त्या वेळी अगदी पॉश अशी अनेक 'ब्रोथेल्स' होती. शांती नावाची एक अतिशय हुशार आणि सुस्वभावी वेश्या होती. तिला फौजदारांनी विचारलं, 'शांती, चर्चच्या आवारात जी दाक्षिणात्य बाई मेलेली आढळली, तिच्याबद्दल काहीच पत्ता लागत नाही.''

त्यावर शांतीनं विचारलं की तिच्या अंगावर काय काय मिळालं?

''अंगावर फुटका मणी देखील नव्हता. पण कमरेला साडीत खोचलेल्या दहा-वीस चिठ्ठ्या मिळाल्या, त्यावर IOU-100, J. IOU-400 james IOU-350 james से असं लिहिलेलं होतं. अशा एकूण दहा-पंधरा लहान लहान चिठ्ठ्या मिळाल्या!''

'करेक्ट!' शांती हसून म्हणाली, ''आता लिंक लागेल! हे पहा फौजदारसाहेब, हे जे अमेरिकन बोटीवरून खलाशी भारतात येतात तेव्हा ते खूप चैन करतात. विशेषत: कृष्णवर्णीय पोरींचं त्यांना खूप आकर्षण असतं. अशा वेळी ते जवळचे पैसे संपले तरी पोरींशी मजा मारतात आणि त्यांना IOU म्हणजे I love you अशा अर्थाच्या चिठ्ठ्या देऊन त्यावर आपली सही करतात. कोणी जेम्स असतो तर कोणी विल्यम्स असतो, तर कोणी बॉब असतो!''

''पण या चिठ्ठ्यांचा उपयोग काय?'' फौजदारांनी विचारलं.

''उपयोग? ओहे, दुसऱ्या वेळी जेव्हा ते खलाशी भारतात येतात तेव्हा अगोदर ज्या ज्या वेश्यांचे पैसे देणे असतात ते त्या वेश्यांजवळच्या चिठ्ठ्या पाहून मागचे पैसे भागवतात अन् मगच दुसऱ्या वेळी त्यांचा उपभोग घेतात.''

''माय गॉड! पण शांती IOU James हा खलाशी तुझ्या माहितीचा आहे?''

''तो कोण जेम्स आहे हे बघितल्याशिवाय मला सांगता येणार नाही; पण डॉकयार्डवर जर एखादी अमेरिकन बोट आली तर हस्ताक्षरावरून तपास लागू शकेल!''

''एवढ्या आधारावर त्या कामी फौजदारांनी तो जेम्स कोणता हे निश्चित केलं. त्या वेश्येबद्दल खूप माहिती मिळवली आणि अमेरिकेतल्या त्याच्या पत्त्यावर एक सविस्तर पत्र धाडलं. त्या पत्रात मृत वेश्येचा अन् मुलीचा फोटोही घातला. त्या पत्रात त्यांनी लिहिलं होतं,

''जेम्स, मुंबईत एक वेश्या गेले वर्षभर तुझा तपास करीत होती; पण तू ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड या देशांना हल्ली जातोस असं तिला समजलं, तेव्हा चर्चमधे जाऊन तिथल्या धर्मगुरूमार्फत तुला पत्र पाठविण्यासाठी ती मुलीला घेऊन कुलाब्याच्या चर्चमध्ये आली असता मरण पावली. त्या पत्रात त्यांनी असंही लिहिलं होतं, की त्या वेश्येला तुझ्यापासून दिवस गेल्यानंतर तिनं धंदा बंद केला होता अन् तुझ्यापासून जन्मलेली मुलगी तिला मरण्यापूर्वी तुझ्या पदरात घालायची होती.''

''मग काय झालं पुढं?'' सुंदरम् पतीपत्नींनी एकदम विचारलं.

''अहो, पत्र मिळाल्यावर आठव्या दिवशी जेम्स कुलाबा पोलीस ठाण्यावर येऊन दाखल झाला. त्या मुलीला आणवलं फौजदारांनी. मुलीला जवळ घेऊन तो धाय धाय रडला. 'इट्स माय चाइल्ड' म्हणाला आणि पुढं आठ दिवसांनी विमानानं हे मूल घेऊन स्टेटस्ला गेला!''

''काय, सांगता काय?'' सुंदरम्नं मला विचारलं.

''या हकीकतीतला शब्दन्शब्द सत्य आहे. या दाऊदच्या बाबतीत देखील त्याहून वेगळं असं काय घडलेलं आहे?''

''अगदी बरोबर! दोन्ही प्रसंग 'आयडेंटिकल' आहेत!''

''तर हे मानवी जीवन अशा नाट्यमय घटनांनी भरलेलं आहे. शुद्ध व्यवहारी जगात वावरणाऱ्यांना या घटना सत्य आहेत हे टाहो फोडून सांगितलं तरी खरं वाटणार नाही!''

"चला! संपत आलेला चिरूट ॲशट्रेमधे विझवून सुन्दरम् म्हणाले, "मिस्टर ठाकूर, या सर्व प्रकरणातून तुमची आणि दाऊदसाहेबांची ओळख ही आमच्या आयुष्यातली अत्यंत अविस्मरणीय अशी घटना समजतो आम्ही!"

"थँक यू! मग चलायचं ना पासपोर्ट - ऑफिसमध्ये?" मी.

"हो! आत्तापासूनच त्या मागे लागलो, तर चार-आठ दिवसात सर्व कागदपत्रं हाती येतील!"

"डोंट वरी! आपलं काम त्याच्याही अगोदर होईल!" आत्मविश्वासानं मी म्हणालो.

सुन्दरम्ना घेऊन मी सचिवालयात गेलो, ते सरळ शिदोजी राजेंच्या केबिनमधे. मला पहाताच ते दचकले. "येस येस समर, आलास तू?" मी आणखीन काही लफड्यात त्यांना गुंतवतो की काय असं वाटलं असावं.

"थोडं महत्त्वाचं काम आहे! हे मिस्टर सुन्दरम्! यांच्या मुलीला औषधोपचारासाठी जर्मनीला न्यायचं आहे. सोबत यांच्या पत्नीही जाणार आहेत. आम्हाला पासपोर्ट-व्हिसा वगैरे सर्व लागतील-फॉरेन एक्सचेंजही थोडं लागेल!"

शिदोजी राजांनी तत्काळ आपल्या पी. ए. ला बोलावून घेतलं आणि आम्हाला जे हवं ते तातडीनं देण्याची व्यवस्था करायला फर्मावलं. आठ दिवसांत जे काम होणार नाही, ते तिसऱ्या दिवशीच झालं!"

गोल्डा व सुंदरम् पतिपत्नींना निरोप देण्यासाठी मी सांताक्रूझ एअरपोर्टवर गेलो होतो. मध्यरात्रीची वेळ, पावसाची रिमझिम चालूच होती. विमान-वाहतूक मात्र सुरळीत चालू होती.

"युवर अटेंशन प्लीज, पॅसेंजर्स फॉर बर्लिन आर रिक्वेस्टेड टु कम इन चेकरूम!" तपासणीसाठी उतारूंना तपासणी खोलीत बोलावण्यात आले. याच वेळी मी त्या सर्वांचा निरोप घेतला.

ते एअर इंडियाचे प्रचंड विमान अरबी समुद्रावरून उड्डाण करीत दिसेनासे झाल्यावर घरी बांद्र्याला परतलो. रात्रीचे साडेतीन वाजून गेले होते.

याही वेळी उल्कानं माझी हजेरी घेतली.

"अलीकडे नेहमीच तू वेळानं यायला लागलास हं समर! हे लक्षण बरं नव्हे!"

मी हसलो आणि म्हणालो, "उल्का, गेले चार-पाच दिवस मी एका महत्त्वाच्या कामात गुंतलो होतो. उद्यापासून संध्याकाळी साडेसातला बॅक होम!"

"असलं कसलं महत्त्वाचं काम होतं? माझ्यापासून दडवून ठेवावं असं वाटलं?"

"तसं मुळीच नाही! सांगतोच तुला!"

मी उल्काला सर्व प्रकार सांगायचं ठरवलं. बाहेरचा उजेड खोलीत येईपर्यंत मी उल्काला सांगत होतो, अन् डोळे सताड उघडे ठेवून उल्का ते ऐकत होती.

नुकताच त्या तिघांना निरोप देऊन आल्याचं सांगताच तिचे डोळे पाणावले. माझ्या अंगावर हात टाकून ती म्हणाली, "समर, प्रत्यक्ष बाप न होतादेखील तू त्या मुलीच्या प्रेमाखातर जे केलंस त्याला तोड नाही! राजा, उगाच गैरसमज करून घेतला रे मी!" मला मिठीत घेत उल्का म्हणाली अन् चार दिवस अहोरात्र पायपीट केलेल्या श्रमांचा परिहार क्षणार्धात झाला.

त्या दिवशी दुपारी साडेबारा वाजेपर्यंत झोपायचं मी रेकॉर्डच केलं. रात्री कितीही वेळानं झोपलो तरी सकाळी आठनंतर मी कधीच अंथरुणावर लोळलो नाही. पण त्या दिवशी मला अशी गाढ झोप लागली की, मुंबईच्या खडखडाटाचा माझ्यावर यत्किंचितही परिणाम झाला नाही. उल्कानंही मला उठवलं नाही.

साडेबाराला जाग आली. तरीही अंथरुणावर पडूनच होतो. मध्यरात्री गोल्डा आणि सुंदरम् पतीपत्नींना घेऊन गेलेलं विमान आता कुठं असेल? याचा विचार करीत पडलो होतो. 'एडनच्या पुढं नक्कीच गेले असेल! जेट आहे ते. कदाचित इटालीलादेखील पोहोचलं असेल... पण छे:! बर्लिनला जाणारं विमान इटालीला कशाला जाईल? त्याचा रूट निराळा असणार! मुंबई, बसरा, इराक, सायप्रस, अथेन्स, बेलग्रेड ते बर्लिन! या वेळी मला परदेशी जाण्याची संधी अगदी सहज आली होती. पण कसं शक्य होतं? गोल्डाच्या सुश्रूषेला मीनाक्षीनं सोबत जाणं अत्यावश्यक होतं. मी अन् मीनाक्षीनं सोबत जाणं शक्य होतं? का नाही? तू मीनाक्षीसोबत गेल्यानं असं काय होणार होतं? काही झालं नसतं, पण मी ज्या स्त्रियांच्या सहवासात येतो तिथं काहीतरी वादळ उठतं, एवढं खरं!... सलिमाच्या बाबतीत काय घडलं? कुमारीचं काय झालं? एवढंच कशाला, राजकन्येला आता कसले दिवस पाह्यला मिळताहेत?... या स्त्रियांच्या जीवनात कदाचित् या घटना अटळ असतीलही; पण मला मात्र वाटतं, यापुढं अधिक स्त्रियांची ओळख नको, अन् ओळख झाली तरी त्यांचा सहवास फार काळ राहू नये!...'

मी असा विचार करीत अंथरुणावर पडलो असताना, पोस्टमननं एकदम दोन पत्रं खिडकीतून आत भिरकावली. ती सरळ कॉटखाली येऊन पडली. पडल्या पडल्याच मी वाकून ती घेतली. त्यातलं एक विलासचं होतं हे मी चटकन् ओळखलं, कारण पाकिटावर घोड्याचं मुंडकं असलेला मोनोग्राम त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाचा असणार? दुसऱ्या पत्रावरचं अक्षर मात्र काही ओळखता आलं नाही. प्रथम विलासचं पत्र वाचायला सुरुवात केली,—

"प्रिय समर,

तुला मागे एक पत्र मार्टिनच्या पत्त्यावर पाठवलं होतं. त्याचं उत्तरदेखील तू पाठवलं नाहीस. तू काहीतरी मोठ्या व्यापात असल्याशिवाय असं घडणार नाही, असा अंदाज करून मी स्वस्थ राहिलो. पण आता मी पुन्हा तुला पत्र पाठवण्याचा खटाटोप करीत आहे, तो एवढ्याचसाठी की, पुण्यात मी एक मोकळी जागा खरेदी केली आहे. त्या जागेवर मला शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांना भाड्यानं देण्यासाठी खोल्या बांधायच्या आहेत. दरमहा पाच-सातशे रुपये मिळतील अशी तरतूद करायची आहे. तू म्हणशील हा जॉकी आहे, महिन्याला तीन-चार हजार कमावतो; मग दगडमातीत हा पैसा कशाला घालतो आहे? पण खरं सांगू, हा जॉकीचा व्यवसाय म्हणजे अळवावरचं पाणी आहे! रोज मृत्यूच्या गोलात फिरणं! कुठल्या वेळी घोड्यावरून पडून कपाळमोक्ष होईल किंवा हातपाय अधू होईल याचा भरवसा देता येत नाही. अशा वेळी पाचसातशे रुपयांचं निश्चित असं उत्पन्न इंदूच्या हाती येईल अशी व्यवस्था करून ठेवलेली बरी!

त्या जागेवर बांधावयाच्या इमारतीचा प्लॅन-नकाशा, सर्व काही तयार करून ठेवलेलं आहे. पण कॉंट्रॅक्ट देण्यापेक्षा आपण डिपार्टमेंटली - म्हणजे माल देऊन इमारत बांधून घेणं, हे थोडं फायद्याचं आहे असं म्हणतात. मला माझ्या व्यवसायातून या कामाकडे पहाणं जमणार नाही. तरी तू माझं एवढं काम करावंस अशी माझी तुला कळकळीची विनंती आहे. उल्काला मुंबईत एकटीला सोडून तू इथं येणं अशक्य नसलं तरी कठीण आहे हे मला दिसतं; पण तरीही या माझ्या संकल्पसिद्धीला तुझ्याशिवाय दुसरा कोणी विश्वासाचा अन् लायक माणूस मला दिसत नाही. तुला हवं तर मी डेक्कन क्वीनचा पास काढून देईन, रोज किंवा एक-दोन दिवसांनी येऊन-जाऊन हे काम केलंस तरी हरकत नाही. तुझ्या पत्रापेक्षा तुझ्या येण्याची वाट पहाणारा.

तुझाच

विलास.''

विलासचं ते पत्र वाचून मी विचार केला, या विलासनं नाही म्हटलं तर काही काळ मला आश्रय दिलेला आहे. माझ्यावर त्याचा नितांत विश्वास आहे. इंदूवहिनी आणि उल्का यांचं न पटल्यामुळं आपण विलासचं घर सोडलं, पुणंही सोडलं. म्हणून विलासशी असलेले मैत्रीचे संबंध काही तोडले नाहीत. माझ्या निघून जाण्यानं विलास काहीसा दुखावला होता हे सत्य होतं; कदाचित् त्याला मी कृतघ्न आहे असंही वाटण्याची शक्यता होती; पण त्यानं 'जगात दोन बायका कधीही एकमेकींशी पटवून घेत नाहीत' असं सांगून उलट माझीच समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता....

काही झालं तरी विलासच्या इच्छेप्रमाणं वर्ष-सहा महिने मला पुण्याला ये-जा करून ते इमारतीचं बांधकाम पूर्ण करून देणं भाग आहे! आणि इथं मला कुठल्या ऑफिसमधे अगदी बरोबर साडेदहाला जाऊन मस्टरवर सही करावी लागते आहे?... प्रश्न आहे तो उल्काचा! तिला सांगितलं तर ती म्हणणार, 'तुला कोणी ही उठाठेव सांगितलीय? इमारत त्याची, भाडं तो घेणार! पुणं-मुंबई-पुणं अशा फेऱ्या मारून वैतागशील! त्याचं त्याला पाहू दे!....'

पण आताशी उल्काच्या स्वभावात थोडं परिवर्तन झाल्याचं मला दिसत होतं. काल गोल्डाला जर्मनीला घेऊन जाण्याच्या कामी साहाय्य केल्याबद्दल तिनं माझं कौतुकच केलं होतं. योग्य वेळ, तिचा मूड साधून हे तिच्या कानांवर घालायचं, असं ठरवून मी दुसरं पत्र फोडलं. अन् आश्चर्याचा धक्काच बसला. ते पत्र भवानीनगरवरून आलेलं होतं अन् माझा भाऊ अमर यानं पाठवलेलं होतं. मी त्याचं हस्ताक्षरदेखील ओळखू नये? छट्! पत्र वाचू लागलो.

''प्रिय दादा,

तू इकडून गेल्यापासून तुझं पत्र नाही; म्हणून चिंता वाटते. डॅडी गेल्यापासून आईची तब्येत अधूनमधून बरी नसते. डॉक्टरांनी घरी येऊन तपासलं आणि सांगितलं की, फक्त यांनी फार विचार करू नये. प्रकृतीत काहीच दोष नाही. तरीही आई विचार करायचं काही थांबत नाही. तिला तुझी चिंता वाटते, अलकावहिनीचं पुढं कसं होईल ही चिंता वाटते. तू अलका वहिनीला मुंबईला घेऊन जावंस असं ती एकसारखं सुचवते आहे.

मी व माझी बायको शेतावर रहायला गेलो होतो. पण आईची प्रकृती इतकी क्षीण झाली आहे की तिची देखभाल करायला कोणीतरी जवळ असावं म्हणून मी माझ्या बायकोला गावातच रहायला सांगितलं. पुन्हा घरात काहीतरी धुसफुस चालू झाली. माझी बायको आईची सेवा करते, तिची देखभाल करते; म्हणून वहिनी तिच्यावर जळते. दोन निरनिराळ्या घरच्या बायका एकत्र आल्या की प्रत्येक घरांत कमी-अधिक प्रमाणात हे घडतं, हे मला ठाऊक आहे; म्हणून मी त्या धुसफुशीकडे दुर्लक्ष करतो आहे. पण मला चिंता वाटते ती आईच्या प्रकृतीची. कोणताच आजार नसताना ही असाध्य रोगाने पीडित असल्यासारखी अंथरुणाला खिळून आहे. दोन-दोन दिवस भाताचा घासदेखील खात नाही. मला आईचं लक्षण काही बरं दिसत नाही. डॅडी गेल्यापासून ती अगदी निर्वाणीचीच भाषा करते आहे. तरी तू एक आठ-पंधरा दिवस इकडे येऊन रहा. दादा, डॅडी गेले. आपल्यावरचं छत्र निघून गेलं. आईही गेली तर आपल्याला दुसरं कोण आहे रे?''

पत्र वाचतावाचता माझे डोळे भरले. कारण पत्र लिहिताना अमरच्याही डोळ्यांतून अश्रू ओघळल्याचा पुरावा मला समोर दिसत होता. पत्रातली काही अक्षरं पाणी पडल्यासारखी पुसट झाली होती.

ती दोन्ही पत्रं मी घडी करून उशाला ठेवली. उल्का न्हाऊन ओले केस पाठीवर मोकळे सोडून मार्केटला गेली होती. ती आली आणि मला म्हणाली,

"झाली का झोप?"

"हो! तू काय मार्केट करून आलीस?"

"हं, ऊठ. अंघोळ करून घे!"

"घेतो. पण उल्का, अमरचं पत्र आलंय, आईची प्रकृती ढासळलीय. त्यानं मला भवानीनगरला बोलावलंय."

"मग जाऊन ये!"

"शिवाय हे विलासचं पत्र आलंय."

"काय म्हणतात?"

"वाच म्हणजे समजेल."

दोन्ही पत्रं मी उल्काच्या हाती दिली. उल्कानं ती अथपासून इतिपर्यंत वाचली अन् मला म्हणाली, "तुला जावंच लागेल."

"कुठं, पुण्याला की भवानीनगरला!" उल्काचा अंदाज घेण्यासाठी मी विचारलं.

"दोन्हीकडे!"

"दोन्हीकडे? विलासच्या पत्राप्रमाणं मी पुण्याला त्याच्या इमारतीची देखरेख करायला जाणं आवडेल तुला?"

उल्का वाळलेले केस आरशात पाहून विंचरत मला म्हणाली, "विलासनं पत्रात ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यावरून वाटतं की तू त्याचं काम पूर्ण करून द्यावंस. माणसाला शेवटी आपल्या मुलाबाळांची चिंता करावीच लागते. रेसमधे जीविताला काही धोका झाला तर उत्पन्नाचं निश्चित काहीतरी साधन असावं वाटणं हे नैसर्गिकच नाही का?"

"मला वाटलं-"

"इंदूचं आणि माझं बिनसलं होतं म्हणून जायचं नाही असं म्हणेन! होय ना?"

"एक्झॅक्टली."

"समर, सर्वांशी, गोडीगुलाबीनं, मिळूनमिसळून रहावं असं मला आताशी वाटू लागलंय! शिवाय मुलाबाळांविषयी आई-वडिलांच्या भावना काय असतात याची थोडीशी जाणीव मला ॲबॉर्शन झाल्यापासून व्हायला लागलीय्."

"उल्का!" उठून मी तिचे दोन्ही खांदे धरून हालवीत म्हणालो, "तुझ्यातला हा बदल अलीकडे मला जाणवत होता; पण वाटायचं की, तो फक्त भासच आहे. आता मात्र खात्री झाली! माय डार्लिंग, यू आर डार्लिंग. यू आर कंप्लिटली चेंज्ड!" मी तिचं चुंबन घ्यावं म्हणून जवळ गेलो, तेव्हा ती रागावून, "दात घास अगोदर! वास येतोय तोंडाला! घाणेरडा! मी न्हालेय, पारोशा अंगानं स्पर्शदेखील करू नकोस मला!"

मला ढकलून देत ती स्वयंपाकासाठी स्टोव्ह पेटवायला गेली.

दाढीला साबण फासताफासता मी म्हणालो, "मग कसं काय चाललंय तुझं बालमंदिर?"

"छान! काल पस्तीस मुलं आली होती. आणखी वाढण्याची शक्यता आहे. पण जागेअभावी जास्त मुलं घेता येणार नाहीत! लिलियन् म्हणतेय दोन बॅचेस कराव्यात!"

"तुम्हा दोघींच्या मागे व्याप लागला हे बरं झालं."

"आणि स्वतंत्र रे! कोणाची ताबेदारी नाही! लिलियनमुळे खिश्चन मुलं फार आली."

"आता दोघी मिळून एक शिक्षण-संस्था काढा!"

"कशाला? आहे हा व्याप सांभाळता-सांभाळता नाकी नऊ येतील. आहेस कुठं?"

उल्काची नोकरी संपल्यानंतर तिचं पुढं काय होणार ही मला भेडसावणारी समस्या

आता काही काळापुरती तरी मिटली असं समजायला हरकत नव्हती.

-०-०-

३६

उन्हाळा संपत आला होता. पश्चिमेकडून जोरदार वारा वाहत होता. भल्यापहाटे रेल्वेतून जाताना मला पावसाळा लौकर सुरू होणार अशी लक्षणं दिसत होती. भवानीनगर स्टेशनवर उतरलो, तेव्हा एक हलकीशी सर येऊन गेल्यामुळं स्टेशनचा फलाट ओलसर झाला होता. टांग्यातून जाताजाताच मी टांगेवाल्याचे पैसे भागवले. घरासमोर टांगा थांबताच मी सरळ आईला पहायला आत गेलो. इतका आतुर झालो होतो मी!

आई! आई हा माझ्या आयुष्यातला वीक पॉइंट! मुंबई-पुण्यात मी नाना लफडी केली. जुगारात अनेकांना हातोहात फसवलं. बायकांच्या बाबतीत काहीएक करायचं शिल्लक ठेवलं नाही. शिदोजी राजासारखा महाकारस्थानी माणूस, त्यालाही मी नाकात वेसण घातलेल्या बैलासारखा नमवला, महिन्याला दोन हजारांची खंडणी तो चुपचाप देऊ लागला. हे इतकं सारं खरं असूनही आई म्हटलं की, मला माझं एक निराळंच अस्तित्व जाणवतं. माझ्यातला जोश. प्रतिकूल परिस्थितीला ठोकरून उडवण्याचं सामर्थ्य, वेळप्रसंगी धादांत खोटं बोलण्याची किमया, सारं सारं क्षणार्धात निघून जातं. मी दीन-दुबळा होतो. आईनं आम्ही लहान असताना किती खस्ता खाल्ल्या होत्या याची जाणीव होते. डॅडी ऐन उमेदीत होते तेव्हा पैसा आणि प्रसिद्धी त्यांच्या पायी लोळण घेत होती. ठाकूर वकील म्हटलं की, आदरानं काही लोक मान तुकवीत. भवानीनगरच्या महाराजांचे कायदाविषयक सल्लागार असताना 'महाराज, मला यापुढे आपली नोकरी झेपणार नाही,' असं स्पष्ट सांगून निघून येणारे डॅडी, न्यायाधीशांना एखादा कायद्याचा क्लिष्ट मुद्दा समजला नाही तर त्यांनादेखील ठणकावणारे डॅडी... घरी ते आईला कधीही विश्वासात घ्यायचे नाहीत. अधूनमधून ते परगावी जायचे, तेव्हा आई खूप रडायची. आम्हाला समजत नसे, आई का रडते? माणसांनी कामासाठी परगावी जाण्यात वाईट काय असतं? असा प्रश्न नेहमी माझ्या समोर उभा रहायचा. पण मला थोडी जाण आली तेव्हा समजलं, डॅडींचं परगावी काय काम असतं ते. गोवा त्या काळी बायकांच्या बाबतीत प्रसिद्ध होता. मद्य आणि मदिराक्षी यांचा सुकाळ असलेला तो पोर्तुगीजांच्या अमलाखालील प्रदेश भारतातल्या छंदीफंदी लोकांचं एक खास आकर्षण होतं.

आईनं अमर आणि माझ्याकडे पाहून दिवस काढले. डॅडी असे वागत असूनही ती त्यांना देवासारखं मानत होती. त्यांना जरा बरं नसलं की ती कासावीस व्हायची. कधीकधी कोर्टातून डॅडींना घरी यायला वेळ होई, तेव्हा ती अस्वस्थ होऊन माडीवर जायची व खिडकीतून कोर्टाच्या रस्त्याकडे डोळे लावून बसायची! डॅडी आणि आई मनमोकळेपणानं कधी बोलत बसल्याचं मला आठवत नाही. इतकं असूनही डॅडींना देव मानणाऱ्या आईचं मला कोडं वाटायचं!

मला समजू लागल्यावर डॅडींच्या या तऱ्हेवाईक आणि बाहेरख्याली वृत्तीबाबत मी आईसमोर नापसंती व्यक्त करण्याचा प्रयत्न केला होता, त्या वेळी आई माझ्यावर केवढी गरम झाली! म्हणाली, "समर, त्यांच्याबद्दल यापुढं माझ्यासमोर पुन्हा असे उद्गार काढशील तर याद

राख!'' एरवी शांत, प्रेमळ, वत्सल दिसणारी आई मला रौद्रावतार धारण केल्यासारखी दिसली.

आईची आणखी एक आठवण! अलकाचा बदफैलीपणा माझ्या नजरेस आल्यानंतर मी तिला घरी ओढत आणली. लाथाबुक्क्यांनी झोडपलं, तेव्हा आई आडवी आली.

''जीव घेण्याच्याच लायकीची आहे! मैत्रिणीकडे जाते म्हणून गेली आणि त्या तळ्याजवळच्या बागेत ठोंबरे प्रोफेसरशी गुलूगुलू बोलत बसली होती! असली नादान बदपैâली बायको नको आहे मला. आत्ताच्या आत्ता हिला घरातून हाकलून देणार!''

त्या वेळी शांतपणाने आई म्हणाली, ''समर, राजक्षत्रियाच्या घराण्यात लग्न होऊन येणारी मुलगी उभी जात नसते!''

''मग आडवी होऊन जाईल असं करतो!'' असं म्हणून मी अलकाचा गळा दाबायला धावलो, तेव्हा तिला पाठीशी घालून आई म्हणाली,—

''राजक्षत्रिय वंशात जन्मलेली माणसं स्त्रीहत्या करीत नाहीत! स्त्रीच्या प्रमादाबद्दल तिला क्षमा करायची असते. चुकलेल्या माणसाला क्षमेसारखी दुसरी मोठी शिक्षा नाही!''

माझी आई साधी-भोळी अशिक्षित दिसायची. पण कधी-कधी ती अशी बोलू लागली की हात जोडून तिच्या पायाशी बसून रहावं असं वाटायचं.

अस्थिपंजर होऊन पडलेल्या आईकडे बघताना या साऱ्या गतकालातल्या आठवणी उचंबळून आल्या.

रुमालाने डोळे टिपत मी म्हणालो -

''आई! अशी का अवस्था करून घेतलीस?''

''हं ऽ!'' आईनं एक क्षीण हुंकार दिला. अन् तिनं खोलीत भिंतीवर लटकावलेल्या डॅडींच्या फोटोवर नजर केंद्रित केली. तिच्या कपाळावरच्या आठ्या मावळल्या, गालावर, ओठावर किंचित् स्मित उमटलं अन् ती ओठातल्या ओठांत पुटपुटली-

''इतके दिवस मनापासून दूर राह्यले नव्हते रे ते!''

नवऱ्याशी एकनिष्ठ असणाऱ्या कित्येक स्त्रिया माझ्या बघण्यात आलेल्या होत्या; पण आईच्या पतिनिष्ठेला तोड नव्हती.

अमर माझ्यामागे येऊन उभा राह्यला होता. त्याची बायको येऊन माझ्या पाया पडून बाजूला उभी राहिली.

''अमर, मी आईला मुंबईला घेऊन जातो.'' चटकन् मी बोलून गेलो.

त्यावर आईनं हातानं इशारा केला, ''मला कुठंच जायचं नाही. मला जिथं जायला हवं आहे तिकडेच चालले आहे मी.''

अलका घरी असूनही मी आल्यानंतर खाली आली नाही या गोष्टीनं माझं डोकं तापलं. मी तिसऱ्या मजल्यावर आलो तेव्हा अलका 'इंडियन फिलॉसॉफी'चं पुस्तक वाचत बसली होती. मी तिच्या हातून पुस्तक हिसकावून घेतलं आणि ओरडून म्हणालो,-

''अजून तुझा ताठा निमालेला नाही?''

अलकानं माझ्या प्रश्नाला उत्तर दिलं नाही, तेव्हा मी पुढं होऊन तिचे खांदे गदगद हलवून म्हणालो, ''आजपर्यंत इतक्या बायका पाह्यल्या; पण तुझ्यासारखी दुष्ट कोणी बघितली नाही.''

अलका त्यावर काहीच न बोलता आरशासमोर उभं राहून विस्कटलेले केस विंचरू लागली.

''अलका, हे आता पुरे झालं. याचा कुठंतरी शेवट व्हायला हवाय. सांग, तुझ्या मनात आहे तरी काय?''

"तुमचा मार्ग तुम्ही स्वीकारलेला आहे. माझा मी स्वीकारलेला आहे. कोणी कोणाच्या आड येऊ नये." अगदी शांतपणे अलका उत्तरली.

"पण माझ्या नावाचं गळ्यात मंगळसूत्र आहे ते तरी कशाला घालतेस?"

"हवं तर घ्या काढून!" शांतपणे ती उत्तरली.

"हूं! इतके दिवस आईच्या सहवासात राह्यलीस; पण तिच्या स्वभावातला अणूरेणूदेखील उचलला नाहीस!"

"पुरुषांनी अनिर्बंध वागावं आणि स्त्रियांनी गुलामासारखी त्यांच्या पायी लोळण घ्यावी हा जमाना गेला आता!"

"अनिर्बंध वागलो हे खरं, पण त्याला कारणीभूत तू आहेस! शाळा-कॉलेजात असल्यापासून बेताल वागण्याची तुला सवय होती हे लपवून ठेवलंस माझ्यापासून, पण प्रत्यक्ष जेव्हा ठोंबऱ्यांशी हसतखेळत बसलेली पाहिली तेव्हा खात्रीच झाली. नशीब समज, तुला जिवंत ठेवली!"

"स्वत: पवित्र असणाऱ्यानं दुसऱ्यानं पवित्र रहावं अशी अपेक्षा धरावी! तुम्ही पुण्या-मुंबईत काय दिवे लावले आहेत हे सारं मला समजलंय!"

"समजलं? ठीक झालं! पण तसं वागायला मुळात तूच कारणीभूत आहेस! तू मला फसवलंस, आणि त्यामुळंच मला अनिर्बंध अशा वागण्याला प्रवृत्त केलंस!"

"ही लंगडी सबब आहे! मी ठोंबऱ्यांशी बोलत होते, या एकाच गोष्टीवरून तुम्ही त्यांचा अन् माझा अनैतिक संबंध होता असा निष्कर्ष कशावरून काढलात?"

"घरी खोटं कारण सांगून बाहेर गेलीस, चित्रकाराच्या पुतळ्याखाली तुम्ही दोघं हसत-खिदळत बसल्याचं मी प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितलं, नाशिकला कॉलेजात असताना बिपीन सारडा, जयचंद राठोड, चंदर, राम धुळेकर या पोरांनाही तू नादी लावलं होतंस, हे मला अगोदरच समजलं असतं तर कशाला तुझ्याशी लग्न करायला तयार झालो असतो?"

"शाळा-कॉलेजात पोरींच्याबद्दल जे बोललं जातं हे सारं खरं असतं असं वाटतं?"

"असंच काही नाही; पण लग्नानंतर तुझं जे वागणं दिसून आलं त्यावरून तुझ्याबद्दलच्या त्या अफवा सत्य असाव्यात असं अनुमान काढणं काही गैर नव्हतं!"

"कलुषित नजरेनं पहायचं म्हटल्यावर सगळंच वाईट दिसतं!"

"ठोंबऱ्यांशी हसत-खिदळत बसलेली बघितलीय मी तुला!"

"हो, बरोबर आहे. ते तत्त्वज्ञान घेऊन फर्स्ट क्लास फर्स्ट आलेले होते. मला त्यांच्याविषयी नितांत आदर वाटत होता. त्या दिवशी मी मैत्रिणीकडे गेले होते; पण तिचे नातेवाईक अचानक आजारी पडल्यानं तो प्रोग्रॅम रहित झाला. म्हणून मी परत यायला निघाले. वाटेत ठोंबरे भेटले. म्हणाले, 'सवड असली तर थोडा वेळ गप्पा मारत बसू.' मीही घरी वेळानं येईन म्हणून सांगितलं होतं. वाटलं, एक अर्धा तास गप्पा माराव्यात. माझ्या किंवा ठोंबऱ्यांच्या मनात पाप असतं तर मी बागेच्या मध्यभागी असलेल्या पुतळ्याच्या कट्ट्यावर कशाला बसले असते? तळ्याच्या बाजूला एकांताच्या खूप जागा आहेत!"

"अलका, तू मला बनवण्याचा प्रयत्न करते आहेस."

"मुळीच नाही!"

"तुझ्या पेटीत संततिनियमनाची साधनं कशी सापडली?"

"हो! मला ग्रॅज्युएट होण्याआधी मूल नको होतं! लग्नानंतर स्त्रियांचं शिक्षण पूर्ण होणं कठीण जातं, अन् त्यातल्या त्यात मूल झालं की शिक्षण संपलंच. मला मूल काही कायमचं नको होतं असं नाही, पण निदान पदवी पदरात पडेपर्यंत तरी नको होतं!"

"मग तसं मला विश्वासात घेऊन सांगायला काय हरकत नव्हती?"

"विश्वासात घेऊन सांगायला हरकत अशी काही नव्हती; पण तुम्ही माझ्या विचाराशी सहमत व्हाल की नाही याची शंका वाटत होती."

"म्हणजे तू इतकं सारं करूनही पवित्र आहेस हे दाखवण्याचा अट्टाहास करतेस तर?"

"अट्टाहास करायचं काही कारण नाही! मी बी.ए. झाले, बी. टी. झाले, आता महिन्याला शे-पाचशे रुपये कमावते; मला कोणाच्या मेहेरबानीवर जगायचं कारण नाही. मी अशी आहे, तशी आहे असं दाखवायचा अट्टहास करायचं कारणच काय?"

अलकाशी प्रदीर्घ अशी चर्चा आज प्रथमच होत होती. निर्भयपणे तिनं आपली बाजू माझ्यासमोर मांडली होती. मला ती पटली होती असं नाही; पण तरीही तिनं आपली बाजू मांडताना जी तार्किक संगती दर्शवली होती ती कुणाही व्यवहारी माणसाला पटण्यासारखी होती. मी क्षणभर विचार करून म्हणालो,—

"तुझी बाजू इतकी न्याय्य होती तर ती तू मला पटवून देण्याचा प्रयत्न का केला नाहीस?"

"तुम्ही ती पटवून घेण्याच्या मन:स्थितीत होताच कुठं?"

"हे पटण्यासारखं नाही!"

"सोडून द्या! तुम्हाला माझं म्हणणं पटावं असा माझा अट्टाहास नाही!"

"ठोंबऱ्यांच्या बाबतीतलं सोडून दे. नाशिकला कॉलेजात तू पोरांना नादी लावलं होतंस त्याचं काय?"

"समर! खरं म्हणजे मला हे सर्व खुलासे करायचं अगदी जिवावर येतं आहे. पण तुमच्या बुद्धीची तोकडी कुवत पाहून कीव करावीशी वाटते. अहो, शंकरलाल परदेशींसारख्या लक्षाधीशाची मी एकुलती एक मुलगी. वडिलांच्या लाडाखाली वाढलेली. कॉलेजात पहिल्या दिवशी मी स्वत: गाडी घेऊन गेले. माझी ओळख व्हावी, मी प्रेम करावं, म्हणून काही पोरटी माझ्यामागे लागली होती, हे अगदी सत्य. पण मला जसा हवा होता तसा एकही त्यात नव्हता. तो बिपीन सारडा, जयचंद राठोड, चंदर, राम धुळेकर ही पोरं माझ्यासाठी जीव टाकीत होती, अन् त्या वेळचं माझं वय पोरांना बनवण्यात धन्यता वाटणारं असं होतं. तरीही मी एकालादेखील बोटभर चिठ्ठी लिहिली नव्हती की कोणाला माझ्याशी बोलण्यापलीकडे जाऊ दिलं नव्हतं. त्यांनी मात्र मला भलीमोठी पत्रं पाठवली होती. तुमच्याशी लग्न ठरलं, त्या दिवशी त्या पत्रांची होळी करून टाकली. त्या पोरांचा अन् माझा अनैतिक संबंध होता, असा एक तरी पुरावा आहे का तुमच्याकडे? कशाच्या आधारावर तुम्ही हा आरोप करता आहात? पण आता मात्र वाटू लागलंय?"

"काय?" मी अधिर होऊन विचारलं.

"एवीतेवी बदफैली म्हणून मला सोडलेलीच आहे तुम्ही. तेव्हा—"

"अलकाऽ!"

"ओरडू नका. खाली आईची तब्येत बरी नाही!"

"अगदी आईविषयी प्रेम असल्यासारखं दाखवतेस की?"

"प्रेम? त्यांच्याविषयी प्रेम तर आहेच, पण त्याबरोबर आदरही. तुम्ही उल्काशी दुसरं लग्न केलंत, पुण्यात त्या हैद्राबादच्या सलिमाप्रकरणी तुमचं नाव गुंतलं होतं, मुंबईत कुमारीच्या घरी पडून होता, अन् आता त्या राजकन्येचा हुजऱ्या बनून मुंबईत दिवस कंठता आहात, ही कारणं मला तुमच्यापासून घटस्फोट घ्यायला पुरेशी होती! पण केवळ या माऊलीच्या भावना दुखवायच्या नाहीत, म्हणून गप्प बसले!"

"अलका, मी संभ्रमात पडलो आहे! मला समजत नाही, तू मला बनवते आहेस की सांगतेस ते सारं सत्य आहे!" डोकं हातात घट्ट धरून मी म्हणालो.

"संभ्रमावस्था फार वाईट! एक तर मी तुमच्याशी एकनिष्ठ आहे असं समजा किंवा बदफैली आहे असं समजा!"

अलकानं खरोखरच मला बुचकळ्यात पाडलं होतं. आजपर्यंत मी अलकाला तुच्छ लेखून केवळ आईसाठी म्हणून स्वस्थ राहिलो होतो; पण आता मला त्या बाबतीत काहीतरी निर्णय घेणं प्राप्त होतं.

लग्न ठरल्या वेळची अलका आणि आज मी पहात होतो ही अलका, या दोन भिन्न व्यक्ती वाटत होत्या. ज्या वेळी मी नाशिकला गेलो, तेव्हा मधुबनात निरनिराळ्या जातीचे द्राक्षांचे वेल दाखवत, माझ्याशी हसत-खिदळत फिरणारी अलका संपूर्ण बदललेली होती. शिक्षणानं तिच्या वागण्याबोलण्यात आमूलाग्र बदल घडला होता. तिच्याविषयी माझ्या मनात जो विकल्प होता तो तिनं आपल्या मुद्देसूद अशा खुलाशानं दूर केला होता, पण अजूनही माझ्यातला पुरुष स्वत:ची चूक कबूल करायला तयार नव्हता. संशयाचं जाळं ज्या धाग्यावर उभं होतं, ते धागे तुटले होते किंवा जीर्ण झाले होते; पण मनातून संपूर्णपणे ते निघून जायला तयार नव्हते.

"अलका! तुला माझ्यापासून घटस्फोट हवा आहे का? केवळ आईची अन् डॅडींची इच्छा नव्हती; म्हणून मी तो विचार सोडून दिलेला होता. आता डॅडी गेले, आईही त्या मार्गावर आहे. त्यांच्या हयातीपर्यंत त्यांचं मानलं. पण यापुढं आपण दोघांनी एकत्र बसून निर्णय घ्यायला हवा! मी उल्काशी लग्न केलेलं आहे, तू म्हणतेस त्या स्त्रियांशीही माझा संबंध आलेला आहे. मी पवित्र आहे असं माझं म्हणणं नाही. तेव्हा तुला माझ्या बंधनातून मुक्त करावं असं मला वाटू लागलं आहे!"

"इतकं माझं बंधन जाचक वाटू लागलं आहे!"

"असं काही नाही; पण ही समस्या आपण दोघांनी एकत्र येऊन मिटवलेली बरी!"

काही का असेना, बऱ्याच कालावधीनंतर अलकाशी झालेल्या चर्चेमुळे माझ्या मनावरचं ओझं हलकं झालं होतं.

अलकानं या वेळी माझ्याशी जी चर्चा केली, तीवरून तिनं आपलं निरपराधित्व सूचित केलं होतं. तिनं सूचित करताना जो युक्तिवाद लढवला होता तो अत्यंत सुसंगत असाच होता. मला त्यावर थोडा विचार करायला हवा होता... पण मी विचार करणार म्हणजे निश्चित काय करणार होतो? अलका माझ्याशी एकनिष्ठ नाही या जाणिवेनं मी जीवनाचा एक अत्यंत भिन्न अन् गतिमान असा रस्ता पकडला होता. त्या रस्त्यानं मी इतका दूर गेलो होतो की, आता मला मागे परतणंही अशक्य झालं होतं. मी धरलेल्या या नवीन रस्त्यावर खूप वेडीवाकडी वळणं होती. अलकाला माझ्यामागून यावं असं वाटलं तरीही ते तिला अशक्य होतं, अन् तसं म्हटलं तर तिनं आपण स्वीकारलेल्या मार्गात मी आड येऊ नये असं मला स्पष्टच सांगून टाकलं होतं...

अलका तरुण होती. सुंदर तर होतीच; त्याशिवाय का तिला पहाताक्षणीच मी तिच्या प्रेमात पडलो? अन् आता तर ती सुविद्य अन् मिळवतीही झाली होती! अशी तरुण, सुस्वरूप, सुशिक्षित आणि सधन स्त्री समाजात एकटी वावरू लागली की, तिच्याविषयी रोज नवनवीन अफवा उठत असतात! अलकाच्या बाबतीत त्या उठण्याची दाट शक्यता; कारण ती परित्यक्ता होती!... अलकाविषयी माझ्या मनात असे विचार येण्याचं कारण स्वाभाविकच होतं. ती माझ्या नावानं कपाळाला कुंकू लावत होती अन् गळ्यात मंगळसूत्र होतं ते माझ्या

नावाचंच!

माडीवरून खाली आलो तो हे विचारांचं काहूर डोक्यात घेऊन! आईचा अस्थिपंजर देह पुन्हा पहाताक्षणी डोक्यातलं विचारचक्र क्षणभर थांबलं! जीवन हे असं क्षणभंगूर असताना उगाच खोलवर विचार करून स्वत:च्या अन् दुसऱ्याच्या डोक्याला ताप कशाला द्यायचा?

"आई, तुला काही खावंसं वाटतं का?" आईनं माझ्याकडे मान वळवली अन् हाताने 'काही नको' अशी खूण केली अन् पुन्हा आपली नजर डॅडींच्या फोटोवर स्थिरावली. जसं काही तिला सांगायचं होतं, तुझे वडील हयात होते तेव्हा जे हवं ते सर्व पोटभर खाऊन घेतलं आहे. आता कशाकशाची वासना उरलेली नाही!

आईचे ते अगदी शेवटचे दिवस होते. अशा वेळी माणसाची कोणतीही इच्छावासना अतृप्त राहू नये म्हणून त्याला जे हवं ते द्यावं! आईला काही खायची प्यायची इच्छा नव्हती; मग तिचे प्राण कशात गुंतून राह्यले असतील? मला काही समजेना.

इतक्यात अलका खाली आली. माझ्या पाठीमागे उभी राहून आईला म्हणाली, "थोडा कोको घेऊन येते." कोको हे आईचं आवडतं पेय! आई तो नको म्हणाली नाही!

अलका कोको घेऊन आली. बाजूच्या टेबलावर तिनं कप ठेवला, तेव्हा आईनं तिला जवळ बोलावलं. ती पुढं आली. आईनं तिचा हात माझ्या हातात दिला. समाधानाचं स्मित आईच्या चेहऱ्यावर उमटलं. मी आईला बशीतून कोको पाजला. ती भलतीच खूष झाल्यासारखी दिसत होती. मी अन् अलका मात्र गंभीर झालो होतो. दोघांनी भिन्न मार्ग आक्रमण करायचं परस्परांच्या सम्मतीनं मान्य केलं होतं. रेल्वेचे रूळ समांतर असतात. पण त्या दोघांची भेट मात्र होऊ शकत नाही! पण आईनं अलकाचा हात माझ्या हातात भिडवून आपली अंतिम इच्छा व्यक्त केली होती. ह्यासाठी तर तिनं आपले प्राण रोखून धरले नसतील?....

त्या दिवशी ती अतिशय समाधानी दिसली. मी अमरला म्हणालो, "आज उत्तमपैकी चिकन करी बनवायला सांग तुझ्या बायकोला, आईला दोन घास खायला घालू आज!"

खायचं नाव काढलं की आई मानेनं नकार देत राह्यची; पण मी अमरला हे सांगताना तिनं नकार दर्शवला नाही.

मी आणि अमरनं आईला थोडी चिकन् करी अन् भात खाऊ घातला. ती आमच्या दोघांशी फारशी बोलत नव्हती; पण आज तिच्या चेहऱ्यावर कमालीचं समाधान दिसत होतं. जेवण झाल्यावर हात धुऊन तिनं डॅडींच्या फोटोला हात जोडले, अन् अंथरुणावर आडवी झाली.

मी जेवून तिसऱ्या मजल्यावर गेलो तेव्हा रात्रीचे साडेदहा वाजले होते. रस्त्यावरची वाहतूक थांबली होती. बाहेर पाऊस पडत होता. तिसऱ्या मजल्यावरच्या गच्चीवर पावसाचे थेंब पडून तडतड असा आवाज येत होता. मी कॉटवरची चादर झटकून आडवा झालो. अर्धा तासानं अलका वर आली. तिला जेवणानंतर सुपारी अन् वेलदोडा खाण्याची सवय होती. टेबलावरचा चांदीचा डबा उघडून तिनं सुपारी तोंडात टाकली अन् वेलदोडा सोलू लागली, तेव्हा मी म्हणालो, "आज बरं वाटलं. आईनं दोन घास खाल्ले!"

"तेवढ्या एकाच कारणामुळं बरं वाटलं?" अलकानं सोललेल्या वेलदोड्याचे दाणे तोंडात टाकून मला विचारलं.

"म्हणजे?"

"आर्इंना समाधान वाटलं त्याचं कारण निराळं आहे!"

"हां, आलं लक्षात."

आईनं अलकाचा हात माझ्या हातात दिल्यानं खरं समाधान झालं होतं, हे सूचित करून अलका आपल्या कॉटवरची चादर झटकू लागली, तेव्हा मी म्हणालो, "थोडी सुपारी दे, जेवलो फार आज!"

अलकानं चादर तशीच कॉटवर टाकली अन् सुपारीचा डबा घेऊन माझ्याकडे आली. सुपारीचा डबा घेताना मी पट्कन् तिचा हात पकडला. मला वाटलं, ती हिसकावून घेईल, प्रतिकार करील, काहीतरी बोलेल; पण तिनं यापैकी काहीएक केलं नाही. उलट ती माझ्या शेजारी कॉटवर आडवी झाली. नाही म्हटलं तरी दुपारी तिच्याशी झालेल्या चर्चेमुळं तिच्याविषयी माझ्या मनात जे एक किल्मिष दाटलेलं होतं, ते दूर झालं होतं. त्यात आईनं मघा तिचा हात माझ्या हातात देऊन समेट घडवला होता. या दोन घटनांच्या पार्श्वभूमीवर अलका माझ्या सन्निध आल्यानंतर मी तटस्थ रहाणं हे माझ्या देहाला अन् स्वभावाला रुचणारं नव्हतं. मी अलकाला मिठीत घेतलं. जवळजवळ दीड पावणेदोन वर्षांनंतर मी पुन्हा अलकाशी एकरूप होत होतो. झालं गेलं सारं विसरून ती तिच्या ओठाला ओठ भिडवले होते अन् तिनं त्याला प्रतिसाद दिला होता.

मध्यरात्री जेव्हा मला जाग आली तेव्हा उशाच्या निळ्या दिव्याच्या मंद प्रकाशात मला गाढ झोपी गेलेल्या अलकाच्या चेहऱ्यावरची समाधानाची तृप्ती स्पष्ट दिसत होती. तिच्या कपाळावर आलेले केस मी हलकेच मागे सारले. तिच्या गालाचं चुंबन घेण्याचा मोह मला आवरता आला नाही.

सकाळी साडेपाचच्या सुमारास मी उठलो, तर माझ्या अगोदरच अलका उठून खाली गेली होती. मी खाली आलो तेव्हा ती देवघरात पूजा करीत होती. न्हाऊन पाठीवर ओले केस मोकळे सोडून ती डोळे मिटून बसली होती. श्वेतवस्त्रधारी तपस्विनीसारखी ती मला भासली. मी अंघोळ उरकून आईच्या खोलीत गेलो. आई शांत झोपी गेली होती. मी आणखीन थोडं जवळ जाऊन पाह्यलं अन् जोरानं ओरडलो, "आई ऽऽऽ!" आईची प्राणज्योत मध्यरात्री केव्हातरी मालवली होती.

अमर, अलका, अमरची बायको धावत आली. मी कपाळाला हात लावून रडत होतो. अलका मला समजावत होती. अमर चौकटीला हात धरून दंडावर मान ठेवून रडत होता. आई इच्छामरणी असल्यासारखी निघून गेली होती.

-o-o-

३७

गाडीनं लोणावळा सोडले. बाहेर धो-धो पाऊस कोसळत होता. काचेतून बाहेरचं काहीच दिसत नव्हतं. दाट धुकं आणि जोरदार पाऊस यांना न जुमानता जनता एक्सप्रेस एकामागून एक बोगदे पार करीत घाटमाथा उतरत होती. खंडाळ्याच्या घाटातली निसर्गशोभा एरव्ही पाहण्यासाठी मी धडपडून खिडकीजवळची जागा मिळवीत असे. पण आज बाहेर पहाण्यासारखं काहीच नव्हतं. खिडकीची काच थोडी जरी उचलली असती तरी पावसाची सर आत आली असती.

सारे प्रवासी कसे अंग आकसून बसल्यासारखे दिसत होते.

गाडी मला मुंबईच्या दिशेनं घेऊन चालली होती; पण माझं विचारचक्र मात्र उलट दिशेनं धावत होतं. आई गेली, ती जाणारच होती. डॅडींच्या निधनानंतर तिनं जवळजवळ मरणाचा ध्यासच घेतला होता. आईची ती अवस्था पाहून तिनं फार काळ जगावं असं काही मला वाटलं नाही, ती माझी जन्मदात्री होती, माझ्यावर तिनं अलोट प्रेम केलं होतं हे जरी सत्य असलं, तरी ती ज्या एका परंपरेत वाढली होती, त्या परंपरेत सवाष्णीचं मरण येणं भाग्याचं लक्षण समजलं जात होतं. डॅडी अगोदर गेल्यानं आपण त्या भाग्याला मुकलो ही खंत तिला एकसारखी जाळत होती. अशा अवस्थेत आईनं खूप दिवस जगावं असं काही मला वाटलं नाही! आई गेली पण जाण्यापूर्वी तिनं माझ्या विवंचनेत आणखी थोडी भर टाकली. भवानीनगरला येईपर्यंत मी अलकाचा व माझा संबंध संपुष्टात आला असंच समजत होतो. पण आईनं केलं निराळंच. बरं, आईनं तशी इच्छा व्यक्त केली म्हणून अलकानं आपला ताठा का सोडावा? तिनंही त्या रात्री आपला संपूर्ण कायापालट झाल्यासारखं वर्तन केलं. ते खटकलं. खरं म्हणजे सलिमा, कुमारी, उल्का यांच्याशी माझा संबंध आला तेव्हाच मला थोडं खटकायला हवं होतं. अलका माझी धर्मपत्नी होती. तिच्याशी एकशय्या होताना अन् झाल्यानंतर मला खटकण्याचं कारण नव्हतं! पण जे घडलं ते मात्र अगदी उलटं!...

"दिवाडकर चिवडाऽऽऽ, लोणावळा चिक्कीऽऽ" अशी कर्जत स्टेशन आल्यानंतर पोऱ्यांची ओरड सुरू झाली, मी एक सिगारेट शिलगावली. गाडीनं कर्जत सोडल्यानंतर धुवांधार पावसात माथेरानला जाणारी ती गाडी दिसली. पुन्हा गतस्मृती उफाळून आल्या. सलिमानं 'इथून तत्काळ निघून जा' असं सांगितल्यानंतर मी माथेरान गाठलं होतं. त्यावर इकडे आलो नव्हतो. कुमारी मला वारंवार म्हणायची, एक चार दिवस कुठंतरी थंड हवेच्या ठिकाणी जाऊ. पण तो योग काही आला नाही.

कर्जत सोडल्यानंतर घाटात रेंगाळणाऱ्या गाडीनं चांगलीच गती घेतली. बघताबघता कल्याण आलं. मग ठाणे, कुर्ला, माटुंगा-मुंबईच्या या उपनगरातून जाताना मागचे सारे विचार लोप पावले. मुंबापुरीचं हे एक खास वैशिष्ट्य-ती भल्याभल्यांना चिंता करायला, गत आयुष्याचा विचार करायला वेळच देत नाही! माणसाला एकसारखं पळवत ठेवते. एका अर्थी ते फार चांगलं आहे. माणसाला स्वत:ला विसरायला लावणारी ही किमया फक्त मुंबईचे करू

जाणे! इथं गुडघ्यांत मान घालून तासन् तास एका ठिकाणी पहात राहणारी माणसं औषधाला मिळणार नाहीत. जो तो घाईत-धांदलीत. सकाळी ऑफिसला जायची घाई, संध्याकाळी घरी परत यायची! इतक्या लोकल्स, बसेस, टॅक्सीज् अव्याहत माणसं ओढतात पण ही सापसुरळीसारखी जमिनीतून वर येणारी लोकसंख्या मात्र काही थांबत नाही.

बांद्र्याला घरी आलो, तेव्हा उल्का उठून पुढं आली. आईच्या निधनाबद्दल तिनं माझं सांत्वन करण्याचा प्रयत्न केला, पण का कुणास ठाऊक, मला मी उल्काचा अपराध केल्याचीच जाणीव होत राहिली.

"समर, व्हेरी सॉरी!" मला हाताला धरून आत घेताघेता ती म्हणाली, "असं कसं झालं?"

"व्हायचं ते झालं!"

"मला वाटलं होतं, उभ्या उभ्या येऊन जावं."

"तू?"

"हो, का? मी आल्याचं तुला आवडलं नसतं?"

"आवडण्याचा प्रश्न नाही उल्का, पण—"

"अलकाला बरं वाटलं नसतं, असंच ना?"

"अं-नाही नाही! तसं काही नाही!" बायकांना थापा मारण्यात माझा हातखंडा; पण आयुष्यात मी प्रथमच असा उत्तर देताना कचरलो. कदाचित् उल्कानं मला अधिक विचारलं असतं तर माझी पंचाईत झाली असती, पण लिलियन आल्यामुळं मी बचावलो.

"केव्हा आलास समर?"

"आत्ता, एवढ्यात!"

"व्हेरी सॉरी टु लर्न अबाऊट द डिमाइस ऑफ युवर मदर!"

मी फक्त मान डोलावली.

"ए व्हेरी काइंडहार्टेड वुमन!" असं म्हणून लिलियननं आईच्या काही आठवणी सांगितल्या. डॅडी वारले तेव्हा लिलियन आणि रॉबर्ट दोघेही मला भेटायला भवानीनगरला आलेले होते. त्या वेळी आईच्या सहवासात लिलियन राह्यली होती.

रुमालानं डोळे टिपत ती म्हणाली,—

"तरी बरं! त्यांच्या शेवटच्या क्षणी तू तिथं होतास!"

"शेवटच्या क्षणी मी नव्हतो आईजवळ! आईचे प्राण रात्री झोपेतच गेले!"

"अन् तू कुठं होतास तेव्हा?"

"मी माडीवर!"

माडीवर हा शब्द ऐकताच उल्कानं माझ्याकडे एक संशयाचा कटाक्ष टाकला. पण मी तो पाहून न पाह्यल्यासारखं केलं.

"उल्का, चल येतेस ना? मुलं आली असतील?" लिलियननं विचारलं. उल्कानं जायची तयारी केलीच होती; पण मी आलो म्हणून ती थोडा वेळ थांबली होती. माझ्या बोलण्या-वागण्यात काहीसा बदल झाल्याचं उल्कानं ताडलं होतं; पण कदाचित् आईच्या मृत्यूमुळं तो घडला असावा, असा अंदाज तिनं केला असावा. पण त्या बदलाचं खरं कारण मला एकट्यालाच ठाऊक होतं! स्वत:च्या लग्नाच्या पत्नीशी समागम केल्यानंतर अपराध्यासारखं वाटावं, अशी काहीशी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली होती. तसा मी बायकांच्या बाबतीत निर्ढावलो होतो; पण उल्काबद्दल माझ्या मनात एक वेगळंच स्थान होतं! तिची माझ्यावरची निष्ठा संशयातीत होती. ती व्यसनाधीन झाली होती, तेव्हादेखील मी एक-

दोन दिवस दिसलो नाही की ती बेचैन व्हायची. आता तर ती व्यसनमुक्त होती. नोकरी सुटल्यानंतर लिलियननं आणि तिनं चर्चमागच्या हॉलमधे मॉंटेसरी स्कूल सुरू केलं होतं, त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला होता. घरबसल्या या दोघींना हजार रुपये मिळत होते.

दाढी, अंघोळ आटोपून दादर गाठले. अधूनमधून पाऊस पडतच होता. छत्री डोकं तेवढं कोरडं ठेवीत होती; कमरेपासून खालचा सारा भाग भिजून चिंब झाला होता. राजकन्येच्या दाराला कुलूप पाहून मी वैतागलो. बाजूच्या ब्लॉकमधे चौकशी करावी म्हणून मी वळलो, तोच टॅक्सीतून राजकन्या उतरल्याचं पाह्यलं!

"हॅल्लो समर! कधी आलास? आणि हे काय रे, तुझी आई वारल्याचं कळवलं नाहीस मला? मी तुझी कोणी नव्हे?"

"असं कसं?" काहीतरी बोलायचं म्हणून मी म्हटलं.

"रॉबर्टकडे गेले तेव्हा कळलं मला. काय आजारी होत्या का?"

"डॅडी गेल्यापासून अंथरूणच धरलं होतं!"

"बॅड लक्! बरं, तुला एक आनंदाची बातमी सांगायचीय."

"कोणती!"

"माझ्या वकिलांनी रावेरकरांना वाटणीसाठी नोटीस पाठवली होती. माझ्या हिश्श्याची प्रॉपर्टी मला न दिल्यास दिवाणी कोर्टात दावा दाखल करू अशी भीती घातली होती त्यांना!"

"बरं, मग?"

"मग काय? त्यांचं उत्तर आलेलं आहे की, समक्ष येऊन तुमच्या वाटणीचे दागिने, सोनं, चांदी वगैरे घेऊन जा म्हणून!"

"समक्ष? माय गॉड!"

"तुला भीती वाटते?" खोलीचं कुलूप काढता काढता माझ्याकडे पाहात राजकन्या म्हणाल्या, "अरे, ते लोक कोर्टात यायला घाबरतात!"

"पण एकूण संस्थानच्या मालकीचे किती दागिने, सोनंनाणं आहे हे तुम्हाला काय ठाऊक आहे?"

"डोंट वरी! अरे, लग्न झाल्यानंतर वाड्यात अहेर वगैरे नमूद करण्यासाठी लिस्ट केली होती खासगी कारभाऱ्यांनी. त्या लिस्टची एक कॉपी रजिस्टर केलेली आहे. शिवाय सरकारात त्याची एक प्रत आहे! ते लोक तसे फसवू शकणार नाहीत."

"पण राजे, तुम्हाला तिकडे बोलवून तुमच्या जीविताचं काही भलंबुरं तर करणार नाहीत ना?"

"त्यासाठीच मी तुझी वाट पहाते आहे! आपण सात-आठजण मिळून जाऊ, सगळ्यांनाच काही मारून टाकू शकत नाहीत ते. शिवाय आपण आपल्या बंदोबस्तात जाऊ!"

"आय सी! बंदोबस्तातच जाऊ मग!"

"समर, मात्र या कामाला विलंब लावून उपयोगाचं नाही! लक्ष्मी समोर आलेली आहे, दुर्लक्ष केलं तर ती नाराज होईल!"

"एक्झॅक्टली राईट!"

राजकन्येनं रावेरला जाण्यात धोका होता हे निश्चित; पण म्हणून वाटणीचे दागिने, सोनं, चांदी त्या भीतीपोटी गमावण्यातही अर्थ नव्हता.

रेसकोर्सवर माझी बऱ्याच पोलीस अधिकाऱ्यांची ओळख झालेली होती. बंदोबस्तासाठी म्हणून येणारे काही बडेबडे पोलीस अधिकारी रेस पंटर होते. माझी-त्यांची चांगलीच जानपहेचान होती. मुंबईचे असिस्टंट कमिशनर इझॅकल हे जातीने ज्यू होते; पण

त्यांच्या दोन पिढ्या मुंबईत राह्यल्यामुळं इझॅकल हे उत्तम मराठी बोलत! या असिस्टंट कमिशनरसाहेबांची आणि विलासची चांगलीच पहेचान होती.

मी इझॅकलसाहेबांना गाठलं. त्यांना माझे आणि राजकन्येचे संबंध ठाऊक होते. ते मला गमतीनं म्हणाले, ''समर, आम्हाला एक अशी सोन्याचं अंडी घालणारी कोंबडी शोधून दे ना!''

मी हसलो आणि म्हणालो, ''तुम्हाला कशाला असल्या कोंबडीची गरज लागते? तुमच्याकडे पोल्ट्रीच आहे की!''

''बरं, बोल काय सेवा करू?'' सोनेरी रंगाची सिगारेट केस उघडून माझ्यासमोर धरून त्यांनी विचारलं. मी त्यांना सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली अन् शेवटी म्हणालो,—

''राजकन्येला आपल्या वाटणीसाठी रावेरला जाणं तर भाग आहेच, पण त्याबरोबर तिच्या सुरक्षिततेचीही व्यवस्था करायला हवी!''

''तुमच्यासोबत एक पोलीस अधिकारी दिला तर?''

''फारच उत्तम!''

''आणि मी स्वत: आलो तर?''

''चेष्टा करता आहात आपण!''

''नो! नो जोक्स्! माझं म्हैसूरला एक महत्त्वाचं काम आहे. तिकडे जायचंय आहे मला, जाता जाता रावेरला हे तुमचं काम करून मग मी पुढं जाईन, कसा वाटतो प्लॅन?''

''फार उपकार होतील आपले!''

''उपकाराची भाषा करशील तर मग कॅन्सल!''

रावेरच्या गेस्ट-हाऊसवर आम्ही उतरलो होतो. कानडी प्रदेशातलं हे मराठी बोलणाऱ्या राजाचं छोटं संस्थान, तसं पाह्यलं तर निसर्गरम्य अशा ठिकाणी वसलेल होतं. गावाच्या सभोवार नैसर्गिक अशी डोंगराची तटबंदी भिंत होती. राजवाड्यासमोर भव्य असा तलाव होता. निळ्याभोर जलाशयांत किंचित तांबूस छटा असलेल्या राजस्थानी सॅण्ड स्टोनच्या इमारतीचं प्रतिबिंब उमटलेलं होतं. जागोजागी कमळं उमललेली होती. भारतात दुर्मिळ असे काळे राजहंस (Black swans) स्वच्छंदपणे जलविहार करीत होते. पावसामुळे तो जलाशय तुडुंब भरलेला होता. पण आम्ही गेलो तेव्हा पाऊस नव्हता, म्हणूनच ही निसर्गशोभा अवलोकन करण्याची संधी मिळाली.

दुपारी आम्हाला राजवाड्यावर पाचारण करण्यात आलं. मी आणि इझॅकल गेलो. राजकन्येचे श्वशूर मोठे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी आमचं स्वागत केलं. खरं म्हणजे माझ्या कॉन्शसला ते खटकत होतं. ज्या सुनेनं असा ऐश्वर्याचा त्याग केला अन् तोंडाला रंग फासून सिनेमाच्या श्रेत्रात जाण्याची हाव धरली, तिच्या बाजूनं मी प्रतिनिधी म्हणून वाटणी घ्यायला आलो होतो. पण परिस्थितीनं माझ्यातला विवेकी अन् भावनाप्रधान समर अलीकडे अविवेकी अन् भावनाशून्य बनला होता. अविवेकाचं अन् भावनाशून्यतेचं समर्थन करायची सवय जडली होती. शिदोजी राजाला ट्रॅप करून त्याच्याकडून दरमहा दोन हजारांची खंडणी वसूल करण्यास काय म्हणावं?

मी महाराजांना माझी व इझॅकलसाहेबांची ओळख करून दिली. मेणासारखी कांती असलेल्या महाराजांनी मान डोलावली अन् ते म्हणाले...

''आमच्या घराण्यावर आजपर्यंत असा प्रसंग आलेला नव्हता; पण उद्या कोर्टात उभं रहाण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून आम्ही तिला वाटणी देण्याचं ठरवलं आहे!''

''हा आपल्या मनाचा मोठेपणा आहे, हुजूर!'' मी अदबीनं म्हणालो.

"तुम्ही तिचे प्रायव्हेट सेक्रेटरी आहात असं समजलंय मला!"

"हो, बरोबर आहे!"

"तुम्ही पूर्वी फुटबॉल प्लेअर होता!"

"हो, होतो! आपल्याला कसं समजलं?"

"रत्नापूरचे महाराज येतात ना अधूनमधून!"

"म्हणजे राजकन्या इथून गेल्या तरीही त्यांनी आपल्याशी असलेले संबंध तोडले नाहीत?"

"नाही! ते का तोडावेत? त्यांची काय चूक आहे? असो. हे दागिन्यांचं लिस्ट! रजिस्टर झालेलं आहे. याचे समान चार हिस्से करण्यात आलेले आहेत. एक माझा, एक माझ्या पत्नीचा, एक मुलाचा अन् चौथा सुनेचा! यापैकी तुम्हाला कोणता हवा तो तुम्हीच ठरवा! चॉइस इज युवर्स!"

"मी राजकन्यांना विचारून येतो. आपण ते लिस्ट माझ्याकडे द्यावं!"

"त्यांनी इकडे यायला काही हरकत नव्हती! तुम्ही आणि हे इतके मोठे पोलीस अधिकारी सोबत आणल्यानंतर आमची काय टाप आहे गडबड करायची?"

"तसं काही समजू नका, महाराज! यांना म्हैसूरला पुढं जायचं होतं, म्हणून आम्ही म्हणालो चला मिळूनच जाऊ!"

"मिस्टर ठाकूर, तुमच्यापेक्षा मी दहा-वीस पावसाळे अधिक बघितले आहेत. एनी वे, यू कॅन कॉल हर हिअर!"

मी राजकन्येला घेऊन आलो. आल्यानंतर रिवाजाप्रमाणे हुजरे मुजरे झाले. संस्थानिकांचं हे वैशिष्ट्य बऱ्याच कालावधीनंतर मला पहायला मिळत होतं. आपसात कोर्टकज्जे करतील, प्राणपणानं झगडतील; पण एकमेकांच्या समोर उभे राह्यले की लवून मुजरे!

"हे मूळचं सर्व प्रॉपर्टीचं लिस्ट तुमच्याजवळच्या लिस्टप्रमाणं आहे की नाही हे पडताळून पहा, आणि याचे हे चार हिस्से, यांपैकी कोणताही एक तुम्ही घ्या!"

राजकन्येनं बारकाईनं सर्व हिस्से अवलोकन केले आणि त्यांपैकी दोन नंबरचा हिस्सा स्वीकारला-यांत, चार हिऱ्याचे कंठे, मोत्यांच्या बांगड्या, सोन्याचे तोडे, बाजूबंद, रत्नजडित कमरपट्टा, एक डझन हिरे जडवलेली कर्णफुलं, पायातील सोन्याचे पैंजण, मोहनमाळ आणि हिऱ्याच्या निरनिराळ्या आकाराच्या चार चमक्या, लहान मुलाचा एक नवरत्नांचा पोचा, असे दागिने आणि चांदीची ताटं, वाट्या, पेले, जग, जेवण वाढण्याची भांडी, फ्लॉवर पॉटस्, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या असा मोल होता. हा सर्व ऐवज आम्ही ताब्यात घेत असताना एक पाच वर्षांचं अतिशय देखणं अन् गोंडस मूल धावत आलं आणि महाराजांना बिलगलं आणि म्हणालं,—

"पप्पा, त्या सिलीला सांगा. ती मारते मला!"

हसत हसत त्याला जवळ घेऊन त्याच्या पाठीवरून हात फिरवीत महाराज म्हणाले, "शीला! एऽशीला! का मारतेस बाळराजांना!"

ते लहान मूल वाड्यात राजकन्येनं पूर्वी पाह्यलेलं नव्हतं. ती त्या मुलाकडे आश्चर्यानं आणि कौतुकानं पहात राह्यली. इतक्यात एक वीस-बावीस वर्षांची खिश्चन पोरगी पुढं आली आणि म्हणाली,

"सर, लेसन केला नाही आणि विचारलं तर इकडे पळून आले!"

"असं नाही करायचं बेटा, जा! अगोदर लेसन करा. दुपारी जायचं ना ग्रीन पिजन

शूटला?''

''कोणाचं मूल हे?'' राजकन्येनं विचारलं.

तेव्हा महाराज किंचित स्मित करून म्हणाले, - ''हा रावेरचा राजकुमार! रत्नप्रभा, तू इथून गेलीस ते एका अर्थी बरंच झालं! नंतर गुंतागुंत वाढली असती! आमच्या बाळराजाचं एका दासीच्या मुलीवर प्रेम होतं. त्यांच्यापासूनच तिला हा मुलगा झाला होता. पण दासीपुत्र हा राजकुमार होऊ शकत नाही; म्हणून आम्ही राजकुमाराचं तुझ्याशी लग्न केलं. पण नियतीची इच्छा नव्हती की, तू इथं रहावं! तू इथून गेलीस अन् त्यामुळं आमच्याही जुनाट अशा विचारसरणीत फरक पडला. खानदान हे कधी जन्मानं मिळत नसतं, याची प्रचीती आली. मग आम्ही त्या दासीपुत्रीलाच राजवाड्यावर आणलं! कुमारांचं तिच्यावर सुरुवातीपासून प्रेम होतं म्हणून तुझ्याकडे तो कधीच आकर्षिला गेला नव्हता. ही दासीपुत्री फार शिकलेली नाही, पण तिची अदब आणि वागणं हे भल्याभल्या राजघराण्यातल्या पोरींना येणार नाही! तेव्हा असा आहे हा इतिहास! बरं, तुम्हाला आणखी काही हवं का?'' महाराजांनी अगदी सहजगत्या विचारलं.

स्वप्नात काहीतरी पाह्यल्यासारखं, ऐकल्यासारखं झालेली राजकन्या त्या बालकाकडे पहात राह्यली.

राजकन्येच्या वाटणीला आलेल्या मालात एक लहान मुलाच्या हातात बांधण्याचा नवरत्नांचा पोचा होता. तो घेऊन ती पुढे झाली अन् त्या मुलाच्या हातात बांधू लागली, तेव्हा महाराज म्हणाले, ''रत्नप्रभा, हे काय करतेस? अगं, तो पोचा अत्यंत मोलाचा आहे! त्यातला मधला हिरा तीन-साडेतीन लाखांचा आहे!''

''असू दे! ही माझी आठवण म्हणून इथं राहील!''

ते दृश्य पाहून मी आणि इझॅकल दोघेही भारावून गेलो. राजकन्येच्या स्वभावाचा अंत लागत नव्हता, हेच खरे!

आम्ही रावेर सोडीपर्यंत राजकन्येचे पती किंवा ती दासीपुत्री आम्हाला दिसली नाहीत.

इझॅकल साहेबांबरोबर आम्ही म्हैसूरला गेलो. तिथं राजकन्येनं आपल्या वाटणीला आलेले दागिने, भांडी, असा सर्व माल विकून टाकला. किती पैसे आले हे मला किंवा इझॅकलला सांगितलं नाही. सारे पैसे बँकेत ठेवून आम्ही उतरलो होतो त्या हॉटेलात आलो. आम्ही दोघे पीत बसलो होतो. आमच्या गप्पा चांगल्याच रंगल्या होत्या, पण ती येताच आम्ही बोलायचे थांबलो.

कारण रावेरला राजवाड्यात जे मूल पाह्यलं त्याच्याबाबतच आमची चर्चा चाललेली होती.

''अरे, मी तुम्हा लोकांना डिस्टर्ब तर करीत नाही ना?''

मी आणि इझॅकल राजकन्या येताच उठून उभे राह्यलो होतो. त्या बसताच आम्ही दोघेही बसलो,

''आत्ता मोकळी झाले एकदाची!''

''वुड यू लाइक टु जॉइन अस?'' इझॅकलनं राजकन्येला विचारलं.

''ऑफ कोर्स! आय वॉण्ट टु सेलेब्रेट टुडे!''

''सेलेब्रेट? फॉर व्हॉट?''

''फॉर हर शेअर इन् रावेर्स ट्रेझर!'' मी म्हणालो. इतक्यात वेटरनं रिकामा ग्लास आणून ठेवला. व्हाइट हॉर्सचा एक पेग इझॅकलनं तिच्या ग्लासात ओतला, तेव्हा ती चिअर्स करून एक घोट घेऊन म्हणाली,—

"समर, मला माझ्या वाटणीचे दागिने घेताना काय वाटलं असेल असं वाटतं तुला?"

"सांगणं कठीण आहे! कधी कधी मला तुमच्या स्वभावाचा अंदाजच लागत नाही!"

"तो खुद्द मलाच लागत नाही, तो तुला कसा लागेल! खरं म्हणशील तर ते दागिने घेण्यापूर्वी मी त्यांच्यावर सूड उगवणार आहे असं वाटत होतं; पण त्या मुलाचा इतिहास समजल्यानंतर मला वाटू लागलंय की, माझाच पराजय झाला आहे! तुझ्या वाटणीचं जे आहे ते घे आणि गप्प बैस अशा अर्थानं ते मला देऊन टाकलेलं आहे! दासीपुत्रीला राणीचा दर्जा देऊन त्या लोकांनी एक प्रकारे माझ्यावरच सूड उगवलाय असं नाही वाटत तुला?"

"राजे, हे प्रकरण इतकं नाजुक अन् गुंतागुंतीचं आहे की, माझी काही बुद्धीच चालत नाही!"

"ओ. के. फर्गेट इट! मग काय मिस्टर इझॅकल, मिसेस इझॅकल कुठं बऱ्याच दिवसांत दिसल्या नाहीत!"

"आहेत ना मुंबईतच! अधूनमधून मुलाकडे जातात पालघरला. तिथं तो पोल्ट्री चालवतो आहे ना!"

"आय सी! पण काय हो, तुमची अन् समरची इतकी कशी काय दोस्ती जमते? तुमच्या गडकरी इन्स्पेक्टरांच्या खुनांत याचा हात होता असं अजूनही लोक बोलतात!"

"लोकांच्या बोलण्याला काय अर्थ आहे? लोक काय, कसंही बोलतात! पण आमची खात्री होती ना, समर त्यावेळी बांद्र्यालाच होते!"

"समर, पुढं त्या मुलीचं काय झालं रे? जर्मनीला गेल्यानंतर काय झालं समजलं नाही?"

"मलाही काही समजलं नाही!"

"ती परत आल्यानंतर मला भेटव हं!"

"ओ ऽ के!"

"मिस्टर इझॅकल, सिनेमाक्षेत्रात तुमच्या विश्वासातला कोणी डायरेक्टर आहे का?"

"का?"

"मला एक पिक्चर फायनान्स करायचं आहे. शिवाय मला त्यात हिरॉइनचा रोल करायचा आहे."

"राजे ऽ!" मी किंचित आवाज मोठा करून म्हणालो, "अद्याप सिनेमाचं वेड तुमच्या डोक्यातून गेलेलं दिसत नाही!"

"ते मी हिरॉइन म्हणून स्वत:ला पडद्यावर बघितल्याशिवाय जाणार नाही. आजपर्यंत दुसऱ्यांची मनधरणी केली; आता स्वत:च पिक्चर फायनान्स करते!"

मी आणि इझॅकल एकमेकांकडे पहातच राह्यलो. कारण राजकन्या सिनेमाच्या क्षेत्रात पडणार म्हणजे रावेरला जी संपत्ती हाती आली तिची वाट लागणार हे अगदी सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट होतं.

"मे आय सजेस्ट यू प्रिन्सेस वन् थिंग?" इझॅकल सिगारेटचा झुरका घेऊन म्हणाले.

"काय सुचवता तुम्ही?"

"तुमच्या वाटणीला आलेले दागिने विकून तुम्ही जे पैसे केले आहेत ते चांगल्या सुरक्षित अशा ठिकाणी गुंतवा-मुंबईला एखादी बिल्डिंग घ्या, अगर बँकेत दीर्घ मुदतीनं ठेवा. तुम्हांला दरमहा मोठं व्याज येईल! अन् अशी व्यवस्था झाल्यानंतर उरलेल्या पैशाचं काय करायचं ते करा!"

राजकन्येनं व्हिस्कीचा एक घोट घेतला आणि ती मोठ्यानं हसत म्हणाली,

"कोणासाठी म्हणून मी ही व्यवस्था करू! माझं कोण आहे? ना मूल ना बाळ! मी हे पैसे शिल्लक ठेवणार नाही!"

"म्हातारपणी काय खाल?"

"म्हातारपण येईपर्यंत जगेन अशी गॅरंटी आहे का?"

परवा रावेरच्या महाराजांनी आपल्या पुत्राचं प्रेमप्रकरण सांगितल्यापासून राजकन्येच्या वागण्याबोलण्यात एक निराळीच छटा उमटली होती. ती निश्चित कोणती अवस्था म्हणावी, हे मला समजत नाही. पण ती त्या क्षणापासून काहीशी चमत्कारिक वागू लागली होती, यात संशय नाही!

रात्री जेवणानंतर मी आणि राजकन्या खोलीत आलो. इझॅकल पलीकडच्या खोलीत गेले. राजकन्या सिगारेट ओढत कॉटवर पडली होती. मी पलीकडे पेपर चाळत होतो. पण स्कॉचच्या मादक धुंदीनं पेपरच्या अक्षरांवर नजर ठरत नव्हती!

"समर! प्लीज कम हिअर!"

आज इथं अशी काहीतरी गडबड होणार ही मला शंका होतीच. मी उठून कॉटजवळ गेलो. माझ्या हाताला धरून आपल्या जवळ ओढून घेत राजकन्या म्हणाली, —

"खरं असेल का रे ते सगळं?"

"कशाबद्दल म्हणता तुम्ही!"

"रावेरच्या राजकुमारांना दासीपासून ते मूल झालं असेल?"

"मला तरी खरं वाटतं! अशा खोट्या गोष्टी सांगण्याचं कारणच काय त्यांना?"

"अन् त्या मुलाचे फिचर्स अगदी रावेर नरेशांच्यासारखेच होते. बाकी एका अर्थी बरं झालं, नाही?"

"मला नाही बरं वाटत! दासीला राणीचा दर्जा द्यावा लागला त्यांना!"

"पण रावेरचे थोरले महाराज काय म्हणाले विसरलास तू!"

"काय म्हणाले?"

"खानदान हे जन्मानं लाभत नसतं! याचा अर्थ ती दासीपुत्री खानदानी आणि मी? म्हणून अजूनही वाटतं की, त्यांच्यावर सूड उगवावा!"

"राजे, रात्र बरीच झालीय, शिवाय उद्या सकाळी आपल्याला परत निघायचं आहे. इझॅकलला परवा ड्युटीवर हजर व्हायचं आहे."

"लेट हिम गो अहेड! तो जाऊ दे ना पुढं. आपण नंतर दोन दिवसांनी जाऊ!"

"पण अनायासे मुंबईपर्यंत त्यांची गाडी मिळतेय आपल्याला!"

"मी येणार नाही! तुला जायचं असलं तर जा!"

"पण का? त्यांच्यासोबत का नको?"

"मला वाटतं म्हणून!"

बोलता बोलता राजकन्या माझा हात कुरवाळत होती. तिची इच्छा काय आहे हे मला समजत होतं. पण मला आज मूड नव्हता.

"समर, मी तुला एक पन्नास हजार दिले तर तू काय करशील त्या पैशाचं?"

"मला नकोत तुमचे पैसे!"

"मग शिदोजींच्या दोन हजारातले एक हजार का घेतलेस?"

"त्यावेळी गरज होती मला!"

"आता कशानं सरली गरज?"

"उल्कानं माँटेसरीचा वर्ग सुरू केला आहे. पाचशे रुपये मिळवते ती!"

''बायकांच्या पैशावर जगणं हे तुझ्यासारख्या राज-क्षत्रियाला शोभतं का?''

''लग्नाच्या पत्नीच्या पैशावर जगणं निषिद्ध नसावं!''

''कोण लग्नाची पत्नी? उल्का की अलका? अरे, उल्काला तू पत्नी समजतोस, पण ती तुझी पत्नी होऊ शकत नाही, आणि एक सांगू तुला, तू तुझ्या नीतीअनीतीच्या कल्पना वाऱ्यावर सोडून दे! कधी कधी तू त्या देतोसच म्हणा!''

राजकन्येला निश्चित काय म्हणायचं होतं हे समजेना. मी तिच्या हातातून माझा हात सोडवून घेतला आणि माझ्या कॉटवर जाऊन पडलो. राजकन्येशी फारसे संबंध ठेवू नये असं एक मन सांगत होतं, तर दुसरं म्हणत होतं, तू हिच्यापासून दूर गेलास की कावळे जमावेत तसे लोक हिच्याभोवती जमतील आणि हिला लुबाडतील. आपण फार धूर्त आणि धोरणी आहोत असं जरी हिला वाटत असलं तरी वास्तव जगाची हिला मुळीसुद्धा कल्पना नाही.

सकाळी सहाला इझॅकलनी निघायचं असं सांगितलं होतं, पण राजकन्येनं आपण नंतर येणार असं सांगितल्यानं इझॅकलना 'तुम्ही पुढं जा' असं सांगून येऊन परत झोपलो. जाताना इझॅकलची जरुरी नव्हतीच!

त्या रात्री मला मध्यरात्रीपर्यंत झोप आली नाही. डोक्यात एकसारखं अशुभ कल्पनांनी ठाण मांडलं होतं.

सकाळी इझॅकल केव्हा गेले हे आम्हाला समजलंदेखील नाही. अंघोळ आटोपून आम्ही ब्रेकफास्ट करायला बसलो, तोच ती भयंकर बातमी समजली. इझॅकलची मोटार रस्त्यात गुंडांनी अडवली आणि त्यांना बेदम मारहाण झाली होती. त्यांचा ड्रायव्हर अत्यवस्थ असल्याचंही समजलं. जखमींना हॉस्पिटलमधे दाखल करण्यात आल्याचं समजताच मी आणि राजकन्या त्यांना पहायला गेलो.

इझॅकलना कपाळावर मार लागला होता. ड्रायव्हरचं कॉलरबोन तुटलं होतं. एक मालट्रक रस्त्यावर उभा होता, त्याच्या ड्रायव्हरनं हात केला म्हणून इझॅकलच्या ड्रायव्हरनं गाडी थांबवली. गाडी थांबवताच पाच-सहा लोक ट्रकच्या मागून घुसले आणि त्यांनी इझॅकलला आणि त्यांच्या ड्रायव्हरला बेदम मारलं होतं. या राजरस्त्यावर अशी वाटमारी बऱ्याच वर्षांत घडलेली नव्हती. त्या दिवशीच नेमकी ती घटना अन् तीही इझॅकलच्या गाडीला!

''वुई आर एक्ट्रिमली सॉरी मिस्टर इझॅकल!'' राजकन्या म्हणाली.

''पण हे का घडावं?'' मी विचारलं.

''समर!'' एक क्षणभर थांबून इझॅकल म्हणाले, ''माझ्या गाडीवर कोणीतरी पाळत ठेवली असली पाहिजे. गेले दोन दिवस राजकन्या म्हैसूरमध्ये आपले दागिने विकत होत्या ना? तेव्हा ही गाडी अडवून लुबाडली तर चांगला लग्गा मिळेल असा त्यांचा अंदाज असावा. पण गाडीत काहीच न मिळाल्यानं त्यांनी आम्हांला पिटलं आणि निघून गेले!''

''नंबर नाही पाह्यला?''

''नंबर पाह्यला; पण तो बनावट असण्याची दाट शक्यता आहे! तुम्ही दोघे आला नाहीत माझ्यासोबत, फार बरं झालं! राजकन्या नव्हत्या हे माझं नशीब!''

''पण माझ्यामुळं तुम्हाला मार खावा लागला, मिस्टर इझॅकल!'' राजकन्या म्हणाल्या.

''चालायचचं! आम्हीही गुन्हेगारांना आजपर्यंत काही कमी मारलेलं नाही. या वेळी त्यांनी थोडीशी परतफेड केली, असं समजायचं! अशा वेळीदेखील इझॅकल आपली विनोदबुद्धी विसरायला तयार नव्हते.''

म्हैसूरच्या पोलिसांना जखमी झालेले इझॅकल हे मुंबईचे असिस्टंट पोलीस कमिशनर आहेत हे समजताच त्यांनी धावपळ करायला सुरुवात केली. पण रस्त्यावर उभं राहून नेमकी

मोटार अडवणारे काही कच्च्या गुरुचे चेले असतात की काय?

सहाव्या दिवशी आम्ही मुंबईला पोहोचलो. येताना बेंगलोरहून विमानानं मुंबईला आलो. राजकन्येला दादरला पोहोचवायला गेलो, तेव्हा त्या म्हणाल्या, ''आता समजलं ना? मी त्या दिवशी इझॅकलसोबत जायला नको का म्हणाले ते?''

''उगाच काहीतरी सांगू नका! तुम्ही ती गाडी थांबवून लुटली जाणार आहे हे काय ठाऊक होतं थोडंच?''

''तसं नाही रे, काही काही वेळा माणसाला अशुभ अशा घटना अंत:प्रेरणेनं अशा समजतात!''

''पण एकूण बरं झालं! मी आता लवकर काही तुमच्याकडे येणार नाही, अन् मला वाटतं, आता तुम्हाला माझ्या मदतीचीही फारशी गरज लागणार नाही!''

''म्हैसूरमधे बोलले त्याचा मनात राग धरलेला दिसतोस?''

''राग असा नाही, पण जिथं आपल्या शब्दाला किंमत नाही, तिथं वारंवार येणंजाणं बरं नव्हे!''

''समर, असं नको रे बोलू! तुझ्याविषयी मला काहीतरी वाटतं म्हणून अधिकारवाणीनं बोलते! तुला आवडत नसेल तर बोलणार नाही. बरं, परवा पुण्याला येणार?''

''पुण्याला काय आहे?''

''रेसेस सुरू आहेत ना? बरेच दिवस झाले रे!''

मी क्षणभर विचार केला. विलासची दोन-तीन पत्रं आली. त्याच्या बांधकामावर मला लक्ष देता येणं शक्य नव्हतं; पण तरीही मला येता येत नाही, असं पत्र लिहून कळवणं तरी भाग होतं. पण मी तेही केलं नव्हतं. तेव्हा चटकन् बोलून गेलो, ''जाऊ या!''

मुंबई ते पुणे हा टॅक्सीचा किंवा खासगी गाडीचा प्रवास अत्यंत सुखकर! तीन साडेतीन तासात पुणं येतं, नयनरम्य अशा घाटातून गाडी केव्हा खंडाळा ओलांडते समजतदेखील नाही. पाऊस पडल्यानं पुण्याचा परिसर हिरवागार झाला होता. तसा पुण्याचा परिसर नेहमीच डोळ्याला सुख देणारा, पण पावसाळा सरल्यानंतर त्याची शोभा आणखीच खुलते. आताशी पुण्यालाही लोकवस्तीची भयानक 'लागण' व्हायला लागलीय, पुण्याचं स्वास्थ्य, पुण्याचा भाजीपाला, दूध दुर्मिळ होत चाललंय.

हॉटेल हेवर्डस्मधे गेल्यानंतर माझ्या गतस्मृतींना आणखी एकदा उजाळा मिळाला. तिथला मालक, वेटर्स, स्वीपर्स सर्व माझ्या परिचयाचे झाले होते.

''थर्ड फ्लोअरची खोली रिकामी आहे?''

''होय साहेब, काल रात्रीच मोकळी झाली!''

''जा, साफ करून घ्या!'' मी वेटरला फर्मावलं.

या हेवर्डस् हॉटेलमधे तिसऱ्या मजल्यावर एकच खोली होती. तिथून पूर्वेकडचा पुण्याचा सारा परिसर नजरेच्या टप्प्यात येत होता. पुणं संपतं आणि वानवडी गावठाणाचा भाग सुरू होतो तो भाग तिथून स्पष्ट दिसत होता. मागे वळून पाह्यलं की चर्च, वँâप एरिया, अन् दूरवर क्षितिजाला रेघ मारल्यासारखा दिसणारा सिंहगड!

गच्चीत माझ्या शेजारी अगदी खेटून राजकन्या उभ्या होत्या. ''समर, मला कधी कधी पुण्यात येऊन स्थायिक व्हावं असं वाटतं!''

''मुंबईपेक्षा रहायला पुणं फार उत्तम, राजे!''

''पण मुंबईत कोण कोणाची पंचाईत करत नाही रे! गाव लहान झालं की चांभारचौकशा वाढतात!''

"पण इथं पुण्यात कोण येणार आहे तुम्हाला उपद्रव द्यायला?"

"ते काही सांगू नकोस! आता मी रावेरला जाऊन माझी दागिन्यांची वाटणी घेऊन आले आहे एवढं समजायचा अवकाश - माझ्याकडे पाहून डोळे मोडणारे, पाठ फिरवणारे असे अनेक महाभाग भुतासारखे जमतील! पण मला आता कोणाकोणाचं तोंड बघणं नको झालंय!"

"असं म्हणून कसं चालेल? तुमच्याविषयी जिव्हाळा असणारी माणसं तुमच्याकडे आली तर तुम्ही त्यांनाही भुतावळच म्हणणार का?"

"माझ्याकडे निर्हेतुक अशी येणारी माणसं जवळजवळ नाहीतच! कोणाचा काहीतरी स्वार्थ असतोच! आजपर्यंत मला एकच माणूस नि:स्वार्थी वाटला."

"कोण?" अतिशय जिज्ञासेनं मी विचारलं.

"तूच की! दुसरं कोण?" हसतहसत राजकन्या म्हणाल्या, "आपण एक छोटा बंगला घेऊन टाकू या कॅंप एरियात किंवा वानवडी भागात! मला मुंबईचा वैताग आला आहे आताशी! हिवाळ्यात मुंबईत निदान थोडी हवा बरी असते; पण उन्हाळ्यात काय भयानक प्रकार असतो रे! बाप रे बाप! पावसाळा तो तसा! रस्त्यावर कमरेइतकं पाणी, सारी वाहनं बंद, तर उन्हाळ्यात नळाला पाणी नाही, पण अंगातून मात्र घामाच्या धारा! अशा दमट हवेत रहायला नको वाटतं! पण काय आहे, तिथं कोण कोणाची उचापत करीत नाही म्हणून नाईलाजानं रहावं लागतं, झालं!"

"राजे, मी जरा विलासला भेटून येतो. त्याचा माझ्यावर थोडा रोष झाला आहे!"

"ये भेटून, तोपर्यंत मी माझं सारं उरकून घेते!"

मी खाली येऊन विलासला घरी फोन केला.

"हॅल्लो? कोण वहिनी का?"

"हो, आपण कोण?"

"मी समर बोलतो आहे. विलास कुठंय्?"

"ते बांधकामावर गेलेत! बारा-साडेबाराला परत येतील आणि लगेच कोर्सवर जातील! आज रेसेस आहेत ना?"

"हो हो! कल्पना आहे मला!"

"इकडे का नाही आलात? मुलं सारखी आठवण काढतात!"

"येईन येईन!"

"सोबत कोणीतरी तुम्हाला इकडे न सोडणारी व्यक्ती असेल!" इंदूवहिनीनं खोचक असा प्रश्न टाकला.

"छे: छे:! वहिनी, तसं काही समजू नका हं! पण काय आहे — राहू दे — समक्ष भेटल्यावरच सांगेन. विलास बांधकामावरच आहे ना?"

"हो हो, नऊ वाजता गेलेत!"

मी विलासला बांधकामावर जाऊन गाठलं. माझ्याकडे पाहून आश्चर्य वाटल्यासारखं करीत तो म्हणाला, "अरेच्चा! इकडे कुठं वाट चुकलास?"

"मुद्दाम तुला भेटायला आलो!"

"भाग्य आमचं!" हवेत हात उडवून विलास म्हणाला, "दोन-तीन पत्रं पाठवली, एकाचंही उत्तर नाही, आमची काय चूक झाली असेल तर सांगा, हुजूर!"

"मी हुजूर?" हसतहसत विलासच्या खांद्यावर हात ठेवीत मी म्हणालो.

"मग कोण? राजकन्या फिदा झालेला माणूस हलकासलका असतो का?"

"बोल बाबा, बोल! तुला बोलायला योग्य असं कारण मिळालेलं आहे! पण काय रे, आज काही चान्स आहे का?"

विलास माझा हात हातात घट्ट धरून म्हणाला, "पैसे कमावण्याची भूक भागत नाही अजून? अरे, दुसऱ्यांना आपल्या नशिबाची परीक्षा पाहू दे ना जरा!"

"विलास, तुझा काहीतरी गैरसमज झाला आहे! मी बेकारच आहे. उल्का माँटेसरीचा वर्ग चालवते, म्हणून दोन वेळा जेवतो. माझी प्राप्ती म्हणशील तर शून्य!"

"हे बघ, माझा खर्च जर एखादी राजकन्या चालवू लागली तर मला कमावण्याची गरजच काय? पैसा लागतो तो खर्चासाठी. खर्चच जर परस्पर भागत असला तर पैसा घेऊन करायचंय काय? बरं, ते जाऊ दे! तुझी आई गेल्याचं कळलं. तू तिथंच होतास म्हणे तेव्हा?"

"हो! पण तुला माझ्या हालचालीची ही बित्तंबातमी लागते कशी?"

"कशी? समर, तू काय आता साधीसुधी आसामी राह्यलेला नाहीस! सलिमा प्रकरणानं उभं पुणं तुला ओळखतं, गडकरी इन्स्पेक्टरच्या खून प्रकरणापासून मुंबई तुला ओळखते आणि आता राजकन्या रत्नप्रभा तुझ्यामागे सावलीसारखी वावरते म्हटल्यावर तुला उभ्या महाराष्ट्रात कोण ओळखणार नाही? पण ही राजघराण्यातील माणसं भलती चंचल असतात बरं का? मी अधिक सांगण्याची गरज नाही!"

"फर्गेट इट! विलास, तुझी प्रथम क्षमा मागायची आहे!"

"कशाबद्दल?"

"मी तुझ्या सूचनेप्रमाणं या बांधकामाची देखरेख पाहू शकलो नाही म्हणून!"

"जाऊ दे! तुझ्या वेळेला आता भलतं मोल आलं आहे. वास्तविक तू पुण्यात रहात होतास तेव्हाच मी हे बांधकाम सुरू करायला हवं होतं. बांधकामासाठी लागणारं सिमेंट, लोखंडही त्या वेळी स्वस्त होतं. अनायासे तुझी देखरेख राह्यली असती!"

"खरं सांगू विलास, तू विश्वास ठेव अगर ठेवू नकोस, मी एका विचित्र अशा भोवऱ्यात सापडलो आहे! धड बुडतही नाही आणि त्यातून बाहेरही पडू शकत नाही, अशी माझी अवस्था झालीय्! एक संपलं की दुसरं काहीतरी सुरू होतं!"

"याचंच नाव जीवन!"

"पण मला नाही वाटत की, असलं गतिमान आयुष्य कोणी अनुभवलं असेल! फार डोकेदुखी, अनंत यातना!"

"जया अंगी मोठेपण तया यातना कठीण!" हसतहसत विलास म्हणाला आणि त्यानं मनगटातल्या घड्याळाकडे पहात म्हटलं, "घरी जाऊ! आज मुलं घरीच आहेत!"

"चल!"

विलासनं ड्रायव्हिंगला मला बसवलं आणि विचारलं, "उल्का काय म्हणते? ठीक चाललंय ना?"

"फाइन्! मध्यंतरी तिनं काय कमी त्रास दिला नाही!"

"आय लर्न्ट दॅट शी वॉज ॲडिक्टेड टू ड्रिंक्स?"

"ड्रिंक्स? अरे, ड्रिंक्स ॲण्ड नार्कोटिक्स टू ऽ! शेवटी एक बिचारी डॉक्टरीण भेटली, तिनं रात्रंदिवस प्रयत्न करून हिचं व्यसन सोडायला लावलं!"

"कमाल आहे! एकदा लागलेलं व्यसन माणूस मेल्याशिवाय सुटत नाही!"

"पण आमच्या चोक्सीबाईनं मात्र चमत्कार करून दाखवला बुवा! हॅटस ऑफ टु हर!"

"बरं समर, तुझ्या पहिल्या बायकोचं काय चाललंय?"

"ती हायस्कूलला मास्तरीण आहे!"

"छान! एक माँटेसरी चालवते, तर दुसरी हायस्कूल, पण तुला शिकवायला मात्र कोणीच दिसत नाही?"

"ते का? राजकन्या आहे की!" हसतहसत मीही उत्तर दिलं.

विलासची मुलं मला पाहताच जवळ येऊन बिलगली. "अंकल! आता आम्ही सोडणार नाही तुम्हाला! तुम्ही आऊटहाऊसमधेच रहायला पाहिजे."

त्यावर विलास टायची गाठ सोडतासोडता म्हणाला,

"अरे अजय, तो आता आपल्या आऊटहाऊसमधे कसा राहील? पॅलेस घेईल तो! खरंच हं समर, समोर बंडगार्डनशेजारी बुवासाहेब महाराजांचा बंगला विकायला निघाला आहे. फार उत्तम कन्स्ट्रक्शन आहे. पुढेमागे भरपूर मोकळी जाग आहे. जर रत्नप्रभाराजे घेणार असतील तर विचार!"

"माझीसुद्धा इच्छा तशीच आहे विलास! हाती आलेले पैसे तिनं असे कशात तरी गुंतवावेत असं मला वाटतं. ती ऐकणार नाही. सिनेमाचं तिच्या डोक्यातलं वेड काही केल्या जायला तयार नाही."

"विनासायास मिळालेला पैसा असा नेहमी कुठंतरी पळवाट काढत असतो, तिची चूक नाही ती समर."

दुपारी जेवायला हॉटेल हेवर्डसवर येईन म्हणून राजकन्येला सांगितलं होतं, पण आता विलास आणि मुलं मला जेवल्याशिवाय सोडणार नाहीत; म्हणून मी राजकन्येला फोन केला. 'जेवायला येत नाही' असा.

रेस असलेल्या दिवशी विलास जेवत नसे. सकाळी एक दीड कप चहा घेईल, तेवढाच. मी मात्र बऱ्याच दिवसांनी मुलांच्या पंगतीला जेवायला बसलो.

"अंकल, तुम्ही आता इकडे कधी रहायला येणार?"

"येणार येणार! लौकरच येणार!" काहीतरी बोलायचं म्हणून मी बोललो, तेव्हा इंदूवहिनी भात वाढताना मला म्हणाल्या, "उल्काचा स्वभाव बदलला की नाही?"

"काय सांगू, वहिनी? तिला एकदा इकडे घेऊनच येतो म्हणजे पहा! अतिशय शांत अन् विचारी झालीय्. आयुष्यात झळ बसल्याशिवाय माणसाचा कायापालट होत नाही."

विलास आतून कपडे करून बाहेर आला. त्यानं माझं बोलणं ऐकलं असावं. तो हसत हसत म्हणाला, "तुझ्यासारख्याशी गाठ पडल्यावर त्या बिचारीला आपला स्वभाव बदलल्याशिवाय दुसरा इलाजच उरला नसेल."

"जोक्स् अपार्ट विलास. बाय गॉड सांगतो, शी इज कंप्लिटली चेंज्ड!"

"एकदा घेऊन ये ना." विलास म्हणाला.

"आणीन, नक्की आणीन! दोन दिवस रहायला आणतो. आता काय, तिला रजा मागा, रजेसाठी मनधरणी करा, असा काही प्रकार करावा लागत नाही. स्वत:चीच माँटेसरी आहे. दोन दिवस बंद ठेवली तरी कोणी विचारणार नाही. पण तुम्ही या ना वहिनी एकदा आमच्याकडे!"

"यांना सांग! बाकी, बायकांना सोबत न्यायला पुरुषांना का आवडत नाही हेच समजत नाही."

"कारण सोपं आहे, वहिनी!" हसत हसत मी म्हणालो, "आपली लफडी तुम्हा बायकांना समजू नयेत हा एकच उद्देश असतो त्यात."

"तू सांगतोस समर हे? अरे, लफडी तुझी जास्त की माझी?"

"माझी चव्हाट्यावर येतात, तुझी येत नाहीत, एवढाच फरक!"

"यू ऽ स्वाइन्!" असं म्हणून विलासनं माझ्या पाठीत एक गुद्दा मारला.

आयुष्यात भाराभर मित्र करण्यापेक्षा जिवाभावाचे चारदोनच असावेत. विलासचे आणि माझे संबंध असेच अकृत्रिम जिव्हाळ्यानं जखडले गेले होते. त्याच्या बांधकामासाठी आलो नाही म्हणून तो थोडासा रागावला, उपरोधानं बोलला हे खरं; पण लगेच ते तो विसरूनही गेला.

जेवण झाल्यानंतर मी विलासच्याच गाडीतून निघालो. विलास मला हॉटेल हेवर्डसजवळ सोडून पुढे जाताना म्हणाला, "समर, एवढा या हॉटेलचा इतिहास माहीत असूनही तू अद्याप इथंच उतरतोस?"

"प्रत्येक वेळी तसं काही घडत नसतं!"

"बा ऽऽ य" करीत हसत विलास रेसकोर्सकडे निघून गेला.

मी खोलीवर आलो, तो काय? राजकन्या एखाद्या आंग्लनटीसारखी नटून बसलेली. केसांची हेअर स्टाइल, तोंड रंगवलेलं, ओठांना लिपस्टिक चोपडलेली! खोल गळ्याचं स्लीव्हलेस ब्लाउज आणि बेंबीच्या खाली नेसलेली साडी! का कुणास ठाऊक, मला तिचा रागच आला तो अवतार पाहून! नुकताच मी विलासच्या घरी इंदूवहिनींचं साधं, सालस असं रूप पाह्यलं होतं, त्या पार्श्वभूमीवर एकदम नट्टापट्टा केलेली ही राजकन्या पहाताच माझा मस्तकशूळ उठला.

"राजे, काय अवतार केलायत हा?"

"का? काय झालं?"

"इथं पुण्यात आपल्याला बरेच लोक ओळखतात."

"ओळखेनात? त्यांच्या बापाचं काय जातं?"

"त्यांच्या जात नाही; पण तुम्ही अशा वेषांत रेसकोर्सवर जाणार असाल तर मी येणार नाही."

"नको येऊस! तू बाहेर गेलास की, असाच काहीतरी फॅड डोक्यांत घेऊन येत असतोस! मी अगदी अश्शी रेसकोर्सवर जाणार!"

"बेशक जा! तुम्हाला कोण अडवणार आहे?"

"लग्न झालेला नवरा मला अडवू शकला नाही, जन्मदात्या बापानं मला शिकवायचा कधी प्रयत्न केला नाही, तेव्हा तू काही सांगितलंस तर मी ऐकेन असं वाटतं तुला?"

"मी सांगणारच नाही! पण फॅशन करताना माणसानं आपलं समाजातलं स्थान विसरून जाऊ नये."

"बस बस्! आलं लक्षात! कुमारी कसल्या फॅशन करीत होती हे ऐकलंय मी! पण ती तुला आदर्श वाटली."

"राजे, कुमारी मरून गेली. मेलेली माणसं देवरूपाला जातात, त्यांची निंदानालस्ती करणे हे शहाणपणाचं लक्षण मानलं जात नाही, आलं का लक्षात?"

"आलं आलं! मी चालले कोर्सवर! इफ यु वॉण्ट, यू कम!"

राजकन्या पाठ आणि पोट उघडं सोडलेली साडी नेसून जिन्यावरून खाली उतरून गेली. मी पायातले बूट सोडून दाराजवळ फेकले आणि तंगड्या पसरून कॉटवर आडवा झालो.

राजकन्येच्या स्वभावाचा अंदाजच करता येत नव्हता.

-०-०-

३८

साडेसहा वाजता राजकन्या रेसकोर्सवरून परतल्या. पर्स टेबलावर फेकली. दुर्बिण कॉटवर ठेवली अन् बाथरूमला गेल्या. बाथरूममधून बाहेर आल्यानंतर साडी बदलली आणि माझ्याकडे पहात म्हणाल्या, —

"तू आला नाहीस, फार बरं झालं! वर्स्ट डे! सगळी नावाजलेली घोडी हरली-खप्पड घोड्यांनी रेसेस जिंकल्या! पुन्हा रेसला येऊ नये असं वाटलं!"

मी तसाच कॉटवर पडून उशाला हाताचा टेकू देऊन ऐकत होतो.

"समर, आज मला मस्तपैकी व्हिस्की हवी. डोकं गरगरायला लागलंय. व्हिस्कीशिवाय शांत होणार नाही!"

तरीही मी तसाच निश्चल!

"अरे, तुला झालंय काय? बोलत का नाहीस?" असं म्हणत राजकन्येनं टॉवेलनं तोंड पुसलं, पावडर लावली, केसांवरून ब्रश फिरवला आणि माझ्याकडे येत म्हणाल्या, "मी फॅशन केल्याचं तुला आवडत नाही हे समजलं! यापुढं मी पांढरी वॉयल आणि पांढरं ब्लाऊज वापरते, मग झालं?"

ड्रेसिंग टेबलावरच्या सौंदर्य प्रसाधनांकडे बोट दाखवून मी म्हणालो, "आणि हे?"

"तेसुद्धा वापरणार नाही. प्रॉमिस!"

"अशी एकाएकी उपरती कशानं झाली?"

"आपल्या आवडत्या माणसासाठी काहीतरी त्याग करावा असं वाटतं!"

"कोण आवडतं?"

"तूच की!"

राजकन्या बोलतबोलत माझ्या जवळ आल्या आणि माझ्या कुशीत शिरल्या. कुणाही शहाण्या माणसाला राजकन्येच्या या हालचाली वेड्या स्त्रीच्या आहेत असं वाटलं असतं. मी त्यांना दूर करीत म्हणालो, "माझी एकही गोष्ट तुम्ही ऐकत नाही. मला यापुढं तुमच्याशी बोलण्याची इच्छा नाही!"

राजकन्या मोठ्यानं हसल्या आणि माझ्या कपाळाचं चुंबन घेऊन म्हणाल्या, "रागावलास म्हणजे खरोखरच हँडसम दिसतोस हं, समर! तू रागावत जा, मला फार आवडतात तुझ्या चेहऱ्यावरचे रागावलेले भाव!"

माझ्या क्रोधाला क्षणार्धात ढासळून टाकण्याची किमया राजकन्येच्या त्या बालिश वक्तव्यात आणि हालचालीत होती.

मी उठलो. चुरगळलेले कपडे झटकले आणि म्हणालो, "यापुढं रेसला जर जायचं तर दोनचारशेपेक्षा अधिक पैसे न्यायचे नाहीत!"

"कबूल! रेसकोर्सवर जाताना फॅशनही करायची नाही. कोपरापर्यंत पांढरं ब्लाऊज आणि पांढरी साडी नेसायची! नो लिपस्टिक, नो मेकअप, ॲण्ड नो हेअरस्टाइल!"

"राजे, तुम्हाला चेष्टा वाटते; पण नवऱ्याला सोडून आलेली राजकन्या म्हणून उभं रेसकोर्स तुम्हाला ओळखतं, अशा वेळी तुम्ही साधं वागणं अत्यावश्यक आहे! रेस खेळायची, तिलादेखील काही मर्यादा हव्यात! किती पैसे घालवले आज?"

"साडेनऊ हजार!"

"या गतीनं जर पैसे उडवू लागलात तर उद्या तुमचं काय होईल कल्पनाच करवत नाही मला!"

"अरे, तू उठसूठ उद्याची बात कशाला करतोस? तू स्वत: हवं तेवढं रॅश वागलेलं चालतं?"

"मी पुरुष आहे! उद्या बोरीबंदरवर हमाली करायची तयारी आहे माझी. तुमच्याकडेच पैसे संपले की तुम्ही काय कराल? वाटणी घेताना पोटगीची रक्कम यापुढं मागणार नाही असं लिहून दिलेलं लक्षात आहे ना?"

"सगळे पैसे संपले तरी निदान पाच वर्षं शिदोजींचे महिना दोन हजार तरी कुठं गेले नाहीत!"

"शिदोजी मिनिस्टर आहेत म्हणून इज्जतीला घाबरतात, उद्या मिनिस्टरशिप गेली की ते डरतील असं नका समजू! महा पाताळयंत्री माणूस आहे तो!"

"पण राजा म्हणून तरी प्रेस्टीज आहे ना?"

"राजा आणि राणी! बोललो तर राग येईल, राजे! या दोन्ही शब्दांना आजकाल पत्त्याच्या खेळाशिवाय कोणी ओळखतदेखील नाही!"

"खरंय तू म्हणतोस ते! बरं, पण डोकं फार चढलंय रे, व्हिस्की मागवतोस ना?"

"डोकं चढलं तर ॲस्प्रो मागवतो, व्हिस्कीच कशाला हवी."

"समर, मीr तुझं ऐकते म्हटल्यावर तू हे फारच करू लागलास हं! ऊठ बघू!"

राजकन्येनं मला हाताला धरून बळेबळेच उठवलं. मी ओळखलं, अधिक छेडण्यात अर्थ नव्हता!

तो काळ कडक दारूबंदीचा होता, पण सर्वत्र अन् सर्व प्रकारची दारू मुबलक मिळत होती, पण ती चोरून आणावी लागत होती अन् चोरून प्यावी लागत होती. मोठमोठ्या हॉटेलच्या मॅनेजर्सना, वेटर्सना आणि स्वीपर्सना अशा चोरट्या दारूविक्रीची ठिकाणं ठाऊक असत, पण त्या बेट्यांना बाटली आणायला पाठवलं की मधे आपलं कमिशन हाणायचे. म्हणून मी स्वत:च हेवर्डस् हॉटेलच्या पिछाडीस असलेल्या अन्तोनीच्या घरात गेलो. अन्तोनी मला ओळखत होता. विलासच्या घरी असताना अन्तोनीकडून बऱ्याच वेळा मी 'श्वेतअश्व' घेऊन गेलो होतो. माझ्याकडून तो वाजवी किंमत घ्यायचा; कारण त्याला अधूनमधून माझ्याकडून घोड्यांच्या टिप्स मिळत होत्या. या जगात कोणीही कोणासाठी फुकट काही करत नाही. कुणाकडून काहीतरी हवं असतं म्हणून माणूस त्याला काहीतरी द्यायला तयार असतो!

अन्तोनीशी जरा गप्पासप्पा करून मी हेवर्डस् हॉटेलवर आलो. राजकन्येनं कमालच केली. पेटीतली पांढरी साडी अन् पांढरा ब्लाऊज घालून त्यांनी दार उघडलं!

"कशी दिसते या वेशात?"

"सुरेख!" काखेतली कागदात गुंडाळलेली बाटली मी टेबलावर ठेवली आणि सोडा मागवण्यासाठी बेल दाबली.

"राजे! मी म्हणतो ती प्रत्येक गोष्ट चेष्टेवारी नेऊ नका. तुमच्याजवळ आज लाखो रुपये आहेत, मला त्यातला एक छदामही नको आहे. तुमच्या हयातभर तुम्ही तो पैसा विचारानं खर्च करावा, एवढीच इच्छा आहे!"

''थँक्स फॉर द् ॲडव्हाइस! ग्लास भर लवकर.''

''सोडा तरी येऊ दे ना?''

दारात आलेल्या वेटरला सोडा आणायला सांगून मी व्हाईट हॉर्सच्या बाटलीचं सील उघडू लागलो.

''समर, मी तुला इतकी इन्सल्टिंग बोलते, रागावते, तुझं ऐकत नाही, मग तू माझ्यापासून दूर का जात नाहीस?''

''जावं अशी इच्छा आहे का?''

''इच्छा नाही रे, पण आपलं वाटलं, म्हणून विचारते, फारसं सीरियसली घेऊ नकोस!''

''काही दिवस तुमच्यापासून दूर रहायचं म्हणतो आहे, पण भीतीही वाटते!''

''कसली?''

''पैशासाठी तुमच्या जीविताचा कोणीतरी घात करील याची!''

''करीनात? केव्हातरी मरायचंच आहे ना?''

''मरण हे कोणालाच चुकलेलं नाही राजे, पण जिनं एकदा मला जीवदान दिलं तिचं मरण पहायला माझं मन राजी होत नाही, हीच अडचण आहे!''

वेटरनं सोड्याचा क्रेट आणून ठेवला. त्यातली बाटली फोडून मी ग्लासात ओतली. एक ग्लास राजकन्येला दिला आणि 'चीअर्स' करून मी एक सिप घेतला.

''समर, पण माझी सिनेमात काम करायची इच्छा पूर्ण नाही का होणार?''

''काय ॲट्रॅक्शन वाटतं तुम्हाला हेच कळत नाही. इटस् ए रेचेड लाइफ! बाहेर पडद्यावर तीन तास सिनेमा पहायला बरं वाटतं, पण—''

''अरे बाबा, त्या शूटिंगचादेखील मी अनुभव घेतलाय, पण तरीही माझी इच्छा आहे, एकदा आपण पडद्यावर यावं. अनायासे आपल्याजवळ चार पैसे आहेत. तूच प्रोड्यूसर का नाही होत? तू प्रोड्यूसर झालास म्हणजे मला कोणी फसवेल ही भीतीही रहाणार नाही!''

''सिनेमा काढायचा म्हणजे पोरखेळ नाही, राजे! तीन-चार लाखाचं भांडवल लागतं. शिवाय तो बरा चालला तर ठीक, नाहीतर रस्त्यावरचे खडे वेचायची वेळ येते.''

''काय व्हायचं ते होऊ दे! आय वाँट टुबी ए हिरॉईन्! दॅटस माय ड्रीम!''

''तुमचं स्वप्न आहे हे खरं; पण ते स्वप्न पैशांचा चुराडा करणार ही भीती वाटतेय मला!''

''डोंट वरी! आपण एक सुंदर कथानक निवडू. उत्तम कास्ट ठरवू. डायरेक्टरही जाणकार शोधू! सर्व काही करू, पण मला एकदा पडद्यावर यायचं आहे! इट्स माय ॲम्बिशन!''

तिसरा पेग संपला. छतावरचं लोलक लावलेलं झुंबर पंख्याच्या वाऱ्यानं हळूहळू डोलत होतं.

''जेवायचं ना?''

''ऑफ कोर्स! पण डायनिंग हॉलमधे नको, इथं रूमवरचं मागव!''

मी बेल दाबली.

सुरुवाती सुरुवातीला राजकन्येशी माझा शारीरिक संबंध येऊ नये असं वाटत होतं; पण मला ते शक्य नव्हतं. मी कोणी संयमी साधुसंत नव्हतो. शिवाय मुंबईत आल्यापासून माझ्या नीतिविषयक कल्पना विरघळत चालल्या होत्या. मनाला रुचेल ते दुसऱ्याला न दुखवता करता येत असेल, तर खुशाल करावं, अशी विचारसरणी बनली होती. त्या दिवशी कुलाब्याच्या हॉटेलमध्ये राजकन्येनं मला झोपायला येण्याबद्दल कितीतरी आग्रह केला, पण मी

गेलो नाही. म्हटलं, एक विधिनिषेध सुटला की संपलंच! पण पुढं पुढं मन निर्ढावित चाललं! नवीन स्त्रीच्या संगतीत रहायला बरं वाटू लागलं. शिवाय सारा मामला खुशीचा होता. कुठं अत्याचार, अन्याय होत नव्हता. सलिमाला या हेवर्डस् हॉटेलात प्रथम स्पर्श करताना थोडं संकोचल्यासारखं वाटलं होतं; पण तिनं मला जे सुख दिलं ते पुढं कित्येक दिवस मी आठवत राह्यलो होतो. त्यानंतर कुमारी! उल्का! आणि परवा परवा अलका!

परस्त्रीशी संबंध ठेवणं हे पाप आहे याची आठवण होऊ नये असे प्रसंग माझ्या आयुष्यात निर्माण होत होते. मलाही त्यात गोडी वाटत होती. मी काही चूक करतो आहे अशी यत्किंचितही जाणीव उरली नव्हती. राजकन्येला मी कुशीत घेतलं तेसुद्धा कसलाही विधिनिषेध न बाळगता!

मुंबईला पोहोचल्यानंतर मी घरी आलो आणि उल्काकडून जी हकीकत ऐकली ती भंयकर होती. चोरीच्या आरोपावरून माझं घर पोलिसांनी धुंडाळलं होतं आणि शिदोजीराजांनी राजकन्येला लिहिलेली जी पत्रं, फोटो व निगेटिव्हज घरी होत्या त्या पोलिसांनी नेल्या होत्या. मी मुंबईत नाही असं पाहून शिदोजी राजांनी मंत्रिपदाचा आधार घेऊन पोलीस यंत्रणा राबवली होती आणि ज्या पत्राच्या आणि फोटोंच्या आधारावर मी त्यांना ब्लॅकमेल करीत होतो ते सारं भांडवलच त्यांनी हस्तगत करून नेलं होतं.

माझा जळफळाट झाला. पण मी काय करू शकत होतो? उल्कासमोर फौजदारांनी माझ्या घराची झडती घेतली होती. उल्काला ती पत्रं आणि फोटो घरी माझ्या पेटीत आहेत याची कल्पनाच नव्हती. नेमकी तेवढीच पत्रं आणि फोटो फौजदारांनी उचलले होते. एका जवाहिऱ्याच्या घरफोडीच्या संदर्भात माझ्या घराची झडती घेण्यात आली असे कागदपत्र रंगवण्यात आले होते. मला दातओठ खात गप्प बसण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. शिदोजी राजे असं काहीतरी कारस्थान करून ते पत्रं, फोटो, फोटोच्या निगेटिव्हज पळवून नेतील याची मला काहीही शंका आलेली नव्हती, पण सत्ताधाऱ्यांचे हात खूप लांब असतात याची प्रथमच कल्पना आली.

"तू घरझडती का घेऊ दिलीस?" मी उल्कावर उखडलो.

"का म्हणजे? वॉरंट दाखवलं त्यांनी घरझडतीचं! शिवाय त्यात बिघडलं काय? आपण का कोणाची चोरी-घरफोडी केली होती थोडीच? त्यांना मी सांगितलं आत जा आणि खुशाल घरातलं सर्व सामानसुमान तपासून पहा! काही काही मिळालं नाही त्यांना!"

"मूर्ख आहेस! म्हणे काही काही मिळालं नाही!"

"अरे खरंच! काही न मिळाल्याबद्दल त्यांनी जो पंचनामा केला होता तो वाचूनही पाहिला मी! घरझडतीचे वेळी कसलाही अनुचित प्रकार घडला नाही म्हणून मी त्या पंचनाम्यावर सहीदेखील केली आहे!"

हात चोळून मी म्हणालो, "बालमंदिरात शिकवण्याच्याच लायकीची आहेस तू!"

"अरे, पण झालं काय ते सांगशील की नाही?"

"माझे महत्त्वाचे कागदपत्र नाहीसे झाले!"

"कसले?"

माझे कसले कागदपत्र पोलिसांनी उचलून नेले हे उल्काला मी सांगू शकत नव्हतो!

"रॉबर्ट कुठं होता? त्याला तरी घरझडतीच्या वेळी बोलवायचं होतंस?"

"तो दुकानात! त्याला कशी बोलावणार मी!"

"बरं केलंस्!"

"अरे, पण मी काय चूक केली ती सांग ना?"

"काही चूक केली नाहीस तू, उल्का! आता गप्प बैस!"

बराच वेळ मी हताश होऊन बसलो. अर्ध पाकिट सिगारेटस् संपवल्या आणि दादर गाठलं! राजकन्येला मी चार दिवसांनी येईन म्हणून सांगितलं होतं; पण त्याच दिवशी आल्याचं पाहून त्या काहीशा आश्चर्यचकित झाल्या!

"काय रे समर! असा चिंताग्रस्त का?"

"शिदोजींनी बरोबर डाव उलटवला. चोरीच्या गुन्ह्यात माझ्या घराची घरझडती घेण्याचं नाटक करून ती पत्रं, फोटो आणि फोटोच्या निगेटिव्हज पोलिसांनी लंपास केल्या! आता शिदोजी आपल्या दोघांना पुरा छळल्याशिवाय रहाणार नाही!"

"पण तू वस्तू बंदोबस्तात का नाही ठेवल्यास?"

"घरात पेटीत ठेवल्या होत्या. उल्काला त्याची कल्पना नव्हती दिली!"

"बरोबर आहे. तिला सांगण्यासारखं नव्हतंच ते प्रकरण!"

"कुरघोडी केली त्यांनी आपल्यावर!"

"जाऊ दे रे! आता त्यांच्या पैशाची गरजच काय आपल्याला?"

"पैशाचं सोडा राजे, त्यांच्या नाकात वेसण घातली होती मी, ते सत्तेवर असेपर्यंत बरीच लहानसहान कामं मला करून घेता आली असती! कामाचं एक सोडा, पण तो गृहस्थ आपल्या दोघांना यापुढं सळो की पळो करून सोडणार यात शंका नाही!"

"समर, ते धाडस नाही होणार त्यांच्या हातून! कारस्थानी माणसं तशी भ्याडच असतात!"

"भ्याड कसं म्हणता राजे? दिवसाढवळ्या पोलिसांमार्फत पत्रं-फोटो पळवून नेली त्यांनी!"

"नेऊ देत रे!"

राजकन्येला त्या घटनेचं फारसं गांभीर्य वाटलं नाही; पण मी मात्र मनातून बराच घाबरलो होतो. राजकन्येनं मघाशी उच्चारलेलं वाक्य 'कारस्थानी माणसं भ्याड असतात' हे माझ्याशी बाबतीत लागू पडत होतं!

त्यानंतर कितीतरी दिवस माझ्या पाळतीवर कोणी आहे की काय अशी एकसारखी शंका मला येत होती. माझ्या मनाचेच खेळ होते ते!

राजकन्येच्या डोक्यातलं सिनेमाचं वेड काही जायला तयार नव्हतं. शेवटी मला प्रोड्युसर होणं भाग पडलं.

राजकन्येनं त्या सिनेमात हिरोइनचं काम केलं, पण तो सिनेमा एक आठवडादेखील चालला नाही. एखाद्याचा हट्ट म्हणून निर्माण केलेली कलाकृती जनमानसाच्या पसंतीला उतरेलच अशी शाश्वती नाही. त्या खटाटोपात राजकन्येनं स्वत:जवळचे तीन लाख रुपये गमावले. मी माझी झोप आणि स्वास्थ्य सतत सहा महिने गमावलं होतं. सिनेमाच्या क्षेत्रात प्रत्येकजण दुसऱ्याला टोपी घालायला टपून बसलेला असतो हे मला पुरतं ठाऊक होतं, पण राजकन्येच्या हट्टामुळं; नाईलाजानं मला प्रोड्युसर व्हावं लागलं होतं! शिवाय सिनेमामुळं माझ्यात आणि राजकन्येत दुरावा मात्र निर्माण झाला! जो दिग्दर्शक मी सज्जन म्हणून निवडला होता त्यानं परस्पर राजकन्येशी संधान बांधून माझ्याविषयी तिचं मन कलुषित करण्याचं पुण्य पदरात पाडून घेतलं.

राजकन्येचं अन् माझं बोलणंही थांबलं! एका अर्थी ते बरंच झालं म्हणा. पण तो दिग्दर्शक तिला साफ धुऊन काढणार या जाणिवेनं मी बेचैन झालो होतो.

याच वेळी एक स्वास्थ्य बिघडवणारी आणखी वार्ता समजली. अलकानं आपण

लौकरच डिलिव्हरीसाठी मॅटर्निटी होममध्ये दाखल होणार आहोत असं कळवलं होतं! खरं म्हणजे त्यात स्वास्थ्य बिघडण्यासारखं काहीच नव्हतं! अलका माझी लग्नाची बायको होती. आईनं मरण्यापूर्वी माझा अन् तिचा समेट घडवून आणला होता. एकच रात्र आम्ही एकत्र आलो होतो. तेव्हा त्या एका रात्रीचं पर्यावसान असं होईल ही शंकादेखील मनात आली नव्हती!

रॉबर्टच्या दुकानच्या पत्त्यावर आलेलं ते पत्र खिशात घालून मी सिगारेटचे झुरके घेत बसलो होतो. इतक्यात रॉबर्टच्या दुकानासमोर विलासची गाडी येऊन थांबली.

"लकी आहे बघ मी! म्हटलं, मिळतोस की नाही! बांद्र्यापासून तुला शोधत आलोय!" विलास गाडी थांबवताच म्हणाला.

"का? काय विशेष?" मी विलासच्या गाडीकडे जात म्हणालो.

"गाडीत बस अगोदर!"

मी रॉबर्टला सांगितलं, "घरी उल्काला सांग वेळ होईल म्हणून!"

विलाससोबत जायचं म्हणजे लवकर सुटका होत नाही याचा अनुभव होता. गाडीत विलास शेजारी बसल्यानंतर त्यानं गाडी मलबार हिलकडे वळवली. हँगिंग गार्डनजवळ गाडी लावून मी आणि विलास एका बाकावर जाऊन बसलो. नेहमी माझी चेष्टामस्करी करणारा विलास आज काहीसा गंभीर दिसत होता. बाकावर बसल्यावर त्यानं मला एक सिगारेट दिली. आपण एक सिगारेट शिलगावली.

"समर, तुला काही समजलं की नाही?"

"कशाबाबत?"

"राजकन्येची काही वार्ता तुला समजली काय?"

"कसली वार्ता?"

"राजकन्येनं अगदी ताळतंत्र सोडलेला आहे. रेसकोर्सवर येते आणि अफाट बेटिंग करते अलीकडे!"

"मला तिच्याबद्दल काही सांगू नको! गेले चार महिने मी तिचं तोंड देखील पाह्यलेलं नाही."

"मला समजलंय ते. त्या सिनेमा प्रकरणापासून तुझ्यात आणि तिच्यात बेबनाव निर्माण झालेला आहे!"

"यापुढं तिच्या कोणत्याच बाबतीत मी लक्ष घालणार नाही."

"समर, आपण एका संस्थानाचे नागरिक आहोत, संस्थानं जरी विलीन झाली असली तरी काही काळ आपण त्या संस्थानिकांचं अन्न खाल्लं आहे. तू स्वत: रत्नापूरला राह्यला होतास! राजकन्येनं तुझे प्राण वाचवलेत. ती आता सर्वनाश ओढवून घेतेय म्हटल्यावर तू स्वस्थ बघत रहाणार!"

"हे बघ विलास, मी हा सारा विचार केलेला नाही असं समजू नकोस! पण तरीही मी या राजकन्येला सावरण्याचा प्रयत्न करणार नाही! ती भिकेकंगाल होणार आहे हे मी केव्हाच ओळखून बसलो आहे!"

"च् च्! अरे, पण हे वागणं बरं नव्हे तुझं! ती मूर्ख आहे हे मलाही मान्य, पण तरीही तिला सावरणं तुझं कर्तव्य आहे. वाटणी करून आलेल्या पैशाची साफ धुळधाण उडवलेली आहे तिनं! परवा रिंगमधे एक लाख 'ब्ल्यू स्टार' घोड्यावर खेळल्या आणि ते घोडं हरलं! असं हेवी बेटिंग करणाऱ्यांचा शेवट काय होतो सांग? शिवाय तो डायरेक्टर मेस्त्री बारान् बारा चोवीस तास तिची पाठ सोडत नाही! किती बनेल आणि तयारीचा आहे तो ठाऊक आहे ना

तुला?''

''अरे बाबा, मला सगळं काही ठाऊक आहे. मी तिला त्या माणसापासून दूर रहाण्याचा सल्ला दिला तेव्हा ती काय म्हणाली आहे का ठाऊक?''

''काय?''

''म्हणाली, 'आय डोंट लाइक अन्वाँटेड ॲडव्हाइस!''

''ते खरं रे, पण पोटगी संपली, जवळ आहेत ते पैसेही संपले, की ही करणार आहे काय?''

''काही का करेना. मला आता तिचं तोंड पहायचं नाहीय.''

''मग तुझी मर्जी! पण तिला सावरणारा मला तुझ्याशिवाय दुसरा कोणीही दिसत नाही. परवा चक्क पिऊन रेसकोर्सवर आल्या होत्या. साडीचा पदर एकीकडे, पर्स एकीकडे, केस विस्कटलेले, डोळे तारवटलेले! अगदी पिटीएबल कंडिशन होती. त्या दिवशी कोणी तिची पर्सच मारली! आठ-दहा हजार होते म्हणे!''

''तो मेस्त्री कुठं होता?''

''तो होता ना रेसकोर्सवर, त्यानंच पोलिसांना जाऊन कळवलं! पण रेसकोर्सवर गेलेले पैसे कधी कुणाला परत मिळालेत?''

''जाऊ दे! मरू दे! मला काहीएक सांगू नको तिचं!''

''मला वाटलं होतं, तू काहीतरी सावरण्याचा प्रयत्न करशील!''

''अरे कसा सावरणार मी? घरातून 'गेट आऊट' एवढंच म्हणायचं बाकी ठेवलं होतं तिनं! मला काही स्वाभिमान आहे की नाही? का उगाच माझे प्राण एकदा तिनं वाचवले म्हणून जन्मभर तिचे पाय चाटत राहू?''

''तू म्हणतोस ते बरोबर आहे. पण आपण संस्थानी जमान्यात वावरलेली माणसं आहोत, एक राजकन्या रसातळाला चाललेली आहे हे पहावत नाही, म्हणून आलो तुझ्यापर्यंत!''

''फर्गेट हर! बरं, तुझं बांधकाम कुठपर्यंत आलं?'' विषय बदलावा म्हणून मी म्हणालो.

''बांधकाम पूर्ण झालं. कॉलेजची मुलं रहायलासुद्धा आली.''

''वास्तुशांती केली नाहीस?''

''सत्यनारायणाची पूजा घातली झालं!''

''बरं झालं.''

''टर्म बेसिसवर मुलं ठेवली. रेंट ॲक्टचं झंजट नाही.''

''विलास, तुझं सारं वागणं हिशोबी असतं बघ.''

''तू मुद्दाम विषयपालट करतो आहेस, मी ज्या हेतूनं आलो होतो तो काही साध्य होत नाही तर!''

''सांगितलं ना विलास, मी पुन्हा राजकन्येचं तोंड पहाणार नाही. तू तिचं नाव देखील घेऊ नकोस माझ्यासमोर. बरं, अजय काय म्हणतो?''

विलासनं माझ्याकडे न पहाताच आणखीन एक सिगारेट शिलगावली आणि अस्वस्थ झाल्यासारखा तो झुरके घेऊ लागला. सिगारेट संपेपर्यंत तो माझ्याशी बोलला नाही. संपलेली सिगारेट चिमटीत धरून ती दूर फेकत तो म्हणाला, ''चल, मला आणखी एकदोन ठिकाणी जायचं आहे.''

''मी सोबत आलो तर चालेल का?''

''माझी काही हरकत नाही, चल!''

विलाससोबत मी बऱ्याच ठिकाणी भटकलो आहे. समाजातल्या लोकांशी त्याच्या ओळखी होत्या. व्यापारी, वकील, डॉक्टर्स, ज्यांना ज्यांना म्हणून रेसचा शौक होता हे विलासची ओळख करून घ्यायला धडपडत असत. विलासची ओळख असणं हा 'प्रीव्हिलेज' वाटायचा त्यांना!

मला विलासबरोबर जावंसं वाटलं खरं, पण लगेच विचार केला, हा आला होता ज्या अपेक्षेनं ती अपेक्षा मी साफ धुडकावून लावली आहे. तो वरून दाखवत नसला तरी मनातून नाराज झालेला आहे, तेव्हा आज त्याच्यासोबत जाणं काही बरं नाही!

"चल येतोस ना?" गाडीकडे जाता जाता विलास म्हणाला.

"यावंसं वाटलं होतं, पण जा तू. मलाही थोडं काम आहे!"

विलासनं ते ओळखलं. तो किंचित् हसून म्हणाला, "बरंय, तुला कुठं सोडू?"

"महालक्ष्मीला सोड, लोकलनं जाईन बांद्र्याला!"

"पण मघा उल्काला निरोप पाठवलास ना? वेळ होईल म्हणून?"

"निरोप पाठवला आणि गेलो म्हणून काही ती रागावणार आहे थोडीच?" गाडीत बसून मी दार ओढून घेतलं. विलास काहीसा गंभीर होऊनच गाडी चालवत होता. महालक्ष्मीच्या स्टेशनजवळ गाडी उभी करून तो म्हणाला, "समर, मी तुझी भूमिका समजू शकतो; पण तू थोडा विचार कर या प्रकरणावर! अच्छा, बाय!"

घरी आलो तेव्हा उल्का वाचत पडली होती. खिडकीतून डोकावून पहात मी हाक मारली. दार उघडून ती म्हणाली, "वेळ होईल म्हणून निरोप दिला होतास ना?"

"हो, पण आलो. ऐन वेळी बेत बदलला!"

"मी जेवण नाही केलं! भात ठेवू का?"

"नको! तशी भूक नाहीच!"

कपडे हँगरला लावून मी नाइटसूटची विजार चढवून कॉटवर आडवा झालो. विलासनं राजकन्येबद्दल जी हकीगत सांगितली होती, तीमुळं मन अस्वस्थ झालं होतं. पण तरीही आपण होऊन तिच्याकडे जावं असं वाटत नव्हतं. त्या दिवशी मुद्दामच मी उपाशी झोपलो. कधी कधी स्वत:वर सूड उगवल्यासारखं वागण्यातही गंमत असते. खरं म्हणजे दोन घास खायला आज हरकत नव्हती; पण नाही, आज उपाशीच झोपायचं!"

सकाळी उठलो तेव्हा उल्का अंघोळ करून कपडे बदलून बाहेर जाण्याच्या तयारीत होती.

"आज रविवार ना? मग लवकर कशाला उठलीस?"

उल्कानं माझ्याकडे फिरून पाह्यलंदेखील नाही, मात्र तुच्छतापूर्ण हसली.

"उल्का, कम हिअर!"

"यू डर्टी बगर, गेट अप!"

ती मला अशा इंग्रजीतून अधूनमधून शिव्या द्यायची, मला गम्मत वाटायची; पण आज तिच्या आवाजाला एक भलतीच धार असल्याचं जाणवलं.

"नालायक! नादान माणसा, माझ्या आयुष्याचं नुकसान केलंस! कृतघ्न, कपटी! समर, तू आजच्या आज या घरातून बाहेर हो. नाहीतर मला पोलिसांना बोलावून तुला धक्के मारून घरातून घालवून द्यावं लागेल!"

मी ताडकन् अंथरुणावर उठून बसलो. वाटलं हिचं डोकंच फिरलं आहे!

"उल्का, अगं तुला झालंय तरी काय? अशी का माझ्यावर उखडतेस?"

"यू रास्कल! मला तुझ्याशी बोलायचीदेखील इच्छा नाही. सकाळी दहाच्या आत तू

इथून बाहेर जा!'' असं म्हणून उल्का पर्स खांद्याला लटकावून बाहेर पडायच्या तयारीत होती; मी उठून दाराला पाठ लावून दोन्ही हात पसरून तिला रोखत म्हणालो, ''अगं, झालं काय ते सांगशील की नाही? तुला आवडत नाही म्हणून मी राजकन्येकडेदेखील जायचं बंद केलं आहे!''

''समर, खरंच तू माझा घात केलास! नीच माणसा, तू इतका घातकी असशील असं वाटलं नव्हतं!''

''अगं, पण सांगशील की नाही, काय झालं ते?''

ड्रेसिंग टेबलावर मला अलकाचं आलेलं पत्र होतं. त्याकडे बोट करून म्हणाली,—

''या पत्राचा अर्थ काय?''

मग मात्र मला सगळ्या प्रकरणाचा उलगडा झाला. अलकानं आपण लवकरच मॅटर्निटी होममध्ये दाखल होणार आहोत आणि डिलिव्हरीच्या वेळी मी हजर रहावं अशी इच्छा व्यक्त केली होती. ते पत्र वाचून उल्का संतापली होती.

''तिनं तुला फसवलं, बदफैलीपणा केला; म्हणून तू घरदार सोडून बाहेर पडलास, असं मला सांगितलंस, ते साफ झूट होतं तर?''

''ते झूट नव्हतं उल्का, मला तसं वाटण्यासारखी परिस्थितीच निर्माण झालेली होती!''

''बरं! समर, तू मला धोका देशील असं वाटलं नव्हतं!''

''उल्का, मला थोडं बोलायची संधी देशील तर बरं होईल!''

''तू आता लाख सांगितलंस तरी मला खरं वाटणार नाही. पोरींना, बायकांना फसवून नादी लावणं हाच तुझा धंदा आहे! त्या आपलं जुमानत नाही असं वाटलं की त्यांना सोडून दुसरीकडं जायचं! पण लक्षात ठेव, माझ्याशी ही चालबाजी चालणार नाही! हे घर माझं आहे, हा प्रपंच मी स्वत: उभा केला आहे! इथं तुला कोणताही अधिकार नाही! दहा वाजण्याच्या पुढं एक मिनिटभर इथं थांबलास तर तुला धक्के मारून बाहेर काढीन!''

मी हताश झालो. अलकाशी माझा समझोता झाल्याचं मी उल्काला सांगितलं नव्हतं हे खरं! पण तरीही ते तिला समजल्यावर ती असा रौद्रावतार धारण करील असं वाटलं नव्हतं! मी कुमारीकडे जात होतो, राजकन्येच्या सहवासात वावरतो हे ठाऊक असूनही उल्का माझ्यावर अशी कधी संतापली नव्हती. पण माझी लग्नाची बायको गरोदर आहे आणि तिनं मी तिच्या बाळंतपणाच्या वेळी हजर रहावं, ही इच्छा व्यक्त केल्यामुळं तिनं असं आकांडतांडव का करावं?

पण ही एका स्त्रीची नैसर्गिक प्रतिक्रिया होती. उल्का माझ्याशी एकनिष्ठ होती. मी तिला पूर्णपणे ओळखत होतो. मध्यंतरी ती 'अल्कोहोलिक' झाली तेव्हा तिची सुश्रूषा करताना मी कोणतीच गोष्ट करायची बाकी ठेवली नव्हती. तिच्या एकनिष्ठेचा मी घोर अपमान केला तो अलकाशी समझोता करून! तसं पाह्यलं तर उल्काला दोष देण्यात अर्थ नव्हता. तिचा गर्भपात झाल्यापासून ती काहीशी अबोल आणि चिंतनशील वाटत होती... मी तिचा एकटीचा आहे ही भावना तिनं उराशी जपली होती, अन् तशात स्वत:ला जे प्राप्त झाले नाही ते तिला प्राप्त होतं आहे हे समजल्यानं ती माझ्यावर उखडली होती.

माझ्या खिशातून ते पत्र रात्री खाली केव्हा पडलं हे मला समजलंदेखील नव्हतं; पण भल्या सकाळी उठून तिनं ते वाचलं आणि असा हा भूकंप झाला.

''मी बाहेर जाते, वाट सोड माझी! आता तुला माझी वाट रोखून धरण्याचा काडीमात्र हक्क उरलेला नाही!''

''उल्का, माझं थोडं ऐकून घे! केवळ आईच्या इच्छेसाठी मी...''

''खोटं! आई मृत्युपंथाला लागल्या होत्या. तिच्या बदफैलीपणामुळं तुला घरदार सोडून

बाहेर जावं लागलं होतं. तुझी ओळख झाल्यानंतर तू मला ते सारं सांगितलंस. घरचा विरोध असूनही मी तुझ्याशी लग्न करायचा निर्णय घेतला. कदाचित् हे दुसरं लग्न बेकायदेशीर ठरण्याची शक्यता आहे, ही जाणीव असतानाही मी तुझ्याशी लग्नाला तयार झाले! तू देखणा आहेस, उमदा आहेस, नवीन ओळख झालेल्या बायापोरींना तुझ्या सहवासात वावरायला बरं वाटतं, हेही मी पाह्यलं; पण म्हटलं, देखणं असणं, आणि गोड बोलणं ही सवय असणं हा काही तुझा दोष नाही. शिवाय तू मनापासून कोणाही स्त्रीशी एकरूप होणार नाहीस अशी माझी मनोमन श्रद्धा होती. पण आज मात्र तू त्या श्रद्धेला सुरुंग लावलास. समर, तू बऱ्या बोलानं इथून जा, नाहीतर या पलीकडच्या गल्लीतल्या खिश्चन लोकांना बोलावून मी तुला धक्के मारून घालवून देईन.''

उल्कानं माँटेसरीचा वर्ग काढल्यापासून ती या भागात बरीच लोकप्रिय झाली होती. विशेषत: सधन अशी काही खिश्चन कुटुंबं तिच्यावर निहायत खूष होती. लिलियनची ही मैत्रीण आपल्या लहान मुलांच्यावर अल्पशा फीच्या मोबदल्यात सुसंस्कार घडवत आहे हे त्यांना दिसून येत होतं. त्यामुळे सुरुवातीला बांद्र्याच्या त्या वस्तीत निर्वासिताप्रमाणं वावरणाऱ्या उल्काला एक आगळंच महत्त्व प्राप्त झालं होतं. अलीकडे तिची प्राप्ती हजार रुपयांपर्यंत वाढली होती, लोकप्रियता आणि पैसा एकदम हाती आल्यामुळं तिच्या व्यक्तिमत्त्वालाही काहीसा भारदस्तपणा आला होता. व्यसनमुक्त झालेल्या उल्काच्या आयुष्यातलं हे स्थित्यंतर म्हणजे कात टाकलेल्या नागिणीसारखं होतं! आजपर्यंत माझ्यावर प्रेमाची पाखर घालणारी ही उल्का मला दंश करायला सज्ज झाली होती... पण त्यात तिला दोष देण्यासारखं काय होतं? तिचा युक्तिवाद स्पष्ट होता, ''तुला जर अलकाशी समझोता करायचा होता तर मला का फशी पाडलंस?...''

आजतरी माझ्याजवळ या प्रश्नाला उत्तर नव्हतं. दरवाजाला आडवे लावलेले हात आपोआप खाली आले. मी खुर्चीवर जाऊन बसलो. उल्कानं पायात चपला सरकावल्या आणि माझ्याकडे न पहाता म्हणाली, ''लिलियनकडे किल्ली ठेवून जा! बाय्!'' ती घरी असेपर्यंत तिच्या चेहऱ्यावर दु:ख व्यक्त झालं नव्हतं; पण ती दारातून बाहेर पडली तेव्हा मात्र तिच्या कंठातून बाहेर पडलेला हुंदका मला अस्पष्टसा जाणवला.

-o-o-

३९

असा प्रसंग माझ्यावर गुदरेल याची कल्पना नव्हती. मला उल्काच्या स्वभावाची पुरेपूर कल्पना होती. तिची कितीही समजूत करण्याचा प्रयत्न केला असता तरी तो निष्फळच ठरणार होता. तेव्हा घर सोडण्याशिवाय इलाजच नव्हता.

'आलिया भोगासी' या तत्त्वाला अनुसरून मी घराबाहेर पडलो. लिलियनकडे किल्ली दिली. तिच्या चर्येवरून मी ओळखलं की उल्कानं तिला सारा प्रकार सांगितलेला आहे. कारण लिलियनच्या डाव्या गालावर पडणारी खळी आज मला कुठंच दिसली नाही.

लिलियन आणि रॉबर्ट चर्चला जायच्या तयारीत होती. रॉबर्टच्या चेहऱ्यावर देखील नेहमीचे आपुलकीचे भाव दिसले नाहीत. डॅडी वारले तेव्हा माझं सांत्वन करण्यासाठी मुद्दाम भवानीनगरला आलेलं हे दांपत्य उल्काला अधिक जवळची मानत होतं.

मला तिथं थांबून काय घडलं ते सांगावंसंच वाटलं नाही. किल्ली दिली आणि तसाच खिशात हात घालून बांद्रा टॉकीजच्या रोखानं चाललो. चालता चालता हिप पॉकेटमधे किती पैसे आहेत ते पहावं म्हणून हात घातला, तो खिशात बरोबर साडेसोळा रुपये होते! काय विलक्षण योगायोग! मी जेव्हा भवानीनगर सोडलं तेव्हाही माझ्या खिशांत साडेसोळा रुपयेच होते. त्यावेळी अलकासाठी घर सोडून बाहेर पडलो होतो. आज उल्कानं मला घराबाहेर काढलं होतं. हक्कानं जाऊन रहावं असं एकही ठिकाण मुंबईत शिल्लक नव्हतं. हे साडेसोळा रुपये धुरासारखे हवेत विरून जाणार होते. पैशाचं एक सोडा, पण आज रात्र झाल्यावर माथा टेकायला जागा?

डोक्यात विचार चालू होते आणि पाय मला पुढं पुढं घेऊन जात होते. बसेस, टॅक्सीज, लॉऱ्या एकसारख्या धावत होत्या. जो तो आपल्या कामात मग्न होता. मी इतक्या विवंचनेत होतो, पण माझ्या भोवतालच्या या दुनियेला त्याची यत्किंचितही फिकीर नव्हती. या मुंबईला कोणाच्या सुखदु:खाचा विचार करायला सवडच नाही. लोकलखाली सापडलेल्या माणसाला कुत्र्यासारखा उचलून बाजूला ठेवतील आणि आपल्या कामाला निघून जातील! मी या बांद्रा टॉकीजजवळ मरून पडलो तरी माझीही गत तीच होणार! पण मला मरावंसं वाटत नाही! मला जगण्याचा कधी कधी कंटाळा येतो; पण मरावंसं मात्र वाटत नाही, कारण मरण हे प्रत्येकाच्या आयुष्यात केव्हा ना केव्हा निश्चित येणार आहे. आपण होऊन त्याच्या समोर जा कशाला? ते यायचं तेव्हा येणारच आहे की? टाळलं तरी सुटणार नाही त्यावेळी! जीवनाची आसक्ती नाही अन् मरणाची घाईही नाही!

खिशात एक अधेली होती ती मोडली. दोन पनामा घेतल्या आणि फुटपाथवर खिशात हात घालून तोंडात सिगारेट धरून खुशाल धूर काढत चाललो. समोर चोक्सीबाईचा दवाखाना दिसला. वाटलं, जावं आणि भेटावं, पण विचार केला ही बाई माझ्यासारखी रिकामटेकडी नाही. सकाळी सात वाजल्यापासून ते रात्री दहापर्यंत एकसारखी राबत असते. नवरा रुसी, वकिली करतो. तोही कमावतो आणि हीही कमावते या बाईच्या अनेक ओळखी आहेत, मला

कुठंतरी ड्रायव्हरची नोकरी लागली तर पहावे, म्हणून परत दवाखान्याकडे वळलो. बाकावर पेशंटांची गर्दी म्हणावी तशी नव्हती. दहा-पंधरा मिनिटातच माझा नंबर लागला असता. पण अचानक चोक्सीबाई दार उघडून बाहेर आल्या. माझ्याकडे पाहून म्हणाल्या...

"मिस्टर ठाकूर, मी आता येणारच होते, परत मला सांगायला यायची काय गरज होती?"

मला काहीच बोध होईना. मी डॉक्टरीणबार्इंच्या चेहऱ्याकडे 'आ' वासून पहातच राह्यलो.

"चला, एकदा कन्सल्टेशनला सुरुवात झाली की बाहेर जाताच येत नाही. आत्ताच जाऊन येऊ!"

"बाई, काय प्रकार आहे? कुठं जायचं?" बाई गाडीजवळ आल्या होत्या, त्या गाडीचं दार उघडता उघडता थबकल्या आणि माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहात म्हणाल्या,—

"म्हणजे तुम्हाला काहीच ठाऊक नाही?" मी संभ्रम झाल्यासारखा नकारार्थी मान हलवीत राह्यलो.

"राजकन्येकडे केव्हा गेला होता?"

"तीन-चार महिने झाले असतील!"

"मग बरोबर आहे! बसा!"

मी गाडीत डॉक्टरीणबार्इंच्या शेजारी बसलो. बार्इंनी गाडी सुरू केली. समोरच्या सर्कलला वळसा घेऊन त्यांनी गाडी पूर्वेकडे वळवली अन् मला म्हणाल्या, "मिस्टर ठाकूर, राजकन्येला नानावटी हॉस्पिटलमधे ॲडमिट केलेलं आहे! फूड पॉयझनिंग झालेलं आहे! डॉक्टरांचे प्रयत्न चालू आहेत, पण कंडिशन सीरियसच आहे!"

"माय गॉड! काय सांगता काय?"

"काल रात्री मला नानावटीतून फोन आला. मी तिथं ऑनररी कन्सल्टंट म्हणून काम पहाते ना?"

"हो, मला ठाऊक आहे ते. पण असं कशानं झालं त्यांना?"

"गॉड नोज! त्यांना ते स्वत:च करून घेतलं की दुसऱ्या कोणी केलं काहीच समजायला मार्ग नाही. ॲन्ड ऑफ इट, त्यांची देखभाल पहायला कोणीही जवळ नाही."

मी कपाळावर हात मारून घेतला अन् म्हणालो,—

"बाई, मला काही काही कल्पना नव्हती! मी राजकन्येशी बोलणं बंद केलं होतं!"

डॉक्टरीणबाई हसल्या आणि म्हणाल्या, "मिस्टर ठाकूर, अशा वेळी ते सगळं विसरावं लागतं. ह्यूमन लाइफ इज टू शॉर्ट टु टेक इट सीरियसली! इजन्ट इट?"

चोक्सीबार्इंना मी काही उत्तर दिलं नाही. पण राजकन्येला बघण्याची उत्सुकता मात्र क्षणाक्षणांनी वाढत चालली. हॉस्पिटलच्या आवारात बार्इंनी गाडी पार्क केली आणि खांद्यावर टाकलेला स्टेथॉस्कोप सावरीत त्या हॉस्पिटलच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत निघाल्या. मी त्यांच्या मागोमाग.

एक डॉक्टर आणि एक नर्स राजकन्येच्या जवळ होत्या. चोक्सीबाई आलेल्याच पहाताच ते डॉक्टर बाजूला झाले.

"हाऊ इज द् पेशंट?" बार्इंनी विचारलं.

"इंप्रुव्हिंग, बट बी. पी. इज ॲबनॉर्मल!"

राजकन्येला ऑक्सिजनच्या नळ्या अन् मनगटात सलाईन चढवलं जात होतं; मला राजकन्येला त्या अवस्थेत पाहू अक्षरश: भडभडून आलं. मी तिच्याबद्दलचा सारा राग क्षणात

विसरून गेलो.

डोळ्याभोवती काही वर्तुळं उमटली होती. गालाची हाडं वर आली होती. डोळे मिटलेलेच होते.

बा◌र्इंनी मला जवळ बोलावताच मी डोळे पुसले आणि कॉटजवळ गेलो.

"मिस्टर ठाकूर, तुम्ही यांना हाक मारून पहा बरं! ओळखीचा आवाज कानावर आला तर त्या ओळखतात का पाहू?"

माझा दाटलेला घसा साफ करून मा म्हणालो,—

"राजे! अहो, राजे! मी आलोय-समर!" त्यांचा डावा हात हातात घेत मी म्हणालो.

अन् त्याच क्षणी त्या निस्तेज अन् क्षीण डोळ्यांची उघडझाप झाली. क्षणभर ते चैतन्यहीन डोळे माझ्यावर स्थिरावले अन् कोमेजलेल्या ओठातून अस्पष्ट असे शब्द उमटले, "समर! तू आलास!"

"हो राजे, मी आलोय!"

त्या चोक्सीबा◌र्इंनी राजकन्येवर देखरेख करणाऱ्या डॉक्टरना उद्देशून म्हटलं, "दॅटस् गुड! डॉक्टर, मिस्टर ठाकूर वुइल स्टे बुइथ द् पेशंट! वई गॉट अ प्रॉपर पर्सन टु लूक आफ्टर हर!"

"मी जाते मिस्टर ठाकूर, तुम्ही रहाल ना यांच्यासोबत?" क्षणाचाही विलंब न लावता मी म्हणालो, "ऑफ कोर्स!"

"मी तुमच्या घरी हवा तर निरोप देते!"

चटकन् उठून मी म्हणालो, "निरोप देण्याची काही गरज नाही, बाई! मी घर सोडलेलं आहे!"

डॉक्टरीणबाई माझ्याकडे पाहून हसल्या आणि म्हणाल्या, "रियल्ली यू आर फॉण्ड ऑफ जोक्स."

"जोक्स नव्हे बाई! मी घर सोडलेलं आहे किंवा मला उल्कानं घरातून बाहेर काढलेलं आहे, असं समजा!"

जी बाई रोज असंख्य रुग्णाईत पहात होती, त्यांच्याजवळ येणाऱ्या मृत्यूला आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून दूर हटवत होती, तिला माणसांच्या क्षुद्र विचारांची अन् विकारांची कीव करावीशीच वाटणार.

राजकन्येची सुश्रूषा करण्याला मी तत्काल सम्मती दर्शवली खरी, पण माझ्या खिशात आता फक्त सोळा रुपये होते. हे पैसे संपल्यानंतर काय करायचं हा मोठा बिकट प्रश्न होता. राजकन्येची सुश्रूषा करण्याचं कबूल केल्यानं निदान वस्तीला राहण्याचा प्रश्न सुटला होता. राजकन्या जितके दिवस दवाखान्यात राहतील तितके दिवस तरी!

राजकन्येला हळूहळू बरं वाटू लागलं अन् मग मला त्यांनी आपली हृदयद्रावक हकीगत सुनावली. डायरेक्टर मेस्त्रीनं त्यांना साफ केलं होतं. होते - नव्हते ते दागिने, पैसा सर्व काही लंपास केलं. शेवटी राजकन्येजवळ काही काही उरलं नाही. भूलथापा देऊन पिक्चरमधे हिरोइनचा रोल देण्याचं वचन देणारा मेस्त्री मुंबई सोडून कुठं गुल झाला होता. पण जाण्याच्या आदल्या रात्री त्यानं राजकन्येला आपल्या कोणा मित्राच्या घरी जेवायला नेलं होतं. जेवणापूर्वी चिक्कार पाजलीही होती. तेव्हा त्या अन्नात काही विषारी द्रव्यं आहेत याची तिला यंत्किंचितही जाणीव नव्हती; पण ते विष माणसाला तत्काळ मृत्यू आणणारं नव्हतं, तर हळूहळू प्रकृती क्षीण होत जाऊन त्यातच त्याचा अंत घडणार असं होतं. राजकन्येला आपणाला विषबाधा झालीय अशी शंका येताच तिनं चोक्सीबा◌र्इंना निरोप पाठवला होता, अन् चोक्सीबा◌र्इंनी

परवा रात्री त्यांना नानावटी हॉस्पिटलमधे ॲडमिट केलेलं होतं.

त्यानंतरचा चौथा दिवस!

राजकन्या कॉटवर उठून बसल्या होत्या. आज त्यांनी ब्रेडटोस्ट आणि कॉफी घेतली. चोक्सीबार्इंचा फोन आला तेव्हा त्या हळूहळू शेजारच्या खोलीपर्यंत चालत गेल्या आणि बार्इंशी बोलल्या. मी हाताला धरून परत त्यांना कॉटवर आणून बसवलं. तेव्हा त्या म्हणाल्या, —

"समर, तू आला म्हणून मी उठले हं. नाहीतर मला जगायचीदेखील इच्छा उरली नव्हती!"

"राजे, मरण असं जबरदस्तीनं कोणी दुसऱ्यावर लादू शकत नाही. जन्माला घालतो, त्यानंच न्यावं लागतं."

"पण आता मात्र पश्चात्ताप वाटतो बघ! तू कळवळून सांगत होतास, या सिनेमाच्या लोकापासून चार हात दूर रहा, पण मला तुझाच राग यायचा! वाटायचं की, तुला माझा उत्कर्ष सहन होत नाही; पण खरं खरं सांगते, माणसं इतकी क्रूर असतात याची थोडीसुद्धा कल्पना आली नाही रे!"

"राजे, तुम्हाला आठवतं ना? महाराजांनी मला जंगलातल्या बंगल्यात नेऊन माझा नायनाट करण्याचा घाट रचला होता, तेव्हा तुम्ही तो ओळखून मला, रत्नापुरातून पळून जायला मदत केलीत! इतक्या हुशार तुम्ही; पण आताशी ही तुमची हुशारी का लोप पावावी?"

"मला चित्रपटतारका व्हायचं होतं ना!" त्या क्षणीक हसल्या आणि म्हणाल्या, "या डॉक्टरीणबार्इंचे माझ्यावर अनंत उपकार झाले रे, समर! माझ्यासारख्या असंख्य ओळखी असतील त्यांच्या, पण प्रत्येक ओळखीच्या ठिकाणी असा आपला वेळ आणि पैसा खर्च कोण करतो?"

"म्हणजे? इथला सगळा खर्च बार्इंनी केला?"

"अर्थात्!"

"माझ्याजवळ आता फुटकी पै देखील शिल्लक नाही. जे होतं ते सारं मेस्त्री घेऊन गेला!"

दातओठ खात म्हणालो, "त्या हरामखोराला अजून समर ठाकूर कोण आहे हे समजलेलं नाही."

"मेहरबानी कर आणि त्याच्या नादाला लागू नकोस! खूप दूरवर त्याचे हात पसरलेले आहेत."

"त्यानं तुमचे पैसे हिरावून घेतले म्हणून मला राग येत नाही राजे, पण त्यानं तुमच्या जीवितावर उठायला नको होतं."

"ते विसर आता! समर, या डॉक्टरीणबाईनं गेल्या चार दिवसांत माझ्यासाठी सातआठशे रुपये खर्च केले आहेत, तिचे उपकार मला नको वाटतात रे! थोडे पैसे देशील मला?"

पुन्हा आयुष्यांत कसोटीची वेळ येऊन ठेपली होती. सोळा रुपये खिशात असताना मी आठशे रुपये देण्याचं आश्वासन राजकन्येला दिलं.

"तिचे पैसे द्यायचे आणि यापुढं लागणारी औषधं आपण आणायची म्हणते मी! पण त्यालासुद्धा पैसे हवेतच की! तू काही व्यवस्था करशील त्यासाठी?"

"राजे, आज तुम्ही पहिल्यांदा माझ्याकडून पैशाची अपेक्षा करता आहात. तसं म्हणाल तर मी कफल्लक आहे. रहायला आसरादेखील नाही अशी माझी स्थिती आहे, पण मी तुम्हाला

छातीठोकपणे सांगतो की तुमची गैरसोय होऊ देणार नाही.''

या हातांनी आजपर्यंत चार-दोन लाख हाताळले गेले होते; पण आज एक हजार उभं करणं मला पर्वतप्राय वाटू लागलं. मी दवाखान्यातून बाहेर पडलो, पैसे हवे होते. तात्काळ गरज होती ती आठशे-हजार रुपयांची अन् त्यानंतर देखील पैसे लागणार होते. पण ते येणार कोठून? असं कुठं पैशाचं झाड होतं की तिथं जावं अन् पैसे तोडून घ्यावेत? पैसा-पैसा-पैसा! काय या पैशाचं स्वरूप वर्णावं? येतो तेव्हा अक्षरश: 'छप्पर फाडके' येतो तेव्हा, त्याचं मोल नसतं! कितीही आणि कशीही उधळमाधळ करावी. असा विनासायास आलेला पैसा स्वस्थ बसू देत नाही. अंगात चैतन्य निर्माण होतं. मग्रुरी येते. हवेतून तरळत निघाल्यासारखं वाटतं. पण याच पैशानं जर का पाठ फिरवली की संपलंच. त्याच्या पाठीशी लागलं तर तो दूर दूरच जातो. पैसा जवळ नसला की मगच त्याचं खरं मोल समजतं! कधी कधी त्या पैशाची मनधरणी करताना लाचारीही पत्करावी लागते.

आजपर्यंत माझ्यावर ती वेळ आली नव्हती, ती येणारही नव्हती. मुंबईत राह्यल्याने पैसा निर्माण कसा करायचा हे तंत्र मला अवगत जरी झालं नसलं तरी ठाऊक होतं. अन् एकदा ठाऊक असल्यावर ते अवगत करून घेणं फारसं कठीणही जाणार नव्हतं. हे असलं एक तंत्र मात्र मला चांगलंच अवगत होतं, जुगाराचं! फ्लशचं! पण तो माझा 'चष्मा' गेला अन् मी 'फ्लश' सोडला. आपलं आवडतं माणूस गेलं की त्याच्यासाठी एखादी वस्तू माणसं सोडतात त्याप्रमाणं! माझा तो 'जादू-ई-चिराग' चष्मा गेला तेव्हापासून मी जुगार सोडला. सर्व प्रकारचा जुगार नव्हे. फक्त पत्त्याचा जुगार! अजून सरकारमान्य रेसचा जुगार चालूच होता. पण कधी कधी तो दगा द्यायचा. कितीही नाणावलेलं घोडं असलं तरी ते ऐनवेळी पेंड खायचं!

अशा विचारांत गुंतलेला असताना माझी बस म्युझियमला केव्हा येऊन पोहोचली समजलं देखील नाही.

आज तसा मी थोडा खुशीतच होतो. राजकन्येच्या प्राण्यावरचं संकट दूर झालं होतं. जिनं माझे प्राण वाचवले होते, तिचे प्राण वाचवताना माझा थोडा का होईना हातभार लागला होता. हा आनंद मला व्यक्त करायचा होता अन् तो एक-दोन पेग घेऊन!

समोर बोळातल्या गुत्त्यात गेलो... काउंटवर मालक बसला होता. मला पहाताच हसून हातात हात देत म्हणाला, ''काय भाई समर? आजकाल कुठं असते?''

''दवाखान्यात!''

''दवाखान्यात? बीमार होता?''

''हो, ते नंतर बोलू. चांगला एक व्हिस्कीचा पेग दे!''

''सॉरी! देखो भाई, पुलीसवालोंने बहोत तंग कर दिया है! एक्साईज डिपाटमेंटने भी जादा चेकिंग शुरू किया है!''

''अरे, मला स्कॉच नको, साधी इंडियन व्हिस्की दे.''

''वो भी नहीं!''

''काय सांगतोस?''

''तेरी कसम!''

''वा:! चांगला न्याय! माझी शप्पथ कशाला घेतोस? मी मेलो तर तुझं काय नुकसान होणार आहे?''

त्यानं मला जवळ बोलावून जे सांगितलं ते त्याच्या धंद्यातल्या अडचणीबद्दल तर होतंच, पण त्याच्या बोलण्यामुळं माझी आर्थिक समस्या सुटण्याचा एक नवा मार्ग नकळत त्यानं मला दाखवला होता.

महाराष्ट्रात दारूबंदी जारी होती; पण आंध्रप्रदेशात बंदी नव्हती. जर आंध्रप्रदेशातून व्हिस्की, रम, ब्रँडी अशा प्रकारच्या मद्याची आयात केली, तर मला अफाट पैसा मिळणार होता. मुंबईत सोन्याच्या भावानं ती दारू विकत घेणारी कुळं होती. पण हा धंदा डोक्यानं करायला हवा होता; त्यात निष्काळजीपणा घडला की खडी फोडायलाच जावं लागणार होतं.

"कंट्री चांगली हाय, देऊ का?"

"च्यायला! काय वेळ आली रे ही? दे ऽ!"

त्या दिवशी कंट्रीचे चार पेग मारले आणि डोक्यात हैद्राबादवरून दारू आयात कशी करायची याचे प्लॅन करीत निघालो. सर्वनाश करणाऱ्या या विचित्र द्रवांत कल्पनेला उत्तुंग भरारी मारायला लावण्याचे केवढे प्रचंड सामर्थ्य आहे.

हैद्राबादला कसं नि केव्हा जायचं, किती खरेदी करायची, ट्रान्सपोर्ट कसं करायचं, याचा मनात आराखडा आखत मी चाललो असताना, फोर्टमधे एका कापडाच्या दुकानात त्या दोघांना हसत-खिदळत असताना पाहून एकदम थबकलो. डोळ्यांची उघडझाप करून पुन्हा पुन्हा पाह्यलं. वाटलं, कंट्रीचे चार पेग घेतल्यानं हा भास होत आहे. पण छे! तो भास नव्हता.

दुकानात शिदोजी राजे आणि डायरेक्टर मेस्त्री हातात हात घेऊन मोठ्या खुशीत येऊन हसत होते. हे दोघे बदमाष एकत्र आल्याचं पाहून माझं मस्तक भडकलं. शिदोजीराजानं माझ्या घरात पोलीस घुसवून ती पत्रे आणि फोटो उचलून नेले होते. मेस्त्रीनं राजकन्येला केवळ लुबाडलंच नव्हतं तर तिचा खून करायचा घाट घातला होता. मला काय होतं आहे हे समजायच्या आतच मी त्या दुकानाच्या पायऱ्या चढून गेलो आणि मेस्त्रीच्या तोंडावर असा जोरदार ठोसा मारला की, तो उभ्यानंच खाली कोसळला.

आपल्या दुकानांत मिनिस्टर आले म्हणून तोंडावर लाचारी आणून हात चोळत उभा असलेला दुकानाचा मालक घाबरून गेला. मला दुकानातल्या नोकरांनी येऊन पकडलं. प्रत्येकाला वाटलं की, आता पोलीस येतील, मला पकडतील आणि निळ्या गाडीत घालून घेऊन जातील, पण खाली कोलमडलेल्या मेस्त्रीला शिदोजी राजे चूपचाप बाहेर घेऊन गेले. रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटारीत बसले आणि निघून गेले.

दुकानदार माझ्याकडे "आ" वासून पहात राह्यला. मला पकडलेल्या नोकरांच्या हाताची पकड सैल झाली. विस्कटलेल्या केसांवरून हात फिरवीत मी दुकानातून बाहेर पडलो. मी कोण, कुठला, त्या गृहस्थाला का ठोकला आणि मारणाऱ्या माणसाला पकडून ठेवलं असताना डेप्युटी मिनिस्टरसारखा माणूस आपल्या मित्राला घेऊन चोरासारखा चुपचाप निघून का गेला हे कोणालाही समजलं नाही!

माझी जेव्हा उतरली तेव्हा मूठ दुखायला लागली. मेस्त्रीची दाढवण नक्कीच ढिली झाली असली पाहिजे!

-o-o-

४०

मद्रास मेल तुफान वेगानं दक्षिणेकडे धावत होती. रेल्वेच्या डब्यात खिडकीजवळ बसून मी बाहेर पहात होतो. दौंड सोडल्यानंतर सपाट अशा भूप्रदेशातून जाताना गाडीनं गती आणखीन वाढवली.

हैद्राबादला मी प्रथमच चाललो होतो, तिथं माझ्या ओळखीचं असं कोणीच नव्हतं! पण मी ज्या कारणास्तव तिकडे चाललो होतो, त्यासाठी कोणाच्या परिचयाची गरजच नव्हती. म्युझियमजवळच्या पटेल लेनमधल्या पारशानं शंभर बाटल्यांची ऑर्डर बुक केली होता. प्रत्येक बाटलीमागे मला तीस रुपये मिळणार होते. म्हणजे शंभर बाटल्यांची एक ट्रिप केली तर नक्त तीन हजार रुपये! गाडीखर्च, वाहतूक, हप्ता असा खर्च अगदी सढळ हातानं जरी केला तरी ट्रिपमागे दोन हजारांना तरी मरण नव्हतं. सुरुवातीला भांडवलाची अडचण होती; पण ती पारशानं सोडवली होती. त्यानं हैद्राबादच्या डीलरला एकवेळ मला क्रेडिट देण्यासाठी पत्र दिलं होतं, त्यात त्याचाही स्वार्थ होताच. मी जर दोन हजार कमावणार असलो तर तो तेवढ्याच मालावर चार हजार कमावल्याशिवाय राहणार नव्हता, आणि तेही जागेवरून न हलता, गल्ल्यावर बसून! आणि जाण्यायेण्याच्या खर्चासाठी थोडे पैसे ॲडव्हान्सही दिले होते.

बर्कतपुरा विभागात एका हॉटेलात मी उतरलो. अंघोळ केली, नाश्ता उरकला. एकदम आठवण आली ती सलिमाची! सलिमाचं प्रेत तिची आई हैद्राबादलाच घेऊन आली होती, तेव्हा इथल्या कबरस्तानातच ती कुठेतरी चिरनिद्रा घेत पडलेली असणार! तिला श्रद्धांजली वहावी असं वाटलं. कोपऱ्यावर फुलवाल्याच्या दुकानात मी एक गेंदेदार गुलाबाचा गुच्छ घेतला आणि रिक्षावाल्याला बोलावलं.

"कहाँ जाना है जी?" कपाळावरचा घाम निपटीत त्या सायकल-रिक्षावाल्यानं मला विचारलं.

"कबरस्तान!"

"कबरस्तान?"

"हाँ, भाई, जब इधरके नबाब लोक गुजर जाते है तो उनको कहाँ दफन किया जाता है?"

"उनका कबरस्तान अलग होता है । वहाँ पर जाना है?"

"हां, चलो!"

मुस्लिमधर्मात काही विशिष्ट दिवशीच मृत नातेवाईकांच्या कबरीचं दर्शन घेण्याला जातात; पण माझ्यासारखा हा अवलिया अधेमधेच कबरस्तानला जायला का मागतो हे काही त्या बिचाऱ्याच्या डोक्यात शिरलं नाही.

सीटवर बुड न टेकताच तो तरुण पोऱ्या सायकल रिक्षा मारत होता. माणसाच्या श्रमावर प्रवास करण्याची ही प्रथा मला काहीशी क्रूर वाटली. पण मी हैद्राबादेत अनोखा होतो. मला रिक्षा केल्याशिवाय गत्यंतर नव्हतं!

कबरस्तानातलं वातावरण अत्यंत शांत असं होतं. ओळीनं उंच अशी निलगिरीची झाडं लावलेली होती. त्यामधून पांढरी शुभ्र अशी थडगी होती. एक की दोन! शेकडो. त्या थडग्यातलं नेमकं सलिमाचं थडगं कोणतं हे शोधून काढणं मला अशक्य होतं.

कोपऱ्यात पीरजादे रहात होता. ही पीरजादे स्मशानाचा व्यवस्थापक असावा. म्हणून मी त्याच्या घराकडे गेलो, पांढरी बनपावाएवढी टोपी माथ्यावर ठेवलेला, दाढी पिकून शुभ्र झालेला असा तो पीरजादे हातातले मणी सरकावीत तोंडानं काहीतरी पुटपुटत होता. मी जवळ जाऊन त्याला सलाम केला. पुण्याहून आल्याचं त्याला सांगितलं. माळेचे मणी स्थिर झाले.

"क्या होना बेटा?"

हात जोडून मी म्हणालो, "देखो चाचाजी, दो अढाई साल पहले पुना में एक लडकीका खून हुआ था! उसकी लाश इधर दफन करने के लिए ला गई थी!"

"अच्छा अच्छा! वो मुजफरखान के लडके के साथ गई थी! ख्याल में आया! क्या नाम था उस लडके का?" स्वत:लाच पीरजाद्याने प्रश्न विचारला आणि आठवल्यानंतर म्हणाला, "हां! दौलतखान! वो भी मर गया बाद में! उसकी भी कबर है इधर!"

"उसको तो सजा हुई थी!" मी म्हणालो.

"हां, वो जेल में मर गया! अमीर का लडका जेलमें जिंदा नहीं रहा!"

"मुझे वह लडकी की कबर दिखाएंगे तो बडी मेहरबानी होगी, चाचाजी!"

पीरजादा उठला. कोपऱ्यातल्या कपाटातून एक जाड असं उर्दूत लिहिलेलं रजिस्टर काढलं अन् मला पाच मिनिटांत सलिमाची अन् दौलतखानची कबर कोणत्या ठिकाणी आहे हे सांगितलं. मी त्या कबरीजवळ गेलो. गुडघे टेकले. गुलाबगुच्छ कबरीवर ठेवला अन् हात जोडले. सलिमा, फक्त एकच रात्र तुझा सहवास घडला! दुसऱ्याच दिवशी तू हे जग सोडून गेलीस! या आयुष्यात पुन्हा तुझं दर्शन घडणं नाही; पण यदाकदाचित् माणसांना जर पुनर्जन्म असलाच तर मी पुढच्या जन्मी तुला शोधून काढल्याशिवाय राहणार नाही.

त्या गुच्छातलं एक फूल मी तोडून घेतलं अन् ते दौलतखानच्या कबरीला वाह्यलं. हात जोडले अन् म्हणालो, "माफ कर! तुला मी फसवलं! तुझे पैसे घेऊन पळून गेलो. अन् जाण्यापूर्वी सलिमाशी..."

"कदाचित् तुम्हा दोघांना मी भेटलो नसतो, तर ही तुमच्या उभयतांच्या आयुष्याची शोकांतिका टळलीही असती! माफ कर दौलतखान!"

कबरस्तानाच्या बाहेर थांबलेला रिक्षावाला मागच्या सीटवर गुडूप झोपला होता. त्याला उठवणं अगदी माझ्या जिवावर आलं होतं; पण माझी चाहूल ऐकून तोच जागा झाला, "बहुत देर हुआ, बाबूजी?"

"नहीं नहीं! मैं अभी आया!"

"चलो बैठो!"

पूर्वीच्याच जोमाने तो सायकल मारू लागला. सीटवर बूड न टेकताच!

रस्त्यावर दुतर्फा संकेश्वरची गेंदेदार झाडं होती. समोर हैद्राबाद शहरातल्या उंच उंच इमारती दिसत होत्या. एका बाजूला हैद्राबादच्या सुप्रसिद्ध चारमिनारचे निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर चार घुमट विलोभनीय दिसत होते.

हैद्राबाद शहर फार मोठं, पण का कुणास ठाऊक, मला ते उजाड, भकास असंच वाटलं! काही शहरांना माणसाप्रमाणं चेहरे-मोहरे असतात. आमची मुंबई पहा सदैव कामात दंग असलेल्या कर्मवाद्याप्रमाणे भासते, पुणं एखाद्या शूचिर्भूत ज्ञानसंपन्न पुरोगामी विचारसरणी असलेल्या गृहस्थासारखं भोसले, सातारा एका जातिवंत क्षत्रियाची आठवण करून देऊन अन्

सांगली एखाद्या लाजाळू तरुणीसारखी दिसेल. पण हे हैद्राबाद मात्र मला नुकतंच कोणालातरी पोहोचवून येऊन पारासमोर बसलेल्या विषण्ण वृत्तीच्या गृहस्थासारखं भासलं.

डीलरशी सौदा झाला. ओळखीच्या पारशाची चिठ्ठी बघितल्यावर त्यानं फार आढेवेढे घेतले नाहीत. सर्व माल खोक्यातून पॅक करण्यात आला त्यावर 'Glass with Care' ची लेबलं चिकटवली गेली.

रोज मुंबईत मद्याच्या शेकडो बाटल्यांची आयात होते हे पोलिसांना ठाऊक नव्हतं असं नाही; पण अव्याहत होणारी अशी मद्याची आयात थोपवून धरण्याला पोलिसही असमर्थ होते! तरीही माझ्यासारखा एखादा अनभिज्ञ आणि नवखा त्या प्रांतात प्रवेश करण्याचा प्रयत्न करू लागला तर पोलीस त्याला नेमका उचलतात हे ठाऊक होतं. तेव्हा हा माझा माल मुंबईत ट्रेनमधून उतल्यानंतर सुरक्षितपणे स्टेशनबाहेर जाईल असा तर्क करणं चुकीचं होतं. माल सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी काहीतरी उपाययोजना करणं अत्यावश्यक होतं. तशात गडकरी प्रकरणातून पोलीस मला चांगलेच ओळखत होते. इझॅकल कमिशनरची आणि माझी चांगली जान पहेचान होतीच; पण तरीही पोलिसी कावा कधी कोणाला सांगता येणार नव्हता! माझा हा माल स्टेशनवर अडवला जाणार, चेक केला जाणार, हे गृहित धरूनच मला काही उपाययोजना करणं अत्यावश्यक होतं. खरं म्हणजे अशी जोखमीची कामं करताना दोन-तीन साथीदार हवेत; पण आता ऐनवेळी मला असे साथीदार कोठून मिळणार?

फर्स्टक्लासच्या डब्यात बर्थखाली बसतील अशी ती खोकी व्यवस्थित बसवली. एक व्हिस्कीची बाटली मी माझ्या ॲटेचीमधे घालून ठेवली. दादर स्टेशनवर फर्स्टक्लासमधून उतरलो आणि थर्डक्लासमधे चढलो. बोरीबंदरला गाडी लागताच साध्या वेषात पोलीस रेल्वे कर्मचाऱ्यांचा बहाणा करीत गुन्हेगार कोण याचा अंदाज करीत प्लॅटफॉर्मवर उभे होते. एका बाजूला रेल्वे पोलीस फोर्सचे ड्रेसमधले लोक बसून होते. वरिष्ठांनी इशारा करताच ते त्यांच्या मदतीला धावण्यासाठी सज्ज असत.

मी त्या गर्दीत माझ्या जवळची व्हिस्कीची बाटली प्लॅटफॉर्मवर टाकली. ती खळकन् फुटली. बाटली फुटताच पोलिसांचं तिकडं लक्ष गेलं. दारूची बाटली फुटली म्हटल्यावर प्लॅटफॉर्मवरचा सारा पोलीस फोर्स त्या जागी तत्काळ धावला. त्या ठिकाणाजवळून चाललेल्या दोन मारवाडी कुटुंबांना पोलिसांनी संशयावरून हटकलं आणि तेथेच उभं केलं. त्यांच्याजवळ भल्या मोठ्या ट्रंका आणि बॅगा होत्या. पोलिसांना आपण दारूची वाहतूक करणारे आरोपी पकडले असं वाटल्यानं ते मोठे खुशीत होते, अन् त्याच वेळी त्यांचं लक्ष नसल्याचं पाहून 'Glass with Care' ही लेबल्स लावलेली ती खोकी हमालांच्या डोक्यावरून बाहेर गेली. फक्त दहा-पाच मिनिटं पोलिसांची दिशाभूल करणं अत्यावश्यक होतं आणि ते नेमकं मी साधलं होतं. पारशानं माझ्या या मोहिमेचं कौतुक केलं. चार दिवसांत दोन-अडीच हजारांची प्राप्ती झाल्यानं आता यापुढं हा किफायतशीर धंदा सोडू नये असंच वाटलं; पण प्रत्येक वेळी हीच ट्रिक चालणार नव्हती. मुंबईचे पोलीस एकदा बनतील; पण रोज उठून त्यांना म्हणाल तर अं ऽ हं! बेटे अत्यंत हुशार, उगाच नाही, मुंबईच्या पोलीस खात्याला इंडियन स्कॉटलंड यार्ड म्हणत!

राजकन्येची प्रकृती चांगलीच सुधारली होती. दुसऱ्या खेपेला मी तिलाच हैद्राबादला घेऊन जायचं ठरवलं. साथीदाराची गरज होती. अशी एक सुस्वरूप तरुण स्त्री साथीदार, ही दहा पुरुष साथीदारांची बरोबरी करू शकणारी होती!

त्यानंतर दहा-वीस वेळा मी हैद्राबादच्या खेपा केल्या अन् त्याही राजकन्येबरोबर. पण प्रत्येक वेळी मालाची वाहतूक करताना निरनिराळं तंत्र वापरलं. कधी सर्व माल कल्याणलाच

उतरवला तर कधी पुण्यातच. तर कधी बोरीबंदरवर. माल खाली उतरून न घेता गाडी यार्डात जाऊन थांबल्यानंतर माल उतरून घेतला. यासाठी मला यार्डात काम करणाऱ्या लोकांना सामील करून घ्यावं लागलं होतं.

हाती पैसा आल्यामुळं 'स्टॅबिलाइज्ड' झालो होतो. राजकन्येची प्रकृती इतकी चांगली झाली की, ती कधीकाळी आजारी होती अन् ते दुखणं हिच्या जिवावर बेतलं होतं हे कोणाला सांगूनही पटणार नव्हतं!

मी बाहेरून आलो तेव्हा राजकन्या पांढरी साडी आणि पांढरा ब्लाऊज घालून केस मोकळे सोडून पेपर वाचत बसली होती.

''समर, ही बातमी वाचलीस?''

''कोणती?''

''मेस्त्रीला चीटिंगखाली अटक झालीय दिल्लीत!''

''बरं झालं.''

''शिवाय या बातमीत म्हटलंय, की या आरोपीच्या मागे कोणी जबरदस्त अशी व्यक्ती असावी अशी शंका दिल्लीच्या पोलीस खात्यानं व्यक्त केली आहे.''

''शिदोजी राजेंच्याशिवाय तो दुसरा कोण असणार? दोघे एकत्र वावरताना मी स्वत: एकदा पाह्यलं होतंच. पण खरं सांगू राजे, मेस्त्री काय अन् शिदोजी राजे काय, यांचं कोणीही वाकडं करू शकणार नाही. सत्ता आणि पैसा एकत्र असला की, भलेभले गुन्हेगार निर्भयपणे वावरतात. त्यांची वेळच भरावी लागते.''

''समर, ते राहू दे, पण मला सांग, तू उल्काकडे यापुढं अजिबातच जाणार नाहीस?''

राजकन्येनं अनपेक्षितरित्या मला तो प्रश्न विचारला तेव्हा मी म्हणालो, ''असं काही नाही, पण मला मुद्दाम होऊन तिच्याकडे जायचं नाही. खरं म्हणजे उल्कानं मला घराबाहेर जा म्हणून सांगितलं यात तिची काहीसुद्धा चूक नव्हती, राजे! तिच्या हाती ते पत्र पडलं आणि सारा घोटाळा झाला!''

''पण काय रे समर, तू असा तारेवरचा नाच किती दिवस करत राहणार?''

''काय करू? मला यातून बाहेरच पडता येईनासं झालंय. खरं म्हणजे मला भवानीनगरला जायला हवं होतं. अलकाचं तातडीचं पत्र आलं होतं, पण त्याच वेळी तुम्ही दवाखान्यात ॲडमिट झाल्याचं समजलं आणि भवानीनगरला जायला हवं हे विसरूनच गेलो मी!''

''छान! स्वत:ची बायको ज्या वेळी दवाखान्यात जाते तेव्हा तू दुसऱ्या स्त्रीच्या सुश्रूषेला! तुझं कसं व्हायचं रे समर?''

''आता व्हायचं काय शिल्लक राह्यलंय, राजे? सगळ्या आयुष्याचे तीन-तेरा वाजलेलेच आहेत.''

''पण मला मात्र वाटतं बरं का समर, माझ्यामुळे तू बदनाम होऊ नयेस!''

''तुमच्या सदिच्छेबद्दल आभारी आहे!'' उपरोधानं मी म्हणालो आणि हसलो.

याच सुमाराला मला पैसे कमावण्याचा आणखीन एक मार्ग सुचला. या मार्गानं पैसे कमावण्यासाठी मला मुंबईबाहेर जावं लागणार नव्हतं.

मुंबईच्या रेसकोर्सवर काही प्रायव्हेट बुकीज बेकायदेशीररित्या बेटिंग घेत. ते लोक कोण आहेत हे मला ठाऊक होतं. त्यांना धमकी देऊन किंवा भीती घालून पैसा उकळणं काही कठीण नव्हतं. अशा तऱ्हेचं खाजगी बेटिंग घेण्याला टर्फक्लबची मनाई तर होतीच, पण कायद्यान्वयेही ते गुन्ह्याचं कृत्य ठरत असे.

मुंबईच्या रेसकोर्सला महालक्ष्मीचा रेसकोर्स म्हणतात. पण तिथं जुगार खेळायला येणाऱ्या कितीजणांना ही महालक्ष्मी प्रसन्न झालीय कुणास ठाऊक! पण मला मात्र ती आताशी चांगलीच प्रसन्न झाली. मुंबईचे धनाढ्य असे भाटिये, पारशी प्रायव्हेट बुकिंग घ्यायचे अन् मी भीती घातल्यामुळे ते निमूटपणे मला हप्ता देऊ लागले.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात अशा एक काळ येतो की, त्यावेळी त्यानं काही केलं तरी त्यात यश मिळतं. माझ्या आयुष्यात हा असाच काळ आला होता. हैद्राबादची एक ट्रिप केली की मला चार-पाच हजार रुपये मिळत होते. महालक्ष्मीवर रेसच्या दिवशी तीन-चार हजार रुपये खंडणी वसूल होत होती; पण फुकटचा पैसा मला स्वस्थ बसू देत नव्हता. उत्तम प्रकारचे कपडे वापरावे, चैनीच्या वस्तूंचा पुरेपूर आस्वाद घेणं याशिवाय मला काही सुचत नव्हतं. आता या वेळी मात्र राजकन्या मला सावरू लागल्या. ज्या वेळी त्या पैशाची उधळपट्टी करीत होत्या तेव्हा मी त्यांना सावरत होतो आणि आता त्या मला सावरत होत्या, पण मी ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हतो.

पहिल्या पत्रानंतर दोन महिन्यांनी मला अलकाचं दुसरं पत्र आलं होतं. ती सुखरूप बाळंत होऊन मुलगी झाल्याचं तिनं मला कळवलं होतं. पण मी डिलिव्हरीच्या वेळी न आल्यानं तिनं नाराजी व्यक्त केली होती. निदान मुलीच्या नामकरण-समारंभासाठी तरी यावं असं तिनं सुचविलं होतं; पण पुन्हा दुर्दैव! त्या दिवशी महालक्ष्मीवर फार मोठी रेस होती. प्रायव्हेट बुकिंग भरमसाट होणार म्हटल्यावर माझी प्राप्तीही त्याच प्रमाणात वाढणार होती. अलकाला तार करून माफी मागण्याशिवाय मला दुसरा पर्याय नव्हता.

गव्हर्नर कपची रेस चालू होती. प्रायव्हेट बुकिंगकडून मी माझी खंडणी वसूल केली होती. क्रीम कलरचा सिल्कचा सूट, टाय, डोळ्यावर तिरकी डर्बी फेल्ट घालून मी डोळ्याला दुर्बिण लावून सर्टिंग पॉइंटवरून सुटणाऱ्या घोड्यांचं निरीक्षण करण्यात मग्न होतो. आज मला अपेक्षेपेक्षा अधिक प्राप्ती झाली होती. गव्हर्नर कपच्या रेसला भरमसाट बेटिंग झालं होतं, अन् प्रायव्हेट बुकिंगकडून मीही अधिक हप्ता वसूल केला होता. माझ्या चालण्याबोलण्यावरून त्या लोकांना वाटायचं की, हा कोणीतरी पोलिसांचा हस्तकच आहे. त्याला दुखवलं तर आपला हा किफायतशीर धंदा बंद पडेल!

स्टॉलवर मी डोळ्यांना दुर्बिण लावून उभा होतो, तेव्हा माझ्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला. मी डोळ्याची दुर्बिण खाली करून खांद्यावर हात ठेवणाऱ्याकडे पाह्यलं. माझ्या पाठीमागे दोन धिप्पाड पोलीस अधिकारी होते. एकाच्या हातात रुमालात दडवलेली हातबेडी होती. तो मला म्हणाला, "मिस्टर ठाकूर, यू आर अंडर अॅरेस्ट! सरळपणानं याल तर बरं होईल, नाहीतर बेड्या घालून न्यावं लागेल!"

"ओ. के. आय ॲम कमिंग!"

तिथं रेसकोर्सवर तमाशा करण्यात अर्थ नव्हता. पोलीस अधिकाऱ्यांनी मला टर्फ क्लबच्या स्टुअर्टच्या ऑफिसात आणलं आणि माझ्यासमोर एक कागद धरला.

"मिस्टर ठाकूर, या कागदावर नंबर लिहिलेल्या नोटा तुमच्या खिशात आहेत. त्या बाहेर काढा! प्रायव्हेट बुकिंगकडून तुम्ही पैसे गोळा करता अशा तक्रारी आमच्याकडे आल्यावरून तुम्हाला आज अगदी रेडहँडेड पकडण्यात आलेलं आहे!"

दुसरा पोलीस अधिकारी म्हणाला, "हैद्राबादवरून चोरटी दारूची आयात केल्याचाही वहीम तुमच्यावर आहे. पण प्रत्येक वेळी तुम्ही दारू आयातीचं निराळं तंत्र वापरल्यानं आम्हाला पकडता आलेलं नाही."

पोलिसांनी रेसकोर्सवरचे दोन पंच बोलावले. बाहेर रेसशौकीन घोडी विनिंग पोस्टजवळ

येताच मोठमोठ्यानं ओरडत होते अन् आत ते पोलीस अधिकारी शांत चित्तानं माझ्या अंगझडतीचा पंचनामा लिहीत होते.

"पलीकडे फर्स्टक्लास विंगमध्ये प्रिन्सेस आहेत, त्यांना जरा बोलावून आणाल का?" मी विचारलं.

"हा पंचनामा झाल्यानंतर!"

"चालेल! पण त्या मला शोधत राहतील!"

त्यांपैकी एका पोलीस अधिकाऱ्याला माझी दया आली. त्यानं कॉन्स्टेबलला राजकन्येचं वर्णन सांगितलं. राजकन्येला मी कोणत्या अवस्थेत आहे याची कल्पनाच नव्हती. स्टुअर्टच्या ऑफिसात येताच मला अटक झाल्याचं पाहून त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. माझ्या हातात हातकड्या होत्या! "राजे, भिण्याचं काही कारण नाही! फक्त चांदोरकर वकिलांना भेटून माझ्या जामिनाचा अर्ज द्यायची व्यवस्था करा! हे काही फारसं सीरियस नाही. या लोकांना माझ्यावर केस शाबित करणं फार कठीण जाईल!"

निर्ढावलेल्या गुन्हेगारासारखा मी बोलून गेलो. राजकन्या एक हात छातीवर ठेवून जोरजोरानं श्वासोच्छ्वास करीत होत्या!

मुंबईच्या प्रमुख वर्तमानपत्रातून दुसऱ्या दिवशी ती बातमी फ्लॅश झाली. मुंबईच्या पोलिसांना हवा असलेला 'जंटलमन' गुन्हेगार शेवटी चतुर्भुज! फोटोसहित ती बातमी प्रसिद्ध झाल्यानं मला थोडं वाईट वाटलं! पण वाईट वाटण्यासारखं त्यात काय होतं? जाणूनबुजून मी विस्तवाशी खेळत होतो. केव्हा ना केव्हा हात भाजणारच होते.

माझा जामिनाचा अर्ज फेटाळण्यात आला. पोलिसांनी माझ्याविरुद्धच्या आरोपांची लांबलचक अशी यादी तयार केली होती. गडकरी मर्डर केसपासून माझ्या हालचालींवर पोलिसांचं लक्ष केंद्रीत झालं असल्याचं मला आढळून आलं!

तिसऱ्या दिवशी राजकन्या मला पोलीस कोठडीत भेटायला आल्या, डोळे भरलेले, प्रथम त्यांना काही बोलताच येईना!

"समर, मी इझॅकलसाहेबांकडे जाऊन आले. ते पेन्शनीत गेले!"

"ते मला ठाऊक आहे, पण वकिलांनी आर्ग्युमेंटस केली की नाही मला जामिनावर सोडावं म्हणून?"

"केली, पण कोर्टानं तो अर्ज फेटाळून लावला! तुझ्यावर हद्दपारीचं काम सुरू करणार असल्याचं सरकारी वकिलांनी सांगितलं. तुझ्याविरुद्ध साक्ष द्यायला जवळजवळ दोनशे साक्षीदार तयार आहेत म्हणे!"

"असं? पण तुम्ही एक करा. आजच्या आज मुंबई सोडा!"

"अन् कुठं जाऊ?"

"कुठंही जा. हवं तर रावेरला जा; महाराजांची माफी मागा; पण इथं मात्र राहू नका! कदाचित् माझी साथीदारीण म्हणून तुम्हालाही पोलीस एनटँगल करतील अशी मला भीती वाटते!"

"पण मी तुला अशा अवस्थेत सोडून जाईन असं वाटतं?"

"राजे, ऐका, असा हट्टीपणा करू नका! इट इज ए व्हेरी सीरियस मॅटर!"

"अरे, पण त्यांना जर मला अडकवायचंच असेल तर रावेरला येऊन इकडे आणता येणार नाही का? तुझी केस चालवण्याचं कोण बघणार?"

"माझा मी समर्थ आहे. चांदोरकरांकडे पाच हजार रुपये देऊन ठेवा आणि तुम्ही मुंबई सोडून जा!"

"मी जाऊ शकत नाही! मला बाहेर रहाण्याऐवजी तुझ्यासमवेत इथं पोलीस कोठडीत रहायला आवडेल!"

वैतागून मी म्हणालो, "मरा तर मग!"

राजकन्येनं माझ्या सुटकेसाठी प्रयत्नांची शिकस्त केली. चांदोरकर वकिलांच्या जोडीला एक बॅरिस्टरही दिला. माझी केस बरेच दिवस चालली होती. शेवटी मी केसमधून निर्दोष सुटलो. ते प्रायव्हेट बुकीज होस्टाईल झाले. पोलिसांना आपली केस माझ्याविरुद्ध शाबित करता आली नाही; परंतु त्या दिवसापासून पोलिसांची माझ्यावर करडी नजर राहिली. थोड्याच दिवसानंतर मला हद्दपारीची नोटीस लागली, तेव्हा मात्र मी ओळखलं की, आता मला मुंबईत वास्तव्य करणं अशक्य आहे.

तरीही त्या हद्दपारीच्या कामात आपलं म्हणणं मांडण्याचा मी निर्धार केला.

उभी मुंबई आता मला ओळखू लागली होती. मीही काही पूर्वीचा राह्यलो नव्हतो. मन बेडर झालं होतं. मला कोणी सज्जन म्हणावं असा माझाही अट्टाहास नव्हता. माझं काहीही झालं तरी त्याला तोंड द्यायची माझी तयारी होती मला चिंता होती ती फक्त राजकन्येची! माझ्याविना ती मात्र निराधार होणार होती. अलका, उल्का स्वत:च्या पायावर उभ्या रहायला समर्थ झाल्या होत्या, पण राजकन्या? केवळ राजघराण्यात जन्म झाला एवढं भांडवल जगण्याला पुरेसं नव्हतं! पोटगी बंद झाली होती, वाटणीला आलेल्या संपत्तीची धुळधाण झाली होती, कोणाचा आसरा नव्हता! राजकन्येची विवंचना मला रात्रंदिवस जाळत होती. शेवटी मी निर्णय घेतला अन् रावेर गाठलं!

राजकन्येचे श्वशुर रावेरचे थोरले महाराज यांचे पाय धरले आणि म्हणालो, —

"महाराज! रत्नप्रभाराजेंच्या हातून घडू नये ते घडलं, पण आता शेवटी त्यांना तुमच्याशिवाय दुसरा कोणाचाही आधार उरलेला नाही! आपण मन मोठं केलंत आणि त्यांना संपत्तीची वाटणी दिलीत; पण त्यांच्या सिनेमाच्या वेडापायी त्यांची सर्व धुळधाण झाली. माझे प्राण त्यांनी वाचवले होते; म्हणून मी त्यांना आजवर सांभाळून घेण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्या आज डोळ्याला दिसताहेत! पण यापुढं माझं काही खरं नाही. पोलिसखातं हात धुऊन माझ्यामागं लागलेलं आहे. माझं काहीही भलंबुरं होवो, माझी एवढीच इच्छा आहे की, तुम्ही त्यांना इथं राहायची परवानगी द्या. दोन वेळच्या अन्नाशिवाय त्यांना काहीही नाही दिलं तरी चालेल!"

रावेरचे महाराज माझ्याकडे पाहून हसले आणि म्हणाले, "ठाकूर, खरंच तू शहाणा आहेस!"

"मी कसला शहाणा महाराज? माझ्यासारखा मूर्ख कोणीही नसेल! लग्नाच्या दोन बायका मी सोडल्या. मुंबईत बेताल असं जीवन जगलो. जुगार, मद्य, रेस आणि बायका यांशिवाय मला दुसरं काही ठाऊक नव्हतं! पण आता ते फार काळ चालणार नाही! नियतीनं माझ्यावर सूड उगवायचं ठरवलं आहे! आता माझी यातून सुटका होणं नाही! मेलो तरच सुटलो. पण हवं तेव्हा मरण यायला मी काही पुण्यवान नव्हे! नीतिअनीती न मानणाऱ्या समाजातल्या उच्चस्तरात वावरणारा एक लफंगा, याशिवाय मला दुसऱ्या कोणत्याही दृष्टीनं लोक पहाणार नाहीत! माझी एवढी शेवटची विनंती मान्य करा महाराज! हात जोडतो आपणाला!"

"ठीक आहे! पण तिला राजवाड्यात राहता येणार नाही!"

"नसेना! कुठंही एखादी लहानशी जागा द्या, वस्त्र, निवारा अन् अन्न झालं की पुरे!"

"पण एकदा इथं आल्यानंतर तिला इथून परत जाता येणार नाही! गेलीच तर परत

रावेरच्या वेशीतून ती आत येऊ शकणार नाही!''

''कबूल महाराज, कबूल! आपल्या साऱ्या अटी बिनशर्त मान्य!''

-o-o-

४१

राजकन्या काही केल्या ऐकायला तयार नव्हत्या. माझ्या वाटेला येणाऱ्या कसल्याही खडतर आयुष्यात त्यांना भागीदारी करायची होती; पण मला माझं भवितव्य स्पष्ट दिसत होतं. मुंबईतून माझी हकालपट्टी होणार होती. हद्दपारीचं प्रकरण मी कितीही जिद्दीनं लढवलं तरी ते माझ्या उलट जाणार होतं; पण माझ्यातला राज-क्षत्रिय इरेला पेटला होता. मी अशी सहजासहजी मुंबई सोडायला तयार नव्हतो! तो माझा पराजय ठरला असता!

राजकन्येला बळेबळेच रावेरला घेऊन गेलो. महाराजांनी आपला शब्द पाळला. राजवाड्याच्या परिसरात एक छोटा बंगला होता, तो राजकन्येला देण्यात आला. कायमची अशी मोलकरीणही त्यांच्या दिमतीला देण्यात आली. खरं म्हणजे एखाद्यानं अशा बदफैली सुनेला परत आश्रय दिलाच नसता; पण महाराजांनी विचार केला, किती जरी झालं तरी आपल्या मुलाशी तिचा विवाह झालेला आहे, जोपर्यंत कायदेशीर विवाहविच्छेद झालेला नाही, तोवर ती आपली सूनच राहणार आहे. घटस्फोटाची प्रथा अन् रुढी खानदानीत नसल्यामुळे घटस्फोटही देता येत नाही. पुण्या-मुंबईत रस्त्यावरून येता जाता हिला 'ही पहा रावेरची राणी' असं लोकांनी बोट दाखविण्यापेक्षा इथं राजवाड्याच्या परिसरात डांबून ठेवलेलीच बरी! शिवाय जवळ जी काही 'माया' होती तिची वाट लागल्यानं तिचा नक्षाही पुरा उतरलेला असेल!

राजकन्येला तिथं सोडून येताना मी खूप खूप रडलो. आयुष्यात असा कधी रडलो नव्हतो. डॅडी आणि आई गेल्यानंतर जे दु:ख झालं तितकंच तीव्र असं हे राजकन्येच्या वियोगाचं दु:ख होतं.

मुंबईला आलो तेव्हा सदैव गजबजलेली ही मुंबापुरी मला ओकीओकी वाटू लागली. राजकन्येच्या त्या दोन खोल्यांत मी राहू लागलो, माझ्या हद्दपारीचं काम जेव्हा सुरू झालं तेव्हा मीच विचार केला, कशाला उगाच हे काम चालवायचं? त्यापेक्षा स्वखुशीनं मुंबई सोडून गेलो तर?... पण जाणार कुठं?

भवानीनगर!

जाण्यापूर्वी उल्काचा निरोप घ्यावा म्हणून बांद्र्याला गेलो. लिलियन मार्टिन फिश मार्केटजवळ भेटली.

"हॅल्लो ऽ समर! हल्ली तू कुठं असतोस?"

"दादर!"

"राजकन्येकडं वाटतं?"

"नाही, त्या मुंबई सोडून गेल्या, मीही चाललो!"

"कुठं?"

"भवानीनगर!"

"कायम?"

"पुढचं पुढं! सध्यातरी जायचा निर्णय घेतला आहे! जाण्यापूर्वी उल्काची भेट घ्यावी म्हणतो!"

उल्काचं नाव काढताच लिलियन दचकली अन् काहीशी गंभीर होऊन म्हणाली,—

"प्लीज, डोंट सी हर!"

"म्हणजे? का भेटू नको?"

"काय ठाऊक आहे? गेल्या रविवारी तिनं लग्न केलं!"

"काय सांगतेस काय?"

"हो, चर्चच्या समोर ती चार मजली इमारत आहे ना, तिथल्या विल्यम बरोबर!"

"माय गॉड! उल्कानं त्याला पसंत केला?"

"हो, आमच्या माँटेसरीत फिजिकल ट्रेनिंगसाठी त्याला नेमून घेतलं होतं आम्ही, तसा स्वभावानं फार चांगला आहे! बरेच दिवस उल्काचा निर्णय होत नव्हता; पण शेवटी तिनं ठरवलं! तुझा काही विरोध आहे का?"

"हं! लिलियन, विरोध कशाला करू? आजपर्यंत ती माझ्याशी एकनिष्ठ राहिली; पण मी मात्र कधी तिच्या इच्छेप्रमाणे वागलो नाही! माझ्या स्वभावातच ते नाही तर आणू कोठून? बरं झालं! मे गॉड ब्लेस हर!"

माझी पावलं पुढं जायला तयार होईनात. चालता चालता चर्चचं टोक दिसलं, तेव्हा मी लिलियनला म्हणालो,—

"माझं काँग्रॅच्युलेशन्स सांग!"

"सांगते! समर, विल्यमनं तिचा सर्व पूर्वेतिहास समजूनदेखील लग्नाचा निर्णय घेतला आहे. पण तू तिला याबद्दल त्रास तर देणार नाहीस ना?"

"लिलियन, तू मला ओळखलंच नाहीस! चुकूनही मी तिच्या वाटेला जाणार नाही! एवढंच काय, यापुढं तिला भेटणार देखील नाही! आणखी एक विवंचना मिटली!"

"आणखी एक म्हणजे?"

"राजकन्या रावरेला गेल्या! ती एक विवंचनाच होती! चला, सुटलो! पाय अडत होता तो उल्कासाठी; पण तिनं फार चांगला निर्णय घेतला. विल्यमला मी ओळखतो. चांगला समजूतदार तरुण आहे तो! पण काय ग ती लग्नापूर्वी खिश्चन झाली का?"

"अर्थात!"

"बरं झालं?"

"पण अजून तिला वाटतं की, तू काहीतरी त्रास देशील!"

"तिला तसं वाटण्याचं काही कारण नाही! तू सांग, तू केलंस ते अगदी योग्य असंच केलंस! माझ्या आयुष्याला निश्चिती अशी आजपर्यंत लाभलेली नाही, यापुढं लाभेल असा भरवसा नाही."

"बरं झालं तू भेटलास! जेवायला येतोस?"

"आज नाही! पुन्हा कधीतरी येईन! पण लिलियन, माझ्यासाठी तू एक काम कर! मी एक वस्तू देतो ती उल्काला नेऊन दे!"

बाजूच्या दुकानातून मी गुलछडीचा एक गुच्छ विकत घेतला अन् लिलियनकडे देऊन म्हटलं, "उल्काला दे हा अन् सांग, आय वुइश हर ए लाँग अँड हॅपी मॅरीड लाइफ!"

इतकं बोलून मी झटकन् वळलो. कारण माझा कंठ दाटून आला होता अन् पापण्या ओल्या झाल्या होत्या, मला अधिक बोलता येणं शक्य नव्हतं.

उल्का! ढगाळ अशा अंधाऱ्या रात्री आकाशाचा एखादा कोपरा स्वच्छ व्हावा आणि त्यातून चमकणारी उल्का दिसावी तशीच ती माझ्या आयुष्यात आली होती. अलकानं माझ्याशी प्रतारणा केली या समजुतीनं मला घर सोडावं लागलं होतं, त्या वेळी उल्कानं माझ्या

आयुष्यात प्रवेश केला होता; पण मुंबईत आल्यानंतर ती नोकरी मिळत नाही म्हणून निराश झाली. निराशेच्या पोटी जन्मली ती वैफल्यावस्था! आणि त्यातूनच ती व्यसनाधीन झाली! खरं म्हणजे त्यात तिचा अंतच व्हायचा; पण नशीब सिकंदर! व्यसनमुक्त होऊन ती पुन्हा स्वत:च्या पायावर उभी राहिली.

मला आलेलं अलकाचं ते पत्र वाचल्या क्षणापासून तिनं निर्णय घेतला. मला घरातून बाहेर घालवून, स्वत:च्या मनातूनदेखील तिनं माझं उच्चाटन केलं! काय वावगं केलं तिनं? आज तिनं लग्न केल्याची वार्ता समजल्यावर मी का दु:ख करून घ्यावं?... उल्का, फार छान केलंस! अगदी योग्य असा निर्णय घेतलास तू!...

असे विचार मनात येत होते. पण डोळे मात्र घळघळ वाहत होते, माझ्या आयुष्यातलं आणखीन एक पर्व संपलं!

मला भवानीनगरला आल्याचं पहाताच अलकाला अतिशय आनंद होईल असं वाटलं होतं. पण अलकानं माझं अगदीच थंड स्वागत केलं. मी माझी मुलगी पहायला उत्सुक होतो; पण ती दाखवायला अलका मात्र उत्सुक नव्हती.

पाळण्याजवळ जाऊन पाह्यलं. मोठे टपोरे डोळे, गोरा रंग, नाकाची ठेवण बिलकूल माझ्यासारखी! त्या मुलीला पहाताच मला माझ्या आईची आठवण झाली. जीर्ण झालेलं शरीर टाकून आई पुन्हा या मुलीच्या रूपानं घरी अवतीर्ण झालीय, असंच वाटू लागलं!

डिलिव्हरीच्या वेळी मी आलो नाही म्हणून अलका रागावलेली आहे, हळूहळू तिचा राग कमी होईल असं वाटलं होतं. पण अलका अबोला सोडायला तयार नव्हती! पतिपत्नीमधले मतभेद अन् दुरावा मूल जन्मलं की संपतात असं म्हणतात; पण निराळाच अनुभव येऊ लागला.

मुंबईमध्ये गतिमान असं आयुष्य जगलेला मी, इथं आल्यापासून कसंसंच वाटायला लागलं, मग ठरवलं, की शेतावर जायचं! अमर शेतावर रहायला तयार होता; पण त्याची बायको रहायला तयार नव्हती; शेवटी मी एकट्यानंच शेतावर रहायचं ठरवलं. तिथं आल्यानंतर अधिकच एकाकीपण जाणवू लागलं.

आजपर्यंत आयुष्यात मी काय कमाई केली? काही नाही! जुगार, रेस, दारू आणि बायका! सलिमा, कुमारी, उल्का, अलका आणि राजकन्या! पाच स्त्रिया. त्यांपैकी सलिमा फक्त एकच रात्र माझ्या सहवासात आली! बाकीच्या थोड्या अधिक काळ माझ्या सहवासात राह्यल्या! पण तो खरंच तारेवरचा नाच होता! आता तो संपला! एकमार्गी जीवन कंठावं म्हटलं तर अलका अबोला धरून बसलेली!

जाऊ दे! मरू दे! मला यापुढं कोणाचंच तोंड पहायचं नाही! जे आजपर्यंत घडलं ते सारं मला विसरायचं आहे! आयुष्याच्या पाटीवर झालेली ही गिजबीट पुसून टाकायची आहे! पण हे कसं शक्य आहे?....

आहे! तेही शक्य आहे! स्वत:ला मद्यपी बनवलं तर सारं विसरून जाता येतं!

छे ऽऽऽ! पण असं मद्यपी बनलं की लिव्हर खराब होते. सिरॉसिस होतो, मृत्यू ओढवतो! मग त्यात बिघडलं कुठं? अशा अवस्थेत जगलो काय अन् मेलो काय दोन्हीही सारखंच!

शेतावर देखरेख करून मन रमवण्याचा खूप खूप प्रयत्न केला; पण मधेच रेसकोर्सवर धावणारी घोडी दिसायची. आठव्या मजल्यावरून खाली पडलेलं गडकरी इन्स्पेक्टरांचं प्रेत दिसायचं, तर कधी दाऊद मोहम्मद अरबानं माझा चष्मा फोडल्याचं आठवायचं! छे! नको-नको त्या आठवणी! आय वॉन्ट टु फर्गेट माय पास्ट!...

जी अवस्था उल्काची झाली होती तीच माझी झाली यावेळी! रात्रंदिवस मी बाटली हाताशी बाळगू लागलो, अन् तीही कंट्री—हातभट्टी. पायाचं जुनं दुखणं पुन्हा उद्भवलं. गुमानसिंगनं हॉकीची स्टिक मारल्यानं दुखावलेला गुडघा मला उभंदेखील राहणं मुष्कील करू लागला. पायाला पट्ट्या बांधून मी शेतातल्या घरात चालण्याचा प्रयत्न करू लागलो, पण दारू चढली की तोल जाऊन कोलमडून पडत होतो.

अलका किंवा अमर यांना मी रात्रंदिवस दारू पितो आहे हे समजलं होतं; पण त्या दोघांपैकी एकहीजण मला परावृत्त करण्यासाठी पुढं आले नाहीत. माझी कोणाला गरजच नव्हती!

कुशाबा मात्र हात जोडून सांगायचा, ''मालक खरं न्हवं हे! ही बया घातकी हाय!'' त्यावर मी हसून म्हणायचो, ''कुशाबा, बायकांचा फार अनुभव घेतलाय रे मी! पाच झाल्या ही आता सहावी.'' असं म्हणून मी हातभट्टीची बाटली कुरवाळायचो!

पण साली दारू मला संपवायला तयार नव्हती. माझं लिव्हर लोखंडाचं होतं की काय कोण जाणे! आता गेली पाच वर्षं मी ही हातभट्टी पितो आहे तरी मी मरत नाही. साले हे कंजारभाट रसायनात सल्फेट, नवसागर घालतात, दारूत का नाही मिसळत ते?

त्यानंतर मला आलेला तो पॅरॅलिसिसचा ॲटॅक! डावी बाजू लुळी पडली. हात उचलता येत नाही, तोंड वाकडं झालं आहे! कोणी धरल्याशिवाय पाच पावलं चालता येत नाही. कानाला ऐकू मात्र चांगलं येतं; पण खरं सांगू, कान बधिर झाले असते तर फार चांगलं झालं असतं. जे कानावर येऊ नये ते नेमकं येतं! अलका ज्या हायस्कूलमधे नोकरी करते त्या हायस्कूलचा हेडमास्तर म्हणून ठोंबरे परत आला आहे! प्रोफेसरचा हेडमास्तर झाला! का? कशासाठी? कोणासाठी? गणित कठीण वाटलं? पण उत्तर फार सोपं आहे!...

उल्कानं लग्न तरी केलं, पण अलकानं हे काय चालवलं आहे? पाच वर्षांची मुलगी असताना? पण मुलगी तुझीच याची काय गॅरंटी आहे? पाच वर्षांपूर्वी तू फक्त एकदाच...! जाऊ दे. नको तो विषय! बाटली कुठंय?...

आता बाटलीही संपली. सहावी बयाही सोडून गेली. दारू हवी म्हणायला तोंड उघडता येत नाही. कुशाबा अर्धी भाकरी अन् ताक कुस्करून माझ्यासमोर ठेवतो. नशीब 'लुलू' म्हणत नाही. अशी ही माझी कर्मकहाणी! डोळ्यांसमोर उभा रहातो तो बूमरँग! ऑस्ट्रेलियातील एक जमात या हत्यारानं शिकार करायची! फेकलं की प्राण्याला जायबंद करून परत शिकाऱ्याच्या हातात येणारं ते अस्त्र आठवतं! मीही तसाच एक बूमरँग घेऊन शिकार करायला निघालो होतो... पण ते सालं माझ्या हाती न येता माझ्यावरच चालून आलं! असलं काहीतरी विचित्र घडलंय! बूमरँग माझ्यावरच उलटलंय!''

दुसरा भाग समाप्त

0-0-0